Sanskrit Vidyā Parisanstha, Poona 30

The Late Vasudeo Shastri Abhyankar

Publication Series No, 11

General Editor– Prof. K. V. Abhyankar, M. A.

Vaiyākarana-Sidhānta Kaumudi

of

Bhattoji Dixit

PART V

(Vaidikī Prakriyā)

(With Balabodhinī Commentary and translation in Marathi)

by

Prof. Mahadeo Damodar Sathe

M.A.L.T.

Author of ' Laghu Siddhānta Kaumudi ' with translation & exhaustive Notes in Marathi; ' Vaiyākarana Siddhānta Kaumudi ' parts I, II, III & IV in this series. Panini and Pāninīya Sampradāya etc. etc.

Published with the financial assistance from the Ministry of Education, Govt. of India.

December 1970

Price Rs. 3-75

॥ श्रीः ॥

संस्कृतविद्यापरिसंस्था–पुणें ३०

कै. म॰ म. वासुदेवशास्त्री अभ्यंकर – ग्रंथमाला.

प्रसंपादक : प्रा. काशिनाथ वासुदेव अभ्यंकर, एम्. ए.

(कार्याध्यक्ष — सं. वि. परिसंस्था, पुणें)

पुष्प–अकरावें

भट्टोजि दीक्षित–विरचित

वैयाकरण–सिद्धान्त–कौमुदी

[भाग पांचवा]

वैदिकीप्रक्रिया

(मराठी बालबोधिनी टीकेसह विस्तृत अनुवाद)

संपादक

प्रा. महादेव दामोदर साठे

एम्. ए., एल्. टी.

'लघुसिद्धान्त कौमुदी'–विस्तृत विवेचनासह मराठी अनुवाद',
'वैयाकरण सिद्धान्त कौमुदी', चा मराठी
'बालबोधिनी' टीकेसह अनुवाद', भाग, १–२–३ व ४;
'पाणिनि व पाणिनीय व्याकरण संप्रदाय',
इत्यादि पुस्तकांचे कर्ते.

एप्रिल १९७०

प्रकाशक :

श्री. नी. दा. अभ्यंकर, बी. ए.

कार्यवाह, ‘ सांस्कृतिक संशोधन व प्रकाशन समिति ’

‘ संस्कृत विद्या परिसंस्था ’,

संस्कृत पाठशाळा, फडतरे चौक,

६३५ सदाशिव पेठ, पुणें ३०

आवृत्ति पहिली, प्रती ५००

मुद्रक :

पु. म. गोखले, जयश्री प्रेस,

१३९७ शुक्रवार (नवा) पेठ, पुणें

अर्पण-पत्रिका

कै. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक

यांस

त्यांचा वैदिक भाषेचा गाढ अभ्यास, ज्ञान व संशोधन

आणि

चिरंतन मूल्याची ग्रन्थनिर्मिति यासाठीं हा ग्रन्थ आदरपूर्वक अर्पण करीत आहे.

म. दा. साठे

प्रस्तावना

'"विद्या ह वै ब्राह्मणमाजगाम गोपाय मां शेवधिष्टेऽहमस्मि ।
असूयवेऽनृजवेऽयताय न मा ब्रूया वीर्यवती यथा स्याम् ॥'

यास्काचार्यांनीं वरील श्लोकामध्ये केलेल्या आवाहनाप्रमाणे वागून भारतांतील विद्वानांनीं आजपर्यंत सतत पांच-सहा हजार वर्षें अत्यंत परिश्रमपूर्वक वेदवाङमयाचें जतन केलें व तें पिढ्यानुपिढ्या मुखोद्गत ठेवलें ही केवळ कौतुकास्पद गोष्टच नव्हे तर भारतीयांना ही मोठी अभिमानाचीं बाब आहे. जगांतील उपलब्ध वाङमयामध्ये वेदवाङमय हें सर्वांत जुनें व श्रेष्ठ दर्जाचें वाङमय समजलें जातें. संहिता, ब्राह्मण, आरण्यकें व उपनिषदें या चार प्रकारांत मिळून त्याचा विस्तार फार मोठा आहे. महाभारत, रामायण इत्यादि पुराणें, तसेंच कालिदास, भवभूति इत्यादि कवींचें काव्यग्रंथ व व्याकरण, वेदान्त इत्यादि शास्त्रांवरील ग्रंथ यांच्या भाषेप्रमाणें वेदवाङमयाचीं भाषा संस्कृत किंवा गीर्वाण जरी असली तरी वेदवाङमयांत कित्येक शब्द व कित्येक शब्दांचीं रूपें निराळीं आढळून येतात व त्यामुळें बऱ्याच वेळां वेदवाक्यांचा अर्थं आकलन करणें फार कठिण होतें. नमुन्यादाखल बोलावयाचें म्हटल्यास वेदांमध्यें एकट्या तुम् प्रत्ययाऐंवजी से, असे वगैरे अनेक प्रत्यय पाणिनीनें ' तुमर्थे सेंसेनसे असेन्क्सेकसेनध्यैअध्यैन्कध्यैकध्यैन्शध्यैशध्यैन् तवै तवेङ तवेनः ' (पा. ३।४।९) या सूत्रात नमूद केले आहेत; त्याप्रमाणेंच सु औ अस् या मोजक्या एकवीस विभक्तिप्रत्ययांना प्रत्येकीं सु, पूर्वसवर्ण, आ, या, ए वगैरे अनेक सांगितले आहेत: तर केव्हां केव्हां त्यांचा लोपही ' सुपां सुलुक्० ' (पा. ७।१।३९) या सूत्रानें सांगितला आहे.

वेदवाङमयाचा अभ्यास करणाऱ्याला वेदामध्ये आढळून येणाऱ्या शब्दांची सिद्धि, त्यांचा अर्थ व त्यांतील वर्णांचें स्वरयुक्त शुद्ध व स्पष्ट उच्चारण या तीन गोष्टींचें ज्ञान अत्यंत आवश्यक आहे. पैकीं वर्णोच्चा-

रणाकडें आजपर्यंत मौखिक पठनामध्यें काळजीपूर्वक लक्ष दिलें गेलें. आता मात्र मौखिक पठनपाठनाची परंपरा कितपत मूळ धरून राहील याची शंका वाटते. वेदवाङमय हें अत्यंत पवित्र मानिलें असल्यामुळें वैदिक कर्मामध्ये वेदमंत्रांचें शुद्ध पठन हेंच फलदायक असतें. याउलट वेदमंत्रांच्या अर्थाचा खल करून संशय व्यक्त करण्यानें त्याचें पावित्र्य कमी होतें अशी लोकांची भावना असल्यामुळें संस्कृत पाठशाळांमध्यें सुद्धां वैदिक शब्दांची सिद्धि व त्यांचें स्वर, त्याप्रमाणेंच मंत्राचा अर्थ यांच्याकडे जरूर तितकें लक्ष दिलें गेलें नाहीं; व शब्दसिद्धि, स्वरविचार आणि अर्थबोध या तीनही गोष्टी व्याकरणग्रंथांमध्यें व वेदभाष्यांमध्येंच राहिल्या.

चालू शतकांत व पूर्वीच्या शतकांत पाश्चात्य पंडितांनीं मात्र वैदिक वाङमयाच्या अर्थाच्या अभ्यासाला सुरवात केली व वेदवाङमयांतील कांहीं भाग विद्यापीठांतील उच्च परीक्षांच्या अभ्यासक्रमांत घातले. त्यामुळे अर्थबोधाकडे विशेष लक्ष गेलें; वेदांतील भाषेचा, भाषांच्या तौलतिक अभ्यासांतही समावेश केला गेला व त्या अनुरोधानें व्हिटने, मॅकडोनेल, वाकरनागल, पिशेल, ग्रासमन, विंटरनिट्स् इत्यादि पाश्चात्य विद्वानांनीं वेदव्याकरण व वेदार्थ यांवर ग्रंथ लिहिले व दुर्बोध स्थलीं अर्थाविषयीं उहापोह करण्यास सुरवात केली. भारतांतील विद्वानांनीही वेदवाङमयाच्या अभ्यासाचें काम अंगावर घेतलें. परंतू व्याकरण ग्रंथांतील 'वैदिकी प्रक्रिया' व स्वर–प्रक्रिया यांच्या अभ्यासाकडे त्यांनीं विशेष लक्ष दिलें नाहीं. याला कारणें म्हणजे संस्कृत पाठशाळांमध्यें वेदवाङमयाच्या अभ्यासाला स्थान नव्हतें हें एक व विद्यापीठांतील अभ्यासाचें माध्यम इंग्रजी भाषा असल्यामुळें इंग्रजी, जर्मन व फ्रेंच या भाषांमध्यें लिहिलेले ग्रंथ वाचण्याकडे त्यांची साहजिकच ज्यास्त प्रवृत्ति झाली हें दुसरें, अशीं देतां येतील. वैदिक शब्द साधण्याकरतां 'पाणिनीच्या अष्टाध्यायींत सुमारें तीनशें सूत्रें आहेत व स्वरांचें विवेचन सुमारे चारशें सूत्रांत आलें आहे हें पुष्कळ आधुनिक वेदाभ्यासकांना माहीतही नसतें. वेदभ्यासाला वाहिलेले निरनिराळे प्रातिशाख्यग्रंथ, निरुक्त, श्रौतसूत्रें, निरनिराळी वेदभाष्यें, त्याप्रमाणेंच उपलब्ध वैदिकीप्रक्रिया व स्वरप्रक्रिया यांचा काळजीपूर्वक अभ्यास न करतां, उलट

' सायण येथें चुकला, ' ' हा सायणाचा अर्थ बरोबर नाहीं ' अशी विधानें करण्याची त्यांचीं प्रवृत्ति असते हें पाहून हसूच येतें !

भारतांतील पाठशाळांमध्यें वेदवाङमयाचें अध्ययनाध्यापन जरी शास्त्राध्ययनाइतकें झालें नसलें तरी कांहीं प्रधानाध्यापक व शिष्योत्तम यांनीं वेदवाङमयाचा अभ्यास परिश्रमपूर्वक करून ग्रंथनिर्मितीही केली आहे. महाभाष्यकारांनीं वैदिक शब्दांची सिद्धि सांगणाऱ्या सातशे सूत्रांपैकीं ठळक ठळक सूत्रांचें विवेचन करून वेदांतील उदाहरणें दिलीं आहेत. त्यानंतर काशिकाकारांनी आपल्या ग्रंथांत या सर्व सूत्रांवर वृत्ति लिहून उदाहरणें दिलीं आहेत. भट्टोजी दीक्षितांच्या पूर्वी नृसिंहपण्डित यांनीं ' स्वरमञ्जरी ' नांवाचा स्वरांचे विवेचन करणारा पाण्डित्यपूर्ण स्वतंत्र ग्रंथ लिहिला व त्यामध्यें पाणिनीच्या सूत्रांपैकीं महत्त्वाच्या बऱ्याच सूत्रांचें विवेचन करून वेदांतील उदाहरणें दिलीं आहेत. त्यांनीं साडेसातशे उणादि सूत्रां–पैकीं साधारणपणें साडेतीनशे उणादि सूत्रें उद्धृत करून त्या सूत्रांनीं साध–लेल्या शब्दांच्या स्वरांचीं वैदिक उदाहरणें देऊन विवेचन केलें आहे. त्यांतील भट्टोजींनीही आपल्या सिद्धान्त–कौमुदीग्रंथामध्यें वैदिकीप्रक्रिया व स्वर प्रक्रिया अशी दोन प्रकरणें देऊन त्यांमध्यें वैदिक शब्दांची सिद्धि व स्वर यांचें विवेचन केलें आहे. भट्टोजींच्या नंतर श्रीनिवासयज्वा नांवाच्या वैयाकर–णांनींही स्वरांचें व्याख्यान करणारा 'स्वरसिद्धान्तचन्द्रिका' नांवाचा स्वतंत्र ग्रन्थ लिहिला व त्यामध्यें स्वरांचे विवेचन करणारी पावणेपाचशे पाणि–निसूत्रें उद्धृत करून त्यांचें वैदिक व लौकिक दोनही जातींचीं उदाहरणें देऊन विस्तृत व्याख्यान केंलें आहे. साधारणतः याच कालीं रामचन्द्र नागेश शेष यांनींही स्वरांचे विवेचन करणारा एक स्वतंत्र ग्रन्थ लिहिला व त्यांत पाणिनीच्या स्वरसूत्रांचे व्याख्यान करून महत्त्वाच्या भागावर स्वतः टीका लिहिली. त्याप्रमाणेंच भगवद्भक्त नांवाच्या पंडितांनीं वैदिक शब्दांची सिद्धि व स्वर या दोहोंचेंही विवेचन पाणिनिसूत्रें उद्धृत करून व उदाहरणें देऊन अत्यंत संक्षिप्त पद्धतीनें स्वरप्रक्रियानामक स्वतंत्र ग्रन्थ रचून त्यामध्यें केलें आहे. वर निर्दिष्ट केलेल्या स्वतंत्र ग्रन्थापैकीं फक्त 'स्वरसिद्धांन्तचन्द्रिका' हा ग्रन्थ मुद्रित आहे. बाकीचे सर्व हस्तलिखित स्वरूपांत उपलब्ध आहेत.

प्रस्तुत ग्रंथ हा सिद्धान्तकौमुदीच्या मराठी अनुवादासहित प्रकाशित होत असलेल्या सहा भागांपैकीं पांचवा भाग आहे. या भागामध्यें माझे परम स्नेही **प्रा. म. दा. साठे** यांनीं सिद्धांतकौमुदीच्या 'वैदिकीप्रक्रिया' नांवाच्या प्रकरणाचा मराठीमध्यें अनुवाद केला आहे. प्रा. साठे यांनीं संस्कृत पाठशाळेमध्यें परंपरागत पद्धतीनें व्याकरणशास्त्राचें अध्ययन केल्यानंतर आधुनिक पद्धतीनें अनेक वर्षें संस्कृत ग्रन्थांचें अध्यापन केलें असल्यामुळें त्यांनीं लिहिलेला हा ग्रन्थ मराठी माध्यम घेऊन विद्यापीठाच्या उच्च परीक्षांना 'संस्कृत व्याकरण' हा ऐच्छिक विषय घेऊन बसणाऱ्या विद्यार्थ्यांना उपयुक्त होईल, इतकेंच नव्हें तर संस्कृत व्याकरणाचा अभ्यास करणाऱ्यांनाही त्यांनीं केलेले सिद्धांतकौमुदीचें चार भाग जसे उपयुक्त झाले त्याप्रमाणेंच वैदिक शब्दांच्या सिद्धीचें कामीं हा पांचवा भागही उपयुक्त होईल यांत शंका नाहीं. लवकरच सहाव्या भागाचें मुद्रण संपूर्ण होऊन 'संस्कृत विद्यापरिसंस्थेनें' स्वीकारलेल्या 'वासुदेवशास्त्री अभ्यंकर ग्रन्थमालेतील' सिद्धांतकौमुदी या सर्वमान्य ग्रंथाचें मराठी अनुवादासह प्रकाशन संपूर्ण होईल अशी आशा आहे.

सदाशिव पेठ, लक्ष्मीरस्ता, पुणें ३०
वर्षप्रतिपदा, शके १८९२

का. वा. अभ्यंकर

सम्पादकाचें मनोगत

' अस्तु नमः पाणिनये भूयो भूयो तथाऽस्तु वररुचये ।
किं चास्तु पतञ्जलये शब्दब्रह्मात्मने च गीर्पतये ' ॥ १ ॥
नत्वा **दामोदरं साम्बं** कृत्वा च **हरिवन्दनम्** ।
सिद्धान्तकौमुदीव्याख्यां महाराष्ट्र्यां करोम्यहम् ॥ २ ॥
व्याख्याता बहुभिः प्रौढैरेषा गीर्वाणभाषया ।
मया तु सुचिरं ध्यात्वा रचिता **' बालबोधिनी '** ॥ ३ ॥

' लघुसिद्धान्त–कौमुदीचा ' विस्तृत विवेचनासह मराठी अनुवाद प्रसिद्ध केल्यावर तो लोकादरास पात्र झालेला पाहून ' क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते ' या कव्युक्तीप्रमाणें मी भट्टोजी दीक्षितांच्या वैयाकरण–सिद्धांतकौमुदीचा मराठी ' बालबोधिनी ' टीकेसह अनुवाद करण्याचें ठरविलें व तेंही काम पांच–सहाशे पृष्ठांचा एकेक भाग अशा चार भागांत पूर्ण केलें. पाणिनीनें योजलेल्या अनुबंधांचें कार्य हा महत्त्वाचा विषय उदाहरणांसह पहिल्या भागाच्या परिशिष्टांत घातला तर त्यांत येणाऱ्या परिभाषांचा अर्थ उदाहरणांसह दुसऱ्या एका भागाच्या परिशिष्टांत घातला. तसेंच चवथ्या भागाच्या परिशिष्टांत संस्कृत भाषेंतील धातूविषयीं कांहीं उपयुक्त माहिती दिली आहे.

पण एवढ्यानें ग्रंथ पूर्ण झाल्याचें समाधान वाटलें नाहीं. कारण, या चार भागांत लौकिक भाषेंतील शब्दांचें विवरण व व्युत्पत्ति प्रामुख्यानें आहे. वैदिक शब्दांचें विवरण त्यांत नाहीं. पाणिनीनें मात्र आपला ' अष्टा–ध्यायी ' ग्रंथ लौकिक व त्याप्रमाणें वैदिक शब्दांसाठींही रचला. भाष्यकार पतंजलीनें व्याकरणशास्त्राचें प्रयोजन सांगतांना ' रक्षोहागमलघ्वसन्देहाः प्रयोजनम् ' असें म्हटलें आहे. वेदांचें रक्षण व्हावें हा प्रधान हेतु व्याकरण–शास्त्राचा आहे. ' ब्राह्मणेन निष्कारणः षडङ्गो वेदोऽध्येयो ज्ञेयश्च ' असें असल्यानें वेदांचें अध्ययन त्यांच्या सहा अंगांसह व्हावयास पाहिजे व त्या सहा अंगांपैकीं व्याकरण हें प्रधान अंग आहे.

' लौकिकशब्देभ्यो भिन्ना अपि वैदिकशब्दाः सन्ति ' हें सत्य असल्यानें वैदिक शब्दांचेंही विवेचन व्हावयास पाहिजे. पतंजलीनें महाभाष्य रचतांना ' अथ शब्दानुशासनम् ' यापासून प्रारंभ केला व स्वतःच प्रश्न उपस्थित केला कीं, ' केषां शब्दानाम् ? ' व लगेच त्याचें उत्तरही देऊन टाकलें कीं ' लौकिकानां वैदिकानां च '।

'अष्टाध्यायी' ग्रंथांत या दोन्ही प्रकारच्या शब्दांसाठीं रचलेली सूत्रें एकत्रच असली तरी भट्टोजी दीक्षितानें आपला ग्रंथ प्रक्रियात्मक किंवा प्रकरणात्मक रचला असल्याने वेदाशीं संबंध असलेली दोन प्रकरणें ' वैदिकी प्रक्रिया ' व ' स्वरप्रक्रिया ' वेगळी केलीं. हीं प्रकरणें वेदविषयक असल्यानें ज्याला केवळ लौकिक भाषेचेंच अध्ययन करावयाचें आहे तो हीं प्रकरणें वगळतो. शिवाय तीं समजण्यासही कठीण आहेत. आमच्या संस्कृतपाठशालांतूनही या प्रकरणांचे अध्ययन-अध्यापन क्वचितच होत असते. पुढें महाविद्यालयांतून वेदाभ्यास सुरू झाल्यानें वैदिक व्याकरणाची आवश्यकता वाटूं लागली पण त्याचें अध्ययन मुळांतून म्हणजे पाणिनीच्या अष्टाध्यायीं ग्रंथावरून न होता विद्यार्थी या विषयासाठीं इंग्रजी पुस्तकावरच अवलंबून राहतो. तात्पर्य, व्याकरणशास्त्र हें वैदिक शब्दांचेंही झाल्याशिवाय पूर्ण होत नाहीं असें असल्यानें याही प्रकरणाचा अनुवाद करणें आवश्यक झालें.

अशा प्रकारें 'वैयाकरण-सिद्धान्तकौमुदी' या ग्रंथाचा पांचव्या भागासह मराठी अनुवाद संस्कृत व्याकरणप्रेमी लोकांना आज उपलब्ध होत आहे ही समाधानाची गोष्ट आहे. तसें पाहिलें तर वैदिकी प्रक्रिया या प्रकरणांत २६४ सूत्रें आहेत. अष्टाध्यायींतील सुमारें चार हजार सूत्रांच्या मानानें ही संख्या जरी अल्प असली तरी महत्वाच्या मानानें ती कमी नाहीं. अष्टाध्यायींत हीं सूत्रें त्या त्या अध्यायांतून विखुरलेलीं आहेत. परंतु ' वैदिकी प्रक्रिया ' प्रकरणांत तीं अध्यायांच्या क्रमानें एकत्र दिलीं आहेत.

या सूत्रांवर भट्टोजींची वृत्ति व उदाहरणें आहेत. अर्थात् हीं सर्व उदाहरणें वेदांतूनच घेतलेलीं असणार. त्यांपैकी कांहीं उदाहरणें पूर्वींच्या ग्रंथांतून--विशेषतः महाभाष्य, काशिका वगैरे ग्रंथांतून जशीच्या तशी

घेतलीं आहेत. हे वेदातील उतारे स्वरविरहित दिले गेले आहेत. आतां या सर्व उदाहरणाचें मूळ वेदांतून शोधून काढणें फार कष्टाचें काम होतें. परंतु सुदैवानें तें काम **आचार्य वि. प्र. लिमये** यांनीं अंगावर घेऊन माझ्यासाठीं केल्यानें माझें काम सोपे झालें. त्यांचें हें ऋण मी आनंदानें मान्य करतों. त्याचें आभार मानावेत तितके थोडेच होणार आहेत ! त्याप्रमाणें या ग्रंथाला प्रस्तावना लिहिण्याचें काम माझे मित्र **प्रा. का. वा. अभ्यंकर** यानीं मान्य केलें त्याबद्दल मी त्यांचें हार्दिक आभार मानतों, हा ग्रंथ ' कै. म. म. वासुदेवशास्त्री अभ्यंकर ग्रंथमालेंतील ' असून त्या मालेचें प्रा. का. वा. अभ्यंकर हे प्रसंपादक (जनरल एडिटर) आहेत. त्यांनीं ज्या योग्य सूचना केल्या त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें. या ग्रन्थाचें प्रकाशन पूर्ववत् पुणें येथील ' संस्कृत विद्या परि-संस्थेच्या ' ' सांस्कृतिक संशोधन व प्रकाशन ' विभागानें केलें. त्या संस्थेच्या चालकांनीं हें काम माझ्यावर सोपविलें होतें. तें मी यथाशक्ति पार पाडलें आहे. हा अनुवाद लिहित असतां महाभाष्य, काशिका, सुबोधिनी, शेखर, मनोरमा, तत्त्वबोधिनी या ग्रन्थांची मदत झाली. त्याप्रमाणें डॉ. शरच्चन्द्र बसू यांच्या सिद्धान्तकौमुदीच्या इंग्रजी अनुवादाचीही मदत झालीं. मुद्रितें काळजीपूर्वक तपासली गेल्याने वेगळें शुद्धिपत्र दिलें नाहीं. क्वचित् दोष आढळल्यास तो सहज समजण्यासारखा आहे. इतर चार भागांप्रमाणें हा पांचवा भागही संस्कृत व्याकरणप्रेमी लोकाच्या आदरास पात्र होईल असा भरंवसा आहे. अलमतिविस्तरेण ।

चैत्र शुद्ध प्रतिपदा, शके १८९२
दि. ७।४।१९७०
८५४ सदाशिव पेठ,
'पारिजात', शेवडे बोळ, पुणें २

म. दा. साठे

Publishers Note

The Sanskrit Vidya Parisanstha, which is a registered body, decided in 1960, when the Sanskrit Pathashala, conducted by it completed 75 years of its existance, to open a Cultural Research and Publication Department which has since been recognised and aided by the Government of Maharashtra. This Department inaugurated a series of publication of Sanskrit works in memory of the late eminent Pandit Mahamahopadhyaya Vasudey Shastri Abhyankar, who was the head of this Pathashala for over 50 years. Among the works undertaken for publication in this series this Department intended to publish for the first time the whole of the Vaiyakaran Siddhanta Kaumudi of Bhattoji Dikshit in six volumes with a commentary and explanatory notes in Marathi for the benefit of those students of Sanskrit Grammer who are unable to study the work directly from a Sanskrit Pandit.

Prof. M. D. Sathe, M. A., who was in his younger days a student of this Pathashala, undertook the editorship of the first four volumes of this work, which have so far been published. This is the fifth volume which was originally intended to be edited by Acharya V. P. Limaye. But as he was too busy with other Sanskrit works and as Prof. M. D. Sathe was keen on undertaking this volume also the Department entrusted this volume to him. He has completed it now and embodied in it such referances to Vedic passages

as were readily supplied by Acharya V. P. Limaye. This Department is grateful to Prof. Sathe for completing this work at an advanced age of 80 years and thus setting an example for young Scholars to follow.

This Department is already grateful to the Ministry of Education of the Government of India which has given financial assistance for the publication of the previous four volumes of this voluminous work. This has encouraged this Department to undertake the printing of this and the last (sixth) volume of this work. It is hoped that the Ministry of Education of the Government of India will also sanction similar financial assistance for the publication of these [fifth & the sixth volumes of this work, for the financial assistance of which an application has already been made to that Ministry.

A list of works already published or undertaken for publication in this M. M. Vasudev Shastri Abhyankar Publication Series will be found at the end of this volume.

7th April 1970.
635 Sadashiv Peth,
Near Phadatare Chawk,
Poona - 30.

N. D. Abhyankar
Hon. Secretary The Cultural Research & Publication Dept. of the Sanskrit Vidya Parisanstha Poona – 30.

वैयाकरणसिद्धान्तकौमुदी–वैदिकीप्रक्रिया

अनुक्रमणिका

वैयाकरणसिद्धान्तकौमुद्यां

वैदिकीप्रक्रिया

प्रथमोऽध्यायः ।

(३३८७) छन्दसि पुनर्वस्वोरेकवचनम् ।१।२।६१

द्वयोरेकवचनं वा स्यात् । पुनर्वसु नक्षत्रं (मै.सं. २।१३।२०) **पुनर्वसू वा ।** (तैसं. १।५।१।४) **लोके तु द्विवचनमेव ।**

वेदामध्यें 'पुनर्वसु' शब्दाला एकवचन विकल्पानें होतें. मात्र तो शब्द नक्षत्रवाचक असला पाहिजे. उदा० पुनर्वसुर्नक्षत्रम् किंवा पुनर्वसू. भाषेंत मात्र हा शब्द नित्य द्विवचनी आहे.

पुनर्वसु नक्षत्राचे दोन तारे असल्यानें रूढीमुळें द्विवचन प्राप्त झालें असतां वेदामध्यें एकवचनाचें विधान विकल्पानें केलें आहे. येथें 'जात्याख्यायाम्०' (१ । २ । ५८) या सूत्रांतून 'अन्यतरस्याम्' या पदाची अनुवृत्ति येते. भाषेमध्यें मात्र हा शब्द द्विवचनी चालतो. उदा० 'गां गताविव दिवः पुनर्वसू'; (रघुवंश ११ । ३६) नक्षत्र अर्थ नसल्यास 'पुनर्वसू माणवकौ' असा प्रयोग होतो.

(३३८८) विशाखयोश्च ।१।२।६२

प्राग्वत् । विशाखा नक्षत्रम् । (मैसं २।१३।२० विशाखम्) **विशाखे ॥** (शौ. सं. १९।७।३)

पूर्वसूत्राप्रमाणें नक्षत्रवाचक विशाखा शब्दाला एकवचन विकल्पानें होतें. उदा० विशाखा नक्षत्रम् किंवा विशाखे. विशाखा नक्षत्राचेहि पुनर्वसूप्रमाणें दोन तारे आहेत. त्यामुळें भाषेंत हा शब्द द्विवचनीच चालतो.

उदा० 'किमत्र चित्रं यदि विशाखे शशाङ्कलेखामनुवर्तेते।' (शाकुंतल, अंक ३, ११)

(३३८९) षष्ठीयुक्तश्छन्दसि वा ।१।४।९

षष्ठ्यन्तेन युक्तः पतिशब्दश्छन्दसि घिसंज्ञो वा स्यात्। क्षेत्रस्य पतिना वयम्। (ऋ. ४।५७।१) इह वेति योगं विभज्य छन्दसीत्यनुवर्तते। सर्वे विधयश्छन्दसि वैकल्पिकाः। तेन 'बहुलं छन्दसि' इत्यादिरस्यैव प्रपञ्चः। 'यचि भम्'। नभोऽङ्गिरोमनुषां वत्युपसंख्यानम्। नभसा तुल्यं नभस्वत्। भत्वाद्रुत्वाभावः। "अङ्गिरस्वदङ्गिरः" (ऋ. १।३१।१७) "मनुष्वदग्ने।" 'जनेरुसिः' (उणादि २७२) इति विहित उसिप्रत्ययो मनेरपि बाहुलकात्। वृषण्वस्वश्वयोः। वृषन् वर्षुकं वसु यस्य स वृषण्वसुः। वृषा अश्वो यस्यासौ वृषणश्वः। इहान्तर्वर्तिनीं विभक्तिमाश्रित्य पदत्वे सति नलोपः प्राप्तो भत्वाद्वार्यते। अतएव 'पदान्तस्य' इति णत्वनिषेधोऽपि न। 'अल्लोपोऽनः' इत्यल्लोपो न। अनङ्गत्वात्।

वेदामध्यें षष्ट्यन्त पदाशीं युक्त असलेल्या पति शब्दाला घिसंज्ञा विकल्पानें होते. उदा० क्षेत्रस्य पतिना वयम्। या सूत्राचे दोन भाग करावेत. एक 'षष्ठीयुक्तश्छन्दसि' व दुसरें 'वा.' या दुसऱ्या सूत्रांत 'छन्दसि' पदाची अनुवृत्ति येते. त्याचा अर्थ—वेदामध्यें सर्व विधी विकल्पानें होतात, असा होतो. 'बहुलं छन्दसि' २।४।७६ हे सूत्र वरील विधानाचाच प्रपंच आहे असें समजावें. 'यचि भम्' १।४।१८ यानें भसंज्ञा सांगितली आहे. (वा.) 'नभस, अङ्गिरस् व मनुष् या शब्दांपुढें वत् प्रत्यय असल्यास त्यांना भसंज्ञा व्हावी असें प्रतिपादन करावें.' उदा० 'नभसा तुल्यं नभस्वत्'; भसंज्ञा झाल्यानें 'ससजुषोः०' ।८।२।६६ यानें सकाराला रुत्व होत नाहीं. कारण त्या सूत्रांत 'पदस्य' याची अनुवृत्ति आहे. 'अङ्गिरसा तुल्यम् – अङ्गिरस्वत्' येथेंहि पूर्वीप्रमाणें रुत्व होत नाहीं. मनुषा

तुल्यम् – मनुष्वत्; 'जनेरुसिः' (उणादि २७२) या उणादि सूत्रानें सांगितलेला उस् हा प्रत्यय 'वेदामध्यें सर्व विधी बहुलत्वानें होतात' या संकेतास अनुसरून मन् धातूहूनही केला जातो. त्यांतील सकाराला 'आदेश–प्रत्यययोः'। ८।३।५९ यानें षत्व होतें. पदसंज्ञा असती तर षत्वाऐवजी रुत्व झालें असतें. 'आदेशप्रत्यययोः' या सूत्रांत 'अपदान्तस्य' याची अनुवृत्ति आहे. वृषन् शब्दापुढें वेदामध्यें वसु किंवा अश्व शब्द आल्यास त्याला भसंज्ञा होते. 'वृषन् वर्षुकं वसु यस्य स वृषण्वसुः' तसेंच 'वृषा अश्वो यस्यासौ वृषणश्वः; या दोन्ही उदाहरणांत समासांतील पदांच्या विभक्तीचा आश्रय घेंऊन 'नलोपः प्रातिपदिकान्तस्य'।८।२।७ यानें नलोप प्राप्त होतो पण भसंज्ञा झाल्यानें तो होत नाहीं आणि पदसंज्ञा नसल्यानें 'पदान्तस्य' ।८।४।३७ यानें णत्वनिषेधहि होत नाहीं. त्या–प्रमाणें 'अल्लोपोऽनः'।६।४।१३४ यानें अकाराचा लोपहि होत नाहीं. कारण अङ्गसंज्ञा होत नाहीं. त्या सूत्रांत 'अङ्गस्य' असा अधिकार आहे. भाषेमध्यें मात्र वृषवसु व वृषाश्वः अशीं रूपें होतात.

टीपा—'पतिः समास एव' ।१।४८ यांतून 'पति' शब्दाची अनुवृत्ति येते. पति शब्द समासांत नसतांना त्याला घिसंज्ञेची प्राप्ति नव्हती म्हणून प्रस्तुत सूत्रानें ती सांगितली म्हणून 'पतिना' येथें 'आङो नाऽ–स्त्रियाम्' ।७।३।१२० यानें नाभाव होतो. 'षष्ठीयुक्तः' म्हटल्यानें 'मया पत्या जरदष्टिर्यथासः' या वाक्यांत षष्ठीऐवजी तृतीयेशी पति शब्द युक्त असल्यानें त्याला घिसंज्ञा होत नाहीं. म्हणून नाभावहि होत नाहीं. नभस्वत् वगैरे रूपांत 'तेन तुल्यम्०'। ५।१।११५। यानें वति (वत्) प्रत्यय होतो. कैयट म्हणतो, 'निपातनान्येतानि छन्दोविषयाणि'। वृत्तिकार 'कुलुञ्चानां पतये नमः' (वा. सं. १६।२२) किंवा 'कुलुञ्चानां पत्ये नमः' हें रुद्रा–ध्यायांतील उदाहरण देतो. 'छन्दसि' म्हटल्यानें भाषेत 'ग्रामस्य पत्ये' असा एकच प्रयोग होतो.

(३३९०) अयस्मयादीनिच्छन्दसि ।१।४।२०

एतानि छन्दसि साधूनि । भपदसंज्ञाधिकाराद्यथायोग्यं संज्ञा-द्वयं बोध्यम् । तथा च वार्तिकम् । उभयसंज्ञान्यपीति वक्तव्यमिति ।

स सुष्टुभा स ऋक्वता गणेन । (ऋ. ४।५०।५) पदत्वात्कुत्वम् । भत्वाज्जश्त्वाभावः । जश्त्वविधानार्थाया: पदसंज्ञाया भत्वसामर्थ्येन बाधात् । नैनं हिन्वन्त्यपि वाजिनेषु (ऋ. १०।७१।५) । अत्र पदत्वाज्जश्त्वम् , भत्वात्कुत्वाभावः ।

' अयस्मय ' इत्यादि शब्द वेदामध्यें साधु समजावेत. भसंज्ञा व पदसंज्ञा या दोहोंचाहि अधिकार असल्यानें यथायोग्य दोन्ही संज्ञा होतात. वस्तुतः ' अनन्तरस्य विधिर्वा भवति प्रतिषेधो वा ' या वचनाप्रमाणें भसंज्ञेचाच 'अयस्मय' या निपातनानें समावेश झाला असता. तरीपण अयस्मय वगैरे निपातनें हीं दोन्ही संज्ञांचा समावेश दाखवितात. याला प्रमाण वार्तिककारांचें पुढील वार्तिक होय. त्याचा अर्थ असा कीं 'या ठिकाणीं दोन्ही संज्ञा घ्याव्यात असें म्हणावें.' त्यामुळें ' स सुष्टुभा ' इत्यादि प्रयोगांत ' ऋक्वता ' येथे पदसंज्ञा असल्यानें ' चोः कुः ' ।८।२।३० यानें कुत्व होतें. भसंज्ञा असल्यानें जश्त्व होत नाहीं. पदसंज्ञा झाल्यानें जश्त्व होतें त्याचा भत्वसामर्थ्यानें बाध होतो. ' नैनं हिन्वति ' इत्यादि वाक्यात ' वाजिनेषु ' यांचा ' वाचाम् इनाः ' प्रभवः तेष्वपि एवं विद्वासं न हिन्वन्ति-विवदितुं न गच्छन्ति ' असा अर्थ आहे. यांत ' वाजिन ' यांत वाच् शब्दाला पदत्वामुळें जश्त्व होऊन वाज् झालें पण भसंज्ञाहि असल्यानें ' चोः कुः ' यानें कुत्व होत नाहीं.

' अयस्मयं वर्म ' येथें ' अयसो विकारः ' या अर्थी ' द्व्यचश्छन्दसि ' ।४।३।१५० यानें मयट् होतो. भसंज्ञा झाल्याने रुत्व होत नाहीं. तसेंच, ' अयस्मयानि पात्राणि ' समजावें. या उदाहरणांत भसंज्ञेचाच अधिकार आहे तर वरील दोन उदाहरणांत दोन्ही संज्ञांचा उपयोग केला आहे. ' छन्दसि ' म्हटल्यानें भाषेंत मात्र 'अयोमयम्' असें रूप होतें.

' ते प्राग्धातोः' ।१।४।८० यानें गतिसंज्ञक व उपसर्गसंज्ञक शब्द यांचा प्रयोग धातूच्या पूर्वी करावा असें सांगितलें आहे पण—

(३३९१) छन्दसि परेऽपि ।१।४।८१

गतिसंज्ञक व उपसर्गसंज्ञक असे प्र, परा इत्यादि शब्द यांचा प्रयोग वेदामध्यें धातूच्या पुढेहि करावा. 'अपि' शब्दानें तो पूर्वींहि होतो. पुढें प्रयोग केला असतांहि त्याना संज्ञाकार्य नसतें परंतु क्रियायोग असतो हें ज्ञापित होतें. उदा० 'हन्ति नि मुष्टिना' किंवा 'निहन्ति मुष्टिना';

(३३९२) व्यवहिताश्च ।१।४।८२

हरिभ्यां याह्योक आ (ऋ. ७।३२।४) । **आ मन्द्रैरिन्द्र हरिभिर्याहि** (ऋ. ३।४५।१) ।

गत्युपसर्गसंज्ञक शब्दांचे व्यवधान वेदामध्यें दिसून येतें. उदा० 'हरिभ्याम्' इत्यादि वाक्यांत 'याहि' आणि 'आ' यांमध्ये 'ओकः' पद आलें आहे. तसेंच आ उपसर्ग 'याहि' या क्रियापदापुढें आहे. त्याप्रमाणें 'आमन्द्रैः' इत्यादि दुसऱ्या वाक्यांत आ व याहि यांमध्यें 'मन्द्रैरिन्द्र हरिभिः' यांचें व्यवधान आलें आहे. हीं उदाहरणें सूत्र ८१ व ८२ या दोहोमिळून आहेत.

(३३९३) इन्धिभवतिभ्यां च ।१।२।६

आभ्यां परो लिट् कित् स्यात् । समीधे दस्युहन्तमम् । (ऋ. ६।१६।१५) **पुत्र ईधे अथर्वणः** । (ऋ. ६।१६।१४) **बभूव । इदं प्रत्याख्यातम् । इन्धेश्छन्दोविषयत्वाद् भुवो वुको नित्यत्वात्ताभ्यां लिटः किद्वचनानर्थक्यमिति '**

इति वैदिकीप्रकरणे प्रथमोऽध्यायः ।

ञिइन्धी दीप्तौ व भू सत्तायाम् यांपुढील लिट् कित् होतो. 'असंयोगल्लिट् कित्' ।१।२।५ यांतून 'लिट् कित्' यांची अनुवृत्ति येते. 'अपित्' याची येत नाहीं. वरील उदाहरणांत 'ईधे' येथें लिटाला कित्त्व झाल्यानें 'आनिदिताम्०' ।६।४।२४ यानें नलोप होतो. संयोगापुढें लिट् असल्यानें 'असंयोगात्' इत्यादि सूत्रानें कित्वाची प्राप्ति नव्हती. 'बभूव' येथें लिट् कित् झल्यानें 'क्ङिति च' यानें वृद्धि

होत नसल्यानें 'भुवो वुक्०' ।६।४।८८ यानें वुक् होतो. 'बभूव' हें उ. पु. ए. व. आहे. येथें 'मिप्' हा पित् प्रत्यय असल्यानें 'असयोगात्०' इत्यादि सूत्रानें कित्वाची प्राप्ति नव्हती म्हणून सूत्र करावें लागले.

हें सूत्र भाष्यकारांनें प्रत्याख्यात केलें आहे म्हणजे याची आवश्यकता मानली नाहीं. कारण भाषेमध्यें इन्ध् धातूहून 'इजादेश्च०' ।३।१।३६ इत्यादि सूत्रानें आम् होतो. वेदामध्यें 'कासप्रत्ययादाममन्त्रे लिटि' ।३।१।३५ यांत 'अमन्त्रे' असा प्रतिषेध असल्यानें जरी आम् होत नाहीं तरी 'छन्दस्यु-भयथा' ।३।४।११७ यानें लिटाला सार्वधातुकसंज्ञा व आर्धधातुकसंज्ञा होत असल्यानें 'सार्वधतुकमपित्' ।१।२।४। यानें ङित्त्व होत असल्यानें 'ईधे' येथें नलोप होईलच. आर्धधातुकसंज्ञाहि असल्यानें 'छन्दसि दृष्टा-नुविधिः' या वचनाप्रमाणें 'रुधादिभ्यः श्नम्' ।३।१।७८ यानें श्नम् विक-रण होत नाहीं. 'बभूव' येथें 'अचोऽञ्णिति' ।७।२।११५ हें वृद्धीचें विधान करणारे सूत्र पर असलें तरी ।६।४।८८ यानें विहित असलेला वुक् आगम हा कृताकृतप्रसङ्गित्वामुळें नित्य असल्यानें 'परान्नित्यं बल-वत्' (पर सूत्रापेक्षां नित्यविधीचें विधान करणारे सूत्र बलवत् असतें.) या परिभाषेप्रमाणें वृद्धीचा बाध करून वुक् होतो. या कारणामुळें कित्त्व सांगणारे प्रस्तुत सूत्र याचे आनर्थक्य सिद्ध होतें.

याप्रमाणे 'वैदिकीप्रक्रिया' या प्रकरणांतील पहिल्या अध्या-यांतील सूत्रांचा मराठी 'बालबोधिनी' टीकेसह अनुवाद समाप्त झाला.

द्वितीयोऽध्यायः ।

(३३९४) तृतीया च होश्छन्दसि ।२।३।३

जुहोतेः कर्मणि तृतीया स्याद् द्वितीया च । " यवाग्वाऽग्निहोत्रं जुहोति । " (काठ सं. ६।३) अग्निहोत्रशब्दोऽत्र हविषि वर्तते । " यस्याग्निहोत्रमधिश्रितममेध्यमापद्येत " । (ऐब्रा. ७।५) इत्यादि प्रयोगदर्शनात् । अग्नये हूयत इति व्युत्पत्तेश्च । यवाग्वाख्यं हविर्देवतोद्देशेन त्यक्त्वा प्रक्षिपतीत्यर्थः ।

वेदामध्यें हु धातूचें जें कर्म त्याची तृतीया व द्वितीया विभक्ति होते. उदा० ' यवाग्वा अग्निहोत्रं जुहोति ' या वाक्यांत ' यवागू ' हें हु धातूचे कर्म असून त्याची तृतीया झाली. येथें अग्निहोत्र शब्दाचा अर्थ ' हवि ' असा आहे. तसा त्याचा अर्थ पुढील वाक्यांत आहे. ' यस्याग्निहोत्रमधिश्रितममेध्यमापद्येत '; जेव्हां हवि असा अर्थ असेल तेव्हां अग्निहोत्र शब्दाची व्युत्पत्ति ' अग्नये हूयते ' (जें अग्नीसाठीं अर्पण केलें जातें) अशी आहे. त्यामुळें ' यवाग्वा ' इत्यादि वाक्यांचा अर्थ—तो यवागू नांवाचा हवि अग्नींत टाकतो (क्षिपति) असा होतो. वरील वाक्यांत ' यवागू ' शब्द तृतीयेंत असून 'अग्निहोत्र' शब्द द्वितीया विभक्तींत आहे. जरी हे शब्द वेगवेगळ्या विभक्तींत असले तरी त्या दोन शब्दांनीं एकाच वस्तूचा बोध होतो. भाषेंत मात्र ' यवागूमग्निहोत्रं जुहोति ' असाच प्रयोग होतो. पतंजलीनें महाभाष्यांत हें सूत्र प्रत्याख्यात केलें आहे म्हणजे त्याची आवश्यकता त्याला वाटत नाहीं. कारण त्याच्या मतें अग्निहोत्र शब्दाचा अर्थ अग्नि असाच आहे व तसा त्याचा प्रयोग ' यस्याग्निहोत्रं प्रज्वलितम् ' या वाक्यांत आढळून येतो. अर्थात् अग्नि असा अर्थ असतो तेव्हां त्याची व्युत्पत्ति ' हूयते अस्मिन् ' अशी असते. असा अर्थ घेतल्यास वरील वाक्याचा अर्थ ' यवाग्वा अग्निहोत्रं प्रीणयति ' असा होतो. (तो अग्नीला यवागूनें शांत करतो.) आतां ' यवागूमग्निहोत्रं जुहोति ' अशा वाक्यांत जेव्हां ' यवागू ' व ' अग्निहोत्र ' हे एकाच विभक्तींत (द्वितीयेत) अस–

तात तेव्हां मात्र 'तो यवागू नांवाचा हवि अग्नींत टाकतो' असाच अर्थ होतो.

टीप : ' कर्मणि द्वितीया ' या सूत्रातून ' कर्मणि ' पदाची अनुवृत्ति येते. म्हणून द्वितीया प्राप्त झाली असतां तृतीयेचें विधान केलें. चकारानें द्वितीयाहि होते. अग्निहोत्र यांतील ' होत्र ' शब्दाचा अर्थ ' हूयते तत् होत्रम्. ' असा होतो. 'अग्निहोत्र' हा षष्ठीतत्पुरुष आहे. यवागू शब्द तृतीयेंत असला तर अग्निहोत्र शब्दाचा अर्थ अग्नि असा असतो व जुहोति याचा अर्थ प्रीणयति असा असतो. जेव्हां यवागू शब्द द्वितीयेंत असतो तेव्हां अग्निहोत्र शब्दाचा अर्थ हवि असा होतो व जुहोति याचा अर्थ क्षिपति असा होतो.

(३३९५) द्वितीया ब्राह्मणे ।२।३।६०

ब्राह्मणविषये प्रयोगे दिवस्तदर्थस्य कर्मणि द्वितीया स्यात् । षष्ठ्यपवादः । गामस्य तदहः सभायां दीव्येयुः ।

ब्राह्मणग्रंथांत दिव् धातूच्या कर्माची द्वितीया होते. ' दिवस्तदर्थस्य ' ।२।३।५८ यानें सांगितलेल्या षष्ठीचा हा अपवाद आहे. उदा० ' गामस्य तदहः सभायां दीव्येयुः ' (मैत्रायणी संहिता १।६।११) येथें ' गो ' शब्दाची षष्ठी न होता द्वितीया होते.

अनुपसर्ग दिव् धातूच्या कर्माची षष्ठी प्राप्त झाली होती. प्रस्तुत सूत्राने द्वितीया सांगितली. सोपसर्ग दिव् धातूच्या कर्माची ।२।३।५९ यानें विकल्पानें षष्ठी होते. निरुपसर्ग दिव् धातूसाठीं प्रस्तूत सूत्राचें प्रयोजन आहे.

(३३९६) चतुर्थ्यर्थे बहुलं छन्दसि ।२।३।६२

षष्ठी स्यात् । " पुरुषमृगश्चन्द्रमसः गोधा कालका दार्वाघाटस्ते वनस्पतीनाम् " (वासं. २४।३५) **। वनस्पतिभ्य इत्यर्थः ।**
(वा.) षष्ठ्यर्थे चतुर्थीति वाच्यम् । " या खर्वेण पिबति तस्यै खर्वः । (तैसं. २।५।१।७)

वेदामध्यें चतुर्थीऐवजी बहुलेंकरून षष्ठी होते. उदा० ' पुरुषमृगश्चन्द्रमसः ' येथें ' चन्द्रमसे ' याऐवजीं 'चन्द्रमसः' अशी षष्ठी होते. त्याप्रमाणें

'गोधा कालका दार्वाघाटस्ते वनस्पतीनाम्' यांत 'वनस्पतिभ्यः' ऐवजी 'वनस्पतीनाम्' अशी षष्ठी होते. (वा.) 'वेदामध्यें षष्ठीऐवजी चतुर्थी होते असें म्हणावे.' उदा० 'या खर्वेण पिबति तस्यै खर्वः' या वाक्यांत 'तस्याः' ऐवजीं 'तस्यै' अशी चतुर्थी झाली. (जी रजस्वला स्त्री भाजलेल्या थाळ्यानें प्राशन करते तिला वामन (ठेंगणा मुलगा होतो.) 'बहुलम्' म्हटल्यानें कधींकधीं षष्ठी होत नाहीं. 'व्यत्ययो बहुलम्।३।१।८५ याचाच हा प्रपंच आहे असें समजावें.

(३३९७) यजेश्च करणे ।२।३।६३

इह छन्दसि बहुलं षष्ठी । घृतस्य घृतेन वा यजते (तुल० बौश्री ८।१४)।

वेदामध्यें यज् धातूच्या करणकारकाला विकल्पानें षष्ठी बहुलेंकरून होते. उदा० घृतस्य घृतेन वा यजते.

(३३९८) बहुलं छन्दसि ।२।४।३९

अदो घस्लादेशः स्यात् । घस्तां नूनम् । 'लुङि मन्त्रे घस०' इति च्लेर्लुक् । अडभावः । सग्धिश्च मे । (वासं. १८।९)

वेदामध्यें अद् धातूला बहुलेंकरून घस्लृ आदेश होतो. उदा० 'घस्ताम् नूनम्'—यांत 'घस्ताम्' हें लुङाचे रूप आहे. 'मन्त्रे घस०' ।२।४।८० याने च्लिचा लुक् होतो. 'न माङ्योगे' ।६।४।३४ यानें माङ्चा योग नसतांहि 'बहुलम्' म्हटल्याने अडागम होत नाहीं. वस्तुतः हें सूत्र नसतें तरी 'लुङसनोर्घस्लृ' ।२।४।३७ याने घस्लृ (घस्) आदेश होऊन हें रूप सिद्ध झालें असतें. म्हणून 'सग्धिः' (यजुर्वेद, वाज सं. १८।९) हे दुसरें रूप दिलें. याचा अर्थ अदनम् असा आहे. अद् धातूहून क्तिन् प्रत्यय केल्या-वर घस्लृ आदेश होतो. 'घसिभसोर्हलि' ।६।४।१०० यानें उपधालोप केल्यावर 'झलो झलि' ।८।२।२६ यानें सकाराचा लोप होतो. 'झष-स्तथोः ।८।२।४० यानें तकाराला धत्व होतें. घकाराला ।८।४।५३ याने जश्त्व

होतें. तें कर्तव्य असता अकाराला स्थानिवद्भाव होत नाहीं कारण ' न पदान्त० ' ।१।१।५८ इत्यादि सूत्रानें जश्‍त्व कर्तव्य असता त्याचा निषेध सांगितला आहे. समास केल्यावर ' समान ' शब्दाला ' समानस्य छन्दसि० ' ।६।३।८४ यानें सकार होतो.

(३३९९) हेमन्तशिशिरावहोरात्रे च छन्दसि ।२।४।२८

द्वन्द्वः पूर्ववल्लिङ्गः । हेमन्तश्च शिशिरश्च (तैसं. १।६।२।३) **हेमन्तशिशिरौ । ' अहोरात्रे । '** (शौसं. ११।६।५)

हेमन्तशिशिरौ व अहोरात्रे या द्वंद्व समासांत पूर्वपदाचें लिंग वेदामध्यें होतें. ' परवल्लिङ्गम्० ' ।२।४।२६ यानें शिशिर या पर शब्दाचें लिंग प्राप्त झालें होतें. अहश्च रात्रिश्च–अहोरात्रे, येथें ' रात्राह्नाहाः पुंसि ' ।२।४।२९ यानें पुल्लिंग प्राप्त झालें होतें. उदा० ' अहोरात्राणि विदधत् ' ।

टीप—हेमन्त व शिशिर शब्द अमरोप्रमाणें उभयलिंगी आहेत. पण ' हेमन्तशिशिरे ' असा समास होत नाहीं.

' अदिप्रभृतिभ्यः शपः ' ।२।४।७२ यानें अदादिगणांतील धातूपुढील शपे विकरणाचा लुक् सांगितला आहे. पण—

(३४००) बहुलं छन्दसि ।२।४।७३

" वृत्रं हनति वृत्रहा "। (ऋ ८।८९।३) **"अहिः शयत उप पृक्पृथिव्याः"** (ऋ. १।३२।५) **। अत्र लुङ न। अदादिभिन्नेऽपि क्वचिल्लुक् । " त्राध्वं नो देवाः "** (ऋ. २।२९।६) **। ' जुहोत्यादिभ्य : श्लुः । '**

वेदामध्यें ' अदिप्रभृतिभ्यः शपः ' यानें शपाचा होणारा लुक् बहुलें–करून होत नाहीं. उदा० वृत्रं हनति वृत्रहा येथें हन् याचे शपासह ' हनति ' होतें. भाषेंत ' हन्ति ' होतें. त्याप्रमाणें ' अहिः शयते ' इत्यादि वाक्यांत शी याचे 'शय।' होतें. शपाचा लुक् होत नाहीं. भाषेंत 'शेते' होतें. क्वचित् अदादिगणातील धातू नसूनहि शपाचा लुक् होतो. उदा० ' त्राध्वं नो देवाः '; वस्तुतः त्रै धातूचे शपासह ' त्रायध्वम् ' व्हावयास पाहिजे होतें.

' जुहोत्यादिभ्यः श्लुः ' जुहोत्यादि गणांतील धातूपुढील शपाला श्लु सांगितला आहे पण--

(३४०१) बहुलं छन्दसि ।२।४।७६

"दाति प्रियाणि चिद्वसु" । (ऋ. ४।८।३) अन्यत्रापि । "पूर्णा विवष्टि" (ऋ. ७।१६।११)

वेदामध्यें शपाला श्लु बहुलेंकरून होतो. म्हणजे जेथें व्हावयास पाहिजे तेथे होत नाहीं व जेथें व्हावयास नको तेथें होतो. उदा० ' दाति प्रियाणि चिद्वसु ' (ऋग्वेद ।४।८।३), येथे ' ददाति ' ऐवजी ' दाति ' होते. ' देवो वो द्रविणोदाः पूर्णां विवष्टि ' । (ऋग्वेद ।७।१६।११) यांतील ' विवष्टि ' रूप ' वश कान्तौ ' याचे आहे. हा धातू अदादिगणांत असूनहि शपाचा लुक् न होता श्लु होतो. त्यामुळें ' श्लौ ' ।६।१।१० यानें द्विर्वचन होऊन ' विवष्टि ' रूप होतें.

(३४०२) मन्त्रे घसह्वरणशवृदहाद्वृच्कृगमजनिभ्यो लेः ।२।४।८०

एभ्यो लेर्लुक् स्यान्मन्त्रे । " अक्षन्नमीमदन्त हि " । (ऋ. १।८२।२) घस्लादेशस्य ' गमहन ' इत्युपधालोपे ' शासिवसि ' इति षः । "मा ह्वर्मित्रस्य" । (तैसं १।१ ४।१) धूर्तिः प्रणङ्मर्त्यस्य । (ऋ. १।१८।३) 'नशेर्वा' इति कुत्वम् । " सुरुचो वेन आवः । (वासं १३।३) 'मा न आ धक्'; (ऋ. ६।६१।१४) आदित्याकारान्तग्रहणम् । " आ प्रा द्यावापृथिवी " । (ऋ १।११५।१); "परावर्ग भारभृद्यथा"।(ऋ. ८।७५।२) "अक्रन्नुषासः" (ऋ. १।९२।२) "त्वे रयिं जागृवांसो अनुग्मन् " (ऋ. ६।१।३) मन्त्रग्रहणं ब्राह्मणस्याप्युपलक्षणम् । " अज्ञत वा अस्य दन्ताः " (ऐब्रा. ७।१४); विभाषानुवृत्तेर्नेह । "न ता अगृभ्णन्नजनिष्ट हि सः" (ऋ. ५।२।४)

इति द्वितीयोऽध्यायः ।

वेदांतील मंत्रविषयांत घस् (अद् धातूला झालेला आदेश) 'ह्वृ कौटिल्ये' (यालाच गुण होऊन 'ह्वर्' होतें.) त्यांतील अकारउच्चारणार्थ आहे.) णश अदर्शने, वृञ् वरणे व वृङ संभक्तौ, दह भस्मीकरणे; आत् म्हणजे आकारान्त धातू–प्रा पूरणे वगैरे, वृजी वर्जने, डुकृञ् करणे, गम्लृ–गतौ आणि जनी प्रादुर्भावे या धातूपुढील लि म्हणजे च्लिचा लुक् होतो. च्लि यालाच पूर्व वैयाकरणांची 'लि' अशी संज्ञा आहे. उदा० घस्– 'अक्षन्नमीमदन्त हि' (ऋग्वेद १।८२।२); यांतील 'अक्षन्' हे अद् धातूला ।२।४।३७ यानें घस्लृ आदेश होऊन त्याचें लुङाचें रूप आहे. उपान्त्य अकाराचा 'गमहनजन०' ।६।४।९८ यानें लोप होऊन घकाराला ।८।४।५५ यानें ककार होतो. सकाराला 'शासिवसि०' ।८।३।६० यानें षत्व होऊन 'कषयोः क्षः' प्रमाणें क्ष् बनतो. अडागम होऊन 'अक्षन्' रूप सिद्ध होतें. यांत च्लिचा लुक् झाला आहे. ह्वृ (ह्वर्)–'मा ह्वर्मित्रस्य' यांतील 'ह्वर्' हें ह्वृ धातूच्या लुङाचें म. पु. ए. व. आहे. च्लिचा लुक् झाल्यावर ह्वृ + स् अशी स्थिति असतां । ७ । ३ । ८४ यानें गुण होतो व सकाराचा । ६ । १ । ६८ यानें लोप होऊन 'ह्वः' सिद्ध होतें णश्—'धूर्तिः प्रणङ् मर्त्यस्य' (ऋग्वेद ।१।१८।३), यांतील 'प्रणक्' हें रूप प्रपूर्वक नश् धातूच्या लुङाचें आहे. 'हल्ङ्याप्०' यानें तकाराचा लोप होऊन नकाराला 'उपसर्गादसमासेऽपि' ।८।४।१४ यानें णत्व होतें. पुढें मकार असल्यानें 'यरोऽनुनासिके०' यानें ककाराला ङकार होऊन 'प्रणङ्' रूप होतें. तत्पूर्वी शकाराला 'नशेर्वा' ।८।२।६३ यानें कुत्व होतें. वृ–(यानें वृञ् व वृङ या दोहोंचेहि ग्रहण होतें.)–'सुरुचो वेन आवः' (यजु. ।१३।३) यांतील 'आवः' हें वृञ् धातूच्या लुङाचें रूप आहे. दह्–'आ न आधक्'–(ऋग्वेद ६।६१।१४), यांतील 'आधक्' हे रूप आङ्पूर्वक दह् धातूच्या लुङाचें आहे.

आदन्त धातु––आङ्पूर्वक–प्रा, आप्रा द्यावापृथिवी' (ऋग्वेद १।११५।१) यांत 'आप्रा' हें रूप आङ्पूर्वक प्रा धातूच्या लुङाचें म. पु.

ए. व. आहे. त्याहून सिप् प्रत्यय केला असतां त्याला रुत्व व यत्व केल्यावर यकाराचा लोप होतो. ' प्रा पूरणे ' असा धातु आहे. वृज्-'परावर्ग् भारभृद्यथा ' (ऋग्वेद ८।६४।१२) यांतील ' परावर्क् ' हें रूप परापूर्वक वृज् धातूच्या लुङाचें आहे. उपधागुण झाल्यावर 'चोः कुः' । यानें कुत्व होतें. डुकृञ् करणे–'अक्रन्नुषासः '। (ऋग्वेद १।९२।२) यांत 'अक्रन्' हें कृ धातूच्या लुङाचे प्र. पु. ब. व. आहे. झि प्रत्यय ङित् असल्यानें गुण न होता यण् होतो. गम्–' त्वे रयिं जागृवांसो अनुग्मन् '। (ऋग्वेद ६।१।३) ' अनुग्मन् ' हें रूप अनुपूर्वक गम् धातूच्या लुङाचें प्र. पु. ब. व. आहे. ' गमहन० ' यानें उपधालोप होतो. सूत्रांत ' मन्त्रे ' जरी म्हटलें असलें तरी तें ब्राह्मणग्रंथाचेंहि उपलक्षण समजावे. ब्राह्मणग्रंथाचाहि त्यानें समावेश होतो.

जन्- ' अज्ञत वा अस्य दन्ताः '। हें उदाहरण ऐतरेय ब्राह्मणग्रंथांतील आहे. यांत 'अज्ञत ' हें जन् धातूच्या लुङाचें रूप आहे. ' गमहन० ' यानें उपधालोप होतो. ' विभाषा ' याची अनुवृत्ति येत असल्याने पुढील उदाहरणांत च्लिचा लुक् होत नाहीं. ' न ता अगृभ्णन्नजनिष्ट हि सः ' (ऋग्वेद ५।२।४) यांत ' अजनिष्ट ' हें जन् धातूच्या लुङाचे रूप नेहमीप्रमाणें च्लि करून साधले आहे. येथें च्लिचा लोप झाला नाहीं.

' मन्त्रे ' म्हटल्यानें भाषेंमध्यें वरील धातूचीं रूपें अनुक्रमें अघसत्, अह्वार्षीत्, अनशत्, अवारीत्, अधाक्षीत्, अप्रासीः, अवर्जीत्, अकार्षीत्, अगमत्, अजनि व अजनिष्ट अशी होतात.

याप्रमाणें वैदिकीप्रकरणांतील दुसऱ्या अध्यायांतील सूत्रांचा ' बालबोधिनी ' टीकेसह मराठी अनुवाद समाप्त झाला.

अथ तृतीयोऽध्यायः ।

(३४०३) अभ्युत्सादयां प्रजनयां चिकयां रमयामकः पावयांक्रियाद्विदामक्रन्निति च्छन्दसि ।३।१।४२

आद्येषु चतुर्षु लुङि आम् अक इत्यनुप्रयोगश्च । "अभ्युत्सादयामकः"। (मैस. १।६।५।२) **अभ्युदसीषददिति लोके । प्रजनयामकः** (मैसं. १।६।१०) **प्राजीजनदित्यर्थः । चिकयामकः । अचैषीदित्यर्थे चिनोतेराम् द्विर्वचनं कुत्वं च । रमयामकः ।** (काठसं. ७।७) **अरीरमत् । पावयांक्रियात् ।** (मैस. २।१।३) **पाव्यादिति लोके । विदामक्रन् ।** (मैसं. १।४।७) **अवेदिषुः ।**

अभ्युत्सादयाम्, प्रजनयाम्, चिकयाम्, रमयामकः, पावयांक्रियात् आणि विदामक्रन् हीं रूपें वेदामध्यें विकल्पानें निपातित होतात. षद्लृ विशरणगत्यवसादनेषु, जनी प्रादुर्भावे व रमु क्रीडायाम् या धातूंच्या ण्यन्ताहून लुङ केला असतां आम् प्रत्ययाचें निपातन होतें. 'चिञ् चयने' या शुद्ध धातूहून आम् प्रत्यय पुढें असतां द्वित्वाचें व कुत्वाचें निपातन होतें. 'अकः' याचा प्रत्येकाशीं संबंध आहे. त्याचा अनुप्रयोग होतो. 'अकः' हें रूप कृ धातूचें वेदांतील लुङाचें प्र.पु. ए. व. आहे. त्यामुळें पहिल्या चारांचीं अभ्युत्सादयामकः, प्रजनयामकः, चिकयामकः व रमयामकः अशीं रूपें होतात. वेदामध्येंहि विभाषा असल्यानें लोकांत 'अभ्युदसीषदत्' होतें. अभि आणि उद्पूर्वक सद् धातूच्या ण्यन्ताच्या लुङाचे हें रूप आहे. 'विदांकुर्वन्तु०' (३।१।४२) या सूत्रांतून 'अन्यतरस्याम्' पदाची अनुवृत्ति येते. 'प्रजनयामकः' याऐवजी वैकल्पिक रूप 'प्राजीजनत्' होतें. तसेंच 'चिकयामकः' किंवा अचैषीत् होतें. रमयामकः किंवा अरीरमत्; 'पावयांक्रियात्' हें पवति किंवा पुनाति यांचें ण्यन्ताचें आशीर्लिङाचें रूप आहे, येथे 'क्रियात्' याचा अनुप्रयोग होतो. 'क्रियात्' हें कृ धातूचें आशीर्लिङाचें रूप आहे. 'लिङाशिषि' यानें आर्धधातुक संज्ञा होत असल्यानें उ विकरण होत नाहीं.

वैकल्पिक रूप भाषेंत ' पाव्यात् ' असे होतें. ' विदामक्रन् ' हें विद् धातूच्या लुङाचें आहे. लुङ केल्यावर विद् धातूहून आम् प्रत्यय होतो, गुण होत नाहीं. 'अक्रन्' या कृ धातूच्या वैदिक लुङाच्या रूपाचा अनुप्रयोग होतो. वैकल्पिक रूप ' अवेदिषुः ' होतें.

ही सर्व रूपें विस्तारभयास्तव साधून दाखविली नाहींत. तीं वेग-वेगळ्या सूत्रांनीं होतात व तीं सर्व यापूर्वी येऊन गेली असल्यानें पुनरुक्ति केली नाहीं.

(३४०४) गुपेश्छन्दसि ।३।१।५०

च्लेश्चङ वा । गृहानजूगुपतं युवम् । अगौप्तमित्यर्थः ।

वेदामध्यें 'गुपू रक्षणे' या धातूपुढील च्लि याला चङ् विकल्पानें होतो. ' गुपूधूप० ' ।२।२।२८ यानें जेव्हां आय् होत नाहीं तेव्हां हें सूत्र प्रवृत्त होतें. उदा० ' गृहानजगुपतं युवम् ' यांत ' अजूगुपतम् ' हे गुप् धातूच्या लुङाचें रूप आहे. ' तुजादीनां दीर्घोऽभ्यासस्य ' यानें अभ्यासाला दीर्घ होतो. चङ होत नाहीं तेव्हां गुपू धातु ऊदित् असल्यानें विकल्पानें इडागम होतो. तो होत नाहीं, तेव्हां ' अगौप्तम् ' होतें. इडागम झाल्यास 'अगोपिष्टम्' होतें व आय् झाल्यास अगोपायिष्टम् होतें. वेदामध्यें अशीं चार रूपें होतात. भाषेंत चङ् वर्ज करून इतर तीन होतात. मैत्रायणी संहितेमध्यें (१।५। १४) ' गृहान् जुगुपतं युवम् ' असें वाक्य आढळतें.

(३४०५) नोनयतिध्वनयत्यलयत्यर्दयतिभ्यः ।३।१।५१

च्लेश्चङ न । मा त्वायतो जरितुः काममूनयीः (ऋ.।१।५३।३) **मा त्वाग्निर्ध्वनयीत् ।** (ऋ. १।१६२।१५)

ऊन परिहाणे, ध्वन शब्दे, इल प्रेरणे व अर्द गतौ याचने च, या धातू-पुढील च्लि याला चङ् होत नाहीं. या धातूंच्या ण्यन्ताहून च्लिला तो ' णिश्रि ' ।३।१।४८। इत्यादि सूत्रानें प्राप्त झाला होता. ऊनयति व एलयति हे चुरादि ण्यन्त आहेत. ध्वनयति हाहि चुरादि अदन्त असून घटादि

गणांत आहे. अर्दयति येथे मात्र हेतुमण्णिच् झाला आहे. उदा० ' मा त्वा० ' इत्यादि वाक्यांत ' ऊनयीः ' हें म पु. ए. व. आहे. ' न माङ्योगे ' यानें आडागमाचा प्रतिषेध होतो. ' इदमिन्द्रं प्रति सव्यस्य ऋषेर्वचनम् । त्वायत-स्त्वामिच्छतः जरितुः स्तोतुः मम काममभिलाषं मा ऊनयीः ।' ऊनं मा कार्षीरित्यर्थः । भाषेमध्यें ' औननत् होतें. ' मा त्वाऽग्निर्ध्वनयीत् ' यांत ' ध्वनयीत् ' हें ध्वन् धातूचें लुङाचें रूप आहे. अडागम होत नाही. भाषेत ' अदिध्वनत् ' होतें. इल् याचे ऐलयीत् (तुल. शौ सं. ६।१६।३ 'अयमैलब ऐलयीत्); अर्द् याचें आर्दयीत् होतें. भाषेंत ऐलिलत् व आर्दिदत् अशीं रूपें होतात.

(३४०६) कृमृदृरुहिभ्यश्छन्दसि ।३।१।५९

च्लेरङ् वा। इदं तेभ्योऽकरं नमः (ऋ. १०।८५।१७) । अमरत् । अदरत् । यत्सानोः सानुमारुहत् (ऋ. १।१०।२) ।

डु कृञ् करणे, मृङ् प्राणत्यागे, दॄ विदारणे, रुह बीजजन्मनि प्रादुर्भावे या धतूपुढील च्लि याला अङ् विकल्पानें होतो.

या सूत्रांत ' च्लि लुङि ' यांतून च्लि य.ची, ' अस्यति वक्ति० ' यांतून अङ् याची व ' इरितो वा ' यांतून ' वा ' याची अनुवृत्ति येते. उदा० ' इदं तेभ्योऽकरं नमः ' यांतील ' अकरम् ' हें रूप कृ धातूहून च्लि-ला अङ् केल्यावर ' ऋदृशोऽङि गुणः ' यानें गुण करून होतें. भाषेंत अका-र्षीत् होतें. मृ अमरत्, दृ – अदरत्; ' अमरत् ' येथे व्यत्ययाने पर-स्मैपद होतें. भाषेंत ' अमृत ' व ' अदारीत् ' अशीं रूपें होतात. रुह् याचें ' अरुहत् ' होतें. भाषेंत ' अरुक्षत् ' होतें. वेदांत ' यत्सानोः सानुमारुहत् ' असा प्रयोग आहे.

(३४०७) छन्दसि निष्टर्क्यदेवहूयप्रणीयोन्नीयोच्छिष्य-मर्यस्तर्याध्वर्यखन्यखान्यदेवयज्यापृच्छ्यप्रतिषीव्यब्रह्मवाद्य-भाव्यस्ताव्योपचाय्यपृडानि ।३।१।१२३

कृन्ततेर्निस्पूर्वात् क्यपि प्राप्ते ण्यत् । आद्यन्तयोर्विपर्यासो निसः षत्वं च । निष्टर्क्यं चिन्वीत पशुकामः । (तैसं ६।१।७।२); देवशब्दे उपपदे ह्वयतेर्जुहोतेर्वा क्यप् दीर्घश्च । स्पर्धन्ते वा उ देवहूये । (ऋ. ७।८५।२); प्र उत् आभ्यां नयतेः क्यप् । प्रणीयः । उन्नीयः । उत्पूर्वाच्छिषेः क्यप् । उच्छिष्यः । मृङ्स्तृ ध्वृभ्यो यत् । मर्यः । स्तर्या । स्त्रियामेवायम् । ध्वर्यः । खनेर्यण्ण्यतौ । खन्यः । खान्यः । यजेर्यः । शुन्धध्वं दैव्याय कर्मणे देवयज्यायै । (तैसं १।१।३।१) आङ्पूर्वात् पृच्छेः क्यप् । आपृच्छ्यं धरुणं वाज्यर्षति । (ऋ. ९।१०७।५) सीव्यतेः क्यप् षत्वं च । प्रतिषीव्यः । ब्रह्मणि वदेर्ण्यत् । ब्रह्मवाद्यम् । (तैसं २।५।८।३) लोके तु 'वदः सुपि क्यप् च' इति क्यबण्यतौ । भवतेः स्तौतेश्च ण्यत् । भाव्यः । स्ताव्यः । उपपूर्वाच्चिनोतेर्ण्यत् आयादेशश्च पृडे उत्तरपदे । उपचाय्य-पृडम् । (काठसं ११।१) हिरण्य इति वक्तव्यम् । उपचेयपृडम-न्यत् । मृड सुखने पृड चेत्यस्मादिगुपधलक्षणः कः ।

वेदामध्यें निष्टर्क्य, देवहूय, प्रणीय, उन्नीय, उच्छिष्य, मर्य, स्तर्या, ध्वर्य, खन्य, खान्य, देवयज्या, आपृच्छ्य, प्रतिषीव्य, ब्रह्मवाद्य, भाव्य स्ताव्य आणि उपचाय्यपृड या रूपांचें निपातन होतें. हीं रूपें फक्त वेदातच आढळून येतात व त्यांची व्युत्पत्ति येथें देण्याचा प्रयत्न केला आहे. उदा० 'निष्टर्क्य' हें रूप निस्पूर्वक 'कृती छेदने' (कृन्तति) या धातूहून ण्यत् प्रत्यय करून साधलें आहे. तें साधतांना 'ऋदुपधाच्च०' ।३।१।११० यानें क्यप् प्राप्त झाला असतां ण्यत् होतो. कृत् याच्या आद्यन्ताचा विपर्यास करून 'तृक्' करून 'निष्टर्क्य' रूप षत्व करून साधलें जातें. उदा० 'निष्टर्क्यं चिन्वीत पशुकामः'। त्याप्रमाणें 'देवहूयः' हें रूप देव-शब्द उपपद असतां ह्वे किंवा हु धातूहून क्यप् करून साधलें आहे. उका-

राला दीर्घ होतो म्हणून ३।१।७ यानें होणारा तुक् आगम होत नाहीं. उदा० 'स्पर्धन्ते वा उ देवहूये' (ऋग्वेद ७।८५।२); प्रणीयः व उन्नीयः हीं रूपें प्रपूर्वक नी व उत्पूर्वक नी धातूहून क्यप् करून साधलीं आहेत. 'उच्छिष्यम्' हें रूप उत्पूर्वक शिष् अथवा शास् धातूहून क्यप् करून साधलें आहे. 'मर्यः'– मृ धातूहून यत् होऊन गुण होतो. त्याप्रमाणें स्तृ आणि ध्वृ याहूनहि यत् होऊन स्तर्या व ध्वर्यः रूपें होतात. त्यापैकीं 'स्तर्या' हें नेहमी स्त्रीलिंगीच असतें. खन्यः व खान्यः हीं रूप अनुक्रमें खन् धातूहून यत् व ण्यत् प्रत्यय करून साधलीं आहेत. 'देवयज्या' हें देवउपपदपूर्वक यज् धातूहून यत् करून साधले आहे. उदा० 'शुन्धध्वं दैव्याय कर्मणे देवयज्यायै।' हाही शब्द नेहमी स्त्रीलिंगीच असतो. आपृच्छयः– आङ्पूर्वक प्रच्छ् धातूहून क्यप् करून संप्रसारणानें सिद्ध होतो. उदा० आपृच्छ्यं धरुणं वाज्यर्षति'; प्रतिषीव्यः–प्रतिपूर्वक सिव् धातूहून क्यप् होतो व सकाराला षत्व होते. 'हलि च' यानें दीर्घ होतो. ब्रह्मवाद्यम्– ब्रह्मन् उपपद असता वद् धातूहून ण्यत् होतो. भाषेंत मात्र 'वदः सुपि क्यप् च' ३।१।१०६ यानें क्यप् व ण्यत् प्रत्यय होतात. 'ब्रह्मोद्यम्' असें क्यप् करून होतें. भाव्यः व स्ताव्यः हीं रूपें अनुक्रमे भू व स्तु धातूहून ण्यत् करून साधलीं आहेत. 'उपचाय्यपृडम'* उपपूर्वक चि धातूहून पृड शब्द पुढें असता ण्यत् होतो व आयादेश होतो. (वा.) 'मात्र त्याचा अर्थ सुवर्ण असला पाहिजे.' जेव्हां तो अर्थ नसेल तेव्हां 'उपचेयपृडम्' असें रूप होतें. 'मृड सुखने पृड च' असें धातू तुदादिगणांत पठित असून त्यांहून 'इगुपधज्ञाप्रीकिरः कः' ।३।१।१३५ यानें क प्रत्यय होऊन 'पृडः' असें रूप सिद्ध होते.

* **टीप**—'उपचाय्य च तत् पृडं च' असा कर्मधारय आहे.

(३४०८) छन्दसि वनसनरक्षिमथाम् ।३।२।२७

एभ्यः कर्मण्युपपदे इन् स्यात्। ब्रह्मवनिं त्वा क्षत्रवनिम्। (तैसं. १।३।१।५) **उत नो गोषणिं धियम्।** (ऋ. ६।५३।१०)

ये पथां पथिरक्षयः । (वासं १६।६०) **चतुरक्षौ पथिरक्षौ** । (ऋ १०।१४।११) **हविर्मथीनामभि** । (ऋ. ७।१०४।२१)

वन्, षण्, रक्ष् आणि मथ् यांहून कर्म उपपद असता इन् प्रत्यय होतो. उदा० वन्--' ब्रह्मवनिं त्वा क्षत्रवनिम् । ' (वा. सं. १।१७।५; १२।६।३) ब्रह्म वनति, क्षत्रं वनति; इन् केल्यावर तदन्ताचें द्वितीयेचें एकवचन. सन्—' उत नो गोषणिं धियम् ' (ऋ. ६।५३।१०) गोषणिम्-' गां सनति ' असा विग्रह होतो. सुषामादित्वात् षत्व होते. (' सुषामादिषु च ' ।८।३।९८) परंतु याला भाष्यकाराचा विरोध आहे, 'तथापि दन्त्यस्यैव मूर्धन्यवत् पाठो वैदिकसंप्रदायात् । अत एव पदकाले दन्त्यमेव पठन्ति ' । (म. भा.) रक्ष्-' ये पथां पथिरक्षयः ' यांत ' पथिरक्षी ' याचा .पन्थानं रक्षति' असा विग्रह होतो. मथ्-' हविर्मथीनामभि '-हविर्मन्थति-हविर्मथिन्-षष्ठी ब. व. हविर्मथीनाम् ।

(३४०९) छन्दसि सहः ।३।२।६३

सुप्युपपदे सहेर्ण्विः स्यात् । पृतनाषाट् । (ऋ. १।१७५।२)

सुबन्त उपपद असता वेदामध्यें ' षह मर्षणे ' या सह् धातूहून ण्वि प्रत्यय होतो. उदा० ' पृतनाषाट् '- हें प्रथमेचें एकवचन आहे. (इंद्राचें नांव) ' सहेः साडः सः ' । ८।३।५६ यानें सकाराला षत्व होतें. ' पृतन ' यांतील अकाराला ६।२।१३७ यानें दीर्घ होतो.

टीप--' भजो ण्विः ' ३।२।६२ यातून 'ण्वि' याची अनुवृत्ति येते.

(३४१०) वहश्च ।३।२।६४

प्राग्वत् । दित्यवाट् । (वासं. १४।१०) **योगविभाग उत्तरार्थः**।

सुबन्त उपपद असता वेदामध्यें वह् धातूहून ण्वि प्रत्यय होतो. उदा० दित्यवाट्—दित्यं वहति (यजु. १४।१०); मागच्यापासून हे सूत्र वेगळें करण्याचे कारण कीं याच सूत्राची अनुवृत्ति पुढच्या सूत्रांत जावी.

(३४११) कव्यपुरीषपुरीष्येषु ञ्युट् ।३।२।६५

एषु वहेर्ञ्युट् स्याच्छन्दसि । कव्यवाहनः । (वासं. १९।६५) **पुरीषवाहनः ।** (तैसं. ४।१।८२) **पुरीष्यवाहनः ।** (मैसं. २।७।४)

कव्य, पुरीष व पुरीष्य हे शब्द उपपद असता वह् धातूहून ञ्युट् (अन) प्रत्यय होतो. ञकार अनुबन्ध वृद्धीसाठीं व टकार स्त्रीलिंगी ङीप् होण्यासाठीं आहेत.

उदा० कव्यं वहति—' कव्यवाहनः पितॄणाम् ' (यजु. १२–२९) पुरीषवाहनः; पुरीष्यवाहनः; (यजु ११।४४) या शब्दांचे स्त्रीलिंगी रूप ४।१।१५ यानें ङीप् होऊन होतें.

(३४१२) हव्येऽनन्तः पादम् ।३।२।६६

अग्निश्च हव्यवाहनः। (शौ. ७।२०।१) **पादमध्ये तु 'वहश्च' इति ण्विरेव । हव्यवाळग्निरजरः पिता नः ।** (तैसं. १।४।११।१)

हव्य शब्द उपपद असता वह् धातूहून ञ्युट् प्रत्यय होतो. मात्र तो पादाच्या मध्यें नसून अंतीं असावा. उदा० अग्निश्च हव्यवाहनः । (ऋग्वेद १।४४।२) पादाच्या मध्यें आल्यास ' वहश्च ' याने ण्वि होऊन हव्यवाट् किंवा हव्यवाड् रूप होतें. उदा० ' हव्यवाळग्निरजरः पिता नः ' (ऋग्वेद ३।२।२); येथें हव्यवाड् यांतील डकाराला लकार होतो. प्रातिशाख्यात म्हटलें आहे कीं ' द्वयोश्चास्य स्वरयोर्मध्यमेत्य संपद्यते स डकारो लकारः '।

(३४१३) जनसनखनक्रमगमो विट् ।३।२।६७

'विड्वनोः' इत्यात्वम् । 'अब्जाः' । 'गोजाः' (ऋ. ४०।४।५) **" गोषा इन्द्रो नृषा असि "** (ऋ. ९।२।१०); **'सनोतेरनः' इति षत्वम् । " इयं शुष्मेभिर्बिसखा इवारुजत् "** । (ऋ. ६।६१।२) **"आ दधिक्राः शवसा पञ्च कृष्टीः"** । (ऋ. ४।३८।१०।) **अग्रेगाः ।** (वासं. २७।३१)

उपसर्ग किंवा सुबन्त उपपद असता वेदामध्यें जन्, सन्, खन्, क्रम् आणि गम् याहून विट् प्रत्यय होतो. विट् यांतील टकार 'विड्वनो:०' यांतील विट् याच्या विशेषणार्थ आहे व 'वेरपृक्तस्य'। ६।१।६७ येथें सामान्यग्रहणार्थ आहे.

उदा० अप्सु जायते (उत्पद्यते) अब्जाः; गोषु जायते (उत्पद्यते) गोजाः, येथें विट् केल्यावर 'विड्वनो:०' ६।४।४१ यानें आत्व होतें. गाः सनति गोषाः । नृन् सनति नृषाः; 'गोषा इन्द्रो नृषा असि' येथें 'सनोतेरनः' ।८।३।१०८ यानें षत्व होतें. विसानि खनति-विसखाः, 'इयं शुष्मेभिर्विसखा इवारुजत्;' क्रम्—दधि क्रामति—दधिक्राः; आ दधिक्राः शवसा पञ्च कृष्टीः। (ऋग्वेद ४।३८।१०); गम्—अग्रे गच्छति-अग्रेगाः; येथें 'हलदन्तात्०' इत्यादि सूत्रानें सप्तमीचा अलुक् होतो.

टीप—सर्व उदाहरणांत 'विड्वनो:०'। ६।४।४१ यानें आत्व होते.

(३४१४) मन्त्रे श्वेतवहोक्थशस्पुरोडाशो ण्विन् ३।२।७१

(वा.) श्वेतवहादीनां डस्पदस्येति वक्तव्यम् । यत्र पदत्वं भावि तत्र ण्विनोऽपवादो डस् वक्तव्य इत्यर्थः । श्वेतवाः । श्वेतवाहौ । श्वेतवाहः ।उक्थानि उक्थैर्वा शंसति उक्थशा यजमानः । (तैसं. ३।२।९।१) **उक्थशासौ । उक्थशास : । पुरो दाश्यते दीयते पुरोडाः ।**

वेदांतील मंत्रविषयांत श्वेतवह्, उक्थशस् आणि पुरोडाश् यांहून ण्विन् प्रत्यय होतो. हीं निपातनें सूत्रांनीं न सांगितलेल्या कार्यासाठीं आहेत.

कर्तृवाची श्वेत शब्द उपपद असता वह् धातूच्या कर्मकारकार्थी ण्विन् प्रत्यय होतो. (वा.)' जे जे प्रत्यय पुढें असतां पदसंज्ञा होण्याचो शक्यता आहे तेथें ण्विन्चा बाध करून डस् प्रत्यय होतो असें म्हणावें.' उदा० 'श्वेता एनं वहन्ति' या अर्थी श्वेतवाः (इन्द्र); श्वेतवाः

येथे 'अत्वसन्तस्य०' यानें दीर्घ झाला आहे. श्वेतवाहौ, श्वेतवाहः; तृतीया—श्वेतवहा, श्वेतवोभ्याम्, श्वेतवोभिः चतुर्थी—श्वेतवहे, श्वेतवोभ्याम्, श्वेतवोभ्यः; सप्तमी ब. व.-श्वेतवःसु; संबुद्धि-श्वेतवः; इत्यादि. येथें दीर्घ होत नाहीं. कारण 'अत्वसन्तस्य०' यांत 'असंबुद्धौ' असा निषेध आहे. उक्थानि उक्थैर्वा शंसति'उक्थशाः' यजमानः; उक्थशासौ,उक्थशासः; (ऋग्वेद२।३९।१) पुरो दाश्यते दीयते इति पुरोडाः, पुरोडाशौ, पुरोडाशः; (पुरोडा अग्ने पचतः; ऋग्वेद ३।२८।२); 'दाशृ दाने' यांतील दकाराला डकार होतो.

टीप—सर्वनामस्थान प्रत्यय व भसंज्ञा करणारे प्रत्ययपुढें असतां डस् प्रत्यय होत नाहीं.

(३४१५) अवे यजः ।३।२।७२

अवयाः । अवयाजौ । अवयाजः ।

वेदामध्यें मंत्रविषयांत अवपूर्वक यज् धातूहून ण्विन् प्रत्यय होतो. उदा० अवयाः (ऋ. १।१७३।१२ 'अस्ति हि ष्मा ते शुष्मिन्नवयाः') येथे ण्विन्ऐवजी पूर्ववत् डस् झाला आहे.) अवयाजौ, अवयाजः; हें निराळें सूत्र करण्याचें कारण कीं त्याचीच अनुवृत्ति पुढील सूत्रांत जावी. 'त्वं यज्ञे वरुणस्यावया असि' (ऋग्वेद १।१७३।१२)

(३४१६) अवयाः श्वेतवाः पुरोडाश्च ।८।२।६७

एते संबुद्धौ कृतदीर्घा निपात्यन्ते । चादुक्थशाः ।

अवयाः, श्वेतवाः व पुरोडाः अशी दीर्घ केलेलीं रूपें संबुद्धि प्रत्यय पुढें असता निपातन केलीं जातात. चकारानें 'उक्थशाः' याचेंहि निपातन होते. 'अत्वसन्तस्य०' इत्यादि दीर्घाचें विधान करण्याऱ्या सूत्रांत अनुवृत्तीनें 'असंबुद्धौ' म्हटलें असल्यानें निपातन करावें लागलें आहे.

(३४१७) विजुपे छन्दसि ।३।२।७३

उपे उपपदे यजेर्विच् । उपयट् ।

वेदामध्यें उपपूर्वक यज् धातूहून विच् (०) प्रत्यय होतो. उदा० उपयट्; (ता उपयड्भिरेतासृजत । तै. सं. ६।४।१।१) 'मन्त्रे' पदाची अनुवृत्ति येत असतां पुन: ' छन्दसि ' पद स्पष्टार्थ आहे. परंतु ' छन्दोब्राह्मणानि० ' इत्यादि सूत्रांत छन्दस् बरोबर ' ब्राह्मण ' शब्दाचाही निर्देश असल्यानें त्याचा ' छन्दसि ' या शब्दांत अन्तर्भाव होत नाहीं असें दिसतें. तर कांहींच्या मतें मंत्राबरोबर ' ब्राह्मणां ' चाहि समावेश व्हावा म्हणून ' छन्दसि ' पद घातलें आहें. ' मन्त्रव्यतिरिक्तो वेदभागो ब्राह्मणम् ।

(३४१८) आतो मनिन्क्वनिब्वनिपश्च ।३।२।७४

सुप्युपसर्गे चोपपदे आदन्तेभ्यो धातुभ्यश्छन्दसि विषये मनिनादयस्त्रयः प्रत्ययाः स्युः । चाद्विच् । सुदामा । सुधीवा । सुपीवा भूरिदावा । घृतपावा । विच् । कीलालपाः । " ब्रह्मभ्रूणवृत्रेषु क्विप् । "

सुबन्त किंवा उपसर्ग उपपद असतां आकारान्त धातूहून वेदामध्यें मनिन्, क्वनिप् व वनिप् प्रत्यय होतात. चकारानें विच् प्रत्ययहि होतो. उदा० सुदा + मनिन् (मन्)–सुदामन्–सुदामा, प्र. ए. व. (ऋ. ६।२०।७ 'सुदामन्तद्रेक्णो अप्रमृष्यम्') सुधी + क्वनिप् (वन्)–सुधीवन्–सुधीवा सुपा + क्वनिप् (वन्)––सुपीवन्–सुपीवा; भूरि + दा + वनिप्–– भूरिदावन्–भूरिदावा (ऋ. ९।८७।४ 'सहस्रसाः शतसा भूरिदावा') घृतपावन् –घृतपावा (तै. स. १।३।१०।२ 'घृतं घृतपावानः पिबत') विच्-कीलालं–पिबति–कीलाल + पा + विच्—कीलालपाः (ऋ. १०।९१।१४ 'कीलालपे सोमपृष्ठाय वेधसे')

टीप–सुधीवा व सुपीवा येथें क्वनिप् प्रत्यय कित् असल्यानें धा व पा धातूना ' घुमास्था० ' इत्यादि सूत्रानें ईत्व होतें. वनिप् व मनिन् प्रत्यय कित् नसल्यानें ते पुढें असता ईत्व होत नाहीं. ' कीलाल ' म्हणजे जल. पहा––' पयः कीलालममृतं जीवनं भुवनं वनम् ' (अमर)

'ब्रह्मभ्रूणवृत्रेषु क्विप्' ।३।२।२७ यानें ब्रह्मन्, भ्रूण व वृत्र शब्द उपपद असता हन् धातूहून क्विप् सांगितला आहे. पण--

(३४१९) बहुलं छन्दसि ३।२।८८

उपपदान्तरेऽपि हन्तेर्बहुलं क्विप् स्यात्। मातृहा। पितृहा। (पैमं. १९।४६।१४) 'छन्दसि लिट्'। भूतसामान्ये। "अहं द्यावापृथिवी आ ततान।" (तुल, ऋ. १०।१२५।६) 'लिटः कानज्वा'। 'क्वसुश्च'। छन्दसि लिटः कानच्क्वसू वा स्तः। चक्राणा वृष्णि। (ऋ. ८।७।२३) यो नो अग्ने अररिवाँ अघायुः (ऋ. १।१४७।४)। 'णेश्छन्दसि'। ण्यन्ताद्धातोश्छन्दसि इष्णुच् स्यात्तच्छीलादौ। वीरुधः पारयिष्णवः। (तैसं. ४।२।६) 'भुवश्च'। अस्मात्केवलात् प्राग्वत्। भविष्णुः। (मैसं. १।८।१) (वा.) 'छन्दसि परेच्छायां क्यच उपसंख्यानम्'। 'क्याच्छन्दसि'। उप्रत्ययः स्यात्। अघायुः। (वा.) 'एरजधिकारे जवसवौ छन्दसि वाच्यौ'। जवे याभिर्यूनः (ऋ. १।११२।२१)। ऊर्वोमे जवः। (पै.सं.२०।३६।७) देवस्य सवितुः सवे। (ऋ. ५।८२।६)

'ब्रह्मभ्रूण०' ।३।२।२७ इत्यादि सूत्रांत जे शब्द उपपदें म्हणून सांगितलीं आहेत त्यापेक्षां अन्य शब्द उपपद असतांनाहि हन् धातूहुन वेदामध्यें बहुलेंकरून क्विप् होतो, उदा० मातृहा, (मातरं हन्ति) पितृहा, (पितरं हन्ति), 'बहुलम्' म्हटल्यानें मातृघातः, पितृघातः अशीही रूपें होतात. 'छन्दसि लिट्' ।३।२।१०५ वेदामध्यें सामान्य भूतार्थी निष्ठाप्रत्ययार्थी लिट् प्रत्यय होतो. उदा० 'अहं द्यावापृथिवी आ ततान'। 'आततान' येथे तन् धातूहून उत्तम पुरुषीं णल होतो तेव्हां वृद्धि होऊन 'ततान' रूप होतें.

लुङ, लङ व लिट् हे भूतार्थी प्रत्यय सांगितले आहेत. वरील उदाहरणांत उत्तम पुरुषींहि वेदांत लिट् झाला आहे. येथें 'आततान' याला निष्ठाप्रत्ययाचा अर्थ आहे.

'लिट: कानज्वा' ।३।२।१०६; वेदामध्यें लिट्च्या जागीं कानच् प्रत्यय विकल्पानें होऊन त्याला लिटाचा अर्थ असतो. उदा० 'चक्राणा वृष्णि'; (ऋ. ८।७।२२)

'क्वसुश्च' ।३।२।१०७ वरील सूत्रविषय असता क्वसु प्रत्ययहि होतो. उदा० 'यो नो अग्ने अररिवाँ अघायु:'—अररिवाँ—हें रूप 'रा दाने' या धातूहून लिटाच्या ऐवजीं क्वसु (वस्) प्रत्यय होऊन झालें आहे. 'वस्वेकाचाद् घसाम्' यानें धातु आदन्त असल्यानें इडागम होतो. 'ररिवस्' रूप तयार झाल्यावर नञ् समास होतो. 'दीर्घादटि०' ।८।३।९ यानें नकाराला रुत्व होतें. 'आतोऽटि नित्यम्' यानें रुच्या पूर्वीच्या आकाराला नित्य अनुनासिक होतो. 'अररिवान्' (कृपण मनुष्य), ररिवान् (उदार मनुष्य).

'णेश्छन्दसि' ।३।२।१३७ ण्यन्त धातूहून वेदामध्यें ताच्छील्यादि अर्थी इष्णुच् प्रत्यय होतो. उदा० 'वीरुध: पारयिष्णव:'; पृच्या ण्यन्ताहून इष्णुच् होऊन 'पारयिष्णु' होतें.

'भुवश्च' ।३।२।१३८ केवल भू धातूहून ताच्छील्यादि अर्थी इष्णुच् प्रत्यय होतो. उदा० भविष्णु:; (वा.) 'छन्दसि परेच्छायां क्यच उपसंख्यानम्।'

वेदामध्यें परेच्छा असतांना सुद्धां सुबन्ताहून क्यच् होतो. हे वार्तिक करण्याचे कारण कीं 'सुप आत्मन: क्यच्' ।३।१।८ यानें स्वत:ची इच्छा असल्यास सुबन्ताहून क्यच् सांगितला आहे. आतां परेच्छा असताही होतो.

'क्याच्छन्दसि' ।३।२।१७० क्यच् प्रत्ययान्त धातूहून वेदामध्यें उ प्रत्यय होतो. उदा० अघायु:-- (ऋ.१०।९७।३) 'परस्य अघमिच्छति' या अर्थी अघ शब्दाहून क्यच् प्रत्यय होतो. 'अश्वाघस्यात्' ।७।४।३७ यानें क्यच् पुढें असतां दीर्घ होऊन 'अघाय्' या तदन्ताहून उ प्रत्यय होतो.

(वा.) 'एरच्' ।३।३।५६ या सूत्रानें इवर्णांत धातूहून अच् प्रत्यय सांगितला आहे; पण वेदामध्यें तो उवर्णांत धातूहूनहि होतो व त्यामुळें जु या सौत्र धातूचें 'जवः' व 'षूङ् प्राणिगर्भविमोचने' याचें 'सवः' अशीं रूपें होतात. उदा० 'जवे याभिर्यूनः'; 'ऊर्वोर्मे जवः'। 'देवस्य सवितुः सवे'।

या वार्तिकानें अच् सांगितला नसता तर 'ॠदोरप्' यानें अप् झाला असता. रूपांत जरी फरक झाला नसता तरी तो स्वरांत झाला असता.

टीप—'सनाशंसभिक्ष उः' ।३।२।१६८ यांतून 'उः' याची अनुवृत्ति येते. चित्स्वर 'चितः' या सूत्रानें अन्तोदात्त होतो तर ।३।१।४ यानें पित् स्वर अनुदात्त होतो.

(३४२०) मन्त्रे वृषेषपचमनविदभूवीरा उदात्तः । ३।३।९६

वृषादिभ्यः क्तिन् स्यात् स चोदात्तः । वृष्टिं दिवः (ऋ. ९। १०८।१०)। सुम्नमिष्टये (ऋ. ६।७०।४) पचात्पक्तीरुत । (ऋ. ४।२४।७) इयं ते नव्यसी मतिः (ऋ. ८।७४।७) वित्तिः । भूतिः । (ऋ. १।१६१।१) अग्न आ याहि वीतये । (ऋ. ६।१६।१०) रातौ स्यामोभयासः । (ऋ. ७।१।२०)

वृषु सेचने, इषु इच्छायाम्, पच पाके, मन ज्ञाने, विद ज्ञाने, भू सत्तायाम्, वी गतिव्याप्तिप्रजनकान्त्यसनखादनेषु व रा दाने या धातूहून मंत्रविषयांत क्तिन् प्रत्यय होतो व तो उदात्त होतो. 'स्त्रियां क्तिन्' ।३।३।९४ यातून क्तिन् याची अनुवृत्ति येते. सूत्रांत 'वीराः' यानें शेवट होणारा समास पंचम्यर्थी प्रथमा विभक्तीत आहे. उदा० 'स नो वृष्टिं दिवः' 'सुम्नमिष्टये पचात्पक्तीरुत', 'इयं ते नव्यसी मतिः', वित्तिः। भूतिः। 'अग्न आ याहि वीतये'। 'रातौ स्यामोभयासः'। वरील उदाहरणांत वृष्टिः, पक्तिः मतिः, वित्तिः, भूतिः, वीतिः व रातिः हीं रूपें आलीं आहेत.

(३४२१) छन्दसि गत्यर्थेभ्यः ।३।३।१२९

ईषदादिषूपपदेषु गत्यर्थेभ्यो धातुभ्यश्छन्दसि युच् स्यात् । खलोऽपवादः । सूपसदनोऽग्निः (तैसं. ७।५।२०) ।

वेदामध्यें ईषद् वगैरे शब्द उपपद असता गत्यर्थक धातूहून युच् (अन) प्रत्यय होतो. हा ३।३।१२६ यानें सांगितलेल्या खल् प्रत्ययाचा अपवाद आहे. उदा० ' सूपसदनोऽग्निः '

टीप— ' ईषद्दुःसुषु कृच्छ्राकृच्छ्रार्थेषु खल् ' ।३।३।१२६ व 'कर्तृकर्मणोश्च भूकृञोः' ।३।३।१२७ या दोन्ही सूत्रांनीं खल् सांगितला आहे. ' सूपसदनः ' हें सुप सु व उपपूर्वक सद् धातूहून युच् करून साधलें आहे.

(३४२२) अन्येभ्योऽपि दृश्यते ।३।३।१३०

गत्यर्थेभ्यो येऽन्ये धातवस्तेभ्योऽपि छन्दसि युच् स्यात् । सुवेदनामकृणोर्ब्रह्मणे गाम् (ऋ. १०।११२।८)

गत्यर्थक धातूपेक्षां अन्य धातूहूनहि वेदामध्यें युच् प्रत्यय आढळतो. उदा० ' सुवेदनामकृणोर्ब्रह्मणे गाम् '; त्याप्रमाणें ' सुदोहनामकृणोर्ब्रह्मणे गाम् '; वरील उदाहरणांत सुपूर्वक विद् व दुह् या धातूहून युच (अन) प्रत्यय होऊन उपधेला गुण झाला आहे.

(३४२३) छन्दसि लुङ्लङ्लिटः ।३।४।६

धात्वर्थानां संबन्धे सर्वकालेष्वेते वा स्युः । पक्षे यथास्वं प्रत्ययाः । देवो देवेभिरागमत् (ऋ. १।१।५) । **लोडर्थे लुङ् । इदं तेभ्योऽकरं नमः ।** (ऋ. १०।८५।१७) **लङ्—अग्निमद्य होतारमवृणीतायं यजमानः ।** (मैसं. ४।१३।९) । **लिट्—अद्या ममार ।** (ऋ. १० ५५।५) **अद्य म्रियत इत्यर्थः ।**

वेदामध्यें धातूच्या अर्थाशीं संबंध आला असता लुङ्, लङ व लिट् यांचा सर्व काळांत विकल्पानें उपयोग करण्यांत येतो.

या सूत्रांत ' धातुसंबन्धे प्रत्ययाः ' ।३।४।१ यांतून ' धातुसंबन्ध ' व ' समुच्चयेऽन्यतरस्याम् ' ।३।४।२ यातून ' अन्यतरस्याम् ' या पदांची अनुवृत्ति येते. ' धातुसंबन्ध ' म्हणजे धात्वर्थाचा संबंध. या ठिकाणीं विशेषण-विशेष्यभाव आहे. विकल्प म्हटल्यानें अन्य लकारांचाहि प्रयोग यथायोग्य होतो. उदा० ' देवो देवेभिरागमत् ' येथें ' आगमत् ' हें आङ्पूर्वक गमा धातूच्या लुङ्चें रूप आहे. या प्रयोगांत लुङ्ला ' लोट् ' चा अर्थ आहे. 'इदं तेभ्योऽकरं नमः' येथे 'अकरम्' हें कृ धातूच्या लुङ्चें वैदिक रूप आहे. त्याचा अर्थ लटाचा आहे. 'अग्निमद्य होतारम्०' इत्यादि प्रयोगांत 'अवृणीत' हें वृ धातूच्या लङ्चें रूप आहे. त्याचा अर्थ लटाचा आहे. ' अद्या ममार ', 'ममार' यात लिटाचा अर्थ ' म्रियते ' असा आहे.

(३४२४) लिङर्थे लेट् ।३।४।७

विध्यादौ हेतुहेतुमद्भावादौ च धातोर्लेट् स्याच्छन्दसि ।

वेदामध्यें हेतुहेतुमद्भाव असता विध्यर्थी लेट् प्रत्यय होतो.

टीप–या लेट् प्रत्यय होणाऱ्या रूपांची प्रक्रिया पुढील सूत्रांत देण्यांत येईल.

(३४२५) सिब्बहुलं लेटि ।३।१।३४

लेट् पुढें असता धातूहून बहुलेंकरून सिप् प्रत्यय होतो.

(३४२६) इतश्च लोपः परस्मैपदेषु ।३।४।९७

लेटस्तिङामितो लोपो वा स्यात् परस्मैपदेषु ।

परस्मैपदी प्रत्ययांतील लेट् प्रत्ययांतील इकाराचा विकल्पानें लोप होतो. ।३।४।९६ यातून ' वा ' ची अनुवृत्ति येते व ' लेटोऽडाटौ ' ।३।४।९४ यातून लेट् याची अनुवृत्ति येते.

(३४२७) लेटोऽडाटौ ।३।४।९४

लेटः अट् आट् एतावागमौ स्तः। तौ च पितौ। (वा.) 'सिब्बहुलं णिद्वक्तव्यः'। वृद्धिः। प्रण आयूंषि तारिषत्। (ऋ. १।२५।१२) **सुपेशसस्करति जोषिषद्धि।** (ऋ. २।३५।१) **आ साविषदर्शसानाय।** (ऋ. १०।९९।७)**सिप इलोपस्य चाभावे। पताति दिद्युत्** (ऋ. ७।२५।१) **। प्रियः सूर्ये प्रियो अग्ना भवाति।** (ऋ. ५।३७।५)

लेट् प्रत्ययांना अट् व आट् आगम पर्यायाने (आलटून पालटून) होतात व ते पित् होतात. 'आडुत्तमस्य '।३।४।९६ यातून 'पित्' याची अनुवृत्ति येते. (वा.) 'हा सिप् विकरण णित् समजावा.' त्यामुळें वृद्धि होते. उदा० 'प्रण आयूंषि तारिषत्' यांतील 'तारिषत्' हें रूप तॄ +सिप् + तिप् = तॄ + इट् + सिप् = तार् इ सि अट् (अ) ति = तारिषत्; त्याप्रमाणें 'सुपेशसस्करति जोषिषद्धि' यांतील 'जोषिषत्' हें रूपहि वरीलप्रमाणें 'जुषी प्रीतिसेवनयोः' या जुष् धातूचें होते. 'आ साविषदर्शसानाय '— यांतील 'आसाविषत्' हें रूप आङ्पूर्वक 'षु प्रसवैश्वर्ययोः' याचें लेटाचें आहे. जेव्हां सिप् विकरण होत नाहीं व ति (तिप्) यांतील इकाराचा लोप होत नाहीं तेव्हां 'पताति दिद्युत्' असा प्रयोग होतो. 'पत्लृ पतने' याहून लेट् केल्यावर आडागम होऊन रूप होतें. त्याप्रमाणें 'प्रियः सूर्ये प्रियो अग्ना भवाति' यांत 'भवाति' हें भूधातूच्या लेटाचें आडागम होऊन रूप होतें.

(३४२८) स उत्तमस्य ।३।४।९८

लेडुत्तमसकारस्य वा लोपः स्यात्। करवाव। करवावः। टेरेत्वम्।

लेट्च्या उत्तम पुरुषाच्या प्रत्ययांच्या सकाराचा लोप विकल्पानें होतो. उदा० करवाव किंवा करवावः, करवाम किंवा करवामः, हीं रूपें कृञ्

धातूच्या लेटाचीं वस् व मस् प्रत्यय पुढें असता होतात. 'टित आत्मनेपदानां०। ३।४।७९ ' इत्यादि सूत्रानें टि भागाला एत्व सांगितलें आहे.

(३४२९) आत ऐ ।३।४।९५

लेट आकारस्य ऐ स्यात् । सुतेभिः सुप्रयसा मादयैते । (ऋ. ४।४१।३) **आतामित्याकारस्य ऐकारः । विधिसामर्थ्यादाट ऐत्वं न । अन्यथा हि ऐटमेव विदध्यात् । यो यजाति यजात इत् ।** (ऋ. ८।३१।१)

लेटातील आताम् व आथाम् या आत्मनेपदी प्रत्ययांतील आकाराला ऐकार होतो. उदा० ' सुतेभिः सुप्रयसा मादयैते ' यांतील ' मादयैते ' हें रूप ' मदी हर्षे ' याचें णिजन्ताहून लेट्चें आहे. आताम् या प्रत्ययांतील पहिल्या आकाराला ऐकार होतो व ताम् यांतील आकाराला (टि भागाला) ' टित आत्मनेपदानां टेरे ' ।३।४।७९ यानें एत्व होतें. कारण हें एत्व नित्य आहे. आट् आगमातील आकाराला ऐत्व होत नाहीं. कारण तसेंच विधान केलें असल्यानें त्या सामर्थ्यास्तव होत नाहीं. नाहीं तर ' ऐट् ' असेंच विधान केलें असतें. त्यामुळें यज् धातूच्या लेट्चीं रूपें ' यो यजाति यजात इत् ' यामधील यजाति, यजातः अशीं होतात. आट् आगमाला ऐत्व होत नाहीं. हीं रूपें ' यज देवपूजादौ०' याची लेटाचीं आडागम होऊन होतात.

(३४३०) वैतोऽन्यत्र ।३।४।९६

लेट एकारस्य ऐ स्याद्वा 'आत ऐ' इत्यस्य विषयं विना । पशूनामीशै (काठ सं. २५।१) **। ग्रहा गृह्यान्तै** (तैसं. ६।४।७।१) **। अन्यत्र किम् । सुप्रयसा मादयैते ।**

' आत ऐ ' या सूत्राचा विषय सोडून अन्यत्र लेटाच्या एकाराला ऐकार विकल्पानें होतो. उदा० ' पशूनामीशै '—यांतील ' ईशै ' हे रूप ' ईश ऐश्वर्ये ' याचें लेटाचे उत्तम पु. ए. व. आहे. मूळ ' ईशे ' यांतील एकाराला ऐकार झाला. ' इट् ' प्रत्ययांतील इकाराचा ।३।४।९७ यानें लोप

होत नाहीं कारण तेथें ' परस्मैपदेषु ' म्हटलें आहे. या इकाराला ।३।४।७९ यानें एकार झाल्यावर प्रस्तुत सूत्रानें त्याला ऐकार होतो.

' ग्रहा गृह्यान्तै ' हें ग्रह् धातूचें लेटाचें कर्मणि रूप प्र. पु. ब. व. आहे. झि याला अन्ति झाल्यावर त्याला आडागम होतो. ' आन्ति ' झाल्यावर ।३।४।७९ यानें इकाराला एकार होऊन या सूत्रानें त्याला ऐकार होतो. सूत्र ।६।१।१६ यानें संप्रसारण होऊन ग्रह् याचें गृह् होतें. 'अन्यत्र' म्हट-ल्यानें ' सुप्रयसा मादयैते ' येथे ' आताम् ' यांतील पहिल्या आकारालाच ' आत ऐ ' याने ऐकार होतो हें पूर्वी आलेच आहे.

(३४३१) उपसंवादाशङ्कयोश्च ।३।४।८

पणबन्धे आशङ्कायां च लेट् स्यात् । अहमेव पशूनामीशै । नेज्जिह्मायन्त्यो नरकं पताम। (ऋ. खि. १०।१०६।१ निरुक्त १।११)। **' हलः श्नः शानज्झौ '।**

उपसंवाद (कांहीं अटीवर वचन) म्हणजे पणबंध व आशंका म्हणजे संभावना गम्यमान असतां वेदामध्यें धातूहून लेट् होतो, विधिलिङ् होत नाहीं. उदाहरण—' यदि मे भवानिदं कुर्यात् तदिदमहं दास्यामि ' इति समयकरणम् । ' जर तुम्ही माझ्यासाटीं हे कराल तर हें मी तुम्हाला देईन ! यालाच उपसंवाद किंवा पणबंध अथवा समयकरण म्हणतात.

उदा० ' अहमेव पशूनामीशै '—यांत ' ईशै ' हें रूप ईश् धातूच्या लेट्चें आहे. या वाक्यांत पशु यांचा अर्थ संसारी मनुष्य असा आहे.

त्रिपुरासुराला जिंकण्याची प्रार्थना जेव्हां देवांनीं रुद्राला केली तेव्हां रुद्रानें हें वचन आहे (ही अट आहे.) ती ही कीं सर्व संसारी जनांवर माझें स्वामित्व राहील. ' नेत् जिह्मायन्त्यो नरकं पताम ' यांत ' पताम' हें लेटाचे रूप आहे. मस् होऊन त्याला आडागम होतो. मस् यांतील सकाराचा लोप ।३।४।९८ यानें होतो. ' अत्र जिह्माचरणेन नरकपातः आशङ्कयते '। ' जिह्मायन्त्यः ' येथे ' छन्दसि परेच्छायाम् ' या वार्तिकाप्रमाणें ' जिह्म ', शब्दाहून क्यच् होतो. ' अश्वाघस्यात् ' या योगविभागानें आत्व होतें. ' नेत् ' यांतील इत् शब्द आशंका दाखवितो. दुसऱ्या विषयीं पापेच्छा

यालाच किंवा हेंच जिह्माचरण होय व तसें असल्यास 'जिह्माचरणेन नरकपातो माभूदित्यर्थः।' आम्ही नरकात पडण्याचीं आशंका-भीति आहे.

'हलः श्नः शानज्झौ' । ३।१।८३ यानें श्ना याला लोटाच्या म. पु. ए. व 'हि' प्रत्यय पुढें असता शानच् आदेश सांगितला आहे; परंतु पुढील सूत्रानें--

(३४३२) छन्दसि शायजपि ।३।१।८४

अपि शब्दाच्छानच्। (वा.) 'हृग्रहोर्भश्छन्दसि'। इति हस्य भः। गृभाय जिह्वया मधु। (ऋ. ८।१७।५) **बधान देव सवितः।** (वासं. १।२५) **अनिदितामिति बध्नातेर्नलोपः। गृभ्णामि ते।** (ऋ. १०।८५।३६) **मध्वा जभार।** (ऋ. ४।१८।३)

वेदामध्यें श्ना याला 'हि' प्रत्यय पुढें असता शायच् (आय) आदेश होतो. 'अपि' शब्दानें शानच्हि होतो. उदा० 'गृभाय जिह्वया मधु' यांतील 'गृभाय' हें रूप 'ग्रह उपादाने' याचें लोटाचें आहे. (वा.) 'हृ आणि ग्रह यांच्या हकाराला वेदामध्यें भकार होतो.' याप्रमाणें श्ना याला शायच् (:शाय) होऊन हकाराला भकार झाला. 'गृहाण' याऐवजीं 'गृभाय' रूप होतें. 'ग्रहिज्या०' यानें संप्रसारण होतें. 'बधान देव सवितः' यांत 'बधान' येथें बन्ध् धातूहून शानच् झाला असून 'अनिदिताम्०' यानें नकाराचा लोप होतो. 'गृभ्णामि ते' येथें हकाराला भकार झाल्यानें 'गृह्णामि' ऐवजीं 'गृभ्णामि' होतें. (ऋ. १०।८५।३६) तसेंच 'मध्वा जभार' यांत 'जभार' हें हृ यांतील हकाराला भकार होऊन 'जहार' या रूपाऐवजीं होतें.

(३४३३) व्यत्ययो बहुलम् ।३।१।८५

विकरणानां बहुलं व्यत्ययः स्यात् छन्दसि। भेदति। (ऋ. ८।४०।११) **भिनत्तीति प्राप्ते। आण्डा शुष्णस्य** (ऋ. १०।८६।११) **म्रियत इति प्राप्ते। जरसा मरते पतिः। इन्द्रो वस्तेन नेषतु।**

नयतेर्लोट् शप्सिपौ द्वौ विकरणौ । इन्द्रेण युजा तरुषेम वृत्रम् । (ऋ. ७।४८।२) तरेमेत्यर्थः । तरतेर्विध्यादौ लिङ् । उः शप् सिप् चेति त्रयो विकरणाः ।

सुप्तिङुपग्रहलिङ्गनराणां कालहलच्स्वरकर्तृयङां च ।
व्यत्ययमिच्छति शास्त्रकृदेषां सोऽपि च सिध्यति बाहुलकेन ॥१॥

धुरि दक्षिणायाः । (ऋ. १।१६४।९) दक्षिणस्यामिति प्राप्ते । चषालं ये अश्वयूपाय तक्षति । (ऋ. १।१६२।६) तक्षन्तीति प्राप्ते । उपग्रहः परस्मैपदात्मनेपदे । ब्रह्मचारिणमिच्छते । (शौ. ११।५।१७) इच्छतीति प्राप्ते । प्रतीपमन्य ऊर्मिर्युध्यति । (मैसं. ४।४।१) युध्यत इति प्राप्ते । मधोस्तृप्ता इवासते । मधुन इति प्राप्ते । नरः पुरुषः । अधा स वीरैर्दशभिर्वियूयाः । (ऋ. ७।१०४।१५) वियूयादिति प्राप्ते । कालः कालवाची प्रत्ययः । श्वोऽग्नीनाधास्यमानेन । (काठसं. ८।१२) लुटो विषये लृट् । तमसो गा अदुक्षत् । (ऋ. १।३३।१०) अधुक्षदिति प्राप्ते । 'मित्र वयं च सूरयः । (ऋ. ५।६६।६) मित्रा वयमिति प्राप्ते । स्वरव्यत्ययस्तु वक्ष्यते । कर्तृशब्दः कारकमात्रपरः । तथा च तद्वाचिनां कृत्तद्धितानां व्यत्ययः । अन्नादाय । (शौ. १९।५५।५) अण्विषये अच् । अवग्रहे विशेषः । यङो यशब्दादारभ्य 'लिङ्याशिष्यङ' इति ङकारेण प्रत्याहारः । तेषां व्यत्ययो भेदतीत्यादिरुक्त एव ।

वेदामध्यें विकरणांचा व्यत्यय (आलटापालट) बहुलेंकरून होतो. उदा० 'आण्डा शुष्णस्य भेदति' येथें भिद् धातूला श्नम् न लागता शप् लागून 'भेदति' झाले आहे. 'जरसा मरते पतिः' येथें 'म्रियतें' ऐवजी 'मरते' असें शप् लागून रूप होतें. म्हणजे धातु तुदादि असल्यानें 'श' पाहिजे

होता. ' इन्द्रो वस्तेन नेषतु ' यामध्यें ' नयतु ' ऐवजी ' नेषतु ' आहे. येथें शप् आणि सिप् असे दोन विकरण नीधातूहून झाले आहेत.

' इन्द्रेण युजा तरुषेम वृत्रम् ' येथें ' तरेम ' याऐवजीं ' तरुषेम ' रूप असून उ, सिप् आणि शप् असे तीन विकरण आहेत. हें विधिलिङाचें रूप आहे. कारिकेचा अर्थ--' बहुलम् ' म्हटल्यानें (किंवा ' बाहुलकात् ') आचार्य पाणिनि काय काय साधतो हें या कारिकेत सांगितलें आहे; पुढील बाबतींत व्यत्यय होतो. (१) सुप्--विभक्तिप्रत्यय (२) तिङ--लकाराना होणारे तिप्, तस्, झि इत्यादि प्रत्यय, (३) उपग्रह--परस्मैपद व आत्मनेपद (४) लिङ्ग--पुंल्लिङ्ग, स्त्रीलिङ्ग, नपुंसकलिङ्ग; (५) नर म्हणजे पुरुष--प्रथम, मध्यम व उत्तम; (६) काल--कालवाची प्रत्यय, (७) व्यंजनें, (८) अच्--स्वर, (९) वेदांतील स्वर, (१०) कर्तृशब्दानें कारकें येतात. तद्वाचक कृत् आणि तद्धित प्रत्यय (११) ' यङ ' या प्रत्याहारातील प्रत्यय-- ' धातोरेकाचो० ' ।३।१।२२ यातील ' य ' पासून तों ' लिङ्याशिष्यङ ' ।३।१।८६ यातील ङकारापर्यंत येणारे प्रत्यय. यांमध्यें यङ, णिच्, कण्ड्वादि प्रत्यय, आय्, ईयङ्, णिङ्, स्य व तासि, सिप् (लेट् विकरण), आम् (लिट्), च्लि व सिच्, क्स, चङ, अङ, चिण् (लुङाचे विकरण) कर्मणि यक्, शप्, श्यन्, श्नु, श, श्नम्, उ, श्ना (विकरण), अङ (आशीर्लिङ्), या सर्वांची उदाहरणें पुढें देण्यांत येत आहेत.

(१) **सुप्**-- ' धुरि दक्षिणायाः ' येथें ' दक्षिणस्याम् ' ऐवजीं ' दक्षिणायाः ' असें षष्ठीचें रूप आहे.

(२) **तिङ**--' चषालं ये अश्वयूपाय तक्षति ' ' तक्षन्ति ' याऐवजीं ' तक्षति ' रूप आहे.

(३) **उपग्रह**--(परस्मैपद व आत्मनेपद)-- ' ब्रह्मचारिणमिच्छते ' यांत ' इच्छति ' याऐवजीं ' इच्छते ' असे आत्मनेपदी रूप आहे.

दुसरें उदाहरण--' प्रतीपमन्य ऊर्मिर्युध्यति '-येथे ' युध्यते ' याऐवजीं ' युध्यति ' असें परस्मैपदी रूप आहे.

(४) **लिङ्ग**--' मधोस्तृप्ता इवासते '--यात ' मधुनः ' असें नपुंसकलिंगी रूप पाहिजे. त्याऐवजीं ' मधोः ' असें पुल्लिगी ष. ए. व. रूप आहे.

(५) **नर** म्हणजे **पुरुष**-' अधा स वीरैर्दशभिर्वियूयाः '- येथ वियूयात् या प्रथम पुरुषाऐवजी ' वियूयाः ' असें म. पु. ए. व. चें रूप आहे. हें विपूर्वक यु धातूचें आशीर्लिङ्ाचें रूप आहे.

(६) **काल**--' श्वोऽग्नीनाधास्यमानेन ' येथें लुट्ऐवजीं लृट्चें रूप आहे. आङ्पूर्वक धा धातूहून ।३।१।३३ यानें स्य विकरण करून ।३।३।१४ यानें आत्मनेपदी शानच् प्रत्यय होतो. ।७।२।८२ यानें मुक् आगम झाला.

(७) **व्यंजन**--' तमसो गा अदुक्षत् '-येथें ' अधुक्षत् ' ऐवजीं ' अदुक्षत् ' असा धकाराऐवजीं दकार आहे.

(८) **अच्**--स्वर-' मित्र वयं च सूरयः ' येथें ' मित्रा वयम् ' असें प्राप्त होतें. आकाराऐवजीं अकार आहे.

(९) **वेदातील स्वर**--यातील व्यत्यय पुढें सांगण्यांत येईल, पण येथेंहि देण्यास हरकत नाहीं. उदा० ' गवामिव श्रियसे ' येथें 'तुमर्थे० ' ३।४।९ यानें ' क्सेन् ' प्रत्यय केला असल्यानें ' ञ्नित्यादिर्नित्यम् ' यानें ' श्रियसे ' यांत आद्युदात्त प्राप्त झाला असता व्यत्ययानें मध्योदात्त होतो.

(१०) **कृत्**-कारक. यानें कृत् व तद्धित प्रत्ययांचा समावेश होतो. उदा० 'अन्नादाय' येथें अन्न शब्द उपपद असता अद् धातूहून 'कर्मण्यण् ' यानें अण् करून ' अन्नादः ' अन्नमत्ति सः असा उपपद तत्पुरुष समास होतो. पण वेदामध्यें अण् प्रत्ययाऐवजीं अच् केल्यानें वृद्धि न होता ' अन्नादः ' असें रूप होतें. रूपांत जरी फरक होत नसला तरी पण पदें पाडताना एकांत अन्न व आदाय अशीं पदें पडतील तर दुसऱ्यांत (अच् केला असता) अन्न व अदाय अशी पडतील.

(११) यङ प्रत्याहारातील प्रत्ययांचा व्यत्यय--'भेदति' वर दिलाच आहे.

(३४३४) लिङ्याशिष्यङ् ।३।१।८६

आशीर्लिङि परे धातोरङ् स्याच्छन्दसि । 'वच उम्' । मन्त्रं वोचेमाग्नये । (ऋ. १।७४।१) **दृशेरग्वक्तव्यः । पितरं च दृशेयं मातरं च ।** (ऋ.१।२४।१) **अङि तु 'ऋदृशोऽङि' इति गुणः स्यात् ।**

आशीर्लिङ् प्रत्यय पुढें असता धातूहून वेदामध्ये अङ् प्रत्यय होतो. उदा० '' मन्त्रं वोचेमाग्नये'—यांत 'वोचेम' हें रूप वच् धातूचे आशीर्लिङ्चें मस् प्रत्यय केला असता सिद्ध होतें. प्रस्तुत सूत्रानें अङ् होतो व 'वच् उम्' ।७।४।२० यानें अङ पुढें असता 'उम्' आगम होतो. मस् यांतील सकाराचा लोप होतो. भाषेंत हा अङ् 'अस्यतिवक्ति०' यानें लुङ् पुढें असता होतो. (वा.) 'दृश् धातूहून मात्र अङ् ऐवजीं अक् होतो असें म्हणावें.' उदा० 'पितरं च दृशेयं मातरं च' येथें 'दृशेयम' रूप होतें. अङ् केल्यास 'ऋदृशोऽङि' ।७।४।१६ यानें गुण होऊन 'दर्शेयम्' झालें असतें.

टीप--आशीर्लिङाचे प्रत्यय 'लिङाशिषि' ।३।४।११६ यानें आर्धधातुक आहेत; परंतु पुढील सूत्रानें ते वेदामध्यें सार्वधातुकहि असतात. त्यामुळें शप्ची प्राप्ति आली होती पण प्रस्तुत सूत्रानें सांगितलेला अङ् त्याचा बाध करतो. हें सूत्र खालील धातूसाठींच प्रवृत्त होतें. स्था, गा, गम्, वच्, विद्, शक् आणि रुह्.

(३४३५) छन्दस्युभयथा ३।४।११७

धात्वधिकार उक्तः प्रत्ययः सार्वधातुकार्धधातुकोभयसंज्ञः स्यात् । वर्धन्तु त्वा सुष्टुतयः । (ऋ. ७।९९।७) **वर्धयन्त्वित्यर्थः । आर्धधातुकत्वाण्णिलोपः । विश्रृण्विरे ।** (ऋ. ४।८।६) **सार्वधातु-**

कत्वात् श्नुः शृभावश्च । 'हुश्नुवोः' इति यण् । 'आदृगमहम-जनः किकिनौ लिट् च' । आदन्तादृवर्णान्ताद् गमादेश्च किकिनौ स्तः । तौ च लिड्वत् । "बभ्रिर्वज्रं पपिः सोमं ददिर्गाः"। (ऋ. ६।२३।४) **जग्मिर्युवा ।** (ऋ. ७।२०।१) **जघ्निर्वृत्रममित्रियम् ।** (ऋ. ९।६१।२०) **जज्ञिः ।** (तैसं. ७।५।२०।१) **लिड्वद्भावादेव सिद्धे 'ऋच्छत्यॄताम्' इति गुणबाधनार्थं कित्त्वम् । 'बहुलं छन्दसि' इत्युत्त्वम् । ततुरिः ।** (ऋ. १।१४५।३) **जगुरिः ।** (ऋ. १०।१०८।१) **;**

वेदामध्यें 'धातोः' या अधिकारांत जे प्रत्यय सांगितले आहेत त्यांना सार्वधातुक व आर्धधातुक अशा दोन्ही संज्ञा होतात. इतर प्रसंगी 'तिङ्शित् सार्वधातुकम्' ।३।४।११३ यानें तिङ् प्रत्यय व शकार इत्संज्ञक प्रत्यय यानाच सार्वधातुक संज्ञा होते. उदा० 'वर्धन्तु त्वा सुष्टुतयः' यांत वर्धन्तु हें रूप लोटाचें असल्यानें सार्वधातुक संज्ञा प्रत्ययांना व्हावयास पाहिजे होती. पण आर्धधातुकसंज्ञा झाल्यानें या वृध् धातूच्या णिजन्ताच्या रूपांत णिच् प्रत्ययाचा 'णेरनिटि' ।६।४।५१ यानें लोप होतो. 'वर्धन्तु' याचा अर्थ 'वर्धयन्तु' असा आहे. त्याप्रमाणें लिट् प्रत्यय आर्धधातुक असता ते सार्वधातुक समजले जातात. उदा० विशृण्विरे-या श्रु धातूच्या लिटाच्या रूपांत तो सार्वधातुक मानला गेल्यानें श्नु विकरण होतो व 'श्रुवः शृ च' ।३।१।७४ यानें श्रु याला शृभावही होतो. नंतर 'हुश्नुवोः सार्वधातुके' ।६।४।८७ यानें यण् होऊन रूप सिद्ध होते.

'आदृगमहनजनः किकिनौ लिट् च' ।३।२।१७१

वेदामध्यें दीर्घ आकारांत धातू, ऋवर्णांत (ऋ किंवा ॠ) धातू व गम्, हन् आणि जन् याहून तच्छीलादि अर्थी कि व किन् प्रत्यय होतात आणि ते पुढें असता लिट्प्रमाणें सर्व कार्ये (म्हणजे द्विर्वचन वगैरे) होतात. उदा० 'बभ्रिर्वज्रम्'—यांत 'बभ्रिः' हें रूप भृञ् धातूहून कि प्रत्यय करून साधलें आहे. हे प्रत्यय लिटाच्या स्थानीं होत नाहींत व ते केल्यानंतर तिबादि प्रत्ययहि होत नाहींत. 'लिड्वदित्यतिदेशेन स्वरूपाबाधेनैव कार्या-

तिदेशात् '। (सुबोधिनी); तात्पर्य, हा कार्यातिदेश आहे.

'न लोकाव्यय०' ।२।३।६९ यानें हीं रूपें लकाराचीं असल्यानें 'वज्रम्' येथें षष्ठी न होता द्वितीया होते. 'पपि: सोमम्'—'पपि:' हें रूप पा धातूहून कि प्रत्ययानें साधलें आहे.' ददिर्गा: '- 'ददि:' हें दा धातूचे आहे. 'जग्मिर्युवा' 'जग्मि:' हें रूप गम् + किन् प्रत्यय. 'गम-हन०' ।६।४।९८ याने उपधा अकाराचा लोप होतो. 'जघ्निर्वृत्रममित्रियम्' 'जघ्नि:' हें रूप हन् धातूहून किन्, उपधालोप, हकाराला ७।३।५४ यानें कुत्वानें घकार होऊन साधलें आहे. जन् याचें त्याप्रमाणेंच 'जज्ञि:' होतें एक शंका--लिड्वद्भावानेंच 'असंयोगाल्लिट् कित्' ।१।२।५ यानें कित्त्व झालेच असतें. असें असता कि व किन् यांमध्यें ककार इत्संज्ञक कशाला ? त्यावर उत्तर असे कीं 'ऋच्छत्यॄताम्' ।७।४।११ यानें दीर्घ ॠकारान्त धातूना लिट् पुढें असता गुण सांगितला आहे त्याचा बाध व्हावा म्हणून. पुढील दोन रूपांत त्याचा उपयोग दिसून येईल. उदा० ततुरि:, तसेंच जगुरि; हीं रूपें 'तॄ प्लवनतरणयो:' व 'गॄ निगरणे' यांचीं आहेत. येथें द्वित्वापेक्षां 'बहुल छन्दसि' ।७।१।१०३ याने सांगितलेलें उत्त्व पर असल्यानें तें प्राप्त झालें. परतु 'द्विर्वचनेऽचि' ।१।१।५९ यानें त्याचा निषेध झाल्यानें उत्त्व न होता द्वित्त्व होतें. नंतर 'उरत्' ।७।४।६६ यानें अत्त्व झाल्यावर ततॄ + कि अशी स्थिति असतां उत्तर भागाला रपर उत्त्व होऊन 'ततुरि:' होते. त्याप्रमाणें 'जगुरि:' समजावें. जर प्रत्यय कित् नसता तर ।७।४।१२ यानें गुण झाला असता.

टीप--सूत्रांत 'आद्' यांतील दकार मुखसुखार्थ आहे. तो तकार नाहीं. त्यामुळें 'तात्परस्य' अशी स्थिति नसल्यानें दीर्घ ॠकाराचेंहि ग्रहण होतें म्हणून 'ततुरि:' रूप होतें.

(३४३६) तुमर्थे सेसेनसेअसेन्क्सेकसेनध्यैअध्यैन्कध्यै-कध्यैन्शध्यैशध्यैन्तवैतवेङ्तवेन: ।३।४।९

से । वक्षे राय: । सेन् । ता वामेषे । (ऋ. ५।६६।३) **असे ।**

शरदो जीवसे धाः। (ऋ ३।३६।१०) **असेन्। नित्त्वादाद्युदात्तः। क्से। प्रेषे। कसेन्। गवामिव श्रियसे।** (ऋ. ५।५९।३) **अध्यै। अध्यैन्। जठरं पृणध्यै।** (ऋ. ६।६७।७) **पक्षे आद्युदात्तम्। कध्यै। कध्यैन्। आहुवध्यै।** (ऋ. ६।६०।१३) **पक्षे नित्स्वरः। शध्यै। राधसः सह मादयध्यै। शध्यैन्। वायवे पिबध्यै।** (ऋ. ७।९२।२) **तवै। दातवा उ।** (ऋ. ४।२१।९) **तवेङ। सूतवे।** (ऋ. १०।१८४।३) **तवेन्। कर्तवे।** (ऋ. १।८५।९)

वेदामध्यें पुढील प्रत्यय ' तुमुन् ' अर्थी होतात. से, सेन् , असे, असेन्, क्से, कसेन्, अध्यै, अध्यैन्, कध्यै, कध्यैन्, शध्यै, शध्यैन्, तवै, तवेङ्. आणि तवेन्. वेदामध्यें हे पंधरा प्रत्यय तुमुन्ऐवजीं होतात. कांहीं प्रत्ययांत नकार, ककार, ङकार आणि शकार अनुबन्ध आहेत त्यामुळें तसे प्रत्यय पुढें असता तीं तीं कार्यें होतात हें पुढें सांगण्यांत येईल.

उदाहरणें-- **से**- ' वक्षे रायः '- ' वक्षे ' येथें वच् धातूहून से प्रत्यय झाला. त्याचा अर्थ 'वक्तुम्' असा होतो.

सेन् -- ' त्वा वामेषे' यांत ' एषे ' हें रूप ' इ ' धातूहून सेन्‌ प्रत्ययानें होतें. **असे-असेन्** ' शरदो जीवसे धाः ' 'जीवसे' हें जीव् धातूहून 'असे' प्रत्यय करून होतें. असेन् केल्यास नित्त्वामुळें ।६।१।१९७ यानें आद्युदात्त होतो. **क्से**--प्रेषे, प्रपूर्वक इण् धातूहून क्से (से) होऊन होतें. कित्त्वामुळें गुण होत नाहीं. इ याचे ' इषे ' होऊन ' आद् गुणः ' यानें गुण होऊन ' प्रेषे ' होतें. इकाराला गुण झाला असता तर ' प्रैषे ' झालें असतें. **कसेन्**- ' गवामिव श्रियसे ' येथें श्रि धातूहून कसेन् (असे) होऊन इयङ झाला. नित्त्वामुळें ।६।१।१९७ यानें आद्युदात्त झाला. पण मंत्रामध्यें 'श्रियसे' असा मध्योदात्त पठित आहे. तेथें बाहुलकात् प्रत्ययस्वर होतो असे समजावें. म्हणजे प्रत्ययाचा पहिला स्वर उदात्त होतो.

अध्यै, अध्यैन्--'जठरं पृणध्यै' येथें ' पृणध्यै ' यांत एकदा अध्यै यानें अन्तोदात्त होतो व एकदा अध्यैन् या नित्स्वरानें आद्युदात्त होतो.

कध्यै–कध्यैन्–आहुवध्यै–ह्वे धातूहून (संप्रसारणानें) किंवा आङ्पूर्वक हुधातूहून कध्यै किंवा कध्यैन् (अध्यै) होऊन उवङ् होतो. एकदा नित्स्वरानें आद्युदात्त होतो. **शध्यै**–'राघसः सह मादयध्यै', 'मदी हर्षे' याच्या ण्यन्ताहून शध्यै (अध्यै) प्रत्यय होतो. प्रत्यय शित् असल्यानें त्याला सार्वधातुकसंज्ञा होत असल्यानें भाववाची ' सार्वधातुके यक् ' याने यक् प्राप्त झाला असता (कारण तुमुन् भाववाची आहे.) व्यत्ययानें शप् विकरण होऊन गुण व अयादेश होतात. **शध्यैन्**–' वायवे पिबध्यै ' येथेंहि पूर्ववत् व्यत्ययानें शप् होऊन पा याला पिब आदेश होतो. येथें आद्युदात्त होतो. ' **तवै**-सोममिन्द्राय दातवै' किंवा (दातवा उ) यातील दा धातूहून तवै प्रत्यय व नंतर उ पुढें असता आयादेश झाल्यावर ' लोपः शाकल्यस्य ' यानें यकाराचा लोप होतो. **तवेङ्**–सूतवे, सू धातु ङित् असल्यानें गुण होत नाहीं. **तवेन्**–कर्तवे, कृ धातूहून तवेन् (तवे) प्रत्यय झाला असता गुण होतो. ' कर्तवे ' याचा अर्थ ' कर्तुम् ' असा होतो.

टीप–-तुमर्थी हे प्रत्यय होतात असें सांगितलें पण ' तुमर्थ ' म्हणजे काय ? ' अव्ययकृतो भावे ' या वचनाप्रमाणें तुमर्थ म्हणजे भावार्थ. ज्या प्रत्ययाचा अर्थ सांगितलेला नसतो ते स्वार्थी म्हणजे ज्याहून ते केलेले असतात त्यांचा अर्थ दर्शवितात. तुमुन्चा अर्थ सांगितलेला नाहीं म्हणून ज्या धातूहून ते केले असतात त्या अर्थी म्हणजे भावार्थी (भाव म्हणजे क्रिया) होतात. कर्तरि होत नाहींत.

(३४३७) प्रयै रोहिष्यै अव्यथिष्यै ।३।४।१०

एते तुमर्थे निपात्यन्ते । प्रयातुं रोढुमव्यथितुमित्यर्थः ।

प्रयै, रोहिष्यै व अव्यथिष्यै हीं रूपें वेदामध्यें तुमर्थी निपातिलीं जातात म्हणजे त्यांचा अर्थ प्रयातुम्, रोढुम् व अव्यथितुम् असा होतो. उदा० ' प्रयै देवेभ्यो महीः ' (ऋ ।१।१४२।६ येथें ' प्रयै ' रूप प्र+या+के (ऐ)=प्रयै; ' अपामोषधीनां रोहिष्यै (तैसं १।३।१०।२) रुह् + इष्य = रोहिष्यै, याचा अर्थ ' रोहणाय ' होतो. त्याप्रमाणें ' अव्यथिष्यै '

याच । अर्थ 'अव्यथनाय' असा होतो. नञ् पूर्वक व्यथ् धातूचें 'अव्यथिष्यै' रूप आहे. (पहा–काठसं–३।७)

(३४३८) दृशे विख्ये च ।३।४।११

द्रष्टुं विख्यातुमित्यर्थः ।

दृश् धातु व ख्या धातु याहून वेदामध्ये तुमर्थी के प्रत्यय होतो.। उदा० दृशे विश्वाय सूर्यम् (ऋ १।५०।१।) यांत 'दृशे' याचा अर्थ 'द्रष्टुम्' असा होतो. 'विख्ये त्वा हरामि' (ऋ १०।१५८।४) 'विख्ये' याचा अर्थ 'विख्यातुम्' आहे.

(३४३९) शकि णमुल्कमुलौ ।२।४।१२

शक्नोतावुपपदे तुमर्थे एतौ स्तः । विभाजं नाशकत् । (मै. सं. १।६।४) अपलुपं नाशकत् । (मै. सं. १।६।५) विभक्तुमपलोप्तुमित्यर्थः ।

शक् धातु उपपद असता म्हणजे त्याचा योग असता वेदामध्यें धातूहून तुमर्थी णमुल् व कमुल् प्रत्यय होतात. उदा० 'विभाजं नाशकत् ।' 'अपलुपं नाशकत्'। विभाजम्– विपूर्वक भज् धातूहून णमुल् होतो. णित्वामुळें 'अत उपाधाया:' यानें उपधेला वृद्धि होते. अपलुपम्—'लुप्लृ छेदने याहून कमुल् (अ) झाला. कित्त्वामुळें गुण होत नाहीं. ६।१।१९२ यानें लित् स्वर होतो.

(३४४०) ईश्वरे तोसुन्कसुनौ ३।४।१३

ईश्वरो विचारितोः । (ऐआ १।१।१) ईश्वरो विलिखः विचरितुं विलिखितुमित्यर्थः ।

ईश्वर शब्द उपपद असता वेदामध्यें धातूहून तुमुनर्थी तोसुन् (तोस्) व कसुन् (अस्) प्रत्यय होतात. उदा० 'ईश्वरो विचरितोः' येथ, विपूर्वक 'चर गतौ' याहून तोसुन् होऊन त्याला इडागम झाला आहे. अर्थ विचरितुम् असा होतो. 'ईश्वरो विलिखः'—विपूर्वक लिख् धातूहून कसुन्

(अस्) होतो. कित्त्वामुळें गुण होत नाहीं. अर्थ विलिखितुम् असा होतो. 'क्वातो सुन्कसुनः' याने अव्ययसंज्ञा झाल्याने 'अव्ययादाप्सुपः' याने पुढील विभक्तिप्रत्ययाचा लुक् होतो. 'न लुमताङ्गस्य' यानें प्रत्यय–लक्षणाचा निषेध असल्यानें 'अत्वसन्तस्य०' याने दीर्घ होत नाहीं.

(३४४१) कृत्यार्थे तवैकेन्केन्यत्वनः ।३।४।१४

न म्लेच्छितवै । अवगाहे । (मैसं. ३।६।९) दिदृक्षेण्यः । (ऋ. १।१४६।५) भूर्यस्पष्ट कर्त्वम् (ऋ. १।१०।२)

वेदामध्ये कृत्यप्रत्ययाच्या अर्थी धातूहून तवै, केन्, केन्य व त्वन् प्रत्यय होतात.

कृत्य प्रत्यय 'तयोरेव कृत्यक्तखलर्थाः' याने भावे व कर्मणि होतात. उदा० 'न म्लेच्छितवै' याचा अर्थ 'न म्लेंच्छितव्यम्' असा होतो. म्लेच्छ् धातूहून 'तवै' याला इडागम झाला. अवगाहे–अवपूर्वक गाह् धातूहून कृत्यार्थी केन् (ए) होऊन 'अवगाहे' रूप होते. त्याचा अर्थ 'अव–गाहितव्यम्' असा होतो. दिदृक्षेण्यः–दृश् धातूच्या सन्नन्ताहून केन्य (एन्य) होतो व नंतर 'अतो लोपः' याने अकाराचा लोप होतो. त्याप्रमाणें श्रु धातूचें 'शुश्रूषेण्यः' होते. 'भूर्यस्पृष्ट कर्त्वम्' येथें कृ धातूहून त्वन् (त्व) होऊन गुण झाला. कर्त्वम् याचा अर्थ कर्तव्यम् असा होतो.

टीप--'तुमर्थे सेसेन् ।३।४।९ इत्यादि सूत्रानें तुमर्थी तवै प्रत्यय सांगितला आहे. प्रस्तुत सूत्रानेही 'तवै' सांगितला आहे कारण भावभिन्न अशा कर्मकारकार्थीहि तो प्रत्यय व्हावा म्हणून तो येथें सांगितला.

(३४४२) अवचक्षे च ।३।४।१५

रिपुणा नावचक्षे (ऋ. ४।५८।५) । अवख्यातव्यमित्यर्थः ।

वेदामध्यें 'अवचक्षे' हें रूप कर्मणि कृत्य प्रत्ययार्थी निपातित केले आहे. उदा० 'रिपुणा नावचक्षे' (ऋग्वेद ।४।५८।५) 'नावचक्षे'

याचा अर्थ '.नावख्यातव्यम् ' असा होतो. अवचक्षे-अवपूर्वक चक्ष् (चक्षिङ) धातूहून एश् प्रत्ययाचें निपातन होते. प्रत्यय शित् असल्यानें ।२।४।५४ याने ख्याञ् आदेश होत नाहीं. शित् असल्यानें प्रत्यय सार्वधातुकसंज्ञक आहे.

(३४४३) भावलक्षणे स्थेण्कृञ्वदिचरिहुतमिजनिभ्यस्तोसुन् ।३।४।१६

आसंस्थातोः । सीदन्ति । (तुल. तैसं. ३।३।७।३) **आसमाप्तेः सीदन्तीत्यर्थः । उदेतोः ।** (मैसं १।६।१०) **अपकर्तोः ।** (मैसं १।४।५) **प्रवदितोः ।** (ऐब्रा. २।१५) **प्रचरितोः ।** (काठ ३।४।१७) **होतोः ।** (मैसं १।८।५) **आतमितोः ।** (तैसं. ६।४।५।६) **काममाविजनितोः संभवामः ।** (तैसं. २।५।१।५) **इति श्रुतिः ।**

वेदामध्यें भावलक्षणार्थी स्था, इण्, कृञ्, वद्, चर्, हु, तम् आणि जन् या धातूहून तोसुन् (तोस्) प्रत्यय होतो.

' भावो लक्ष्यते येन स भावलक्षणः ' । या सूत्रापासून पुढें 'कृत्यार्थे' पदाची निवृत्ति होते. पण तुमर्थे याची अनुवृत्ति चालू आहे.

उदा० ' आसंस्थातोः सीदन्ति ' याचा अर्थ ' आसमाप्तेः सीदन्ति ' असा होतो. सम्पूर्वक स्था धातूहून भावार्थी तोसुन् झाला. इण्--'पुरा सूर्यस्य उदेतो राधेयः ' यांत ' उदेतोः ' येथें उद्पूर्वक इण् धातूहून तोसुन् होतो. ' उदयपर्यन्तम् ' असा अर्थ होतो. ' पुरा वत्सानामपकर्तोः '--अपकर्तोः--अपपूर्वक कृ धातूहून तोसुन् होतो. वद्--प्रवदितोः, चर्--प्रचरितोः, हु--होतोः-येथें गुण होतो. आतमितोः--तम् धातूहून तोसुन् होऊन त्याला इडागम होतो. जन्--आविजनितोः संभवामः ' । (तै. सं. ।२।५।१।५) यांत विजनितोः हें विपूर्वक जन् धातूहून तोसुन् करून झाले आहे.

टीप--' भावलक्षणग्रहणं प्रत्ययार्थविशेषणम् ' (सुबोधिनी)

(३४४४) सृपितृदोः कसुन् ।३।४।१७

भावलक्षणे इत्येव । पुरा क्रूरस्य विसृपो विरप्शिन् । (वासं. १·२८) पुरा जत्रुभ्य आतृदः । (ऋ. ८·१·१२)

इति तृतीयोऽध्यायः ।

वेदामध्यें सृप् व तृद् धातूहून तुमर्थीं (भावार्थी) कसुन् प्रत्यय होतो. उदा० 'पुरा क्रूरस्य विसृपः', (यजु १।२८) 'विसृपः' येथे कसुन् (अस्) कित् असल्यानें गुण होत नाहीं. 'पुरा जत्रुभ्य आतृदः'। (ऋग्वेद ८।१।१२) यांत 'आतृदः' हे रूप आङ्पूर्वक तृद् धातूहून कसुन् करून झालें आहे. पूर्ववत् गुण होत नाहीं. 'क्त्वातो सुन्कसुनः' यानें कसुन् प्रत्ययान्ताला अव्ययसंज्ञा होते व 'अव्ययादाप्सुपः' यानें पुढील विभक्ति-प्रत्ययांचा लुक् होतो.

याप्रमाणे तिसऱ्या अध्यायांतील वैदिकसूत्रांचा मराठी अनुवाद समाप्त झाला.

चतुर्थोऽध्यायः ।

(३४५) रात्रेश्चाजसौ ।४।१।३१

रात्रिशब्दान्ङीप् स्यात् अजस्विषये छन्दसि । रात्री व्यख्य- दायती । (ऋ. १०।१२७।१) लोके तु (ग. सू.) 'कृदिकारा- दि'ति ङीष्यन्तोदात्तः ।

वेदामध्यें रात्रि शब्दाहून जस् प्रत्यय सोडून इतर प्रत्यय पुढें असत. ङीप् होतो. उदा०' रात्री व्यख्यदायती ' येथें ' रात्री ' शब्द ङीबन्त आहे। जस् पुढें असतांना मात्र रात्रि शब्दाचें ' रात्रयः' रूप होते. भाषेंत मात्र ' कृदिकारादक्तिनः ' या वार्तिकानें क्तिन् प्रत्यय सोडून इतर कृत् इकारान्त शब्दाहून ङीप् होतो. रूपात फरक नसला तरी स्वरांत होतो. ङीष् केल्यास रात्री हा शब्द अन्तोदात्त होतो, ङीप् केल्यास आद्युदात्त होतो.

' तिमिरपटैरवगुण्ठिता रात्र्यः ' येथें ' रात्र्यः ' या प्रयोगाची संगति कशी ? ' रात्रयः ' असावयास पाहिजे. त्यावर उत्तर असें की हें वाक्य वेदातील नव्हे. भाषेंत ङीप् होतो व ' अजसौ ' असा निषेधहि आहे. ' कृतिकारादक्तिनः ' हें वार्तिक ' बह्वादिभ्यश्च ' ।४।१।४५ या सूत्रावर आहे. असे सर्व इकारान्त शब्द (क्तिन्नन्त सोडून) बह्वादि गणांत पठित समजले जातात. म्हणून स्त्रीलिंगी ङीप् होतो.

' रात्रि ' शब्द हा उणादि ४।६७ यानें रा धातूहून त्रिप् प्रत्यय करून साधला आहे म्हणून ।४।१।४५ यानें ङीप् होतो. व्युत्पत्तिपक्षी हा प्रत्यय कृत् आहे. अव्युत्पत्तिपक्षीं 'सर्वतोऽक्तिन्नर्थात्' यानें ङीष् होतो.

(३४६) नित्यं छन्दसि ।४।१।४६

बह्वादिभ्यश्छन्दसि विषये नित्यं ङीष् । बह्वीषु हि त्वा । (तुल. ऋ. १०।९७।१८) नित्यग्रहणमुत्तरार्थम् ।

बह्वादि गणातील शब्दाहून वेदामध्यें स्त्रीलिंगी नित्य ङीष् होतो. उदा० ' बह्वीषु हि त्वा--येथें ' बह्वी ' हें एका वनस्पतींचें नांव आहे. एक शंका--सूत्रांत ' नित्यम् ' पद कशासाठीं ? ज्या अर्थीं सूत्र केले आहे त्या अर्थीं आरंभसामर्थ्यास्तव प्रत्यय नित्य झालाच असता. होय. हें खरे आहे. त्या शब्दाचे प्रयोगच या सूत्रांत नसून पुढील सूत्रासाठीं आहे.

(३४४७) भुवश्च ।४।१।४७

ङीष् स्यात् छन्दसि । विभ्वी । (ऋ. १.१८८.५) प्रभ्वी । ' विप्रसंभ्य ' इति डुप्रत्ययान्तं सूत्रेऽनुक्रियते । उत इत्यनुवृत्तेः । उवङादेशस्तु सौत्रः । मुद्गलाच्छन्दसि लिच्च । ङीषो लित्वमानुक् चागमः । लित्स्वरः । रथीरभून्मुद्गलानी । (ऋ. १०।१०२।२)

वेदामध्यें भू शब्दाहून स्त्रीलिंगी नित्य ङीप् होतो, उदा० विभ्वी', प्रभ्वी (ऋग्वेद १।१८८।५), विभु आणि प्रभु हें शब्द ' विप्रसंभ्यो ड्वसंज्ञायाम् ' ३।२।१८० यानें डु (उ) प्रत्यय करून साधले आहेत. ' वोतो गुणवचनात् ' ४।१।४४ यातून ' उतः ' याची अनुवृत्ति याही सूत्रांत येते म्हणून ' स्वयंभूः ' येथें दीर्घ ऊकारांत ' भू ' शब्द असल्यानें ङीप् होत नाहीं. एक शंका--ऱ्हस्व भु शब्दाला ' घेर्ङिति ' । यानें गुण केल्यानंतर ' भोः ' असें व्हावयास पाहिजे होते. त्यावर असें समाधान कीं येथें जो उवङ् झाला आहे तो सौत्र आहे असे समजावें (वा.) ' वेदामध्यें मुद्गल शब्दाहून ङीष् होऊन मुद्गल शब्दाला आनुक् आगम होतो. ' आगम कित् असल्यानें अंत्याला होतो. हा प्रत्यय लकार इत्संज्ञक समजला जातो. त्यामुळें ' लिति ' ।६।१।१९३ यानें प्रत्ययामागील स्वर उदात्त होतो. उदा० ' रथीरभून्मुद्गलानी ', ' मुद्गलानी ' यांतील आकार उदात्त होतो.

वरील वार्तिक हें ' इन्द्रवरुण० ' या सूत्रावरील असून येथें देण्यांत येत आहे.

(३४४८) दीर्घजिह्वी च छन्दसि ।४।१।५९

संयोगोपधत्वादप्राप्तो ङीष् विधीयते। आसुरी वै दीर्घजिह्वी देवानां यज्ञवाट्। (तुल. मैसं. ३।१०।६)

वेदामध्यें 'दीर्घजिह्वी' अशा रूपाचें निपातन होतें. 'स्वाङ्गाच्चोपर्जनादसंयोगोपधात्'।४।१।५४ यानें हा शब्द संयोगोपध असल्यानें ङीषची प्राप्ति नव्हती म्हणून निपातन करावें लागलें. उदा० 'आसुरी वै दीर्घजिह्वी देवानां यज्ञवाट्'।

टीप-- सूत्रांतील चकारानें संज्ञा शब्दाची अनुवृत्ति येते. 'दीर्घजिह्वी' हें विशेषनाम आहे.

(३४४९) कद्रुकमण्डल्वोश्छन्दसि ।४।१।७१

ऊङ स्यात्। कद्रूश्च वै। (तै. स. ६।१।६।१) **कमण्डलूः। (वा.) 'गुग्गुलमधुजतुपतयालूनामिति वक्तव्यम्'। गुग्गुलूः। मधूः। जतूः। पतयालूः। 'अव्ययात् त्यप्'। (वा.) 'आविष्टचयस्योपसंख्यानं छन्दसि'। आविष्टचो वर्धते।** (ऋ. १।९५।२)

वेदामध्ये कद्रु व कमण्डलु शब्दाहून स्त्रीलिंगी ऊङ् होतो. 'ऊङुतः' ।४।१।६६ यातून ऊङची अनुवृत्ति येते. उदा० 'कद्रूश्च वै कमण्डलूः'; भाषेंत मात्र कद्रुः व कमण्डलुः अशीच रूपे होतात. (वा.) 'गुग्गुलु, मधु, जतु, आणि पतयालु याहून वेदामध्यें स्त्रीलिंगी ऊङ होतो असे म्हणावें. उदा० गुग्गुलूः, मधूः, जतूः, पतयालूः– हा शब्द 'स्पृहिग्रहि' ३।२।१५८ इत्यादि सूत्रानें पत् याच्या ण्यन्ताहून आलुच् प्रत्यय करून साधला आहे. या सर्व शब्दाना वेदामध्ये व्यत्ययानें स्त्रीत्व होते. 'पतयालु' हे विशेष्यलिंग आहे. (वा.) वेदामध्यें अव्ययाहून त्यप् होतो.'* उदा०'आविष्टचो वर्धते–'

---

* **टीप--** 'अमेहक्वतसित्रेभ्यः' या नियमाप्रमाणें अप्राप्त असलेल्या त्यपाचे शैषिकार्थी विधान केले.+' पत' धातु चुरादि अदन्त आहे.

आविस् या अव्ययाहून त्यप् झाला. 'ह्रस्वात्तादौ तद्धिते' यानें षत्व झाल्यावर ष्टुत्व होते.

(३४५०) छन्दसि ठञ् ।४।३।१९

वर्षाभ्यष्ठकोऽपवादः । स्वरे भेदः । वार्षिकम् । (वासं. १४।१५)

वेदामध्ये वर्षाशब्दाहून ठञ् होतो. 'वर्षाभ्यष्ठक्' ४।३।१८ याने सांगितलेल्या ठक् प्रत्ययाचा अपवाद आहे. रूपांत जरी फरक होत नसला तरी स्वरांत होतो. ठञ् केला तर 'ञ्नित्यादिर्नित्यम्'। यानें प्रत्यय ञित् असल्यानें आद्युदात्त होतो. ठक् केल्यास 'कितः' यानें अन्तोदात्त होतो. उदा० वार्षिकम्--'वर्षाभ्यष्ठक्' ।४।३।१८ यांतून 'वर्षाभ्यः' याची अनुवृत्ति येते.

(३४५१) वसन्ताच्च ।४।३।२०

ठञ् स्यात् छन्दसि । वासन्तिकम् । (वासं. १३।२५)

वसन्त शब्दाहून वेदामध्ये शैषिकार्थी ठञ् होतो. हा ४।२ १६ यानें होणाऱ्या अण् प्रत्ययाचा अपवाद आहे, उदा. वासन्तिकम्-ठक् याला इक आदेश 'ठस्येकः' यानें होतो. 'मधुश्च माधवश्च वासन्तिकावृतू'। (मधु व माधव-चैत्र व वैशाख हे वसन्त ऋतूचे महिने आहेत.)

(३४५२) हेमन्ताच्च ।४।३।२१

छन्दसि ठञ् । हैमन्तिकम् । (वासं १४।२७) **योगविभाग उत्तरार्थः । 'शौनकादिभ्यश्छन्दसि' णिनिः प्रोक्तेऽर्थे । छाणोरपवादः । शौनकेन प्रोक्तमधीयते शौनकिनः ।** (अथर्व परिशिष्ट १।४।१।२) **वाजसनेयिनः । छन्दसि किम् । शौनकीया शिक्षा ।**

वेदामध्यें हेमन्त शब्दाहून शैषिकार्थी ठञ् होतो. येथेंहि पूर्ववत् अण प्राप्त झाला होता. उदा० हैमन्तिकम्, वेगळें सूत्र करण्याचे कारण कीं त्याचीच अनुवृत्ति पुढील सूत्रांत--' सर्वत्राण् च तलोपश्च ' ४।३।२२ यांत

जावी व वसन्त शब्दाची जाऊं नये. ' शौनकादिभ्यश्छन्दसि ' ।४।३।१०६

छन्दस् अभिधेय असता शौनक वगैरे शब्दाहून ' तेन प्रोक्तम् ' या अर्थी णिनि प्रत्यय होतो, ' छन्दसि ' याचा अर्थ ' छन्दसि अभिधेये ' असा घ्यावा. ४।३।१०३ यातून णिनि याची अनुवृत्ति येते. हा णिनि ' वृद्धाच्छः ' यानें सांगितलेल्या छ प्रत्ययाचा व ४।३।१६ यानें होणाऱ्या अण् प्रत्ययाचा अपवाद आहे. उदा० शौनकेन प्रोक्तमधीयते 'शौनकिनः;' 'त्याप्रमाणें वाज-सनेयेन प्रोक्तमधीयते ' वाजसनेयिनः '; ' छन्दसि ' म्हटल्यानें ' शौनकीया शिक्षा ' येथें णिनि न होता छ (ईय) होतो. 'शिक्षा' ग्रंथ छन्दोभागापैकीं नाहीं. म्हणून ' शौनकीया ' हे प्रत्युदाहरण भाष्यकाराने दिलें आहे.

टीप--येथें हें सूत्र ४।३।१०६ लेखकाच्या प्रमादानें घातले गेले.

(३४५३) द्व्यचश्छन्दसि ।४।३।१५०

विकारे मयट् स्यात् । शरमयं बर्हिः । (तैसं. २।१।५।७) **यस्य पर्णमयी जुहूः ।** (तैंस.३ ।५।७।२)

वेदामध्यें दोन अच् असलेल्या शब्दाहून विकारार्थी मयट् (मय) प्रत्यय होतो. ' मयड्वैतयोर्भाषायाम् ।४।३।१४३ यानें तो भाषेंत सांगितला. त्यामुळे वेदामध्यें प्राप्ति नव्हती म्हणून विधान केलें.

उदा० 'शरमयं बर्हिः', (शरमयं बर्हिः शृणायेवैनम्) ' पर्णमयी जुहूः भवति ', (' यस्य पर्णमयी जुहूर्भवति दर्भमयं वासो भवति. ')

(३४५४) नोत्वद्वर्ध्रबिल्वात् ।४।३।१५१

उत्वान् उकारवान् । मौञ्जं शिक्यम् । (तैसं. ५।१०।५) **वर्ध्रं चर्म तस्य विकारो वार्ध्री रज्जुः ।** (तुल. ताण्डयब्रा. ९।२।२२) **बैल्वो यूपः ।।** (मैसं. ३।९।३) **' सभाया यः '।**

उकारवान् प्रातिपदिकाहून त्याप्रमाणें वर्ध्र व बिल्व शब्दाहून वेदा-मध्यें विकारार्थी मयट् होत नाहीं. ' द्व्यचश्छन्दसि ' या मागील सूत्रानें तो प्राप्त झाला होता. उकारवान् शब्दाचें उदाहरण--' मौञ्जं शिक्यम् ' यांत

‘ मुञ्ज ’ शब्द उकारवान् असल्यानें मयट् न होता ‘ तस्य विकारः ’ ४।३। १३४ यानें औत्सर्गिक अण् होतो. वर्ध्र म्हणजे चर्म, त्याचा विकार तो ‘ वार्ध्री ’ रज्जुः; चामड्याची दोरी. प्रत्यय अण् असल्यानें ४।१।१५ यानें ङीप् झाला. त्याप्रमाणें बिल्व शब्दापासून ‘ बैल्वो यूपः ’; बिल्व वृक्षाच्या झाडाचा केलेला यूप. सर्वत्र मयट् न होता औत्सर्गिक अण् होतो.

सभाया यः ।४।४।१०५ यानें सभा शब्दाहून ‘ तत्र साधुः ’ या अर्थी य प्रत्यय सांगितला आहे. पण--

(३४५५) ढश्छन्दसि ।४।४।१०६

सभेयो युवा । (वासं. २२।२२)

वेदामध्यें सभा शब्दाहून ‘ तत्र साधुः ’ या अर्थी ढ (एय) प्रत्यय होतो. उदा० सभेयो युवा (‘सभेयोऽस्य युवा यजमानस्य वीरो जायताम् ’)

(३४५६) भवे छन्दसि ।४।४।११०

सप्तम्यन्ताद् भवार्थे यत् । मेध्याय च विद्युत्याय च । (वासं १६।३८) **यथायथं शैषिकाणामणादीनां घादीनां चापवादोऽयं यत् । पक्षे तेऽपि भवन्ति । सर्वविधीनां छन्दसि वैकल्पिकत्वात् । तद्यथा । मुञ्जवान् नाम पर्वतः । तत्र भवो मौञ्जवतः ।** (ऋ. १० ३४।१) **सोमस्येव मौञ्जवतस्य भक्षः । आ चतुर्थसमाप्तेश्छन्दोऽधिकारः ।**

वेदामध्यें सप्तम्यन्त शब्दाहून भवार्थी यत् प्रत्यय होतो. ‘ तत्र भवः ’ वगैरे सूत्रांनीं प्राप्त झालेल्या अण्, घ वगैरे शैषिक प्रत्ययांचा हा बाध करतो. तरीपण पक्षीं तेहि यथायोग्य होतात. कारण सर्व विधि वेदामध्यें वैकल्पिक असतात असें वचन आहे. उदा० ‘ नमो मेघ्याय च विद्युत्याय च ’ (यजु १६।३८ रुद्राध्याय). यामध्यें मेघ व विद्युत् या शब्दाहून यत (य) झाला. या सूत्रापासून पुढें चवथ्या अध्यायाच्या अखेरपर्यंत ‘छन्दसि’

पद अनुवृत्त होतें आणि ' भवे ' याची अनुवृत्ति सूत्र ।४।४।११८ पावेतों चालते.

' मुञ्जवान् ' नांवाचा पर्वत आहे. त्या ठिकाणीं असलेला तो मौञ्ज-वतः '. ' मुञ्जवत् ' शब्दाहून पक्षीं अण् होतो. पहा—' सोमस्येव मौञ्ज-वतस्य भक्षः ' (मुञ्जवत् पर्वतावर असणाऱ्या सोमाचें भक्षण करणारा)

(३४५७) पाथोनदीभ्यां ड्यण् ।४।४।१११

तमु त्वा पाथ्यो वृषा । (ऋ. ६।१६।१५) **चनो दधीत नाद्यो गिरो मे ।** (ऋ. २।३५।१) **पाथसि भवः पाथ्यः । नद्यां भवो नाद्यः ।**

वेदामध्यें सप्तम्यन्त पाथस् आणि नदी या शब्दाहून ' तत्र भवः ' या अर्थी ड्यण् (य) प्रत्यय होतो.

हा यत् प्रत्ययाचा बाध करतो. प्रत्यय डित् असल्यानें डित्त्वसामर्थ्या-स्तव टि भागाचा ' टेः ' यानें लोप होतो. उदा० ' तमु त्वा पाथ्यो वृषा '; पाथसि भवः पाथ्यः, ' पाथस् ' म्हणजे जल किंवा अंतरिक्ष; ' कबन्धमुदकं पाथः ' (अमर) ' पाथोऽन्तरिक्षम् ' इति वृत्तिः; (' चनो दधीत नाद्यो गिरो मे ';) नद्यां भवः-नाद्यः;

(३४५८) वेशन्तहिमवद्भ्यामण् ।४।४।११२

भवे । वैशन्तीभ्यः स्वाहा । (तैसं. ७।४।१३।१) **हैमवतीभ्यः स्वाहा ।** (शौ. १९।२।१)

वेदामध्यें वेशन्त व हिमवत् शब्दाहून ' तत्र भवः ' या अर्थी अण् होतो. हा अण् यत् प्रत्ययाचा बाध करतो. उदा० वैशन्तीभ्यः स्वाहा; ' वैशन्तीभ्यः ' हें रूप वेशन्त म्हणजे पल्वल. त्याहून ' तत्र भवः ' या अर्थी अण् होतो. ' तत्र भवा आपः- वैशन्त्यः ' (पल्वलातील जल); हैमव-तीभ्यः स्वाहा. अण् झाल्यानें स्त्रीलिंगी ।४।१।१५ यानें ङीप् होतो. ' हिम-वति भवा हिमवत्य आपः ' ।

(३४५९) स्त्रोतसो विभाषा ड्यड्ड्यौ ।४।४।११३

पक्षे यत् । ड्यड्ड्ययोस्तु स्वरे भेदः । स्रोतसि भवः स्रोत्यः । (ऋ. १०।१०४।८) **स्रोतस्यः ।** (शौ. १९।२।४)

वेदामध्यें स्रोतस् शब्दाहून ' तत्र भवः ' अर्थी विकल्पानें ड्यत् व ड्य प्रत्यय होतात. एकदा यत् प्रत्ययहि होतो. ड्यत् व ड्य झाल्यास रूपात फरक होत नाहीं पण स्वरांत [होतो. उदा० ' स्रोतसि भवः स्रोत्यः ' येथें ड्यत् किंवा ड्य झाला असता ते डित् असल्यानें डित्वसामर्थ्यास्तव भसंज्ञा नसताहि ' टेः ' यानें टिभागाचा लोप होतो. यत् झाला असता ' स्रोतस्यः ' होतें. ड्यत् झाल्यास 'तित्स्वरितम् ' ।६।१।१८५ याने स्वरित होतो.

(३४६०) सगर्भसयूथसनुताद्यन् ।४।४।११४

अनुभ्राता सगर्भ्यः । अनुसखा सयूथ्यः । (वासं. ४।२०) (ऋ. २।३०।९) **यो नः सनुत्य उत वा जिघत्नुः । नुतिर्नुतम् । ' नपुंसके भावे क्तः ' । सगर्भादयस्त्रयोऽपि कर्मधारयाः । ' समानस्य छन्दसि ' इति सः । ततो भवार्थे यन् । यतोऽपवादः ।**

वेदामध्यें सगर्भ, सयूथ व सनुत या शब्दाहून ' तत्र भवः ' या अर्थी यन् प्रत्यय होतो. हा ' भवे छन्दसि ' या यत् प्रत्ययाचा अपवाद आहे. रूप जरी एकच होत असलें तरी स्वरांत फरक होतो. यन् प्रत्यय नित् असल्यानें ।६।१।१९७ यानें आद्युदात्त होतो. यत् झल्यास तो तित् असल्यानें तित्स्वर होतो म्हणजे ' तित्स्वरितम् ' ।६।१।१८५ यानें अन्तःस्वरित होतो. उदा० ' अनुसखा सयूथ्यः ', ' अनुभ्राता सगर्भ्यः ' (धाकटा भाऊ), ' यो नः सनुत्यः उत वा जिघत्नुः ', (ऋग्वेद २।३०।९) ' सनुत्य ' म्हणजे चोर ('सनुत' म्हणजे लपलेला. जो गुप्त जागी राहतो.) नु धातूचें रूप नुत होतें. ' नपुंसके भावे क्तः ' यानें क्त प्रत्यय होऊन ' नुतम् ' होतें. 'समान' शब्दाला ' समानस्य छन्दसि ' ।६।३।८४ यानें सभाव होतो. नंतर भवार्थी यन् प्रत्यय होतो. हें सर्व समास कर्मधारय आहेत.

(३४६१) तुग्राद् घन् ।४।४।११५

भवेऽर्थे । पक्षे यदपि । आ वः शमं वृषभं तुग्र्यासु । इति बह्वृचाः । (ऋ. १।३३।१५) तुग्रियास्विति शाखान्तरे । (ऋ. ८ १।१५) धनाकाशयज्ञवरिष्ठेषु तुग्रशब्द इति वृत्तिः ।

वेदामध्यें तुग्र शब्दाहून 'तत्र भवः' या अर्थी घन् (इय) प्रत्यय होतो. हा यत् प्रत्ययाचा बाध करतो. पण एकदा तोहि होतो. उदा० 'आ वः शमं वृषभं तुग्र्यासु'; 'तुग्र्य' म्हणजे जलांत बुडलेला. 'तुग्रियासु' असेंहि रूप इतर शाखांत होतें. 'तुग्र्यासु' असे 'बह्वृचात' (ऋग्वेदांत) आहे. 'तुग्र' शब्दाचा अर्थ धन, आकाश, यज्ञ व वरिष्ठ असा आहे.

(३४६२) अग्राद्यत् ।४।४।११६

वेदामध्यें अग्र शब्दाहून 'तत्र भवः' या अर्थी यत् होतो. एक शंका - ।४।४।११० यानें यत् झालाच असता. परंतु पुनः त्याचें विधान अशासाठीं केले कीं पुढील सूत्रानें सांगितलेल्या घ व छ या प्रत्ययांनीं त्याची बाधा होऊ नये. उदा० अग्र्यम्, भाषेंत मात्र 'अग्रिमः' असें रूप होतें.

(३४६३) घच्छौ च ।४।४।११७

चाद्यत् । अग्रे भवः अग्र्यः । (वासं १६।३०) **अग्रियः ।** (तैसं. ५।५।२) **अग्रीयः ।** (मैसं २।९।५)

वेदामध्यें अग्र शब्दाहून 'तत्र भवः' या अर्थी घ (इय) व छ (ईय) प्रत्यय होतात. एकदा यत् प्रत्ययहि होतो. उदा० अग्र्यः अग्रियः, अग्रीयः; (ऋग्वेद १।१३।१०)

(३४६४) समुद्राभ्राद् घः ।४।४।११८

समुद्रिया अप्सरसो मनीषिणम् । (ऋ. ९।७८।३) **वावदतो अभ्रियस्येव घोषाः ।** (ऋ. १०।६८।१)

वेदामध्यें समुद्र व अभ्र शब्दाहून 'तत्र भवः' या अर्थी घ प्रत्यय

होतो. हा घ यत् प्रत्ययाचा बाध करतो. उदा० समुद्रियः, अभ्रियः, 'समुद्रिया अप्सरसो मनीषिणम्', वावदतो अभ्रियस्येव घोषाः' ('नानदतो' याऐवजीं 'वावदतो' असे वाचावें.)

टीप-- 'समुद्राभ्रात्' हा समाहारद्वंद्व असल्यानें अभ्र शब्द समुद्र-शब्दापेक्षां अल्पाच्तर असूनहि त्याला नियमाप्रमाणें पूर्व निपात झाला नाहीं. यावरून असें सूचित होतें कीं हा विधि अनित्य आहे.

'आपो बिभर्ति इति अभ्रम्', 'समुन्दतीति समुद्रः'; 'स्फायितञ्चि०'. यानें रक् प्रत्यय होतो.

(३४६५) बर्हिषि दत्तम् ।४।४।११९

'प्राग्घिताद्यत्' इत्येव । बर्हिष्येषु निधिषु प्रियेषु । (ऋ. १०।१५।५)

या सूत्रापासून 'तत्र भवः' याची निवृत्ति होते. सप्तम्यन्त बर्हिस् शब्दाहून वेदामध्यें 'दत्तम्' या अर्थी यत् प्रत्यय होतो. उदा० 'बर्हिष्येषु निधिषु प्रियेषु'।

(३४६६) दूतस्य भागकर्मणी ।४।४।१२०

भागोंऽशः । दूत्यम् । (ऋ. १।१२।४)

वेदामध्यें षष्ठ्यन्त दूत शब्दाहून भाग म्हणजे अंश व 'त्याचें कर्म' हें अर्थ वाच्य असतां यत् प्रत्यय होतो. भाग अर्थ असतां 'तस्येदम्' यानें अण् प्राप्त झाला होता आणि 'कर्म' अर्थ असता 'दूतवणिग्भ्यां च' या वार्तिकानें य प्रत्यय प्राप्त होता म्हणून सूत्रारंभ आहे. दूतस्य भागः दूत्यः, 'यत्ते अग्ने दूत्यम्'; दूतस्य कर्म दूत्यम्.

(३४६७) रक्षोयातूनां हननी ।४।४।१२१

या ते अग्ने रक्षस्या तनूः । (मैसं. २।३।१)

वेदामध्यें षष्ठ्यन्त बहुवचनी रक्षस् व यातु शब्दाहून 'हनन करणारी' या अर्थी यत् प्रत्यय होतो. 'हन्यते अनया सा हननी रक्षसाम्'

शैषिक अण् व छ प्रत्ययांचा हा अपवाद आहे. उदा० रक्षस्या, यातव्या; (राक्षसाना व यातूना ठार मारणारी) उदा० ' या तेऽग्ने रक्षस्या तनू: ' (' या वां मित्रावरुणा ओजस्या सहस्या यातव्या रक्षस्या तनू:')

टीप--रक्षस् व यातु हे एकाच अर्थाचे शब्द असून सुद्धां ' विरूपाणामपि समानार्थानाम् ' याप्रमाणें त्यांचा एकशेष, संदेह होऊ नये म्हणून केला नाहीं. ' बह्वार्याभिधायिस्वरूपवचनेन सूत्रस्य भिन्नार्थत्वात् '। (सुबोधिनी) ' बहुवचनं स्तुतिवैशिष्टयज्ञापनाय '।

(३४६८) रेवतीजगतीहविष्याभ्यः प्रशस्ये ।४।४।१२२

प्रशंसने यत्स्यात् । रेवत्यादीनां प्रशंसनं रेवत्यम् । जगत्यम् । हविष्यम् ।

षष्ठचन्त रेवती, जगती व हविष्या या शब्दाहून प्रशंसन (स्तुति) या अर्थी वेदामध्यें यत् प्रत्यय होतो. उदा० रेवत्यादीनां प्रसंशनं रेवत्यं, (काठकसं३१।७) जगती–जगत्यम्, हविष्या–हविष्यम्, (' यद्वो रेवती रेवत्य यद्वो हविष्या हविष्य यद्वो जगतीर्जगत्यम्. ')

प्रशस्य म्हणजे प्रशंसन. प्रपूर्वक ' शंसु स्तुतौ ' या धातूहून भावे क्यप् होऊन रूप सिद्ध होतें. हविषे हिता हविष्या–'उगवादिभ्यो० ' ।५।१।२ यानें यत् होतो. तासां प्रशंसनं हविष्यम्. 'यस्येति च ' ।६।४।१४८ यानें अकाराचा लोप होऊन यकाराचा लोप ' हलो यमां यमि लोपः ' ।८।४।६४ यानें होतो.

(३४६९) असुरस्य स्वम् ।४।४।१२३

असुर्यं देवेभिर्धायि विश्वम् । (ऋ. ६।२०।२)

षष्ठचन्त असुर शब्दाहून ' स्वम् ' (धन) या अर्थी वेदामध्यें यत् प्रत्यय होतो. असुरस्य स्वम्–असुर्यम्. उदा० ' असुर्यं देवेभिर्धायि विश्वम् ', किंवा ' असुर्या नाम ते लोकाः ' (ईश. ३)

(३४७०) मायायामण् ।४।४।१२४

आसुरी माया । (वासं. ११।६९)

षष्ठचन्त असुर शब्दाहून वेदामध्यें ' त्याची माया ' या अर्थी अण्

प्रत्यय होतो. उदा० असुरस्य माया--आसुरी. अण् झाल्यानें स्त्रीलिंगी ।४।१।१५ यानें ङीप् होतो. ('आसुरी माया स्वधया कृतासि ' ।)

टीप--मीयते अनया माया, असदर्थप्रकाशनशक्तिः; । मा धातूहून औणादिक य प्रत्यय होतो. हा अण् पूर्व सूत्राचा अपवाद आहे.

(३४७१) तद्वानासामुपधानो मन्त्र इतीष्टकासु लुक् च मतोः ।४।४।१२५

वर्चस्वानुपधानो मन्त्र आसामिष्टकानां वर्चस्याः । (मै. सं. ४।४।२) **ऋतव्याः ।** (तै. सं. ५।३।१।१)

वेदामध्यें मतुप्प्रत्ययान्त प्रथमान्त शब्दाहून षष्ठ्यर्थी ' हा त्यांचा वर रचण्याचा मंत्र ' या अर्थी यत् प्रत्यय होतो. मंत्रानें वर ठेवण्याच्या यज्ञिय विटा (इष्टका) असल्या पाहिजेत व मतुप् प्रत्ययाचा लुक् झाला असला पाहिजे. उदा० ' वर्चस् ' शब्द ज्या मंत्रांत आहे तो वर्चस्वान्; 'उपधीयते अनेन इति उपधानम्' म्हणजेच चयन किंवा रचन. वर्चस्वान् उपधानमंत्रः आसामिष्टकानाम्--वर्चस्याः; ज्या मंत्रामध्यें 'वर्चस्' शब्द आहे अशा मंत्राने जेव्हां यज्ञिय विटा रचल्या जातात तेव्हां त्याना ' वर्चस्याः ' म्हणतात. त्याप्रमाणें ऋतु शब्द ज्या मंत्रामध्यें आहे तो ऋतुमान्. यज्ञिय विटा रचताना (उपधान) जेव्हां हा मंत्र म्हटला जातो तेव्हां त्या ' ऋतव्याः ' इष्टकाः असें रूप होते. ऋतु शब्दाहून प्रस्तुत सूत्रानें यत् झाल्यावर गुण व अवादेश होऊन ' ऋतव्याः ' रूप होते. यांतील ऋतुमत् शब्दातील व वर्चस्वत् यांतील वत् या मतुप् प्रत्ययाचा लोप होतो. इतर उदाहरणें-तेजस्याः, पयस्याः, रेतस्याः (काशिका); स्पष्टीकरण--सूत्रांतील ' तद्वान् ' शब्द मतुप्प्रत्ययान्त आहे. तद् शब्दाहून मतुप् झाला असून ' ते असणारा ' असा त्याचा अर्थ होतो. आसाम्--ही इदम् शब्दाच्या स्त्रीलिंगाची षष्ठी असून त्या शब्दाचा संबंध ' इष्टका ' शब्दाकडे आहे. उपधान म्हणजे वर ठेवणें--अर्थात् इष्टका वगैरे रचताना म्हणण्याचा मंत्र. उदा० ' वर्चस्या उपदधाति ' (वर्चस् शब्द ज्या मंत्रांत आहे तो म्हणून ज्या इष्टका रचल्या जातात, त्या विटा ' वर्चस्या ' होत.

'तद्वान्' म्हटल्यानें यत् प्रत्यय सर्व मंत्राहून न होता त्या शब्दाहूनच होतो. 'उपधान' म्हटल्यानें स्तुत्यर्थक जे मंत्र आहेत त्यातील शब्दाहून यत् प्रत्यय होत नाहीं. उदा० 'वर्चस्वानुपस्थानमन्त्र आसामिष्टकानाम्'; 'मन्त्रः' म्हटल्यानें 'अङ्गुलिमानुपधानो हस्त आसाम्' (या विटा अंगुलि असलेल्या हातानें गोळा केल्या आहेत.) येथें अङ्गुलि शब्दाहून वत् प्रत्यय होत नाहीं. 'इष्टकासु' म्हटल्यानें 'वर्चस्वानुपधानो मन्त्र एषां कपालानाम्' यांत 'वर्चस्वत्' शब्दाहून यत् होत नाहीं. कारण येथें इष्टका नसून कपाल आहेत. सूत्रांतील इतिकरण नियमार्थ आहे. तें कसे ? 'अनेकपदसम्भवे केनचिदेव पदेन तद्वान् मन्त्रो गृह्यते न सर्वेण'। (काशिका)

मतुप् शब्द उत्तर सूत्रासाठीं आहे. 'अश्विमान्' यांतील मतुप्चाच लुक् व्हावा व 'इनि' चा होऊ नये म्हणून प्रस्तुत सूत्रांत मत्वन्त शब्द असल्यानें मतुप् प्रत्ययाचाच लुक् होणार.

(३४७२) आश्विमानण् ।४।४।१२६

आश्विनीरुपदधाति । (तैसं. ५।३।१।१)

वेदामध्यें मतुप् प्रत्ययान्त अश्विमत् या प्रथमान्त शब्दाहून षष्ठ्यर्थी 'उपधान मन्त्र' या अर्थी अण् प्रत्यय होतो. हा प्रत्ययान्त शब्द उपधान मन्त्र असावा. मात्र उपधान (रचल्या जाणाऱ्या) यज्ञिय इष्टका (विटा) असाव्यात व मतुप् प्रत्ययाचा लुक् झाला असला पाहिजे. उदा०अश्विन् शब्द ज्या मंत्रांत आहे तो अश्विमान्. अश्व शब्दाहून 'अत इनिठनौ' यानें इनि होऊन अश्विन् शब्द होऊन तदन्ताहून मतुप् होऊन 'अश्विमत्' शब्द सिद्ध झाला. उदा० 'आश्विनीरुपदधाति' –अश्विमानुपधानो मन्त्र आसामिष्टकानाम्–आश्विनः–स्त्रीलिंगी 'आश्विनीः'; मतुप्चा लुक् ।४।४।१२५ यानें होतो. अण् होऊन 'आश्विनीः' इष्टकाः' असा प्रयोग होतो. ज्या मंत्रांत 'अश्विन्' शब्द आहे त्या मंत्रानें तो 'आश्विनी' विटा रचतो. 'इनण्यनपत्ये' ।६।४।१६४ यानें प्रकृतिभाव झाल्यानें 'इन्' चा लोप होत नाहीं.

(३४७३) वयस्यासु मूर्ध्नो मतुप् ।४।४।१२७

तद्वानासामिति सूत्रं सर्वमनुवर्तते । मतोरिति पदमावर्त्य पञ्चम्यन्तं बोध्यम् । मतुबन्तो यो मूर्धशब्दस्ततो मतुप्स्यात् प्रथमस्य मतोर्लुक् च वयःशब्दवन्मन्त्रोपधेयास्विष्टकासु । यस्मिन् मन्त्रे मूर्धवयः शब्दौ स्तस्तेनोपधेयासु । मूर्धन्वतीरुपदधातीति प्रयोगः । (तुल. मैतै. ३।२।९)

'तद्वानासाम्० ।४।४।१२५ या सर्व सूत्राची अनुवृत्ति येते. त्यांतील 'मतोः' हें षष्ठयन्त पद या सूत्रांत पंचम्यन्त समजावें.

वेदामध्यें मतुबन्त मूर्धन् म्हणजे मूर्धन्वत् शब्दाहून ज्या मंत्रामध्यें वयस् आहे व मूर्धन्हि आहे त्या मंत्रानें 'विटा रचल्या गेल्या' या अर्थी मतुप् होतो व पहिल्या मतुप् प्रत्ययाचा लुक् होतो. 'वयस्या' इष्टकाः —ज्या मंत्रांत वयस् शब्द आहे अशा मंत्रानें रचल्या जाणाऱ्या इष्टका. त्या 'वयस्याः'; त्याप्रमाणें 'मूर्धन्या' इष्टकाः;

हा मतुप् ।४।४।१२५ यानें सांगितलेल्या यत्चा बाध करतो. उदा० 'मूर्धन्वतीरुपदधाति' असा प्रयोग होतो.

सूत्रामध्यें 'मूर्धवत्' न म्हणतां पुढें मतुप् प्रत्ययाचा लुक् होणार आहे हें अंतःकरणात ठेवून 'मूर्धन्' म्हटलें. वयस्या आणि मूर्धन्या या शब्दांचा अर्थ एकच आहे. ज्या मंत्रामध्यें मूर्धन् व वयस् या दोन्ही शब्दांचा निर्देश आहे असा मंत्र–त्यानें रचलेल्या इष्टका त्या 'मूर्धन्या' व 'वयस्या'; केवळ मूर्धन् शब्द असून वयस् नसेल तर तेथें प्रत्यय होत नाहीं.

(३४७४) मत्वर्थे मासतन्वोः ।४।४।१२८

नभोऽभ्रम् । तदस्मिन्नस्तीति नभस्यो मासः । (वासं. १४।१५) **ओजस्या तनूः ।** (मैसं. २।३।१)

ज्या अर्थी मतुप् प्रत्यय सांगितला आहे त्या अर्थी वेदामध्यें प्रथमान्त शब्दाहून मास किंवा तनू शब्द अभिधेय (वाच्य) असता यत् प्रत्यय होतो. नभस् म्हणजे अभ्र. नभांसि विद्यन्ते यस्मिन् मासे स 'नभस्यः';

आकाश मेघाच्छादित असतें तो महिना. इतर उदाहरणें--सहस्यः, तपस्यः, मधव्यः; तनुवाचक-ओजो यस्याः यस्यां वा अस्ति इति 'ओजस्या' तनः; (बल असणारे शरीर)

हा यत् प्रत्यय इतर सर्व मत्वर्थीय प्रत्ययांचा अपवाद आहे.

(३४७५) मधोर्ञ्च ।४।४।१२९

माधवः । (वासं.१३।२५) **मधव्यः** । (तैसं. ५।७।१।३)

वेदामध्यें मधु शब्दाहून मत्वर्थी ञ प्रत्यय होतो व चकारानें यत् प्रत्ययहि होतो. उदा० माधवः (ञ), माधव्यः (यत्); (चैत्रमास) येथे 'ओर्गुणः' यानें गुण होऊन अवादेश होतो. ('मधुश्च माधवश्च वासन्तिकावृतू')

(३४७६) ओजसोऽहनि यत्खौ ४।४।१३०

ओजस्यमहः । (पैसं. १५।१।३) **ओजसीनं वा** ।(मैसं. ३।१६।४)

वेदामध्यें ओजस् शब्दाहून मत्वर्थी अहन् अर्थ अभिधेय असता यत् व ख प्रत्यय होतात. उदा० ओजस्यमहः किंवा ख (ईन) झाल्यास 'ओजसीनम्' असेंहि रूप होते.

(३४७७) वेशोयशआदेर्भगाद्यल् ।४।४।१३१

यथासंख्यं नेष्यते । वेशो बलं तदेव भगः ।। वेशोभग्यः । वेशोभगीनः । (तुल. मैसं १।४।३) **यशोभग्यः । यशोभगीनः** । (हिश्रौ २।५।४३)

वेदामध्यें वेश व यशस् शब्द आदि असलेल्या भग शब्दाहून मत्वर्थी यल् व ख प्रत्यय होतात. यल् यांतील लकार स्वरार्थ आहे. ।६।१।१९३ यानें लित् स्वर प्रत्ययाच्या मागील अचाला उदात्त होतो. दोन शब्द व दोन प्रत्यय असले तरी ते यथासंख्य होणें इष्ट नाहीं. उदा० वेशोभगो विद्यते यस्य स वेशोभग्यः (वेशो बलं तदेव भगः) किंवा वेशोभगीनः, त्याप्रमाणें

यशोभग्य: किंवा यशोभगीन:, वेश म्हणजे बल व भग म्हणजे चांगलें नशीब, कीर्ति, मोठेपणा इत्यादि.

टीप—काशिकाकार ख प्रत्ययाचा निर्देश करीत नाहीं. कारण पुढील सूत्रानें तो सांगितला आहे.

(३४७८) खच ४।४।१३२

योगविभाग उत्तरार्थः क्रमनिरासार्थश्च ।

वेदामध्यें वेशोभग व यशोभग या शब्दाहून मत्वर्थीं ख प्रत्ययहि होतो. उदा० वेशोभगीन:, यशोभगीन:; प्रस्तुत सूत्र निराळें करण्याचें कारण कीं त्याचीच अनुवृत्ति पुढील सूत्रांत जावी व यल्‌ची जाऊ नये. दुसरें कारण, काशिकाकारानें दिलें आहे तें असें कीं यल् व ख हे प्रत्यय ।१।२।१० प्रमाणें यथासंख्य होऊं नयेत.

(३४७९) पूर्वैः कृतमिनयौ च ।४।४।१३३

गम्भीरेभिः पथिभिः पूर्विणेभिः । (काठक सं. ९।६, आश्रौ २।७।९) **ये ते पन्थाः सवितः पूर्व्यासः ।** (ऋ. १।३५।११)

वेदामध्यें तृतीयान्त पूर्व (वाडवडील) शब्दाहून ' कृतम् ' या अर्थी इन, य व चकारानें ख प्रत्ययहि होतात.

या सूत्रांत 'मत्वर्थे' याची अनुवृत्ति येत नाहीं, उदा० पूर्वैः कृतः पूर्विणः (वाडवडिलांनीं केलेला). या अर्थीं पूर्व शब्द बहुवचनांत असतो. उदा० 'गम्भीरेभिः पथिभिः पूर्विणेभिः'; 'ये ते पन्थाः सवितः पूर्व्यासः' येथें पूर्व शब्दाहून य होतो.

(३४८०) अद्भिः संस्कृतम् ।४।४।१३४

यस्येदमप्यं हविः । (ऋ. १०।८६।१२)

वेदामध्यें तृतीयान्त अप् शब्दाहून ' संस्कृतम् ' या अर्थी यत् प्रत्यय

होतो. उदा० 'यस्येदमप्यं हविः' यांतील 'अप्यम्' हें रूप अप् शब्दाहून यत् करून साधलें आहे. (जलानें शुद्ध केलेला हवि)

(३४८१) सहस्रेण संमितौ घः ।४।४।१३५

सहस्रियासो अपां नोर्मयः । (ऋ. १।१६८।२) सहस्रेण तुल्या इत्यर्थः ।

तृतीयान्त सहस्र शब्दाहून वेदामध्यें 'संमितम्' या अर्थी घ (इय) प्रत्यय होतो. 'संमित' म्हणजे तुल्य किंवा सदृश. उदा० सहस्रेण संमितः= सहस्रियः, म्हणजे सहस्रेण तुल्यः; उदा० 'सहस्रियासो अपां नोर्मयः';

(३४८२) मतौ च ।४।४।१३६

सहस्रशब्दान्मत्वर्थे घः स्यात्। सहस्रमस्यास्तीति सहस्रियः ।

वेदामध्यें सहस्र शब्दाहून मत्वर्थी घ प्रत्यय होतो. हा घ प्रत्यय 'तपः-सहस्राभ्यां विनिनी' ।५।२।१०२ यानें विहित असलेंल्या विनि व इनि प्रत्ययांचा व ।५।२।१०३ यानें सांगितलेल्या अण् प्रत्ययाचा बाध करतो. उदा० सहस्रमस्य विद्यते 'सहस्रियः';

(३४८३) सोममर्हति यः ।४।४।१३७

सोम्यो ब्राह्मणः । (ऋ. ६।७५।१०) **यज्ञार्ह इत्यर्थः ।**

द्वितीयान्त सोम शब्दाहून 'अर्हति' या अर्थी वेदामध्यें य प्रत्यय होतो. उदा० सोम्यो ब्राह्मणः--याचा अर्थ तो ब्राह्मण यज्ञार्ह आहे.

टीप--यत् व य प्रत्ययांनीं रूप जरी एकच होत असलें तरी स्वरांत भेद होतो हें मागें सांगितलेंच आहे.

(३४८४) मये च ।४।४।१३८

सोमशब्दाद्यः स्यान्मयडर्थे । सोम्यं मधु । (ऋ. १।१४।१०) **सोममयमित्यर्थः ।**

मयट् ज्या अर्थी होतो त्या अर्थी वेदामध्यें सोम शब्दाहून य प्रत्यय होतो.

‘आगतविकारावयवप्रकृता मयडर्थाः’। त्यांत ‘आगत’ अर्थ असता समर्थविभक्ति पंचमी असते. पहा–‘तत आगतः’ ।४।३।७४; विकारावयव अर्थ असता समर्थविभक्ति षष्ठी असते. पहा–‘तस्य विकारः’ ।४।३।१३४ व प्रकृत–वचन असता समर्थविभक्ति प्रथमा असते. पहा– ‘तत्प्रकृतवचने मयट्’ ।५।४।२१; अर्थाप्रमाणें समर्थविभक्ति बदलते. उदा० सोम्यं मधु (पिबन्ति) याचा अर्थ ‘ सोममयं मधु ’ असा होतो.

(३४८५) मधोः ।४।४।१३९

मधुशब्दान्मयडर्थे यत्स्यात् । मधव्यः । (शौं. २।३५।२) **मधुमय इत्यर्थः ।**

वेदामध्यें मधु शब्दाहून मयडर्थी यत् प्रत्यय होतो. उदा० मधव्यः ; ‘ओर्गुणः’ यानें गुण होऊन अवादेश होतो. यत्चीच अनुवृत्ति येते व ‘य’ ची येत नाहीं. काशिकाकार–वृत्तिकार हेंच म्हणतो.

(३४८६) वसोः समूहे च ।४।४।१४०

चान्मयडर्थे यत् । वसव्यः । (ऋ. ४·५५·८) (**वा.**) **‘अक्षरसमूहे छन्दस उपसंख्यानम्’। छन्दस् शब्दादक्षरसमूहे वर्त–मानात्स्वार्थे यदित्यर्थः । आ श्रावयेति चतुरक्षरमस्तु श्रौषडिति** (तैसं. १।६।११) **चतुरक्षरम् । यजेति द्व्यक्षरम् । ये यजामहे इति पञ्चाक्षरं, द्व्यक्षरो वषट्कार एष वै सप्तदशाक्षरश्छन्दस्यः ।**

वेदामध्यें वसु शब्दाहून समूहार्थी यत् प्रत्यय होतो. चकारानें मय–डर्थीहि होतो. उदा० वसव्यः म्हणजे समूहः (वा.) ‘छन्दस् शब्दाहून जर तो शब्द ‘ अक्षरसमूह ’ याला उद्देशून असेल तर स्वार्थी यत् प्रत्यय होतो. उदा० सप्तदशाक्षरः छन्दस्यः प्रजापतियज्ञो मन्त्रे विहिताः ’––सतरा अक्ष–

रांचा छन्दस् खालीलप्रमाणें होतो. त्यांत ' आ श्रावय ' (४), अस्तु श्रौषट् (४), यज (२) ये यजामहे (५) वषट् (२) अशा सतरा अक्षरांचा छंद मंत्रांत सांगितला आहे.

वसु शब्दाहून होणारा प्रत्यय स्वार्थीहि होतो. उदा० ' हस्तौ गृहीतस्य बहुभिर्वसव्यैः '--यांत ' वसव्यैः ' याचा अर्थ ' वसुभिः ' आहे.

(३४८७) नक्षत्राद् घः ।४।४।१४१

स्वार्थे । नक्षत्रियेभ्यः स्वाहा । (वासं. ।२२।२८)

वेदामध्यें नक्षत्र शब्दाहून स्वार्थी घ (इय) प्रत्यय होतो. ' समूह ' शब्दाची अनुवृत्ति या सूत्रांत येत नाहीं. उदा० ' नक्षत्रियेभ्यः स्वाहा ' याचा अर्थ 'नक्षत्रेभ्यः स्वाहा' असा होतो. अनिर्दिष्टार्थ प्रत्यय स्वार्थी होतात असें वचन आहे. ' अनिर्दिष्टार्थाः प्रत्ययाः स्वार्थे भवन्ति ' ।

(३४८८) सर्वदेवात्तातिल् ।४।४।१४२

स्वार्थे । सविता नः सुवतु सर्वतातिम् । (ऋ. १०·३६·१४) **प्रदक्षिणिद्देवतातिमुराणः** (ऋ. ४।६।३, ३।१९।२)

वेदामध्यें सर्व आणि देव या शब्दांहून स्वार्थी तातिल् प्रत्यय होतो. उदा० सर्वतातिः, देवतातिः, ' सविता नः सुवतु सर्वतातिम् ' ' प्रदक्षिणिद्देवतातिमुराणः ';

(३४८९) शिवशमरिष्टस्य करे ।४।४।१४३*

करोतीति करः । पचाद्यच् । शिवं करोतीति शिवतातिः । (पैसं. ५।३६।१।९) **याभिः शन्ताती भवथो ददाशुषे** । (ऋ. १।११२।२०) **अथो अरिष्टतातये** । (ऋ. १०।६०।।८।१०)

वेदामध्यें षष्ठ्यन्त शिव, शम् व अरिष्ट या शब्दांहून ' करोति ' या अर्थी तातिल् प्रत्यय होतो. ' करः ' हें रूप ३।१।१३४ याने यांतील पचादिगणांत कृ धातु असल्यानें कर्तरि अच् प्रत्यय होऊन गुण होतो. करोतीति

करः । या कृदन्त शब्दामुळें कृद्योगलक्षणा षष्ठी समर्थविभक्ति 'उभयप्राप्तौ कर्मणि' यानें होते. अर्थ मात्र कर्मकारकाचा होतो. उदा० शिवं करोतीति शिवतातिः; त्याप्रमाणें शंतातिः व अरिष्टतातिः रूपें होतात. उदाहरणार्थ, 'याभिः शन्ताती भवथो ददाशुषे' यांतील 'शन्ताती' रूप 'शन्ताति' शब्दाचें द्विवचनी आहे. 'अथो अरिष्टतातये';

(३४९०) भावे च ।४।४।१४४

शिवादिभ्यो भावे तातिः स्याच्छन्दसि । शिवस्य भावः शिवतातिः । शन्तातिः : । अरिष्टतातिः । (शौंसं १३।५) (शंत-तिभिरथो अरिष्टतातिभिः)

इति चतुर्थोऽध्यायः ।

वेदामध्यें षष्ठ्यन्त शिव, शम् व अरिष्ट या शब्दाहून 'भाव' या अर्थी तातिल् (ताति) प्रत्यय होतो.

उदा० शिवरूपभावः, शिवतातिः, शन्तातिः (कल्याणाची स्थिति) अरिष्टतातिः, या उदाहरणांतून भाव म्हणजे क्रिया दाखविली जाते.

* या सूत्रांतील 'शिव' शब्द हा मंगलार्थ आहे असें कांहींचें म्हणणें आहे. कारण ग्रंथाच्या प्रारभीं, मध्ये व शेवटीं इष्टसिद्ध्यर्थ मंगलार्थवाचक शब्द घालण्याची पूर्व परंपरा आहे असें महाभाष्यांत म्हटलें. हें सूत्र ग्रंथ-मध्यांत आहे. ग्रंथारंभी १।१।१ मध्यें 'वृद्धि' शब्द आहे तर शेवटी ८।४।६७ मध्ये 'उदय' शब्द आहे.

याप्रमाणें वैदिकी प्रक्रियेच्या चवथ्या अध्यायांतील सूत्रांचा मराठी 'बालबोधिनी' टीकेसह अनुवाद समाप्त झाला.

अथ पञ्चमोऽध्यायः ।

(३४९१) सप्तनोऽञ् छन्दसि ।५।१।६१

'तदस्य परिमाणम्' इति वर्ग इति च । सप्त साप्तानि असृजत् । (तु. मैसं. ३।२।१) (वा.) शन्शतोर्डिनिश्छन्दसि तदस्य परिमाणमित्यर्थे वाच्यः । पञ्चदशिनोऽर्धमासाः । त्रिंशिनो मासाः । (वा.) विंशतेश्चेति वाच्यम् । विंशिनोऽङ्गिरसः । (वा.) युष्मदस्मदोः सादृश्ये मतुब् वाच्यः । त्वावतः पुरूवसो । न त्वावाँ अन्यः । यज्ञं विप्रस्य मावतः ।

वेदामध्यें सप्तन् शब्दाहून 'तदस्य परिमाणम्' हा विषय असताना व वर्ग अभिधेय असता अञ् प्रत्यय होतो.

५।१।५७ यांतून 'तदस्य परिमाणम्' याची अनुवृत्ति येते व ५।१।६० यातून 'वर्गे' पदाची अनुवृत्ति येते. वर्ग --'प्राण्यप्राणिविषयः' (शेखर) उदा० 'सप्त साप्तानि असृजत्'--साप्तानि--सप्तन् + अञ् अशी स्थिति असतांना ६।४।१४४ याने 'अन्' या टि भागाचा लोप झाल्यावर जस् प्रत्यय पुढें असता हें नपुंसकलिंगी रूप आहे. जस् प्रत्ययाला शि आदेश होऊन 'नपुंसकस्य झलचः' यानें नुम् झाला व उपधादीर्घ झाला. 'साप्तानि' असें नपुंसकलिंगी रूप आर्ष आहे असे शेखरकार म्हणतो. 'साप्तानि' याचा अर्थ 'सप्त वर्गान्' असा होतो.

(वा.) 'वेदामध्यें शन् आणि शत् अंतीं असलेल्या शब्दाहून 'तदस्य परिमाणम्' या अर्थी डिनि प्रत्यय होतो. उदा० पञ्चदशिनोऽर्धमासाः तैसं. ७।५।२०।१; (पंधरा दिवसांचें परिमाण असलेले अर्धमास किंवा पंधरवडे) पञ्चदश अहानि परिमाणमेषाम्; डिनि प्रत्यय डित् असल्याने त्या सामर्थ्यास्तव पञ्चदशन् यांतील अन् या टि-भागाचा लोप होतो. त्याप्रमाणें तीस दिवसांचे परिमाण असलेले मास ते 'त्रिंशिनो मासाः'; (तैसं. ७।५।२०।१) त्रिंशत् यांतील टि भागाचा म्हणजे अत् याचा लोप होतो.

५

(वा.) 'वेदामध्यें वर सांगितलेला नियम विंशति शब्दालाहि लागू होतो.' उदा० 'विंशिनः अङ्गिरसः', विंशतिर्गोत्राणि परिमाणमेषाम् (विंशति गोत्रें ज्यांचे परिमाण आहे असे अङ्गिरस) डिनि प्रत्यय केल्यावर 'ति विंशतेर्डिति' ।६।४।१४२ यानें ति शब्दाचा लोप झाल्यावर 'यस्येति च' यानें अकाराचा लोप होतो.

(वा.) 'युष्मद् व अस्मद् शब्दाहून वेदामध्यें 'सादृश्य' या अर्थी मतुब् प्रत्यय होतो. उदा० 'त्वावतः पुरूवसो'; (ऋ. ८।४६।१) 'न त्वावाँ अन्यः'; (ऋ. ७।३२।२३) 'यज्ञं विप्रस्य मावतः' (ऋ. १।१४२।२) त्वमिव त्वावान् तस्य त्वावतः, अहमिवेति मावान् तस्य मावतः; 'प्रत्ययोत्तरपदयोश्च' यानें त्व व म आदेश होतात व 'आ सर्वनाम्नः' यानें आत्व होतें.

(३४९२) छन्दसि च । ५।१।६७

प्रातिपदिकमात्रात्तदर्हतीति यत् । सादन्यं विदथ्यम् । (ऋ. १।९१।२०)

वेदामध्यें प्रत्येक प्रातिपदिकाहून 'तदर्हति' या अर्थी यत् प्रत्यय होतो. याच अर्थी होणाऱ्या ठञ् वगैरे प्रत्ययांचा हा अपवाद आहे. उदा० सदनमर्हति-- सादन्यः; 'अन्येषामपि दृश्यते' ।६।३।१३७ यानें दीर्घ होतो. विदथो यज्ञः, तमर्हति-- विदथ्यम् । (ऋग्वेद १।९१।२०)

(३४९३) वत्सरान्ताच्छश्छन्दसि । ५।१।९१

निर्वृत्तादिष्वर्थेषु । इद्वत्सरीयः । (काठसं १३।१५)

वेदामध्यें वत्सरशब्दान्त शब्दाहून निर्वृत्तादि अर्थी छ (ईय) प्रत्यय होतो. हे निर्वृत्तादि पांच अर्थ 'तेन निर्वृत्तम्' ।५।१।७९ व 'तमधीष्टो भृतो भूतो भावी' ।५।१।८० या सूत्रांतून अनुवृत्त होतात. उदा० इद्वत्सरीयः म्हणजे 'इद्वत्सरेण निर्वृत्तः; इद्वत्सरमधीष्टो भृतो भूतो भावी वा'; इद्वत्सर किंवा इदावत्सर म्हणजे काय ? 'इमौ शब्दौ पञ्चवर्षे युगे द्वयोर्वर्षयोः संज्ञे'।

(सुबोधिनी) त्याप्रमाणें संवत्सर व परिवत्सर शब्दहि त्याच अर्थाचें आहेत म्हणजे संज्ञा आहेत.

(३४९४) संपरिपूर्वात् ख च ।५।१।९२

चाच्छः । संवत्सरीणः । (ऋ. १०।८७।१७) **संवत्सरीयः ।** (काठसं. १३।१५, मैसं. २।१०।१) **परिवत्सरीणः ।** (ऋ. ७।१०३।८) **परिवत्सरीयः ।** (काठसं १३।१५)

वेदामध्यें सम् आणि परिपूर्वक वत्सर शब्दान्त प्रातिपदिकाहून निर्वृत्तादि अर्थी ख होतो व चकाराने छ (ईय) हा प्रत्ययही होतो. उदा॰ संवत्सरीणः (ख), संवत्सरीयः (छ); त्याप्रमाणें परिसंवत्सरीणः व परिसंवत्सरीयः;

(३४९५) छन्दसि घस् ५।१।१०६

ऋतुशब्दात्तस्य प्राप्तमित्यर्थे। भाग ऋत्वियः । (ऋ.१।१३५।३)

वेदामध्यें ऋतु शब्दाहून ' तस्य प्राप्तम् ' या अर्थी घस् (इय) प्रत्यय होतो. ' समयस्तदस्य प्राप्तम् ' ।५।१।१०४ यांतून ' तदस्य प्राप्तम् ' याची व ' ऋतोरण् ' ।५।१।१०५ यांतून ऋतु शब्दाची अनुवृत्ति येते. उदा० ' भागः ऋत्वियः ' (ऋग्वेद १।१३५।३)

टीप–या ठिकाणीं ' ओर्गुणः ' ।६।४।१४६ याने गुण होत नाहीं. कारण घस् प्रत्यय हा सित् असल्यानें ' सिति च ' ।१।४।१६ यानें ऋतु शब्दाला पदसंज्ञा होते व गुण तर भसंज्ञकाला सांगितला आहे म्हणून येथें यण् होतो.

(३४९६) उपसर्गाच्छन्दसि धात्वर्थे ५।१।११८

धात्वर्थविशिष्टे साधने वर्तमानात्स्वार्थे वतिः स्यात् । यदुद्वतो निवतः । (ऋ. १०।१४२।४) **उद्गतान्निर्गतादित्यर्थः ।**

वेदामध्यें उपसर्गाहून धात्वर्थविशिष्टसाधन या अर्थीं स्वार्थीं वति प्रत्यय होतो.

सूत्रांतील धातुशब्दानें धातुवाच्य क्रियेचा बोध होतो. तो अर्थ ' ज्या साधनाचें प्रयोजन आहे त्या अर्थी असणाऱ्या ' असा अर्थ होतो.

' उपसर्गाश्च पुनरेवमात्मकाः यत्ते श्रुतायां क्रियायां तामेव विशिषन्ति । यथा आगच्छति । यत्र तु न श्रूयते तत्र क्रियाविशिष्टसाधनमाहुः । निष्कौशाम्बिः । तथा च यत्र क्रियापदं श्रूयते तत्रैव यथा स्यादित्येवमर्थं धात्वर्थमित्युक्तम् ' । (सुबोधिनी)

उदा० ' यदुत्वतो निवतः ' (ऋग्वेद ।१०।१०२।४) यांत उद् व नि या उपसर्गाहून वति (वत्) प्रत्यय झाला आहे. (उत्वतः--उद्गतान् व निवतः निर्गतान् असा अर्थ होतो. येथें हे उपसर्ग धात्वर्थविशिष्टाचे (गमनक्रियेचे) साधन आहेत. जेथें क्रिया ऐकू येत नाहीं तेथें ते साधन असतात. ' उद्वतः ' व ' निवतः ' यांचे विशेष्य ' देशाः ' आहे.

(३४९७) थट् च छन्दसि ।५।२।५०

नान्तादसंख्यादेः परस्य डटस्थट् स्यान्मट् च । पञ्चथम् । (काठसं८।२) **पञ्चमम् ।** (मैसं. १।९।४) **' छन्दसि परिपन्थिपरिपरिणौ पर्यवस्थातरि ' । पर्यवस्थाता शत्रुः । अपत्यं परिपन्थिनम् ।** (ऋ. १।४२।३) **मात्वा परिपरिणो विदन् ।** (वासं. ४।३४)

वेदामध्यें कोणताही संख्यावाचक शब्द पूर्वी नसलेल्या अशा नकारान्त शब्दापुढें होणाऱ्या डट् प्रत्ययाला थट् आगम होतो. त्याप्रमाणें मट्ही होतो. उदा० पञ्चन् शब्दाहून ' पञ्चानां पूरणम् ' या अर्थी ' तस्य पूरणे डट् ' ।५।२।४८ यानें डट् केल्यावर त्याला थट् आगम होऊन ' पञ्चथम् ' व मट् केल्यास ' पञ्चमम् ' रूपें होतात. या मट् आगमाची अनुवृत्ति ' नान्तादसंख्यादेर्मट् ।५।२।४९ यांतून येते.

' छन्दसि परिपन्थिपरिपरिणौ पर्यवस्थातरि ।५।२।८९ याचा अर्थवेदामध्यें परिपन्थिन् व परिपरिन् हें शब्द ' पर्यवस्थातृ ' म्हणजे प्रतिपक्ष

किंवा शत्रु असा अर्थ असतांना इनि प्रत्यय करून निपातन केले जातात. 'पर्यवस्थाता प्रतिपक्षः सपत्न इत्युच्यते'। निपातन कशाचें होते? 'पर्यवस्थातृ' शब्दाहून स्वार्थी इनि प्रत्यय होतो व अवस्थातृ शब्दाला पन्थि व परि असे आदेश होतात. उदा० 'अपत्यं परिपन्थिनम्'; 'मात्वा परिपरिणौ विदन्।'

(३४९८) बहुलं छन्दसि ।५।२।१२२

मत्वर्थे विनिः स्यात्। (वा.) छन्दो विन्प्रकरणेऽष्ट्रामेखलाद्वयोभयरुजाहृदयानां दीर्घश्चेति वक्तव्यम्। इति दीर्घः। मंहिष्ठमुभयाविनम् । (ऋ. ८।१।२) **शुनमष्ट्राव्यचरत्।** (ऋ. १०।१०२८) **(वा.) छन्दसीवनिपौ च वक्तव्यौ। ई। रथीरभूत्।** (ऋ. १०।१०२।२) **(मङ्गलीरियं वधूः।** (ऋ. १०।८५।३३) **मघवानमीमहे।** ऋ. १०।१६७।२)

वेदामध्यें मतुबर्थी विनि प्रत्यय बहुलेंकरून होतो. उदा० 'अग्ने तेजस्विन्'; 'बहुलम्' म्हटल्यानें क्वचित् होत नाहीं. उदा० 'सूर्यो वर्चस्वान्'; 'अस्मायामेधास्रजो विनिः ।५।२।१२१ यांतून 'विनि' याची अनुवृत्ति येते.

(वा.) वेदामध्यें द्वय, उभय आणि हृदय याहून विनि होतो व त्यांतील अंत्य अकाराला विनि प्रत्यय पुढें असतां दीर्घ होतो. हा विनि प्रत्यय अष्ट्रा, मेखला व रुजा याहूनहि होतो. हे शब्द मूळचेच दीर्घान्त आहेत. उदा० अष्ट्रावी. 'अष्ट्रा' शब्द अश् धातूहून ष्ट्रन् प्रत्यय करून साधला आहे. तो शब्द दंष्ट्रा शब्दाचा पर्याय आहे. त्याप्रमाणें मेखलावी, द्वयावी, उभयावी, रुजावी, 'दंष्ट्रा' हृदयावी; उदाहरणें–मंहिष्ठमुभयाविनम्। शुनमष्ट्राव्यचरत्; (वा.) 'वेदामध्यें मतुबर्थी ई आणि वनिप् प्रत्यय होतात. उदा० ई– 'रथीरभून्मुद्गलानीं गविष्टौ'; 'सुमङ्गलीरियं वधूः' यांमध्यें रथीः व सुमङ्गलीः हीं रूपें रथ व सुमङ्गल या शब्दाहून मत्वर्थी ई प्रत्यय करून झालीं आहेत. रथः अस्यास्तीति रथी. सुष्ठु मङ्गलम्–सुमङ्गलम्, 'सुः पूजायाम्'

यानें समास झाल्यावर त्याहून मत्वर्थी ई झाला. 'सुमङ्गलमस्यास्ति'; वनिप् 'मघवानमीमहे'; 'मघं धनम्--तदस्यास्तीति' 'मघवा'; 'मतुप्' झाला असता तर 'मघवत्' शब्द झाला असता. मघवन् व मघवत् अशीं रूपें अनुक्रमें वनिप् व मतुप् प्रत्ययांनीं होतात.

टीप–ईश्च वनिप् च ईवनिपौ;

(३४९९) तयोर्दार्हिलौ च छन्दसि ।५।३।२०

इदन्तदोर्यथासंख्यं स्तः । इदा हि व उपस्तुतिम् । (ऋ. ८।२७।११) **तर्हि ।** (ऋ. १०।१२९।२)

वेदामध्यें इदम् आणि तद् शब्दाहून दा व र्हिल् प्रत्यय होतात. सूत्रांतील 'तयोः' यानें जवळच्या 'इदमो र्हिल्' ।५।३।१६ व 'तदो दा च' ।५।३।१९ या दोन सूत्रांचा निर्देश होतो. म्हणून वृत्तींत 'इदन्तदोः' म्हटले आहे.

उदा० 'इदा हि व उपस्तुतिम्'। यांतील 'इदा' हें रूप इदम् शब्दाहून दा प्रत्यय केल्यावर 'इदम इश्' ।५।३।३ याने इदम् शब्दाला इश् (इ) आदेश करून सिद्ध होते. र्हिल्–तर्हि, येथें 'त्यदादीनामः' ।८।२।१०२ यानें तद् शब्दाला अत्व होतें.

(३५००) था हेतौ च छन्दसि ।५।३।२६

किमस्था स्याद्धेतौ प्रकारे च । कथा ग्रामं न पृच्छसि । (ऋ. १०।१४६।१) **कथा दाशेम ।** (ऋ. ५।४१।१६)

वेदामध्ये किम् शब्दाहून हेतु किंवा प्रकार अर्थ असतां था प्रत्यय होतो. चकारानें 'प्रकारवचने थाल्' ।५।३।२३ यांतून 'प्रकारवचने' याची अनुवृत्ति येते व 'किमश्च' ।५।३।२५ यांतून 'किम्'ची येते. उदा० 'कथा ग्रामं न पृच्छसि' यांतील 'कथा' याचा अर्थ 'केन हेतुना' असा आहे. 'कथा दाशेम' यांत 'कथा' याचा प्रकार अर्थ आहे 'केन प्रकारेण' असा अर्थ होतो.

टीप—' प्राग्दिशो विभक्तिः ' ।५।३।१ हा अधिकार चालू असल्यानें विभक्तिसंज्ञा होऊन किम् शब्दाला कादेश ।७।२।१०३ यानें होतो.

(३५०१) पश्च पश्चा च छन्दसि ।५।३।३३

अवरस्य अस्तात्यर्थे निपातौ। पश्च हि सः। नो ते पश्चा। 'तुश्छन्दसि'। तृजन्तात्तृन्नन्ताच्च इष्ठनीयसुनौ स्तः। आसुतिं करिष्ठः। दोहीयसी धेनुः।

अवर शब्दाला ' अस्ताति ' प्रत्ययाच्या अर्थी पश्चभाव होऊन अकार व आकार प्रत्ययांचे निपातन होते. सूत्रांतील चकारानें ' पश्चात् 'चाहि अंतर्भाव होतो. 'दिक्शब्देभ्यः०' ।५।३।२७ यानें अस्ताति प्रत्यय सांगितला आहे. उदा० ' पश्च हि सः '; 'पुरो व्याघ्रो जायते पश्च सिंहः' (काशिका) ' नो ते पश्चा ' (ऋ. २.२७।११)

' तुश्छन्दसि ' ।५।३।५९ याचा अर्थ वेदामध्यें तृजन्त व तृन्नन्त शब्दाहून इष्ठन् व ईयसुन् प्रत्यय होतात, उदा० ' आसुतिं करिष्ठः ' (ऋ. ।७।९७।७) यांतील ' करिष्ठ ' रूप कर्तृ + इष्ठ – अशा स्थितींत ' तुरिष्ठेमेयःसु ' ।६।४।१५४ यानें ' तृ ' चा लोप होतो. ' दोहीयसी धेनुः ' येथें दोहीयसी हें रूप ' लिङ्गविशिष्ट ' परिभाषान्वयें दोग्ध्री या स्त्रीलिंगी रूपावरून ईयसुन् (ईयस्) प्रत्यय करून साधलें आहे. ' भस्याऽढे० ' यानें पुंवद्भाव होऊन स्त्रीप्रत्ययाची निवृत्ति होते. ' तुरिष्ठेमेयःसु ' ।७।१।८८ यानें पूर्ववत् तृ (तृच्) चीहि ।६।४।१५४ यानें निवृत्ति झाल्यानंतर निमित्तच नष्ट झाल्यानें घत्व व कुत्व यांची निवृत्ति होते. कारण तीं असिद्ध आहेत.

(३५०२) प्रत्नपूर्वविश्वेमात्थाल्छन्दसि ।५।३।१११

इवार्थे। तं प्रत्नथा पूर्वथा विश्वथेमथो। (ऋ. ५।४४।१)

वेदामध्यें प्रत्न, पूर्व, विश्व व इम (इदम्) याहून इव या अर्थी थाल् प्रत्यय होतो.

उदा० ' तं प्रत्नथा पूर्वथा विश्वथेमथो ';

(३५०३) अमु च छन्दसि ।५।४।१२

किमेत्तिङव्ययघादित्येव । प्र तं नय प्रतरम् । (ऋ,१०।४५।९)

'किमेत्तिङव्ययघादाम्वद्रव्यप्रकर्षे ।५।४।११ यानें सांगितल्याप्रमाणें प्रस्तुत सूत्रानें वेदामध्यें किम् वगैरे शब्दाहून अमु (अम्) प्रत्यय होतो. उदा० 'प्र तं नय प्रतरम्'; प्रतर म्हणजे प्रकृष्टतर. प्रकर्ष या अर्थी प्र याहून तरप् होऊन तदन्ताहून अमु होतो. चकारानें ।५।४।११ यानें विहित असलेला आमु पण होतो. अम् व आम् यांचा पाठ स्वरादि गणांत असल्यानें 'स्वरादिनिपात-मव्ययम्' ।१।१।३७ यानें त्यांना अव्ययसंज्ञा असल्यानें 'अव्ययादाप्सुपः' यानें पुढील विभक्तिप्रत्ययांचा लुक् होतो. उदा० 'इन्द्रेमं प्रतरां नय' (वासं. ।१७।५१) 'प्रतराम्' असेंहि 'आमु' प्रत्ययानें होतें.

(३५०४) वृकज्येष्ठाभ्यां तिल्तातिलौ च छन्दसि । ५।४।४१

स्वार्थे । यो नो दुरेवो वृकतिः । (ऋ. ४।४१।४) **ज्येष्ठ-तातिं बर्हिषदम् ।** (ऋ. ५।४४।१)

वेदामध्यें वृक आणि ज्येष्ठ शब्दाहून 'प्रशंसा' या अर्थीं अनुक्रमें तिल् व तातिल् प्रत्यय होतात. हे प्रत्यय 'सस्नौ प्रशंसायाम्' ।५।४।४० यानें सांगितलेल्या प्रत्ययांचा बाध करतात. उदा० वृकतिः-'यो नो दुरेवो वृकतिः'; ज्येष्ठ-'ज्येष्ठतातिं बर्हिषदम्';

टीप—'स्वार्थे' म्हटलें असलें तरी 'प्राशस्त्यविशिष्टे स्वार्थे' असा अर्थ होतो असें शेखरकारांचें मत आहे.

(३५०५) अनसन्तान्नपुंसकाच्छन्दसि ।५।४।१०३

तत्पुरुषाट्टच् स्यात् समासान्तः । ब्रह्मसामं भवति । (तैसं. १।८।१८।१) **देवच्छन्दसानि ।** (मैसं. ३।२।९)

वेदामध्यें अन् किंवा अस् शेवटीं असलेल्या तत्पुरुषाहून नपुंसक-लिंगांत टच् समासान्त होतो. अन्नन्ताचें उदाहरण--'ब्रह्मसामं भवति' यांत 'ब्रह्मसामन्' हा अन्नन्त तत्पुरुष आहे. 'ब्रह्मणः साम' असा विग्रह

आहे. ' नस्तद्धिते ' यानें टिलोप होतो. असन्ताचें उदाहरण--' देवच्छन्दसानि '; ' देवस्य छन्दांसि ' असा विग्रह आहे.

(३५०६) बहुप्रजाश्छन्दसि च ।५।४।१२३

बहुप्रजा निर्ऋतिमाविवेश । (ऋ. १।१६४।३२)

वेदामध्यें ' बहुप्रजाः ' असें रूप निपातनानें होतें. भाषेंत मात्र ' बहुप्रजः ' असें होतें. उदा० बहुप्रजो ब्राह्मणः.

' बहुप्रजा निर्ऋतिमाविवेश '--' बह्व्यः प्रजाः यस्य ' असा बहुव्रीहि असून असिच् प्रत्यय होऊन ' यस्येति च ' यानें अकार लोप होतो. ' अत्वसन्तस्य० ' यानें दीर्घ व रुत्वविसर्ग होऊन ' बहुप्रजाः ' रूप सिद्ध होतें.

(३५०७) छन्दसि च ।५।४।१४२

दन्तस्य दतृशब्दः स्याद्बहुव्रीहौ । उभयतोदतः प्रतिगृह्णाति । (तु.तै. २।६।२।२)

वेदामध्यें दन्त शब्दाला बहुव्रीहि समासांत दतृ आदेश होतो.

उदा० ' उभयोदतः प्रतिगृह्णाति '; ' उभयतो दन्ताः यस्य ' असा विग्रह होतो. ' वयसि दन्तस्य दतृ ' ।५।४।१४१ यांतून ' दन्तस्य दतृ ' याची अनुवृत्ति येते. पहा–' येनान्यतोदतश्च पशून् दाधारोभयतोदतश्च ' ।

(३५०८) ऋतश्छन्दसि ।५।४।१५८

ऋदन्ताद् बहुव्रीहेर्न कप् । हता माता यस्य हतमाता । (शौ. २।३२।४)

वेदामध्यें ऋकारान्त बहुव्रीहीहून कप् प्रत्यय होत नाहीं. ' नद्यृतश्च ' ।५।४।१५३ यानें नित्य प्राप्ति आली होती.

उदा० हता माता यस्य स हतमाता; ' हतमातृकः ' असे भाषेंत होतें. तसेंच हता स्वसा यस्य स हतस्वसा इत्यादि.

याप्रमाणें वैदिकी प्रक्रियेतील पांचव्या अध्यायातील सूत्रांचा मराठी ' बालबोधिनी ' टीकेसह अनुवाद समाप्त झाला.

षष्ठोऽध्यायः ।

एकाचो द्वे प्रथमस्य ।६।१।१ (वा.) **छन्दसि वेति वक्तव्यम्** । **यो जागार** । (ऋ. ५।४४।१४) **दाति प्रियाणि** । (ऋ. ४।८।३)

धातु एकाच्क असल्यास पहिल्या भागाला लिट् प्रत्यय पुढें असता द्वित्व होतें. हें सूत्र पूर्वी येऊन गेलेच आहे. परंतु—

(वा.) ' वेदामध्यें मात्र लिट् प्रत्यय पुढें असतां किंवा अन्यत्र जेथें द्विर्वचन सांगितलें असेल तेथें तें विकल्पानें होतें. उदा० ' यो जागार '; ' जजागार ' असेंहि होतें. ' दाति प्रियाणि ' किंवा ' ददाति प्रियाणि ' असेंहि होतें. 'श्लौ' ६।१।१० यानें नित्य द्वित्व प्राप्त होते तें विकल्पानें होते.

(३५०९) तुजादीनां दीर्घोऽभ्यासस्य ६।१।७

तुजादिराकृतिगणः । प्रभरा तूतुजानः । (ऋ. १।६१।१२) **सूर्यं मामहानम्** । (तु. ऋ।१.११७।१७) **दाधार यः पृथिवीम्** । (ऋ. ३।३२।८) **स तूताव** । (ऋ. १।९४।२)

तुज् वगैरे धातूंच्या अभ्यासांतील ऱ्हस्व स्वराला दीर्घ होतो. तुजादि गण कोठेंहि पठित नाहीं. तो आकृतिगण समजावा. म्हणजे जेथें अभ्यासातील अचाला दीर्घ झालेला असेल तेथें तो धातु तुजादि समजावा. उदा० ' प्रभरा तूतुजानः ' यांतील ' तूतुजानः ' हें रूप तुज् धातूहून केलेल्या लिट् प्रत्ययाला ।३।२।१०६ यानें कानच् करून साधलें आहे. ' सूर्यं मामहानम् '; ' दाधार यः पृथिवीम् ' ' मामहानम् '--येथें ' मह पूजायाम् ' या मह् धातूहून पूर्ववत् कानच् झाला. 'स तूताव'; तूताव–'तु' हा सौत्र धातू असून त्याच्या लिटाचे हें रूप आहे. अभ्यासांतील उकाराला दीर्घ झाला.

टीप—शेखरकार म्हणतो ' तुजादीनामित्यत्रापि छन्दसीति वक्तव्यम् ' इति भाष्यम् । आणि ' छन्दसि सर्वविधीनां विकल्पत्वात् '–'ममहान' असेंहि रूप होतें.

(३५१०) बहुलं छन्दसि ६।१।३४

ह्वः संप्रसारणं स्यात् । इन्द्रमाहुव ऊतये। (ऋ. १।१११।४) (वा.) 'ऋचि त्रेरुत्तरपदादिलोपश्च छन्दसि'। ऋच्शब्दे परे त्रेः संप्रसारणमुत्तरपदलोपश्चेति वक्तव्यम् । तृचं सूक्तम् । (तैसं १।५।८।३) छन्दसि किम् । त्र्यृचानि । (कपि.सं. ३५।४) (वा.) 'रयेर्मतौ बहुलम् । ' रेवान् । रयिमान् पुष्टिवर्धनः । (ऋ. १।१८।२)

वेदामध्यें ह्वे धातूला बहुलेंकरून संप्रसारण होतें.

' ह्वः संप्रसारणम् ' ।६।१।३२ याची अनुवृत्ति येते. उदा० 'इन्द्रमा हुव ऊतये' (ऋग्वेद ।१।३।४) यांतील ' आहुवे ' हें रूप आङ्पूर्वक ' ह्वे ' धातूचे वर्तमानीं लटाचें उत्तम पुरुषाचें आत्मनेपदी एकवचन आहे. शपे विकरणाचा लोप होऊन वकाराला संप्रसारण होतें.

(वा.) ' ऋच् ' शब्द पुढें असतां वेदामध्यें त्रि शब्दांतील रेफाला संप्रसारण होऊन ऋच् यांतील ऋकाराचा म्हणजे त्रिच्या पुढील उत्तर–पदांतील ऋकाराचा जेव्हां तो मंत्राला उद्देशून असेल तेव्हां लोप होतो.

' तृच् ' म्हणजे सूक्त. हा अर्थ कसा झाला ? ' तिस्रः ऋचो यस्मिन् तत् तृचम् '; ' ऋक्पूरब्धूः० ' ।५।४।७४ इत्यादि सूत्रानें ' अ ' समासान्त होऊन रूप सिद्ध होते.

त्रि + ऋच् = तृच्; + अ = तृचम् - ऋचम् सूक्तम् . ' छन्दसि ' म्हटल्यानें भाषेत 'त्र्यृचानि' असें रूप होतें. संप्रसारण व ऋकाराचा लोप होत नाहीं. (वा.) 'वेदामध्यें रयि शब्दाला मतुप् पुढें असता संप्रसारण बहुलें–करून होते.' उदा० रेवान्; रयि + मत् = र इ मत् = र इमत् = रैवत्; ८।२।१५ यानें मकाराला वकार होतो. ' बहुलम् ' म्हटल्यानें क्वचित् संप्रसारण होत नाहीं, उदा० ' रयिमान् पुष्टिवर्धनः ' येथें संप्रसारण व मकाराला वकारहि होत नाहीं. ' रेवान् ' येथें मात्र ' छन्दसीरः ' ।८।२।१५ यानें वत्व होतें. ' तत्र विहितविशेषणाश्रयणात् । ' (शेखर)

(३५११) चायः की ।६।१।३५

चायतेर्बहुलं कीत्ययमादेशः स्याच्छन्दसि । न्यन्यं चिक्युर्न नि चिक्युरन्यम् । (ऋ. १।१६४।३८) लिटि उसि रूपम् । बहुलग्रहणानुवृत्तेर्नेह । अग्निं ज्योतिर्निचाय्य । (तैसं. ४।१।१।१)

वेदामध्यें 'चायृ पूजानिशामनयोः' या चायृ धातूला 'की' असा आदेश बहुलेंकरून होतो. उदा० 'न्यन्यं चिक्युर्न नि चिक्युरन्यम्' यांतील चिक्युः व निचिक्युः हीं रूपें चाय् धातूंचीं लिटाचा उस् प्रत्यय पुढें असतांना होतात. 'बहुलम्' पदाची अनुवृत्ति येत असल्यानें कधीं कधीं 'की' आदेश होत नाहीं. उदा० 'अग्निं ज्योतिर्निचाय्य' यांतील 'निचाय्य' हें रूप चाय् धातूहून क्त्वा व नंतर त्यांला ल्यप् आदेश करून साधलें आहे.

(३५१२) अपस्पृधेथामानृचुरानृहुश्चिच्युषेतित्याजश्रताश्रितमाशीराशीर्ताः ।६।१।३६

एते छन्दसि निपात्यन्ते । इन्द्रश्च विष्णो यदपस्पृधेथाम् । (ऋ. ६।६९।८) स्पर्धेर्लङि आथाम् । अर्कमानृचुः । (ऋ. १।१९।४)। वसून्यानृहुः । (तैसं. ३।२।८।३) अर्चेरर्हेश्च लिटयुसि चिच्युषे । (ऋ. ४।३०।२२) च्युङो लिटि थासि । यस्तित्याज । (ऋ. १०।७१।६) त्यजेर्णलि । श्रातास्त इन्द्र सोमाः । (मैसं. १।१।१) श्रिता नो ग्रहाः । श्रीञ् पाके निष्ठायाम् । आशिरं दुहे । (ऋ. ३।५३।१४) मध्यत आशीर्तः । (ऋ. ८।२।११९) श्रीञ एव क्विपि निष्ठायां च ।

वेदामध्यें अपस्पृधेथाम्, आनृचुः, आनृहुः, चिच्युषे, तित्याज श्राताः, श्रितम्, आशीः व आशीर्तः या रूपांचें निपातन होतें. उदा० 'इन्द्रश्च विष्णो यदपस्पृधेथाम्' यांतील 'अपस्पृधेथाम्' हें रूप अपपूर्वक स्पर्ध् धातूच्या लङाचे आत्मनेपदी म. पु. द्वि. व. आहे. स्पर्ध् धातूतील रेफाला संप्रसारण होऊन अकार लोप होतो. भाषेंत मात्र अपा-

स्पर्धेथाम् ' असें रूप होतें. वेदांत ' बहुलं छन्दस्यमाङ्योगेऽपि ' ।६।४।७५ यानें अडागम होत नाहीं.

आनृचुः व आनृहुः हीं रूपें अनुक्रमें अर्च् व अर्ह् धातूंच्या लिटाचीं प्र. पु. ब. व चीं आहेत व तीं निपातनानें होतात. संप्रसारण होऊन अकार-लोप होतो व नंतर द्विर्वचन, ' उरत् ' यानें अत्व व ' अत आदेः ' यानें दीर्घ होतो. ' तस्मान्नुड् द्विहलः ' यानें नुडागम होतो. उदा० ' अर्कमानृचुः ' (ऋग्वेद १।१९।४) ' वसून्यानृहुः '; भाषेंत मात्र आनर्चुः व आनर्हुः अशीं रूपें होतात. ' चुच्युषे ' रूप च्युङ् धातूच्या लिटाचे आहे. अभ्यासाला संप्रसारण व इडागमाचा अभाव हीं निपातनानें होतात. भाषेंत ' चुच्यु-विषे ' रूप होतें. थास् प्रत्ययाला ' थासः से ' यानें से आदेश होऊन त्याला षत्व होते. ' यस्तित्याज ', तित्याज ' हें ' त्यज वयोहानौ ' याचे लिटाचें आहे. अभ्यासाला संप्रसारण निपातनानें होतें. भाषेत ' तत्याज ' रूप होतें.

' श्राताः ' हें ' श्रीञ् पाके ' याचे निष्ठाप्रत्ययाचे रूप आहे. ' श्री ' याला श्राभाव निपातनानें होतो. ' श्रिताः ' हें ' श्रीञ् ' याचेच रूप आहे. यामध्यें ' श्री ' धातूला ऱ्हस्व होतो. उदा० ' सोमो गौरी अधिश्रितः '; सोमाशी संबंध असेल तेव्हांच ' श्रित ' रूप होते व अन्यत्र 'श्रात' होते असें कांहींचें म्हणणें आहे. सोमाशी संबंध नसतांहि क्वचित् श्राभाव होतो असे शेखरकारांचें मत आहे. उदा० ' यदि श्रातो जुहोतन ' इत्यादि. ' सोमे तु-बहुत्वे एव ' इति भाष्ये स्पष्टम् '; आशीर् व आशीर्त हीं रूपेंहि आङ्पूर्वक श्री धातूची असून शिर् असा आदेश होऊन होतात. निष्ठातकाराला निपा-तनानें नकार होत नाहीं. ' हलि च ' यानें दीर्घ होतो. ' आशीर् ' येथें मात्र क्विप् प्रत्यय झाला आहे. उदा० ' आशिरं दुहे '; ' क्षीरैर्मध्यत आशीर्तः ।

(३५१३) खिदेश्छन्दसि ।६।१।५२

खिद दैन्ये । अस्यैव आद्वा स्यात् । चिखाद । चिखेदेत्यर्थः ।

' खिद दैन्ये ' या खिद् धातूतील एच् वर्णाला वेदामध्यें विकल्पानें आत्व होतें. उदा० चिखाद किंवा चिखेद. उदा. ' चित्तं चिखाद '.

टीप—' आदेच उपदेशे० ' यांतून ' आत् ' व ' एचः ' यांची व

' विभाषा लीयतेः ' यांतून ' विभाषा ' पदाची अनुवृत्ति येते. व्यत्ययानें परस्मैपद होतें.

(३५१४) शीर्षंश्छन्दसि ।६।१।६०

शिरःशब्दस्य शीर्षन् स्यात् । शीर्ष्णः शीर्ष्णो जगतः ।

वेदामध्यें शिरस् शब्दाला शीर्षन् आदेश होतो. उदा० ' शीर्ष्णः शीर्ष्णो जगतः ' (ऋ.७।६६।१५) भाषेंत मात्र 'शिरः' असें एकच रूप होते. 'शीर्ष्णः' येथें ' अल्लोऽपो नः ' यानें अकाराचा लोप होतो व 'रषाभ्याम्०' यानें णत्व होते. ' पूर्वस्मादपि विधौ स्थानिवद्भावः ' असा पक्ष घेतल्यास ' अट्कुप्वाङ्० ' यानें णत्व होतें.

(३५१५) वा छन्दसि ।६।१।१०६

दीर्घाज्जसि इति च पूर्वसवर्णदीर्घो वा स्यात् । वाराही । वाराह्यौ । (मंसं ४।११६) **मानुषीरीळते विशः ।** (ऋ. ५।८।३) **उत्तरसूत्रद्वयेऽपीदं वाक्यभेदेन संबध्यते । तेनामि पूर्वत्वं वा स्यात् । शमीं च** (शौ.६।११।१) **शम्यं च ।** (मैसं.१।१०।१२) **सूर्म्यं सुषिरामिव ।** (ऋ. ८।६९।१२) **'संप्रसारणाच्च' इति पूर्वरूपमपि वा । इज्यमानः ।** (तैसं २।५।४।५) **यज्यमानः ।**

' दीर्घाज्जसि च ' ।६।१।१०५ या सूत्रानें सांगितलेला [दी]र्घाचा निषेध वेदामध्यें विकल्पानें होतो. म्हणजे पूर्वसवर्णदीर्घ जस् पुढे असतां विकल्पानें होतो. त्याप्रमाणें ' नादिचि ' ।६।१।१०४ याचाही नित्य निषेध प्राप्त झाला होता. उदा० वाराही किंवा वाराह्यौ. हें वाराही' शब्दाचें प्र. द्वि. व. आहे. पूर्वसवर्णदीर्घ विकल्पानें होतो. होत नाहीं तेव्हां यणादेश होतो. ' नादिचि ' ।६।१।१०४ यानें नित्य निषेध प्राप्त झाला होता. 'वराहस्य विकारः' या अर्थी अञ् होऊन स्त्रीलिंगी ङीप् होतो. ' वाराही ' होते. ' मानुषीरीळते विशः ' ' मानुषीः ' हें ' मानुषी ' शब्दाचें प्र. ब. व. आहे. जस् प्रत्यय पुढें असतां पूर्वसवर्ण दीर्घ होतो.

या पुढील दोन सूत्रांत ' अमि पूर्वः ' । ६।१।१०७ व ' संप्रसार-

णाच्च ' ।६।१।१०८ या सूत्रांचा वाक्यभेदानें संबंध येतो तो पुढीलप्रमाणें– ' अकः असि पूर्वरूपं वा स्याच्छन्दसि ', त्याप्रमाणें ' संप्रसारणाच्च ' इति– पूर्वरूपं वा स्याच्छन्दसि '; असें अर्थ होतात. उदा० ' शमीं च शम्यं च ' ' सूर्म्यं सुषिरामिव ', ' शम्यम् ' येथें विकल्प सांगितल्यानें पूर्वरूप होत नाहीं व पूर्वसवर्ण दीर्घही होत नाहीं तर यणादेश होतो. यज् धातूचीं यज्यमानः किंवा इज्यमानः अशीं रूपें होतात. कारण संप्रसारण विकल्पानें होतें. यज्यमानः व इज्यमानः येथें यज् धातूहून शानच् झाला आहे. ' सार्वधातुके यक् ' यानें कर्मणि यक् प्रत्यय झाला आहे.

(३५१६) शेश्छन्दसि बहुलम् ।६।१।७०

लोपः स्यात् । " या ते गात्राणाम् । ताता पिण्डानाम् । " (ऋ. १।१६२।१९) (वा.) ' एमन्नादिषु छन्दसि पररूपं वक्तव्यम् । ' " अपां त्वेमन् । अपां त्वोद्मन् । " (वासं. १।३५३)

वेदामध्यें ' शि ' या विभक्तिप्रत्ययाचा बहुलेंकरून लोप होतो. उदा० ' या ते गात्राणाम् ' यांतील ' या ' हें रूप यद् शब्दापुढील शि प्रत्ययाचा लोप केल्यावर प्रत्ययलक्षणानें ' त्यदादीनामः ' यानें अत्व व ' नपुंसकस्य झलचः ' यानें नुम् होतो. ' सर्वनामस्थाने च० ' यानें दीर्घ झाल्यावर लोप होऊन रूप सिद्ध होतें.

' ताता पिण्डानाम् ', ' ताता ' याचा अर्थ 'तानि तानि ' असा होतो. ' ता ' याची व्युत्पत्ति ' या ' प्रमाणें पूर्ववत् समजावी.

(वा.) ' वेदामध्यें ' एमन् ' वगैरे शब्द पुढें असता पररूप होतें असे म्हणावें. ' उदा० ' अपां त्वेमन् '— ' अपां त्वा एमन् ', त्याप्रमाणें ' अपां त्वोद्मन् '—' अपां त्वा ओद्मन् '; ओद्मन् शब्द एमन्नादिमध्यें आहे.

(३५१७) भय्यप्रवय्ये च छन्दसि ।६।१।८३

बिभेत्यस्मादिति भय्यः । (तांब्रा. १०।५।१६) **वेतेः प्रवय्या इति स्त्रियामेव निपातनम् । प्रवेयमित्यन्यत्र । छन्दसि किम् ।**

भेयम् । प्रवेयम् । (वा.) ' ह्रदय्या उपसंख्यानम् ' । ह्रदे भवा ह्रदय्या आपः । (तैसं. ४।५।९।१) **भवे छन्दसि यत् ।**

भी व प्रपूर्वक वी धातूहून यत् प्रत्यय केला असता वेदामध्यें यादेश निपातनानें होतो. हा यत् प्रत्यय ' कृत्यल्युटो बहुलम् ' ।३।३।११३ यानें अपादान अर्थी होतो. वेदामध्यें भय्य व प्रवय्या अशीं रूपें निपातनानें होतात. ' छन्दसि ' म्हटल्यानें भाषेंत भेयम् व प्रवेयम् अशीं रूपे होतात.

'प्रवय्या' असें स्त्रीलिंगी रूपच निपातनानें होते. उदा० 'भय्यं किलासीत् '। ' वत्सतरी प्रवय्या '; भी+य=भे+य-अयादेश होऊन भय्य; तसेंच प्रवी+यत् =प्रवे+य=प्रवय्या. भय्य म्हणजे भिवविणारे.

(वा.) ' वेदामध्यें जलाचा निर्देश असेल तेव्हां ' ह्रदय्या ' असें निपातन होते. उदा० ह्रदे भवाः—' ह्रदय्याः आपः '; येथें ' भवे छन्दसि ' ।४।४।११० यानें यत् होऊन प्रस्तुत वार्तिकानें अकाराला अयादेश होतो.

(३५१८) प्रकृत्यान्तःपादमव्यपरे ।६।१।११५

ऋक्पादमध्यस्थ एङ् प्रकृत्या स्यादति परे न तु वकार-यकारपरेऽति । उपप्रयन्तो अध्वरम् । (ऋ. १।७४।१) **सुजाते अश्वसूनृते।** (ऋ.५।७९।१।१०) **अन्तःपादं किम् ।एतास एतेऽर्चन्ति ।** (ऋ. १।१६५।१) **अव्यपरे किम् । तेऽवदन् ।** (ऋ. १०।१०९।१)

ऋक्पादामध्यें आलेल्या 'एङ्' (ए व ओ) वर्णांला ह्रस्व अकार पुढें असता प्रकृतिभाव होतो. परंतु त्यापुढें वकार किंवा यकार हे वर्ण नसलें पाहिजेत. म्हणजे संधिरूप विकार होत नाहींत.

' पादस्य मध्ये-अन्तःपादम् ' असा अव्ययीभाव समास आहे. ' पद ' शब्दानें ऋक्पाद घ्यावयाचा, श्लोकाचा नाहीं. ' एङः पदान्तात्०। ' यांतून ' एङः ' या पचम्यन्त पदाची अनुवृत्ति येऊन तिचा प्रथमेंत विपरिणाम होतो. ' वा छन्दसि ' यातून ' छन्दसि ' पद अनुवृत्त होत असल्यानें ऋक्पादच घ्यावयाचा हे सिद्ध होतें.

उदा० ' उपप्रयन्तो अध्वरम् '; ' सुजाते अश्वसूनृते ' या उदाहरणांत ' एङः पदान्तादति '। यानें पूर्वरूप प्राप्त झालें होतें. ' अन्तःपादम् ' म्हटल्यानें ' एतास एतेऽर्चन्ति '। येथें पूर्वरूप होतें. कारण ' एतेऽर्चन्ति ' येथें एङ पादामध्यें नसून पादाच्या अन्ती आहे. पहा--' कया मती कुत एतास एतेऽर्चन्ति शुष्मं वृषणो वसूया '। ' अव्यपरे ' म्हटल्यानें ' तेऽवदन् ' येथें एङ वर्णापुढें 'अव्' असा अकारापुढें वकार आल्यानें प्रकृतिभाव न होता पूर्वरूप होतें.

(३५११) अव्यादवद्यादवक्रमुरव्रतायमवन्त्ववस्युषु च ।६।१।११६

एषु व्यपरेऽप्यति एङ् प्रकृत्या । वसुभिर्नो अव्यात् । (तैसं. २।१।११।२) **मित्रमहो अवद्यात् ।** (ऋ. ४।४।१५) **मा शिवासो अवक्रमुः ।** (ऋ.७।२२।२७) **ते नो अव्रत ।** (शौ. १९।३६।५) **शतधारो अयं मणिः ।** (ऋ. १०।१५।१) **ते नो अवन्तु कुशिकासो अवस्यवः।** (ऋ. ३।४२।९) **यद्यपि बह्वृचस्ते नोऽवन्तु रथतूः** (ऋ. १०।७७।८) **" सोऽयमागात् "** (ऋ. १०।५३।१) **तेऽरुणेभिरित्यादौ प्रकृतिभावो न क्रियते तथापि बाहुलकात् समाधेयम् । प्रातिशाख्ये तु वाचनिक एवायमर्थः ।**

ऋक्पादामध्यें असलेल्या ' एङ ' वर्णाला अव्यात्, अवद्यात्, अवक्रमुः, अव्रत, अयम्, अवन्तु व अवस्यु हे शब्द पुढें असता--जरी त्यांचा प्रारंभ अव् किंवा अय् यानें होतो--म्हणजे अकारापुढें यकार किंवा वकार असले तरी प्रकृतिभाव होतो.

उदा० ' वसुभिर्नो अव्यात् । मित्रमहो अवद्यात् ' ' या शिवासो अवक्रमुः '; ' ते नो अव्रत '— हे ऋग्वेदांत नाहीं. पण इतर उदाहरणें देता येतात. ' शतधारो अयं मणिः '; ' ते नो अवन्तु '; ' कुशिकासो अवस्यवः ';

' बह्वृच: ' म्हणजे ऋग्वेद. त्यांत जरी 'ते नोऽअवन्तु रथतू:'; ' सोऽयमागात् ' व ' तेऽरुणेभि: ' असें संधिकार्य केलेले प्रयोग सापडतात तरी त्याचे निराकरण ' बाहुलकात् ' यानें करतां येतें. परंतु ' प्रातिशाख्य ' ग्रंथांत यासंबंधीं स्पष्ट नियम असून तेथें सन्देहाला स्थान नाहीं.

वरील उदाहरणांत आलेल्या रूपांची व्युत्पत्ति येणेंप्रमाणें--

अव्यात्---हें ' अव रक्षणे ' याचें आशीर्लिङाचें रूप आहे.

अवद्यात्--हें ' अवद्य ' शब्दाचें पंचमीचें ए. व. आहे.

अवक्रमु:--अवपूर्वक क्रम् धातूचें लिटाचें रूप आहे. वेदातील रूप असल्यानें ' छन्दसि वा वचनम् ' याप्रमाणें द्विर्वचन झालें नाहीं. कांहीं ' अवचक्रमु: ' असाच पाठ घेतात पण वेदामध्यें तो आढळून येत नाहीं. ऋग्वेदांत ' अवक्रमु: ' असाच पाठ आहे.

अव्रत--हें रूप वृङ् किंवा वृञ् धातूचें लुङाचें आहे. येथें ' मन्त्रे घस० ' २।४।८० यानें च्लिचा लुक् झाला. ' आत्मनेपदेषु० ' यानें ' झ ' ला अत् आदेश होतो.

अवन्तु--अव् धातूच्या लोटाचें प्र. पु. ब. व.

अयम्--इदम् शब्दाचें पुंल्लिंगी प्र. ए. व.

अवस्यव:--अव् धातूहून औणादिक असुन् होऊन ' अवस् ' झाल्यावर त्याहून क्यच् होऊन ' अवस्य ' होतें. ' क्याच्छन्दसि ' ।३।२।१७० यानें उ होतो. अवस्यव: प्र. ब. व.

(३५२०) यजुष्युर: ।६।१।११७

उर:शब्द एङन्तोऽति प्रकृत्या यजुषि । उरो अन्तरिक्षम् । (तु. तैसं. १।३।८।१) **यजुषि पादाभावादनन्त:पादार्थं वचनम् ।**

यजुर्वेदांत जेव्हां उरस् शब्द एङवर्णान्त होतो तेव्हां त्याला ऱ्हस्व अकार पुढें असता प्रकृतिभाव होतो. उदा० ' उरो अन्तरिक्षम् '; वस्तुत:

' प्रकृत्याऽन्तःपादम्० ' ।६।१।१५ यानें सिद्ध होतेच. परंतु यजुर्वेदांत पाद नसल्यानें सूत्र करावे लागले.

(३५२१) आपो जुषाणो वृष्णो वर्षिष्ठेऽम्बेऽम्बालेऽम्बिकेपूर्वे ।६।१।११८

यजुषि अति प्रकृत्या। आपो अस्मान् मातरः। (वासं. ४।२) **जुषाणो अप्तुराज्यस्य ।** (वासं.५।३५) **वृष्णो अंशुभ्याम् ।** (वासं. ७।१) **वर्षिष्ठे अधि नाके ।** (तैसं.१।५।५।४) **अम्बे अम्बाले अम्बिके।** (वासं. २३।१८) **अस्मादेव वचनात् ' अम्बार्थ ' इति ह्रस्वो न ।**

आपो, जुषाणो, वृष्णो, वर्षिष्ठे यांतील एङ् वर्णाला ह्रस्व अकार पुढें असता प्रकृतिभाव होतो. त्याप्रमाणें अम्बिके शब्द पुढें असतां अम्बे व अम्बाले यांतील एङ् वर्णाला प्रकृतिभाव होतो.

उदा० ' आपो अस्मान् मातरः '; ' जुषाणो अप्तुराज्यस्य ' (यजु. ५।३५), ' वृष्णो अंशुभ्याम् ' (यजु. ७।१), ' वर्षिष्ठे अधि नाके ' (तै. सं. १।५।५।४), अम्बे, अम्बाले, अम्बिके (वाज. २३।१८) त्यांचा एकारान्तच उच्चार केला असल्यानें एकाराला ' अम्बार्थनद्योर्ह्रस्वः ' ७।३। १०७ यानें ह्रस्व होत नाहीं.

टीप—' अम्बिकेपूर्वे '—' अम्बिके शब्दात् पूर्वौ ' असा पंचमी-समास याच निपातनानें होतो. सूत्रांतील ' आपो ' हें जस् प्रत्ययान्त, ' जुषाणो ' हे सुप्रत्ययान्त (प्र. ए. व.), ' वृष्णो ' हे शस् प्रत्ययान्त, ' वर्षिष्ठें ' हें ङ्यन्त रूप आहे. इतर तीन रूपें संबुद्ध्यन्त आहेत. येथें हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं हीं विभक्त्यन्त पृथक्पदें अनुकरणात्मक आहेत. ' एतानि पृथक्पदान्यनुकरणानि । विभक्तिस्तु अनुकार्यानुकारणयोर्भेदस्या-विवक्षितत्वात् न भवति । ' सुपां सुलुक् ' इति विभक्तेर्लुग्वा । (सुबोधिनी)

(३५२२) अङ्ग इत्यादौ च ।६।१।११९

अङ्गशब्दे य एङ् तदादौ च अकारे य एङ्पूर्वः सोऽति प्रकृत्या यजुषि । प्राणो अङ्गे अङ्गे अदीव्यत् । (वासं.६।२०)

यजुर्वेदांत जेव्हां ' अङ्गे 'शब्दापुढें दुसरा 'अङ्गे शब्द' येतो तेव्हां त्यापुढें ऱ्हस्व अकार आला असता पुढच्या ' अङ्गे ' शब्दांतील ऱ्हस्व अकाराला व पहिल्यांतील एङ् वर्णाला प्रकृतिभाव होतो,

उदा० ' ऐन्द्रः प्राणो अङ्गे अङ्गे अदीव्यत् '।

सूत्रांतील ' इति ' व ' च ' या दोन शब्दांमुळें काय साधतें तें ' सुबोधिनींत ' दिले आहे.

टीप––सूत्रांत ' इति ' म्हटल्यानें––' तस्याङ्गशब्दस्य आदिस्त–दादिस्तद्रूपो यः अकारस्तस्मिन्परे पूर्वो य एङ् स इत्यर्थः ' असा अर्थ होतो. सूत्रांत चकार नसता तर काय अर्थ झाला असता ? ' असति चकारे अङ्ग–शब्दस्यैवैङ् तदादावति परतः प्रकृत्या भवतीत्यर्थः स्यात्ततश्चाङ्गे अङ्गे इत्यत्रैव स्यात् । अङ्गे अदीव्यत् इत्यत्र न स्यात् '। आता चकारामुळें काय होते ? ' सति तु तस्मिन् अङ्गशब्दस्य य एङ यत्र कुत्रचिदति प्रकृत्या भवति तदादौ चाति परतो यः कश्चिदेङ स प्रकृत्या भवतीत्ययमर्थो भवति । तेन ' अङ्गे अङ्गे अदीव्यत् । प्राणो अङ्गे इत्युभयत्रापि भवति '।

(३५२३) अनुदात्ते च कुधपरे ।६।१।१२०

कवर्गधकारपरे अनुदात्तेऽति परे एङ् प्रकृत्या यजुषि । अयं सो अग्निः । (वासं. १२।४७) **अयं सो अध्वरः ।** (तु. वासं.६।२३) **अनुदात्ते किम् । अधोऽग्रे रुद्रे । अग्र शब्द आद्युदात्तः । कुधपरे किम् । सोऽयमग्निमतः ।**

यजुर्वेदामध्यें अनुदात्त अकारापुढें कवर्गातील वर्ण किंवा धकार आल्यास त्यामागील एङ् वर्णाला प्रकृतिभाव होतो व अकारहि तसाच राहतो. उदा० ' अयं सो अग्निः ' (यजु. १२।४७), ' अयं सो अध्वरः '; अग्नि शब्द निप्रत्ययान्त असल्यानें अन्तोदात्त आहे म्हणून अकार अनुदात्त आहे व त्यापुढील गकार कवर्गातील आहे म्हणून ' सो ' यांतील एङ्वर्ण जो ओकार त्याला प्रकृतिभाव होतो. अध्वर शब्द प्रतिपादिकस्वरानें अन्तोदात्तच आहे म्हणून आदि अकार अनुदात्त आहे. (पहा—' अनुदात्तं पदमेकवर्जम् ' ।६।१।१५८) व त्यापुढें धकार आहे. म्हणून मागील एङ वर्णाला प्रकृतिभाव होतो.

' अनुदात्ते ' म्हटल्यानें ' अधोऽग्रे रुद्रे '--यांत अग्र शब्द आद्युदात्त असल्यानें संधि होतो. हा आद्युदात्त ' ऋज्रेन्द्राग्रे० ' (उणादि १८६) इत्यादि निपातनानें होतो. ' कुधपरे ' म्हटल्यानें ' सोऽयमग्निमतः ' येथें अकारापुढें कवर्गातील वर्ण किंवा धकार नसून यकार आहे म्हणून प्रकृतिभाव होत नाहीं.

टीप---' कुधौ परौ यस्मात् सः कुधपरः '; धकार यांतील अकार उच्चारणार्थ आहे.

(३५२४) अवपथासि च ।६।१।१२१

अनुदात्ते अकारादौ अवपथाः शब्दे यजुषि एङ् प्रकृत्या । त्री रुद्रेभ्यो अवपथाः । (काठसं. ३०।६) **वपेस्थासि लङि ' तिङ्ङतिङः ' इत्यनुदात्तत्वम् । अनुदात्ते किम् । यद्रुद्रेभ्योऽवपथाः ।** (तु. ऋ. ९।९६।१२) **' निपातैर्यद्यदि ' इति निधातो न ।**

यजुर्वेदामध्यें ' अवपथास् ' यांतील अनुदात्त अकार पुढें असता मागील एङ वर्णाला प्रकृतिभाव होतो. उदा० ' त्री रुद्रेभ्यो अवपथाः

यांतील अकार ' तिङ्ङतिङः ' ।८।१।२८ यानें अनुदात्त आहे. ' अवपथाः ' हें रूप वप् धातूचे आत्मनेपदी लङाचें थास् प्रत्यय पुढें असता म. पु. ए. व. आहे. ' अनुदात्ते ' म्हटल्यानें ' यद्रुद्रेभ्योऽवपथाः ' येथे प्रकृतिभाव होत नाहीं. कारण येथें ' अवपथाः ' यातील अकार ' निपातैर्यद्यदि० ' ।८।१।३० यानें अनुदात्त होंत नाहीं. निघात म्हणजे अनुदात्त.

(३५२५) आङोऽनुनासिकश्छन्दसि ६।१।१२६

आङोऽचि परेऽनुनासिकः स्यात् स च प्रकृत्या । अभ्र आँ अपः । (ऋ.५।४८।१) गभीर आँ उग्रपुत्रे । (ऋ.८।६७।११) (वा.) ईषाअक्षादीनां छन्दसि प्रकृतिभावो वक्तव्यः । ईषाअक्षो हिरण्ययः । (ऋ. ८।५।२९)) ज्या इयम् । (ऋ.६।७।५३) पूषा आविष्टु । (ऋ.।१० २६।१)

आङ् या उपसर्गाला अच् पुढें असता अनुनासिक होतो व त्याला प्रकृतिभाव होतो.

उदा० ' अभ्र आँ अपः ', ' गभीर आँ उग्रपुत्रे '; (वा.) ' वेदामध्ये ' ईषाअक्षः ' इत्यादि प्रयोग संधि न होता तेथें प्रकृतिभाव होतो असें म्हणावे. 'उदा० ' ईषाअक्षो हिरण्ययः ', ' ज्या इयम् ', ' पूषा अविष्टु ';

टीप--' अभ्र आँ अपः ' येथें आङ् सप्तम्यर्थद्योतक असल्यानें ईषदादि चार अर्थी नाहीं तथापि ' वाक्यस्मरणयोरङित् ' असें म्हटल्यानें अन्यत्र आङ असा ङित् घ्यावयाचा असें भाष्यांत म्हटलें आहे.

(३५२६) स्यश्छन्दसि बहुलम् ।६।१।१३३

स्य इत्यस्य सोर्लोपः स्याद्धलि । एष स्य भानुः । (ऋ. ४।४५।१)

वेदामध्यें ' स्य ' यापुढील प्र. ए. व. सु प्रत्ययाचा हल् पुढें असतां लोप बहुलेंकरून होतो. उदा. ' एष स्य भानुः ' किंवा ' एष स्य ते मधु माँ

इन्द्रसोमः ' (ऋग्वेद ।९।८७।४); ' एषः सः भानुः ' इत्यर्थः (शेखर) 'स्यः' हें त्यद्शब्दाचें प्रथमाविभक्त्यन्ताचे अनुकरण आहे व 'सुपां सुलुक्०' यानें लुप्तषष्ठीक आहे.

(३५२७) ह्रस्वाच्चन्द्रोत्तरपदे मन्त्रे ।६।१।१५१

ह्रस्वात्परस्य चन्द्रशब्दस्योत्तरपदस्य सुडागमः स्यान्मन्त्रे । हरिश्चन्द्रो मरुद्गणः। (ऋ. ९६६।२६) **सुश्चन्द्र दस्म ।** (ऋ.५।६।५)

मंत्रामध्यें ह्रस्व स्वरापुढें ' चन्द्र ' शब्द उत्तरपद असता त्याला–चंद्र शब्दाला--सुट् आगम होतो.

उदा० ' हरिश्चन्द्रो मरुद्गणः '; ' सुश्चन्द्र दस्म ';

टीप--' सुट् ' कोणाला होतो ? ' उभयनिर्देशे पञ्चमीनिर्देशो बलीयान् ' या परिभाषेप्रमाणें तो ' चन्द्र ' शब्दाला होतो. आगम टित् असल्यानें तो ' आद्यन्तौ टकितौ ' प्रमाणें आदीला होतो. 'सुट् कात्पूर्वः' यांतून ' सुट् ' याची अनुवृत्ति येते. हरि सु व या ह्रस्व स्वरान्तापुढें ' चन्द्र ' शब्द असल्यानें त्याला सुट् (सकार) होतो व संधीनें नंतर त्याला शकार होतो.

(३५२८) पितरामातरा च छन्दसि ।६।३।३३

द्वन्द्वे निपातः । आ मा गन्तां पितरामातरा च । (वासं ९।१९) **चाद्विपरीतमपि । न मातरापितरा नू चिदिष्टौ ।** (ऋ. ४।६।७) **' समानस्य छन्दस्यमूर्धप्रभृत्युदर्केषु ' समानस्य सः स्यान्मूर्धादिभिन्ने उत्तरपदे । सगर्भ्यः ।** (वासं. ४।२०) **(वा.) छन्दसि स्त्रियां बहुलम् । विष्वग्देवयोरद्र्यादेशः । विश्वाची च घृताची च ।** (वासं. १५।१८) **देवद्रीचीं नयत देवयन्तः** (ऋ. ३।६।१) **कद्रीची ।** (ऋ. १।१६४।१७)

वेदामध्यें ' पितरामातरा ' असा पितृ व मातृ शब्दांच्या द्वंद्वाचा

निपात होतो. उदा० 'आ मा गन्तां पितरामातरा च'; निपातनानें पितृ शब्दाला 'अराङ' (आ) आदेश होतो. उत्तरपदाला 'सुपां सुलुक्०' ।७।१।३९ यानें विभक्तिप्रत्ययाच्या स्थानीं आकार आदेश होतो. नंतर 'ऋतो ङि सर्वनामस्थनयो:' ।७।३।११० याने गुण होतो. सूत्रांतील चकारानें विपरीतहि समास होतो. म्हणजे शब्दांची आलटापालट होते. उदा० 'न मातरापितरा नू चिदिष्टौ'

'समानस्य छन्दस्यमूर्धप्रभृत्युदर्केषु', ।६।३।८४

वेदामध्यें समान शब्दाला मूर्धन्, प्रभृति, उदर्क हीं उत्तरपदें वर्ज्य करून स असा आदेश होतो. हें सूत्र (१११२) पूर्वी येऊन गेलेच आहे. उदा० सगर्भ्य: --येथें 'सगर्भसयूथसनुताद्यत्' ।४।४।११४ यानें यत् प्रत्यय होतो. समान: गर्भ:---सगर्भ: तत्र भव: सगर्भ्य:; 'अमूर्ध' वगैरे म्हटल्यानें 'समानमूर्धा' येथें स आदेश होत नाहीं. त्याप्रमाणें 'समानप्रभृतय:' व 'समानोदर्का:' अशीं रूपें होतात. पहा- 'अनु भ्राता सगर्भ्य:'।

(वा.) 'वेदामध्यें स्त्रीलिंगांत विश्व व देव शब्दांतील अन्त्य वर्णाला 'अद्रि' आदेश बहुलेंकरून होतो. उदा० 'विश्वाची च घृताची च' यांत 'विश्वाची' येथें बहुलग्रहणामुळें अद्रि आदेश झाला नाहीं. विश्व आणि देव शब्द हें सर्वनामांचेहि उपलक्षण असल्यानें--म्हणजे सर्वनामाच्या अन्त्याला सुद्धा 'अद्रि' आदेश होतो. उदा० कद्रीची--किम्+अन्च्=कद्रि+अच्, ङीप् होऊन 'कद्रीची' होते. 'देवद्रीचीं नयत देवयन्त:'; पहा-- 'सा कद्रीची कं स्विदर्धं परागात्'।

टीप—विश्वमञ्चति, देवान् अञ्चति या अर्थी अञ्च् धातूहून क्विन् होतो. नलोप होऊन अञ्चु उगित् असल्यानें 'उगितश्च' याने स्त्रीलिंगी ङीप् होतो. 'अच:' यानें अकार लोप होऊन 'चौ' यानें दीर्घ होतो. कुत्सितमञ्चति इति 'कद्रीची'; येथें किम् या सर्वनामाच्या टि-भागाला अद्रि आदेश होतो. नंतर पूर्ववत् ङीप्, अकारलोप व दीर्घ होतात.

(३५२९) सधमादस्थयोश्छन्दसि ।६।३।९६

सहस्य सधादेशः स्यात् । इन्द्र त्वास्मिन्त्सधमादे । (ऋ. ८।२।३) **सोमः सधस्थम् ।** (ऋ. ३।६२।१५)

वेदामध्यें माद व स्थ हीं उत्तरपदें असता सह शब्दाला सध असा आदेश होतो.

' सहस्य सध्रिः ' ।६।३।९५ यांतून ' सह ' शब्दाची अनुवृत्ति येते. सूत्रांतील ' सध ' हा अविभक्तिक निर्देश आहे. उदा० ' इन्द्र त्वास्मिन् सधमादे '; सह माद्यन्ति देवा अस्मिन् इति सहमादो यज्ञः; मद् धातूहून ' हलश्च ' यानें घञ् होऊन ' माद ' रूप होते. सूत्रांतील ' माद ' यांतील अकार उच्चारणार्थ आहे. त्यामुळें ' मादयति ' यांतील मद् याच्या ण्यन्ताहून क्विप् करून ' मात् ' होतें, तो शब्द पुढें असताहि ' सह ' शब्दाला सध असा आदेश होतो. उदा० आ त्वा बृहन्तो हरयो युजाना अर्वागिन्द्र सधमादो-वहन्तु ' (ऋग्वेद ।३।४३।७) ' स्थ ' उत्तरपदाचे उदाहरण; ' सोमः सधस्थम् ' यांत ' सधस्थ ' याचा अर्थ ' सह तिष्ठति ' असा आहे. ' आतोऽनुपसर्गे कः ' यानें स्था धातूहून क होतो.

(३५३०) पथि च छन्दसि ।६।३।१०८

पथि शब्दे उत्तरपदे कोः कवङ्कादेशश्च । कवपथः । कापथः । कुपथः ।

वेदामध्यें पथिन् शब्द उत्तरपद असता कु शब्दाला कवङ् व कादेश विकल्पानें होतात. उदा० कवपथः, कापथः व कुपथः.

टीप —' विभाषा पुरुषे ' ।६।३।१०६ यांतून ' विभाषा ' पदाची अनुवृत्ति येते व सूत्रांतील चकारानें कादेश होतो. कारण ।६।३।१०७ मधून कवङची अनुवृत्ति येते व ' का ' याची ।६।३।१०४ यांतून येते.

(३५३१) साढ्यै साढ्वा साढेति निगमे ।६।३।११३

सहेः क्त्वाप्रत्यये आद्यं द्वयं तृनि तृतीयं निपात्यते । मरु-

द्भिरुग्रः पृतनासु साळ्हा । (ऋ. ७।५६।२३) **अचोर्मध्यस्थस्य डस्य ळः ळ्हश्च प्रातिशाख्ये विहितः । आहहि । "द्वयोश्चास्य स्वरयोर्मध्यमेत्य संपद्यते स डकारो ळकारः । ळ्हकारतामेति स एव चास्य ढकारः सन्नूष्मणा संप्रयुक्त" इति ।** (ऋक् प्रातिशाख्य १।२१-२२)

वेदामध्यें साढ्यै, (मै. सं. १।६।३) (पहा—' तत् साढ्यै वावैष आ धीयते ' ।) साढ्वा व साढा या तीन रूपांचे निपातन होते. त्यापैकीं पहिलीं दोन रूपें सह् धातूहून क्त्वा प्रत्यय केला असता होतात व तिसरें तृन् प्रत्ययान्त आहे. सह धातूहून क्त्वा केला असता त्याला निपातनानें ध्यै आदेश होतो. त्यानंतर ढत्व, ष्टुत्व, ढलोप व ' ढूलोपे० ' यानें दीर्घ होऊन ' साढ्यै ' रूप सिद्ध होते. त्याप्रमाणें पूर्ववत् ढत्व वगैरे विधी करून क्त्वा पुढें असता ' साढ्वा ' (मै. सं. ३।८।५) होते. पहा--' सपत्नं साढ्वा तेऽकामयन्त '; तृन् केला असता ' साढा ' होते. तृच् केला असताही ' साढा ' असेंच रूप होते पण तृच् हा चित् प्रत्यय असल्यानें ' चितः ' यानें अन्तोदात्त होईल; तृन् हा नित् असल्यानें ' ञ्नित्यादिर्नित्यम् ' यानें आद्युदात्त होतो. ' भूरि चक्रे० ' या मंत्रांत तो आद्युदात्त असल्याने तृन्चेच ' साढा ' हें रूप घेतलें पाहिजे.

उदा० ' मरुद्भिरुग्रः पृतनासु साळ्हा ';

कारिकेचा अर्थ–प्रातिशाख्य ग्रंथांत असें सांगितले आहे कीं दोन स्वरांमध्यें डकार आला असता त्याच्या स्थानीं ळकार येतो व तसेंच दोन स्वरांमध्यें ढकार आल्यास त्याचा उच्चार ऊष्मवर्णाप्रमाणें म्हणजे ळ्ह् असा होतो. कारिकेतील ' अस्य ' याचा अर्थ ' अस्य आचार्यस्य ' म्हणजे आचार्यांच्या उच्चारांत इत्यादि. ' एत्य '—' स्थित इति शेषः '; ' ऊष्मणा संप्रयुक्तः=ऊष्मयोगे जात इत्यर्थः ' या कारिकेप्रमाणें ' साढा ' याचा उच्चार ' साळ्हा ' असा होतो कारण येथें ढकार दोन स्वरांमध्यें आहे. सूत्रांतील ' इति ' शब्द प्रकारवाचक आहे. त्यामुळें निष्ठाप्रत्यय पुढें असताहि निपातन होते. उदा० जषाळ्हो अग्ने वृषभः ' (ऋ. ३।१५।४)

(३५३२) छन्दसि च ।६।३।१२६

अष्टन आत्वं स्यादुत्तरपदे । अष्टापदी । (ऋ.१।१६४।४१)

वेदामध्यें अष्टन् शब्दाला उत्तरपद पुढें असता आत्व होतें. उदा० अष्टापदी; ' अष्टौ पादौ अस्याः ' असा बहुव्रीहि असून ' संख्यासुपूर्वस्य ' ।५।४।१४० यानें पाद शब्दांतील अकाराचा लोपसमासान्त होतो. ' पादः पत् ' ।६।४।१३० यानें पाद शब्दाला पत् आदेश होऊन ' पादोऽन्यतरस्याम् ' ४।१।८ यानें ङीप् होतो.

(३५३३) मन्त्रे सोमाश्वेन्द्रियविश्वदेव्यस्य मतौ । ६।३।१३१

दीर्घः स्यान्मन्त्रे । अश्वावतीं सोमावतीम् । (ऋ.१०।९७।७) **इन्द्रियावान्मदिन्तमः ।** (वासं.३।२७) **विश्वकर्मणा विश्वदेव्यावता ।** (ऋ. १०।१७०।४)

वेदामध्यें सोम, अश्व, इन्द्रिय व विश्वदेव्य यांना मंत्रामध्यें मतुप् प्रत्यय पुढे असता दीर्घ होतो. उदा० ' अश्वावतीं सोमावतीम्; ' इन्द्रियावान् मदिन्तमः '; ' विश्वकर्मणा विश्वदेव्यावता ';

(३५३४) ओषधेश्च विभक्तावप्रथमायाम् ।६।३।१३२

दीर्घः स्यान्मन्त्रे । यदोषधीभ्यः । (ऋ.७।५०।३) **दधात्योषधीषु ।** (ऋ. ५।८३।१)

मंत्रामध्यें ओषधि शब्दांतील इकाराला प्रथमाविभक्ति सोडून इतर विभक्तिप्रत्यय पुढें असता दीर्घ होतो. उदा० ' यदोषधीभ्यः ' ' दधात्योषधीषु '।

(३५३६) ऋचि तुनुघमक्षुतङ्कुत्रोरुष्याणाम् ।६।३।१३३

दीर्घः स्यात् । आतू न इन्द्र । (ऋ. १।१०।११) **नू मर्तः ।** (ऋ.७।१००।१) **उत वा घा स्यालात ।** (ऋ. १।१०९।२) **मक्षू गोमन्तमीमहे** (ऋ,८।३३।३) **भरता जातवेदसम् ।** (ऋ. १०।१७६।२) **तङिति थादेशस्य ङित्त्वपक्षे ग्रहणम् । तेनेह न ।** (तैसं. १।३।१३।१) **शृणोत ग्रावाणः ।** (मैसं. ४।२।१३) **कूमनाः ।** (ऋ.१।१६३।५) **अत्रा ते भद्रा ।** (ऋ. १।८३।१) **यत्रा नश्चक्रा । उरुष्याणः ।** (ऋ.१०।७।१)

ऋग्वेदांत तु, नु, घ, मक्षु, तङ प्रत्यय, कु, अन्तीं असलेला त्र व उरुष्य यांना दीर्घ होतो.

उदा० तु--' आतू न इन्द्र '; नु—' नू मर्तः '; घ--' उत वा घा स्यालात् '; मक्षु—' मक्षू गोमन्तमीमहे '; तङ--' भरता जातवेदसम् ' यांत ' भरत ' हें भृ धातूच्या लोटाचें म. पु. ब. व. चे रूप आहे. थ प्रत्ययाला ' लोटो लङ्वत् ' या अतिदेशसूत्रानें ' तस्थस्थमिपाम्० ' यानें तादेश होतो. तङ अशा ङित् निर्देशानें ' त ' याने थादेशाचें ग्रहण होत असल्यानें ' शृणोत ग्रावाणः ' यांतील ' शृणोत ' हें रूप लोटाचे म. पु. ब. व आहे व तें ' तप्तनप्तनथनाश्च ' ।७।१।४५ यानें ' त ' च्या स्थानीं ' तप् ' असा पित् आदेश झाल्यानें तो ङित् नाहीं म्हणून प्रस्तुत सूत्र प्रवृत्त होत नाहीं व दीर्घ होत नाहीं.

कु—कूमना; त्रान्त--' अत्रा ते भद्रा '; 'यत्रा नश्चक्रा'; 'ऊरुष्य-उरुष्याणः ';

टीप--सूत्रांतील घ शब्द वेदामध्यें स्वरूपानें घ्यावयाचा असून घसंज्ञक (तरप् व तमप्) नाहीं. स्यालात्--श्यालात्, श्याल म्हणजे भार्येचा भाऊ. ' स्यालात् ' ही पंचमी आहे. ' उरुष्य ' हें 'उरुष्य' या रक्षणार्थक कण्ड्वादि धातूचें लोटाचें रूप आहे. 'नस्' यांतील नकाराला ' नश्च धातुस्थो रुषुभ्यः ' ।८।४।२७ यानें णत्व होतें.

(३५३६) इकः सुञि ।६।३।१३४

ऋचि दीर्घ इत्येव । अभीषु णः सखीनाम् । (ऋ.४।३१।३) ' सुञः ' इति षः, ' नश्च धातुस्थो रुषुभ्यः ' इति णः ।

मंत्रामध्यें इक् वर्णान्ताला सुञ् (सु) पुढें असता दीर्घ होतो. उदा० अभीषु णः सखीनाम् '; येथें ' सुञः ' ।८।३।१०७ यानें सकाराला षत्व होते व ' नश्च धातुस्थो रुषुभ्यः ' ।८।४।२७ यानें नकाराला णत्व होतें.

(३५३७) द्व्यचोऽतस्तिङः ।६।३।१३५

मन्त्रे दीर्घः । विद्मा हि । (ऋ. १०।४७।१०) चक्रा जरसम् ॥ (ऋ. १।१८९।९)

ऋग्वेदामध्यें तिङन्तरूप द्व्यच्क असल्यास तिङ प्रत्ययातील अकाराला दीर्घ होतो. उदा० ' विद्मा हि । चक्रा जरसम् ' यांतील ' विद्म ' हें ' विद ज्ञाने ' याचें लटाचे रूप आहे. ' विदो लटो वा ' यानें मस्च्या स्थानीं म आदेश होतो. ' विद्म ' हें तिङ प्रत्ययान्त रूप द्व्यच्क असल्यानें मकारांतील अकाराला दीर्घ झाला. तसें ' चक्र ' हें वेदामध्यें कृ धातूच्या लिटाचें म. पु. ब. ब. आहे. ' द्व्यचः ' म्हटल्यानें ' देवा भवत वाजिनः ' यांतील ' भवत ' हें त्र्यच्क तिङन्तरूप असल्यानें तकारांतील अकाराला दीर्घ होत नाही.

(३५३८) निपातस्य च ।६।३।१३६

एवा हि ते । (ऋ.१।८।९)

वेदामध्यें निपातसंज्ञक शब्दाच्या अन्त्य स्वराला दीर्घ होतो. उदा० एवा हि ते; ' एव ' शब्दाचा चादिगणांत पाठ असल्यानें ' चादयोऽसत्त्वे ' यानें त्याला निपात संज्ञा होते. म्हणून अकारला दीर्घ झाला.

(३५३९) अन्येषामपि दृश्यते ।६।३।१३७

अन्येषामपि पूर्वपदस्थानां दीर्घः स्यात् । पूरुषः । (ऋ. १०।९०।३) दण्डादण्डि ।

वेदामध्यें इतर शब्दांतील स्वरानाही दीर्घ झालेला आढळतो. उदा० 'पूरुषः', यांतील 'पुरुष' यांतील पुकारांतील उकाराला दीर्घ झाला आहे. पहा--'अतो ज्यायांश्च पूरुषः'; तसेंच 'दण्डादण्डि' यांतील पूर्वपद जें 'दण्ड' त्याच्या अन्त्य स्वराला दीर्घ झाला आहे.

(३५४०) छन्दस्युभयथा ।६।४।५

नामि दीर्घो वा । धाता धातॄणाम् । (ऋ.१०।१२८।७) **इति बह्वृचाः । तैत्तिरीयास्तु ह्रस्वमेव पठन्ति ।**

वेदामध्यें नाम् प्रत्यय पुढें असता मागील अङ्गांतील अंत्य स्वराला विकल्पानें दीर्घ होतो.

या सूत्रांत 'नामि' सूत्रांतून 'नामि' पदाची अनुवृत्ति येते व 'ढ्लोपे०' यातून 'दीर्घ' शब्दाची येते. उदा० 'धाता धातॄणाम्' येथें 'धातॄणाम्' या रूपांत दीर्घ झाला आहे. ऋग्वेदीय दीर्घ उच्चार करतात तर तैत्तिरीय तोच उच्चार ऱ्हस्व करतात. उदा० 'धाता धातृणाम्'; (तैसं.४।७।१४।३)

वृत्तिकारानें 'न तिसृचतसृ' ।६।४।४ यातून 'तिसृचतसृ' याची अनुवृत्ति आणली आहे ती अयुक्त आहे असे शेखरकार म्हणतो.

(३५४१) वा षपूर्वस्य निगमे ।६।४।९

षपूर्वस्याच उपधाया वा दीर्घोऽसम्बुद्धौ सर्वनामस्थाने परे । ऋभुक्षाणम् । ऋभुक्षणम् । (ऋ. १।१११।४) **निगमे किम् । तक्षा । तक्षाणौ ।**

निगमांत नकारान्त शब्दातील उपधेच्या अकाराला तत्पूर्वी षकार असल्यास सर्वनामस्थानसंज्ञक प्रत्यय पुढें असता विकल्पानें दीर्घ होतो. उदा० ऋभुक्षाणम् किंवा ऋभुक्षणम्; ऋभुक्षिन् शब्द उणादिपठित आहे. 'इतोऽत्सर्वनामस्थाने' यानें इकाराला अकार होतो. 'ऋभुक्षाणम्' हें

ऋभुक्षिन् याचें द्वितीयेचें ए. व. आहे. ' निगमे ' म्हटल्यानें भाषेंत ' तक्षन् ' शब्दाची तक्षा, तक्षाणौ अशी दीर्घ झालेली एकेकच रूपें होतात.

(३५४२) जनिता मन्त्रे ।६।४।५३

इडादौ तृचि णिलोपो निपात्यते । यो नः पिता जनिता । (ऋ.१०।८२।२)

मंत्रामध्यें इडागम झालेला तृच् प्रत्यय पुढें असता जन् धातूहून झालेल्या णिच् प्रत्ययाचा लोप होऊन ' जनिता ' असें रूप निपातित होतें. उदा० ' जनिता '; याचा अर्थ ' जनयिता ' असा होतो. उदा० ' यो नः पिता जनिता '; भाषेंत मात्र ' जनयिता ' होतें. ' णेरनिटि ' ।६।४।५१ याला हा अपवाद आहे.

(३५४३) शमिता यज्ञे ।६।४।५४

शमयितेत्यर्थः ।

शम् धातूचे यज्ञक्रियेंत यज्ञविषयक प्रयोगात- ' शमिता ' (मैसं. ३।१०।२) असें पूर्ववत् निपातन होतें. त्याचा अर्थ ' शमयिता ' असा होतो. ' यज्ञे ' म्हटल्यानें ' शृतं हविः शमयितः ' (शतपथ ब्राह्मण, ३।८।३।४ व ५) हें तृच् प्रत्ययान्त रूप आहे.

(३५४४) युप्लुवोर्दीर्घश्छन्दसि ।६।४।५८

ल्यपीत्यनुवर्तते । वियूय । (ऋ. १०।१३१।२) विप्लूय । ' आडजादीनाम् ' ।

वेदामध्यें ल्यप् प्रत्यय पुढें असता यु व प्लु यांच्या उकाराला दीर्घ होतो. ' ल्यपि लघुपूर्वात् ' ।८।४।५६ यांतून ' ल्यपि ' पदाची अनुवृत्ति येते. उदा० वियूय, विप्लूय; उदा० ' दान्त्यनुपूर्वं वियूय '; ' यत्राथो दक्षिणा परिप्लूय '; ' आडजादीनाम् ' । या सूत्रानें अजादि धातूना लङ्, लुङ् व लृङ् पुढें असता आट् आगम सांगितला. पण वेदामध्ये--

(३५४५) छन्दस्यपि दृश्यते ।६।४।७३

अनजादीनामित्यर्थः । आनट् । (ऋ. १।७१।८) **आवः ।** (ऋ. १।३३।१४) **' न माङ्योगे '** ।

वेदामध्यें धातू अजादि नसून व्यंजनादि असल्यासहि आट् आगम झालेला आढळतो. उदा० आनट्--हें नश् धातूच्या लुङाचे रूप आहे. ' मन्त्रे घस० ' ।२।४।८० यानें च्लिचा लुक् होतो. ' नशेर्वा ' ।८।३।६३ हें सूत्र विकल्पानें लागू होत असल्यानें त्याच्या अभावीं ' व्रश्च० ' ।८।२।३६ यानें शकाराला षत्व होऊन जश्त्वानें डकार व नंतर, चर्त्वानें टकार होतो. ।८।२।६३ यानें मात्र कुत्व होऊन 'आनक् ' रूप होते. षत्वानें ' आनट् ' होते. पहा--' आ यदिषे नृपतिं तेज आनट् ' । ' आवः कुत्समिन्द्र ' ।

' आवः '--हें वृ धातूच्या लुङाचें आहे. ।२।४।८० यानें च्लिचा लुक् होतो. ' न माङयोगे ' ।६।४।७४ यानें माङ याचा योग असता धातूला अट् किंवा आट् आगम होत नाहीं असें सांगितले पण--

(३५४६) बहुलं छन्दस्यमाङयोगेऽपि ।६।४।७५

अडाटौ न स्तः । माङ्योगेऽपि स्तः । जनिष्ठा उग्रः । सहसे तुराय । (ऋ. १०।७३।१) **मा वः क्षेत्रे परबीजान्यवाप्सुः** (आपधसू २।१३।६)

वेदामध्यें ' माङ ' याचा योग असो वा नसो अट् आणि आट् आगम बहुलेंकरून होत नाहींत व माङचा योग असता होतातहि. उदा० ' जनिष्ठा उग्रः सहसे तुराय ' येथें अडागम न झाल्यानें ' जनिष्ठाः ' असे रूप झाले. हें रूप जन् धातूच्या लुङाचें थास् प्रत्यय पुढें असतांना होते. ' मा वः क्षेत्रे परबीजान्यवाप्सुः '--यामध्यें माङचा योग असतानाहि ' अवाप्सुः '--येथें अडागम होतो. ' अवाप्सुः ' हें वप् धातूचे कर्मणि लुङाचें रूप आहे. व्यत्ययानें परस्मैपद होते. सुबोधिनीकार म्हणतो, काशिकेच्या अनुरोधानें वर ' अवाप्सुः ' असे म्हटलें पण अध्ययनांत मात्र ' वाप्सुः ' असेंच म्हटलें जातें.

(३५४७) इरयो रे ।६।४।७६

प्रथमं दध्र आपः । (ऋ. १०।८२।५) **रेभावस्याभीयत्वेनासिद्धत्वादालोपः । अत्र रेशब्दस्येटि कृते पुनरपि रेभावस्तदर्थं च सूत्रे द्विवचनान्तं निर्दिष्टमिरयोरिति ।**

वेदामध्यें ' इरे ' याला ' रे ' आदेश बहुलेंकरून होतो. उदा० ' प्रथमं (गर्भम्) *दध्रे आपः'; मूळ रूप ' धाञ् ' च्या लिटाचें ' दधिरे ' असून त्यातील ' इरे ' याला रेभाव होतो. हा रेभाव आभीय असल्यानें ' असिद्धवदत्राभात् ' ।६।४।२२ यानें असिद्ध आहे म्हणून ' आतो लोप इटि च ' ।६।४।६४ यानें आकाराचा लोप अजादि प्रत्यय पुढें आहे असें समजून होतो

* ' गर्भम् ' इति क्वचिदस्ति ।

एक शंका–रेभाव झाल्यानंतर पुनः त्याला क्रादिनियमाप्रमाणें इडागम होऊन 'इरे' का होत नाहीं? त्यासाठींच तर सूत्रांत 'इरयोः' म्हटलें आहे. व तसा निर्देश असल्याने ' लक्षणप्रतिपदोक्त ' परिभाषा येथें प्रवृत्त होत नाहीं. दुसऱ्यानें इडागम झाल्यानंतर जे 'इरे' शब्दरूप होतें तें लाक्षणिक असल्यानें त्याला वरील परिभाषेंप्रमाणें रेभाव व्हावयास नको होता. म्हणूनच वर सूत्रांत ' इरयोः ' म्हटलें व त्यामुळें वरील परिभाषा प्रवृत्त न होता पुनः रेभाव होतो हा इत्यर्थ आहे.

(३५४८) छन्दस्युभयथा ।६।४।८६

भूसुधियोर्यण् स्यादियङुवङौ च । वनेषु चित्रं विभ्वम् (ऋ.४।७।१) **विभुवं वा ।** (तैसं १।५।१।१) **सुध्यो नव्यमग्ने ।** (ऋ. ६।१।७) **सुधियो वा ।** (तैब्रा. ३।६।१०।३) **(वा.) ' तन्वादीनां छन्दसि बहुलम् ' । तन्वं पुषेम ।** (ऋ.१०।१२८।१) **तनुवं वा ।** (तै सं.४।७।१४।१) **त्र्यम्बकम्** (ऋ. ७।५९।१२) **त्रियम्बकम् ।**

वेदामध्यें भू व सुधी यांच्या अंत्य वर्णाला यण् आदेश होतो. त्याप्रमाणें अनुक्रमें इयङ व उवङ आदेशही होतात. उदा० ' वनेषु चित्रं विभ्व

विशे ' यांतील ' विभ्वम् ' येथें यण् झाला आहे. ' विभुवम् ' असे उवङ होऊनहि रूप होते. ' सुध्यो नव्यमग्नें '--'सुधियो नव्यमग्ने '; येथें अनुक्रमें यण् व इयङ झाले आहेत. (वा.) ' वेदामध्यें तनु वगैरे शब्दाना बहुलेंकरून उवङ व यण् व शब्द ईकारान्त असल्यास इयङ व यण् आदेश होतात. ' हा नियम धातु नसलेल्या रूपानाहि लागतो. उदा० ' तन्वं पुषेम ' किंवा ' तनुवम् '; त्र्यम्बकम् –' त्र्यम्बकं यजामहे ' किंवा त्रियम्बकम्; ' अधातुत्वादप्राप्ते उवङ विधीयते ' (सुबोधिनी) ' त्रीणि अम्बकानि यस्यासौ त्र्यम्बक: रुद्र: '। धातु नसल्यानें उवङची प्राप्ति नव्हती म्हणून त्याचें विधान केलें.

(३५४९) तनिपत्योश्छन्दसि ।६।४।९९

एतयोरुपधालोप: ङ्किति प्रत्यये । वितत्निरे कवय: । (ऋ. १। १६४।५) **शकुना इव पप्तिम ।** (ऋ.९।१०७।२०) **भाषायां वितेनिरे । पेतिम ।**

तन् व पत् यांतील उपधा अकाराचा अजादि कित् किंवा ङित् प्रत्यय पुढें असता लोप होतो. उदा० ' वितत्निरे कवय: ' यांतील ' वितत्निरे ' हें रूप 'तनु विस्तारे' याच्या लिटाचें प्र. पु. ब. व. आहे. प्रस्तुत सूत्रानें उपधा अकाराचा झालेला लोप असिद्ध असून सुद्धा ' अत एकहल्मध्ये० ' ।६। ४।१२० इत्यादि सूत्राने एत्वाभ्यासलोप विधानसामर्थ्यास्तव होत नाहींत. ' शकुना इव पप्तिम '; ' पप्तिम ' हे पत् धातूच्या लिटाचें मस् प्रत्यय पुढें असतानाचें रूप आहे. मस् याला म होऊन इडागम होतो. भाषेंत 'वितेनिरे' व ' पेतिम ' रूपें होतात.

(३५५०) घसिभसोर्हलि च ।६।४।१००

सग्धिश्चमे । (वासं १८।९) **बब्धां ते हरी धाना: ।** (निरुक्त ५।१२) **'हुझल्भ्यो हेर्धि: ।'**

वेदामध्यें घस् आणि भस् या धातूंच्या उपधा अकाराचा अजादि कित् किंवा ङित् प्रत्यय पुढें असतां लोप होतो. उदा० ' सग्धिश्च मे '।

' सपीतिश्च मे '। (रुद्राध्याय) यांतील ' सग्धिः ' हें रूप अद् धातूहून क्तिन् केला असता ' बहुलं छन्दसि ' २।४।३९ याने घस्लादेश, प्रस्तुत सूत्रानें उपधालोप केल्यावर ' झलो झलि ' ।८।२।२६ यानें सकार-लोप, तकाराला धत्व, घकाराला जश्त्व केल्यावर ' सग्धिः ' (समाना ग्धिः) रूप होतें. ' समानस्य छन्दस्यमूर्ध० ' ।६।३।८४ इत्यादि सूत्रानें ' समान ' शब्दाला सभाव होतो. 'बब्धां ते हरी धाना:'; यांतील 'बब्धाम् ' हें रूप भस् धातूच्या लोटाचें ताम् पुढें असता होतें. प्रस्तुत सूत्रानें सांगितलेला उपधा-लोप पर व नित्य असला तरी बाहुलकात् ' श्लौ ' यानें प्रथम द्वित्व होऊन नंतर उपधालोप होतो. नंतर पूर्ववत् सलोप, धत्व व जश्त्व होऊन रूप सिद्ध होतें.

' हुझल्भ्यो हेर्धिः ' ।६।४।१०१ यानें हु धातु व झल्वर्णान्त धातू यापुढील ' हि ' प्रत्ययाला धि आदेश सांगितला आहे, पण वेदामध्यें--

(३५५१) श्रुशृणुपॄकृवृभ्यश्छन्दसि ।६।४।१०२

श्रुधी हवम् । (ऋ. १।२।१) **शृणुधी गिरः** । (ऋ. ८।८४।३) **रायस्पूर्धि** । (ऋ. १।३६।१२) **उरु णस्कृधि** (तु. १०।१४७।५) **अपा वृधि** । (ऋ.१।७।६)

वेदामध्यें श्रु, शृणु, पॄ, कृ आणि वृ यांपुढील ' हि ' प्रत्ययाला धि आदेश होतो. उदा० ' श्रुधी हवम् ', ' शृणुधी गिरः ', ' रायस्पूर्धि ', ' उरु णस्कृधि ', ' अपा वृधि ';

श्रुधी—' बहुलं छन्दसि ' यानें शपाचा लुक् होतो व ' अन्येषामपि० ' ।६।३।१३७ यानें दीर्घ होतो.

शृणुधी—श्रु धातूला ' श्रुवः शृ च ' याने शृभाव केल्यावर विधान-सामर्थ्यास्तव ' उतश्च प्रत्ययात्० ' ।६।४।१०६ यानें ' हि ' प्रत्ययाचा लुक् होत नाहीं. पूर्ववत् दीर्घ होतो.

पूर्धि—' पॄ पालनें '—शपाचा लुक् होऊन ' उदोष्ठ्यपूर्वस्य ,

।७।१।१०२ याने उत्व होतें तें उर् असें रपर होतें. ' हलि च ' ।८।२।७७ याने दीर्घ होतो.

उरु णस्कृधि-- यांतील ' उरुणस् ' हें रूप नकाराला ' नश्च धातुस्थो रुषुभ्यः ' ।८।४।२७ याने णत्व होतें आणि विसर्जनीयाला ' कः करत०' ।८।३।५० याने सकार होतो.

अपा वृधि-येथेंही पूर्ववत् दीर्घ होतो.

(३५५२) वा छन्दसि ।३।४।८८

हिरपिद्वा ।

वेदामध्यें ' हि ' प्रत्यय विकल्पानें पित् होत नाहीं. त्यामुळें वेदामध्यें ' हि ' प्रत्यय पुढें असता दोन रूपें होतात. उदा० प्री-प्रीणाहि किंवा प्रीणीहि,; प्रत्यय ङित् असल्यास ' ई हल्यघोः '।६।४।११३ याने ईत्व होते. युध् युयुधि किंवा, ङित् नसल्यास उपधेला गुण होतो. युयोधि,; वेदामध्यें ' हि ' ला तो अङित् असल्यास पुढील सूत्रानें धि आदेश होतो.

(३५५३) अङितश्च ।६।४।१०३

हेर्धिः स्यात् । रारन्धि । (ऋ.१।९१।१३) **रमेर्व्यत्ययेन परस्मैपदम् । शपः श्लुरभ्यासदीर्घश्च । अस्मे प्र यन्धि ।** (ऋ.३।३६।१०) **युयोधि जातवेदः ।** (ऋ. ८।११।३) **यमेः शपो लुक् । यौतेः शपः श्लुः ।**

वेदामध्यें ' हि ' प्रत्यय जेव्हां ङित् नसतो तेव्हां त्याला धि आदेश होतो. ' वा छन्दसि ' ।३।४।८८ याने वेदामध्यें ' हि ' आदेश विकल्पानें पित् होत नाहीं आणि जेव्हां तो पित् असतो तेव्हां तो ङित् होत नाहीं, (पहा-- 'सार्वधातुकमपित्' ।१।२।४) उदा० रारन्धि, हें रम् धातूचें रूप आहे. व्यत्ययानें परस्मैपद होतें. शपाला श्लु होऊन द्वित्व होतें व ' तुजादित्वात् ' सूत्र ६।१।७ यानें अभ्यासाला दीर्घ होतो. 'अनुदात्तोपदेश०' ।६४।३७ याने ' हि 'प्रत्यय ङित् नसल्यानें मकाराचा (नकाराचा) लोप होत नाहीं.

'अस्मे प्र यन्धि' यातील 'प्र यन्धि' हें रूप प्रपूर्वक यम् धातूचे आहे. येथें शपाचा लुक् 'बहुलं छन्दसि' याने होतो. 'युयोधि जातवेदः' यांतील 'युयोधि' हें रूप यु (यौति) धातूचें आहे. शपाला श्लु होतो.

टीप---सूत्रांतील 'अङितः' हें पद 'हेः' याचें विशेषण आहे.

(३५५४) मन्त्रेष्वाङ्यादेरात्मनः ।६।४।१४१

आत्मन् शब्दस्याऽऽदेर्लोपः स्यादाङि । त्मना देवेषु । (ऋ.७।७।१)

वेदामध्यें आत्मन् शब्दाच्या आदि आकाराचा तृतीया विभक्ति-प्रत्यय पुढें असता लोप होतो.

'आङ्' ही पूर्व वैयाकरणांची 'टा' याची संज्ञा आहे. उदा० 'त्मना देवेषु';

(३५५५) विभाषर्जोश्छन्दसि ६।४।१६२

ऋजुशब्दस्य ऋतः स्थाने रः स्याद्वा इष्ठेमेयस्सु । त्वं रजिष्ठमनुनेषि । ऋजिष्ठं वा । (ऋ.१।९१।१)

इष्ठ, इमन् व ईयस् हे प्रत्यय पुढें असता वेदामध्यें ऋजु शब्दांतील ऋकाराला विकल्पानें र आदेश होतो. उदा० 'त्वं रजिष्ठमनुनेषि'; 'रजिष्ठः' ऐवजीं विकल्पानें 'ऋजिष्ठः' असेंहि रूप होतें.

(३५५६) ऋत्व्यवास्त्व्यवास्त्वमाध्वीहिरण्ययानि छन्दसि (६।४।१७५)

ऋतौ भवमृत्व्यम् । (ऋ.१०।१८३।२) **वास्तुनि भवं वास्त्व्यम् वास्त्वं च ।** (मैसं २।२।४) **मधुशब्दस्याणि स्त्रियां यणादेशो निपात्यते । माध्वीर्नः सन्त्वोषधीः ।** (ऋ. १।९०।६) **हिरण्यशब्दाद्विहितस्य मयटो मशब्दस्य लोपो निपात्यते । हिरण्ययेन सविता रथेन ।** (ऋ. १।३५।२)

इति षष्ठोऽध्यायः ।

वेदामध्यें ऋत्व्य, वास्त्व्य, वास्त्व, माध्वी आणि हिरण्यय या रूपांचे निपातन होतें.

'**ऋत्व्य**'--हें रूप 'ऋतौ भवम्' या अर्थी ऋतु शब्दाहून यत् प्रत्यय होऊन सिद्ध होतें. 'ओर्गुणः' यानें गुण न होता निपातनानें यण् होतो.

'**वास्त्व्य**'--वास्तु शब्दाहून 'वास्तुनि भवम्' या अर्थी यत् होऊन हें रूप होतें. येथेंहि पूर्ववत् यणादेशाचें निपातन होतें. गुण होत नाहीं.

'**वास्त्व**'--हें रूप वास्तु शब्दाहून 'वास्तुनि भवम्' या अर्थी अण् प्रत्यय होऊन यणादेश होतो.

माध्वी--मधु शब्दाहून वरील अर्थी अण् केल्यावर स्त्रीलिंगी ङीप् होऊन यणादेश होतो. उदा० 'माध्वीर्नः सन्त्वोषधीः';

हिरण्यय--हें रूप 'हिरण्य' शब्दाहून मयट् प्रत्यय करून साधलें आहे. निपातनानें मकाराचा ('म' याचा) लोप होतो. तो असिद्ध असल्यानें 'यस्येति च' यानें अकाराचा लोप होत नाहीं. उदा० 'हिरण्ययेन सविता रथेन'; 'अकृत्सार्व०' इति दीर्घस्तु अङ्गवृत्तपरिभाषया वारणीयः।' (सुबो.)

याप्रमाणें 'वैदिकी प्रक्रिया' प्रकरणांतील सहाव्या अध्यायांतील सूत्रांचा मराठी 'बालबोधीनी' टीकेसह अनुवाद समाप्त झाला.

सप्तमोऽध्यायः ।

शीङो रुट् ।

(३५५७) बहुलं छन्दसि ।७।१।८

रुडागमः स्यात् । 'लोपस्त आत्मनेपदेषु' इति पक्षे तलोपः । धेनवो दुह्रे । (ऋ. १।१३४।६) लोपाभावे घृतं दुह्रते । अदृश्रमस्य । (ऋ. १।५।३) 'अतो भिस ऐस्'।

'शीङो रुट्' ।७।१।६ या सूत्रानें शीङ धातूपुढील आत्मनेपदाच्य बहुवचनी 'अते' प्रत्ययाला रुट् आगम सांगितला आहे. परंतु वेदामध्यें कोणत्याही धातूपुढील सर्व प्रत्ययाना तो बहुलेंकरून होतो. उदा० 'धेनवो दुह्रे'--यांतील 'दुह्रे' हें रूप दुह् धातूहून प्र. पु. ब. व. 'अते' प्रत्ययाला रुडागम होऊन झालें. यांतील तकाराचा लोप 'लोपस्त आत्मनेपदेषु' ।७।१।४१ यानें होतो. लोप होत नाहीं तेव्हां 'घृतं दुह्रते' असें रूप होते. 'अदृश्रमस्य केतवः' यांतील 'अदृश्रम्' हें रूप 'दृशिर् प्रेक्षणे' या दृश् धातूच्या लुङाचे 'इरितो वा' ।३।१।५७ यानें 'अङ व त्याला रुडागम होऊन झालें आहे. येथें व्यत्ययानें प्र. पु.ब.व. च्या स्थानीं उ. पु. ए. व. चा 'मिप्' झाला आहे व त्याला रुडागम होतो. या ठिकाणीं 'ऋदृशोऽङि गुणः' ।७।४।१६ यानें सांगितलेला गुण होत नाहीं. 'अतो भिस ऐस्' ।७।१।९ यानें अदन्त शब्दापुढील भिस् प्रत्ययाला ऐस् आदेश सांगितला आहे पण वेदामध्यें —

(३५५८) बहुलं छन्दसि ।७।१।१०

अग्निर्देवेभिः । (ऋ. ३।१०।४)

वेदामध्यें वरील ऐस् प्रत्यय बहुलेंकरून होतो. उदा० 'अग्निर्देवेभिः'; 'देवो देवेभिरागमत्' (ऋग्वेद ।१।१।४) 'देवैः' ऐवजीं 'देवेभिः' रूप वेदांत होतें.

(३५५९) नेतराच्छन्दसि ।७।१।२६

स्वमोरद्ड् न । वार्त्रघ्नमितरम् । छन्दसि किम् । इतरत्काष्ठम् । 'समासेऽनञ्पूर्वे क्त्वो ल्यप्'।

वेदामध्यें 'इतर' शब्दापुढील सु व अम् प्रत्ययांना अद्ड् आदेश होत नाहीं. उदा० 'वार्त्रघ्नमितरम्'--या वाक्यांत 'इतरत्' रूपाऐवजीं 'इतरम्' होतें. अद्ड् होत नाहीं तेव्हां 'अतोऽम्' ।७।१।२४ यानें अम् होतो. 'छन्दसि' म्हटल्यानें भाषेंत 'इतरत् काष्ठम्' असें रूप होतें. 'अद्ड्-तरादिभ्यः०' ।७।१।२५ यानें अद्ड् प्राप्त होतो.

'समासेऽनञ्पूर्वे क्त्वो ल्यप्' ।७।१।३७ याने नञ्पूर्वक समास नसल्यास त्याहून झालेल्या क्त्वा प्रत्ययाला ल्यप् आदेश सांगितला आहे पण वेदामध्यें—

(३५६०) क्त्वापि छन्दसि ।७।१।३८

यजमानं परिधापयित्वा । (काठसं. ११।१०)

वेदामध्यें अनञ्पूर्व समास असता क्त्वा होतो व 'अपि' शब्दानें ल्यप् ही होतो. उदा० 'यजमानं परिधापयित्वा'--परिपूर्वक धा धातूच्या णिजन्ताहून क्त्वा प्रत्यय केला असता त्याला ल्यप् आदेश होत नाहीं. त्याला फक्त 'क्त्वा' हाच आदेश होतो.

(३५६१) सुपां सुलुक्पूर्वसवर्णाच्छेयाडाड्यायाजालः ।७।१।३९

ऋजवः सन्तु पन्थाः । (ऋ.१०।८५।२३) **पन्थान इति प्राप्ते सुः । परमे व्योमन् ।** (ऋ. १।६२।७) **व्योमनि इति प्राप्ते ङेर्लुक् । धीती ।** (ऋ.५।२५।३) **मती ।** (ऋ.१।८२।२) **सुष्टुती ।** (ऋ.२।३२।४) **धीत्या मत्या सुष्टुत्येति प्राप्ते पूर्वसवर्णदीर्घः । या सुरथा रथीत-**

मोभा देवा दिविस्पृशा ।* (ऋ. १।२२।२) अश्विना । यौ सुरथौ दिविस्पृशावित्यादौ प्राप्ते आ । न ताद् ब्राह्मणम् । न तमिति प्राप्त आत् । या देव विद्म ता त्वा । (ऋ. ६।२१।६) यं तमिति प्राप्ते । न युष्मे वाजबन्धवः । (ऋ. ८।६८।१९) अस्मे इन्द्राबृहस्पती । (ऋ. ४।४९।४) युष्मासु अस्मभ्यमिति प्राप्ते शे । उरुया । (मै. २।७।८) घृष्णुया । (ऋ. १।२३।११) उरुणा घृष्णुनेति प्राप्ते या । नाभा पृथिव्याः । (ऋ. १।१४३।४) नाभाविति प्राप्ते डा । ता अनुष्ठ्योच्च्यावयतात् । (मैसं. ४।१३।४) अनुष्ठानमनुष्ठा, व्यवस्थावदङ्, आङो ड्या । साधुया । (ऋ. १।४६।११) साध्विति प्राप्ते याच् । वसन्ता यजेत । (मैसं.२.१।४) वसन्ते इति प्राप्ते आल् । (वा.) 'इयाडियाजी-काराणामुपसंख्यानम्' । उर्विया । (ऋ.।१।९२।९) दार्विया । उरुणा दारुणेति प्राप्ते इया । सुक्षेत्रिया । (ऋ. १।९७।२) सुक्षेत्रि-णेति प्राप्ते डियाच् । दृतिं न शुष्कं सरसी शयानम् । (ऋ.७।१०३।२) ङेरीकार इत्याहुः । तत्राद्युदात्ते प्राप्ते व्यत्ययेनान्तोदात्तता । वस्तुतस्तु ङीबन्ताद् ङेर्लुक् । ईकारादेशस्य तूदाहरणान्तरं मृग्यम् । (वा.) आङ्याजयारामुपसंख्यानम् । प्र बाहवा सिसृतम् । (ऋ. ७।६२।५) बाहुनेति प्राप्ते आङादेशः । 'घेर्ङिति' इति गुणः । स्वप्नया (शौ. ५।७।८) स्वप्नेनेति प्राप्ने अयाच् । स नः सिन्धुमिव नावया । (ऋ. १।९७।८) नावेति प्राप्ते अयाच्, रित्स्वरः ।

* टीप--'रथीतमा दिविस्पृशा' इत्येव बहुत्र पाठः ।

विभक्तिप्रत्ययांच्या स्थानीं सु, लुक्, पूर्वसवर्णदीर्घ, आ, आत्, शे (ए), या, डा (आ)– हा आदेश पुढें असता मागच्या टि भागाचा लोप, या (ड्या), या (याच्) आणि आल् (आ) असे अकरा आदेश होतात. उदाहरणें--

(१) ' अनृक्षरा ऋजवः सन्तु पन्थाः ' येथें बहुवचनीं जस् प्रत्ययाच्या स्थानीं एकवचनी सु प्रत्यय झाला. ' पन्थाः ' याचा अर्थ ' पन्थानः ' असा होतो. वस्तुतः ' व्ययो बहुलम् ' यानेंच सिद्ध होतें.

(२) ' परमे व्योमन् ' येथें सप्तमीच्या ङि प्रत्ययाचा लुक् होऊन ' व्योमनि ' ऐवजीं ' व्योमन् ' होतें.

(३) धीती, मती, सुष्टुती या शब्दाहून तृतीयेच्या एकवचनाचा प्रत्यय पुढें असता पूर्वसवर्णदीर्घ होऊन प्रमाणतः ईकार होतो. भाषेंत धीत्वा मत्वा व सुष्टुत्या अशी रूपें होतात.

(४) ' या सुरथा रथीतमोभा देवा दिविस्पृशा। अश्विना ता हवामहे '; यौ, सुरथौ, उभौ, दिविस्पृशौ, अश्विनौ अशी रूपें होण्याऐवजी या, सुरथा, उभा, दिविस्पृशा, व अश्विना अशी रूपें वेदामध्यें 'आ' आदेश होऊन होतात.

(५) ' न ताद् ब्राह्मणम् '–' न तम् ' न होता ' आत् ' आदेश होऊन ' न तात् ' होतें. ' आत् ' यांतील तकाराला ' न विभक्तौ तुस्माः ' यानें इत्संज्ञा होत नाहीं. 'या देव विद्म ता त्वा '–' यम् ' व 'तम् ' न होता 'या' व ' ता ' होतें. यद् व तद् शब्दाहून ' अम् ' न झाल्यानें यम् व तम् अशी रूपें होत नाहींत. ' या ' व ' ता ' होतात.

(६) ' न युष्मे वाजबन्धवः '–' युष्मासु ' न होता बहुवचन प्रत्ययाला शे (ए) आदेश होतो व राहिलेल्या वर्णांचा लोप होतो. त्याप्रमाणें ' अस्मे इन्द्राबृहस्पती ' येथें ' अस्मभ्यम् ' न होता पूर्ववत् भ्यम् याला शे आदेश होऊन ' अस्मे ' होते. युष्मे व अस्मे हीं रूपें वेदांत युष्मासु व अस्मभ्यम् याऐवजीं होतात. ' शे '।१।१।१३ यानें प्रगृह्यसंज्ञा झाल्यानें अयादेश होत नाहीं.

(७) उरुया व धृष्णुया अशी वेदांत रूपें होतात. उरुणा व धृष्णुना अशीं प्राप्त झालीं होतीं. तृतीया एकवचनाला 'या' आदेश होतो.

(८) ' नाभा पृथिव्याः '–' नाभौ ' न होता ' नाभा ' होतें. डा (आ) आदेश झाल्यानें ' डित्त्वामुळें टिलोप होतो.

(९) 'ता अनुष्ठयोच्च्यावयतात्'--'अनुष्ठया' न होता 'अनुष्ठ्या' असें ड्या (या) आदेश होऊन टिलोप होऊन रूप सिद्ध होतें. वरील वाक्याचा अर्थ 'अनुष्ठानेन भवान् विशसनं करोतु--पृथक् करोतु भवान्' असा आहे. 'अनुष्ठा' रूप 'आतश्चोपसर्गे' ।३।३।१०६ यानें अनुपूर्वक स्था धातूहून अङ होऊन होतें. एक शंका--अनुपूर्वक स्था धातूहून 'आतश्चोपसर्गे' ।३।३।१०६ यानें होणाऱ्या अङ प्रत्ययाचा बाध करून 'स्थागापापचो भावे' ।३।३।९५ यानें सांगितलेला क्तिन् का होत नाहीं? त्याचे कारण पाणिनीनेंच 'व्यवस्था' असें रूप अङप्रत्ययान्त 'पूर्वपरावर०' ।१।१।३५ या सूत्रांत उपयोजिलें आहे म्हणून.

(१०) साधुया—'साधुः' न होता 'साधुया' होतें. सु चा लुक् होत नाहीं. याच् (या) आदेश त्याला होतो.

(११) 'वसन्ता यजेत'--यांत 'वसन्ते' न होता आल् (आ) आदेश होऊन 'वसन्ता' रूप होतें. लकार स्वरासाठीं आहे. (बा.) 'इया डियाच् व दीर्घ ईकार हेही आदेश होतात असें प्रतिपादन करावें'; उदा० 'उर्विया परिधानम्,' दार्विया--उरुणा व दारुणा न होता वरील रूपें इया आदेश होऊन होतात. तृतीयाएकवचन प्रत्ययाला इयादेश होतो. 'सुक्षेत्रिणा' न होता सुक्षेत्रिन् शब्दाचें तृतीयेच्या 'टा' ला डियाच् (इया) आदेश होतो व डित्त्वामुळें टिलोप होऊन 'सुक्षेत्रिया' होतें. तसेंच 'सुगात्रिणा' न होता 'सुगात्रिया' होतें.

'दृतिं न शुष्कं सरसी शयानम्' यामध्यें 'सरसि' न होता ईकार आदेश होऊन 'सरसी' होतें. वस्तुतः 'सरसी' शब्दाची व्युत्पत्ति सरस् शब्दाहून स्त्रीलिंगी गौरादिलक्षण (पहा-षिद्गौरादिभ्यश्च') ङीष् करून साधता येते. तो आद्युदात्त असावयास पाहिजे परंतु तो व्यत्ययानें अन्तोदात्त आहे. 'सरसी' या ङीषन्त शब्दाहून सप्तमीच्या ङि प्रत्ययाचा लुक् प्रस्तुत सूत्रानेंच होतो. तेव्हां 'सरसी' हें दीर्घ ईकार आदेशाचें उदाहरण होऊ शकत नाहीं. तें अन्यत्र शोधलें पाहिजे. यावरील सायणभाष्य--'सरसी गौरादिलक्षणो ङीष्; सरस्यां 'सुपां सुलुक्' इति सप्तम्यां लुक्। महति सरसि निर्जले घर्मकाले

शयानं निवसन्तं मण्डूकगण: इति '। 'सरसी' अशा ङीषन्त शब्दाहून झालेल्या ङि प्रत्ययाचा लुक् होऊन 'सरसी' रूप होतें.

(बा.) 'वरील वार्तिकाप्रमाणें आङ्, अयाच् व अयार् या आदेशांचेहि प्रतिपादन करावे.' उदा० 'प्र बाहवा सिसृतम्'–'बाहुना' न होता 'बाहवा' वेदांत होतें. आङ् (आ) आदेश झाल्यावर उकाराला 'घेर्ङिति' ।७।३।१११ यानें आङ ङित् असल्यानें गुण होऊन ओ झाल्यावर अवादेश होतो.

टीप–काशिकाकारानें 'बाहुना' न म्हणता 'प्रबाहुना' असे म्हटलें आहे ती चूक आहे. कारण 'प्रबाहुना' हा समास नाहीं. कारण 'प्र' याला समासस्वर नसून त्याचा वेगळा स्वर आहे. पदकारांनीं 'प्र' याचा वेगळा पदपाठ दिला आहे.

'स्वप्नया'—हें रूप पूर्ववत् 'स्वप्नेन' याऐवजीं वेदांत होतें. उदा० 'स्वप्नया सचसे जनम्'। येथें अयाच् (अया) आदेश होतो. 'अयाच्' यांतील अकार 'सुपि च' यानें दीर्घ होऊ नये म्हणून आहे. 'अतो गुणे' यानें पररूप होऊन 'स्वप्नया' रूप सिद्ध होतें.

'स नः सिन्धुमिव नावया'–'नावा' न होता 'नावया' होतें. नौ शब्दापुढील तृतीया एकवचन टा प्रत्ययाला अयार् आदेश होतो. अयार यांतील रेफ स्वरासाठीं आहे. 'उपोत्तमं रिति' ।६।१।१९७ यानें उपोत्तम उदात्त होतो.

टीप–सूत्रांतील 'आच्छे' शब्द आ, आत् व शे या तिघांचा संधि होऊन झाला आहे हें लक्षांत ठेवावे.

(३५६२) अमो मश् ।७।१।४०

मिबादेशस्यामो मश् स्यात् । अकार उच्चारणार्थः । शित्वात्सर्वादेशः । 'अस्तिसिचः' इतीट् । वधीं वृत्रम् । (ऋ. १।१६५।८) अवधिषमितिप्राप्ते ।

मिप् याला झालेला जो अम् आदेश त्याला वेदामध्यें मश् (म्) आदेश होतो. सूत्रांतील ' अमः ' यानें द्वितीया एकवचन अम् न घेता लुङात मिप् (उ. पु. ए. व.) प्रत्ययाला झालेला अम् आदेश घ्यावयाचा. (छन्दसि दृष्टानुविधानात् ' ।) आदेश शित् असल्यानें ' अनेकाल्शित्सर्वस्य ' याप्रमाणें तो सर्वादेश होतो. प्रत्ययांतील अकार उच्चारणार्थ आहे. शित्करण नसतें तर 'अलोऽन्त्यस्य' यानें अम् यांतील मकाराचाच लोप झाला असता. उदा० ' वधीं वृत्रम् ', ' वधीं वृत्रं मरुत इन्द्रियेण' यांतील ' वधीम् ' हें रूप ' अवधिषम् ' यासाठीं होतें. ' वधीम् ' हें रूप हन् धातूच्या लुङाचें वेदातील रूप आहे. ' हनो वध लिङि ' । 'लुङि च ' ।२।४।४२।४३ यानें हन् धातूला वधादेश झाल्यावर च्लिला सिच्, मिप् प्रत्ययाला ' तस्थस्थ० ' ।३।४।१०१ यानें अमादेश, त्याला प्रस्तुत सूत्रानें मशादेश; ' अस्तिसिचः ' यानें मकाराला ईडागम, ' इट ईटि ' ।७।२।९६ यानें सिचाचा लोप व सवर्णदीर्घ होऊन रूप सिद्ध होतें. ' बहुलं छन्दसि ' ।६।४।७५ यानें अट् आगमाचा लोप होतो.

(३५६३) लोपस्त आत्मनेपदेषु ।७।१।४१

छन्दसि । देवा अदुह्र । (तु.मैसं. ३।३।४) **अदुहतेति प्राप्ते । दक्षिणतः शये ।** (तैसं. ६।२।५।५) **शेते इति प्राप्ते । आत्मने इति किम् । उत्सं दुहन्ति ।** (ऋ. १।६४।६)

आत्मनेपदी तकार प्रत्ययाचा वेदामध्यें लोप होतो. उदा० ' देवा अदुह्र ' यांतील अदुह्र ' हें रूप ' अदुहत ' यासाठीं आहे. ' अदुह्र ' याच्या प्रक्रियेसाठीं सूत्र 'बहुलं छन्दसि' ।७।१।८पहा. ' दक्षिणतः शये' यांतील 'शये' रूप 'शेते'- ऐवजीं होतें. तलोप केल्यावर अयादेश होतो. ' आत्मनेपदेषु ' म्हटल्यानें ' उत्सं दुहन्ति कलशं चतुर्बिलम् ' या वाक्यांत 'दुहन्ति' असेंच रूप होतें. परस्मैपद असल्यानें ' अन्ति ' यांतील तकाराचा लोप होत नाहीं.

(३५६४) ध्वमो ध्वात् ।७।१।४२

अन्तरैवोष्माणं वारयध्वात् । (काठसं, १६।२१, ऐब्रा. २।६) **वारयध्वमिति प्राप्ते ।**

वेदामध्यें ध्वम् प्रत्ययाला ' ध्वात् ' असा आदेश होतो. उदा० ' अन्तरैवोष्माणं वारयध्वात् ' -- ' वारयध्वम् ' असें रूप प्राप्त झालें होतें. वृ धातूच्या णिजन्ताच्या लोटाचें हें रूप आहे.

(३५६५) यजध्वैनमिति च ।७।१।४३

एनमित्यस्मिन्परे ध्वमोऽन्त्यलोपो निपात्यते । यजध्वैनं प्रियमेधाः । (ऋ.८।२।३७) **वकारस्य यकारो निपात्यत इति वृत्तिकारोक्तिः प्रामादिकी ।**

वेदामध्यें ' यजध्वमेनम् ' ऐवजी ' यजध्वैनम् ' असें निपातन होतें. म्हणजे काय होतें ? ' यजध्वम् ' यापुढें ' एनम् ' पद आलें असता ' यजध्वम् ' यातील मकाराचा वेदांत लोप होतो. उदा० ' यजध्वैनं प्रियमेधाः; वृत्तिकार (काशिकाकार) वकाराला यकार निपातनानें होतो असें म्हणतो तें प्रामादिक आहे. कारण तो ' यजध्यैनम् ' असा चुकीचा पाठ घेऊन वकाराला यकार निपातनानें होतो असें म्हणतो. मुळांत वकारपाठ निर्विवाद आहे.

(३५६६) तस्य तात् ७ १।४४

लोटो मध्यमपुरुषबहुवचनस्य स्थाने तात् स्यात् गात्रं गात्रमस्या नूनं कृणुतात् । (मैसं.४।१३।४) **कृणुतेति प्राप्ते । सूर्यं चक्षुर्गमयतात् । गमयतेति प्राप्ते ।**

वेदामध्यें लोटाच्या म. पु. ब. व. तान्त (तकारान्त) प्रत्ययाच्या स्थानी तात् असा आदेश होतो. उदा० ' गात्रं गात्रमस्या नूनं कृणुतात् ' येथें ' कुणुत ' न होता तात् आदेश होऊन ' कृणुतात् ' रूप होतें. त्याप्रमाणें ' सूर्यं चक्षुर्गमयतात् ' येथें 'गमयत' न होता ' गमयतात् ' होतें.

टीप--' कृणुत ' हें रूप ' कृवि हिंसाकरणयोश्च ' (भ्वादि) याचें लोटाचें आहे. ' धिन्विकृण्व्योर च' ३।१।८० यानें शपाऐवजी उप्रत्यय होऊन वकाराला अकार अन्तादेश होतो व ' अतो लोपः ' ।६।४।४८ यानें त्याचा लोप होतो. ' गमयतात् ' हें गम् धातूच्या णिजन्ताचें लोटाचें रूप आहे.

(३५६७) तप्तनप्तनथनाश्च ।७।१।४५

तस्येत्येव । शृणोत ग्रावाणः । (तैसं. १।३।१३।१) **शृणुतेति प्राप्ते तप् । सुनोतन पचत ब्रह्म वाहसे ।** (ऋ. ५।३४।१) **दधातन द्रविणं चित्रमस्मे ।** (ऋ.१०।३६।१३) **तनप् । मरुतस्तज्जुजुष्टन ।** (ऋ.७।५९।९) **जुषध्वमिति प्राप्ते व्यत्ययेन परस्मैपदं श्लुश्च । विश्वेदेवासो मरुतो यतिष्ठन ।** (ऋ. १०।६३।६) **यत्संख्याकाः स्थेत्यर्थः । यच्छब्दाच्छान्दसो डतिः । अस्तेस्तस्य थनादेशः ।**

वेदामध्यें लोटाच्या मध्यमपुरुषी बहुवचनाला तप्, तनप्, तन व थन असे आदेश होतात. तप् आणि तनप् यांतील पकार इत्संज्ञक आहे.

उदा० ' शृणोत ग्रावाणः ' येथें शृणुत याऐवजी ' शृणोत ' होतें. तप हा पित् असल्यानें तो ङित् नाहीं म्हणून गुण होतो.

' सुनोतन पचत ब्रह्म वाहसे '; त्याप्रमाणें ' दधातन द्रविणं चित्र-मस्मे '; ' सुनोतन ' हें रूप ' सुनुत ' याऐवजी होते. तनप् प्रत्यय पूर्व-वत् पित् असल्यानें ङित् नाहीं म्हणून गुण होतो. दधातन-येथेंहि प्रत्यय पित् असल्यानें ' श्नाभ्यस्तयोरातः ' ६।४।११२ यानें आकाराचा लोप होत नाहीं. हें आदेश 'थ' प्रत्ययाला होतात.

' मरुतः तज्जुजुष्टन ' ' जुषध्वम् ' ऐवजी ' जुजुष्टन ' होतें. येथें व्यत्ययानें परस्मैपद व श्लु निपातनानें होतात. श्लु झाल्यानें ' श्लौ ' यानें द्विर्वचन होतें. येथें 'तन' आदेश होतो.

'विश्वेदेवासो मरुतो यतिष्ठन'-यांतील यतिष्ठन हें रूप यत् शब्दाहून छान्दस डति प्रत्यय होऊन टिलोप झाल्यावर 'यति' होते. पुढें अस्+थ=

अस्+थन= अकाराचा लोप होऊन स्थन;=ष्ठन; यातील थकाराला थन आदेश होऊन सुषामादित्वात् षत्व होतें. ष्टुत्वानें थकाराला ठकार होतो. त्याचा अर्थ ' यत्संख्याकाः स्थ ' असा होतो.

टीप—ऋग्वेदी ' यतिष्ठन ' असा पाठ घेतात. संहितेंत तो 'यतिष्ठन ' असाच आहे. पदपाठांत तो ' यति स्थन ' असा आहे असें पदमंजरीकार म्हणतो. काशिकाकार मात्र हें रूप इष् धातूपासून साधतो. व त्याचा अर्थ ' यदिच्छत ' असा करतो.

(३५६८) इदन्तो मसि ।७।१।४६

मसीत्यविभक्तिको निर्देशः। इकार उच्चारणार्थः। मस् इत्ययमिकाररूपचरमावयवविशिष्टः स्यात्। मस इगागमः स्यादिति यावत्। नमो भरन्त एमसि। (ऋ. १।१।७) **त्वमस्माकं तव स्मसि।** (ऋ. ८।९२।३२) **इमः स्मः इति प्राप्ते।**

सूत्रांत ' मसि ' हा अविभक्तिक निर्देश आहे. त्यांतील इकार उच्चारणार्थ आहे. वेदामध्यें परस्मैपदी उत्तम पुरुषाच्या बहुवचनीं मस हा प्रत्यय मसि असा इकारान्त होतो. तात्पर्य, मस् याला इक् आगम होतो तो कित् असल्यानें मस् यांतील अन्त्य सकाराला होऊन त्याचा चरम अवयव होतो. सूत्रांतील ' अन्त ' शब्द अवयववाची आहे. इत् अन्तो यस्य सः इदन्तः; यांतील तपरकरण असंदेहार्थ आहे इतकेंच. ' मस् इक् ' असेंही सूत्र केलें असतें तरी चाललें असतें. पण ' इक् ' हा प्रत्याहार घेतला गेला असता म्हणून तसें सूत्र पाणिनीनें केले नाहीं असें सुबोधिनीकार म्हणतो. उदा० ' नमो भरन्त एमसि ' यांत ' एमसि ' हे वैदिक रूप ' इमः ' याऐवजी आहे. ' इण गतौ ' याहून मस् केल्यावर इकार त्याचा अंतावयव होतो. दुसरें उदाहरण, ' त्वमस्माकं तव स्मसि ' यांतील ' स्मसि ' हें रूप ' स्मः ' ऐवजीं आहे. अस् धातूहून मस् केल्यावर 'श्नसोरल्लोपः ' ६।४।१११ यानें अकाराचा लोप होतो.

(३५६९) क्त्वो यक् ।७।१।४७

दिवं सुपर्णो गत्वाय । (ऋ. ८।१००।८)

वेदामध्यें कांहीं ठिकाणीं क्त्वा याला यक् असा आगम होतो. यक् यांतील ककार इत्संज्ञक आहे. हा आगम केल्यानंतर 'त्वाय' एवढा प्रत्यय बनतो. कारण यक् हा कित् असल्यानें त्यांतील य, क्त्वा याचा अंत्य अवयव बनतो. उदा० 'दिवं सुपर्णो गत्वाय'; 'गत्वा' ऐवजी 'गत्वाय' रूप होतें.

(३५७०) इष्ट्वीनमिति च ।७।१।४८

क्त्वाप्रत्ययस्य ईनम् अन्तादेशो निपात्यते । इष्ट्वीनं देवान् । इष्ट्वा इति प्राप्ते ।

वेदामध्यें इष्ट्वा यांतील आकाराला ईनम् असा अन्तादेश निपातनानें होतो. उदा० 'इष्ट्वीनं देवान्' यांतील 'इष्ट्वीनम्' हें रूप 'इष्ट्वा'-ऐवजी आहे.

(३५७१) स्नात्व्यादयश्च ।७।१।४९

आदिशब्दः प्रकारार्थः । आकारस्य ईकारो निपात्यते । स्विन्नः स्नात्वी मलादिव । (मै ।३।११।१०) **पीत्वी सोमस्य वावृधे ।** (ऋ ३।४०।७) **स्नात्वा पीत्वेति प्राप्ते ।**

सूत्रांतील 'आदि' शब्द प्रकारार्थ आहे. वेदामध्यें स्नात्वा वगैरे क्त्वा प्रत्ययान्त शब्दाना कांहीं ठिकाणीं आकाराला ईकार निपातनानें होतो. उदा० 'स्विन्नः स्नात्वी मलादिव' किंवा 'पीत्वी सोमस्य वावृधे' यांतील स्नात्वी व पीत्वी हीं रूपें स्नात्वा व पीत्वा याऐवजीं आहेत.

(३५७२) आज्जसेरसुक् ।७।१।५०

अवर्णान्तादङ्गात्परस्य जसोऽसुक् स्यात् । देवासः । (ऋ. १०।२८।८) **ब्राह्मणासः ।** (ऋ.७।१०३।८)

अकारान्त अङ्गाच्या पुढील प्रथमा बहुवचनाच्या जस् प्रत्ययाला असुक् असा आगम होतो. असुक् यांतील ककार इत्संज्ञक आहे व उकार उच्चारणार्थ आहे. जस् याला हा आगम केल्यानतर असस् असा प्रत्यय बनतो. उदा० देवास: व ब्राह्मणास:—हीं रूपें वेदांत 'देवा:' व 'ब्राह्मणा:' याऐवजी होतात. असुक् आगम केल्यानंतर 'अस्' यांतील सकाराचे श्रवण होतें व असुक् यांतील सकाराला विसर्ग होतो. (पहा– 'देवास आयन परशूँरे विभ्रन्। ' ब्राह्मणास: ोमिनो वाचमक्रमत '।

(३५७३) श्रीग्रामण्योश्छन्दसि ।७।१।५६

आमो नुट् । श्रीणामुदारो धरुणो रयीणाम् । (ऋ. १०।४५।५) **सूतग्रामणीनाम्** । (काठसं. २८।३)

वेदामध्यें श्री आणि ग्रामणी या शब्दापुढील आम् प्रत्ययाला नुडागम होतो.

टीप– लोकामध्यें श्री शब्दाला 'वामि' ।१।४।५ या सूत्रानें नदीसंज्ञा विकल्पानें सांगितली आहे. हें सूत्र नित्यार्थ आहे. नदीसंज्ञा केली असतां 'ह्स्वनद्यापो नुट्' ।७।१।५४या सूत्रानें नुडागम होतो. नदीसंज्ञा केली नाहीं म्हणजे होत नाहीं. त्यामुळें श्रीणाम् व श्रियाम् अशी दोन रूपें होतात. परंतु वेदामध्यें तर 'श्रीणाम्' असें एकच रूप दृष्टीस पडतें. तेव्हां नदीसंज्ञा नसतानाही नुडागम झाला पाहिजे याकरता या सूत्रामध्यें 'श्री' शब्द घातला आहे; आणि 'ग्रामणी' शब्दाला मुळीच नदीसंज्ञा नाहीं म्हणून वेदामध्यें नुट् आगम होण्यासाठीं 'ग्रामणी' शब्द उच्चारला आहे.

उदा० 'श्रीणामुदारो धरुणो रयीणाम्'; 'सूतग्रामणीनाम्'— 'सूताश्च ग्रामण्यश्च सूतग्रामण्य:' असा इतरेतर द्वंद्व आहे. समाहार द्वंद्व घेतल्यास त्याचा सूत्रांत निर्देश न करताहि रूप सिद्ध होतें. कारण ७।१।५४ यानें नुट् झाला असता.

(३५७४) गो: पादान्ते ।७।१।५७

विद्मा हि त्वा गोपती शूरगोनाम् । (ऋ. १०।४७।१) **पादान्ते किम् । गवां शता वृक्षयामेषु ।** (ऋ. १।१२२।७) **पादान्ते कचिन्न । छन्दसि सर्वेषां वैकल्पिकत्वात् । विराजं गोपतिं गवाम् ।** (ऋ. १०।१६६।१)

वेदामध्यें पादाच्या शेवटीं असलेल्या गो शब्दाच्या पुढील आम् प्रत्य-याला नुट् आगम होतो. उदा० ' विद्मा हि त्वा गोपतिं शूरगोनाम् ' । येथें ' गवाम् ' न होता नुडागम होऊन ' गोनाम् ' रूप होतें. ' पादान्ते ' म्हटल्यानें ' गवां शता वृक्षयामेषु ' येथें पादाच्या शेवटीं गोशब्द नसल्यामुळें ' गवाम् ' असेंच होतें. पादाच्या अन्ती गो शब्द असूनही क्वचित् नुट् होत नाहीं कारण वेदामध्यें सर्वच विधि विकल्पानें होतात असें वचन आहे. उदाहरणार्थ, ' हन्तारं शत्रूणां कृधि । विराजं गोपतिं गवाम् '; पादाच्या शेवटीं गोशब्द असूनहि ' गोनाम् ' न होता ' गवाम् ' होतें.

टीप—' पाद ' शब्दानें ऋक्पादच घ्यावयाचा, श्लोकपाद नाहीं कारण ' छन्दसि ' पदाची अनुवृत्ति चालू आहे.

(३५७५) छन्दस्यपि दृश्यते ।७।१।७६

अस्थ्यादीनामनङ् । इन्द्रो दधीचो अस्थभिः । (ऋ.१।८४।१३)

वेदामध्यें अस्थि, दधि वगैरे शब्दांना अजादि तृतीयादि विभक्ती-शिवाय इतर ठिकाणींहि उदात्त अनङ् आदेश झालेला दृष्टीस पडतो.

' अस्थिदधि० ।७।१।७५ हें सर्व सूत्र अनुवृत्त होतें. सूत्रांतील ' अपि ' शब्दानें ' यत्र विहितस्ततोऽन्यत्रापि दृश्यते ' असा अर्थ होतो. सर्वोपाधि-व्यभिचारार्थ 'अपि' शब्द आहे. उदा० ' इन्द्रो दधीचो अस्थभि: ' येथें भिस् हा हलादि प्रत्यय पुढें असूनहि अस्थि शब्दाला अनङ् आदेश झाला. तो ङित असल्यानें अंत्य वर्णाला झाल्यावर नकाराचा लोप होतो.

(३५७६) ईच द्विवचने ।७।१।७७

अस्थ्यादीनामित्येव । अक्षीभ्यां ते नासिकाभ्याम् । (ऋ.१०।१६३।१)

वेदामध्यें अस्थि वगैरे शब्दाना द्विवचन प्रत्यय पुढें असता दीर्घ ईकार अन्तादेश होतो व तो उदात्त होतो. उदा० 'अक्षीभ्यां ते नासिकाभ्याम्.' हें सूत्र नसते तर 'अक्षिभ्याम्' असेंच झालें असतें. हा ईकार नुमाचा परत्वात् बाध करतो.

(३५७७) दृक्स्ववस्स्वतवसां छन्दसि ।७।१।८३

एषां नुम् स्यात् सौ । कीदृङ्ङिन्द्रः । (ऋ. १०।१०८।३) **स्ववान् ।** (ऋ.१।३५।१०) **स्वतवान् ।** (ऋ. ४।२।६) **'उदोष्ठ्यपूर्वस्य'।**

वेदामध्यें दृक्, स्ववस् आणि स्वतवस् या शब्दाना प्रथमा विभक्तीचा सु किंवा संबुद्धि सु प्रत्यय पुढें असता नुम् आगम् होतो. 'आच्छीनद्योर्नुम्' ।७।१।८० यांतून नुम्ची व 'सावनडुहः' ।७।१।८२ यांतून 'सु' ची अनुवृत्ति येते.

उदा० 'कीदृङ इन्द्रः' किम् शब्दपूर्वक दृश् धातूहून क्विन् होतो. 'क्विन्प्रत्ययस्य कुः' ।८।२।६२ यानें कुत्वानें नुमाच्या नकाराला ङकार होतो. व 'इदं किमो०' यानें की आदेश होतो.

स्ववान्--'सुष्ठु अवा यस्य' असा विग्रह आहे 'स्ववस्' शब्दाचें 'स्ववत्' होतें. नुम् झाल्यावर 'सान्तमहतः' ।६।४।१० यानें दीर्घ होऊन संयोगान्त लोप होतो. तो असिद्ध असल्यानें नलोप होत नाहीं. तसेंच स्वतवान्--स्वं तवो वृद्धिर्यस्य--'स्वतवान्' रूप होतें.

'उदोष्ठ्यपूर्वस्य' ।७।१।१०२ यानें धातूच्या अंत्य दीर्घ ॠकाराला तो जर ओष्ठ्यवर्णपूर्व असेल तर त्याला उर् आदेश होतो. पण वेदामध्यें-

(३५७८) बहुलं छन्दसि ।७।१।१०३

ततुरिः । (ऋ. १।१४५।३) **जगुरिः ।** (ऋ. १०।१०८।१)

वेदामध्यें ॠकारान्त धातूच्या अङ्गाला ओष्ठ्यवर्ण मागे नसतानाही ह्रस्व उकार आदेश होतो. तो बहुलेंकरून होत असल्यानें ओष्ठस्थानचा

वर्ण मागे असूनहि उकार होत नाहीं. उदा० ' मित्रावरुणौ ततुरिः '; ' दूरे अध्वा जगुरिः '; ' पपुरिः '; हीं रूपें तॄ, गॄ व पॄ पासून होतात.

ततुरिः--तॄ धातूपासून ' आदृगम० ' यानें किन् होतो. उत्व होतें. ' द्विर्वचनेऽचि ' यानें स्थानिवद्भाव झाल्यानें द्विर्वचन होऊन ' उरत् ' यानें अत्व होते. ' बहुलम् ' म्हटल्यानें 'पपुरिः' येथें उत्व होतें. तर ' पप्रितमम् ' येथें होत नाहीं.

(३५७९) ह्रु ह्वरेश्छन्दसि ।७।२।३१

ह्वरेर्निष्ठायां ह्रु आदेशः स्यात् । अह्रुतमसि हविर्धानम् । (वासं. १।९)

वेदामध्यें ह्वृ धातूला निष्ठाप्रत्यय पुढें असता ह्रु असा आदेश होतो. उदा० ' अह्रुतमसि हविर्धानम् '; भाषेंत मात्र ' ह्वृतम् ' असेंच होतें.

टीप---' श्वीदितो निष्ठायाम् ' ।७।२।१४ यातून ' निष्ठायाम् ' या पदाची अनुवृत्ति येते. न ह्रुतम्—अह्रुतम्;

(३५८०) अपरिह्वृताश्च ।७।२।३२

पूर्वेण प्राप्तस्यादेशस्याभावो निपात्यते । अपरिह्वृताः सनुयाम वाजम् । (ऋ. १।१००।१९)

' अपरिह्वृताः ' असें रूप निपातित होतें. म्हणजे पूर्वसूत्रानें प्राप्त झालेला ह्रु आदेश होत नाहीं. उदा० ' अपरिह्वृताः सनुयाम वाजम् ';

टीप--वेदांत हा शब्द बहुवचनीच असल्यानें तसाच निर्देश सूत्रांत केला आहे.

(३५८१) सोमे ह्वरितः ।७।२।३३

इड्गुणौ निपात्येते । मा नः सोमो ह्वरितः । (तु. माश्रौ. २।५।४।२४)

वेदामध्यें सोम अर्थ वाच्य असता ' ह्वरित ' असें निपातन होतें. ऋकाराला गुण व निष्ठा प्रत्ययाला इडागम निपातनानें होतो. उदा० ' मा न: सोमो ह्वरित: '--

(३५८२) ग्रसितस्कभितस्तभितोत्तभितचत्तविकस्ताविशस्तृशंस्तृशास्तृतरुतृवरुतृवरूत्रीरुज्ज्वलितिक्षरितिवमित्यमितीति च ।७।२।३४

अष्टादश निपात्यन्ते । तत्र ग्रसु स्कम्भु स्तम्भु एषामुदित्त्वान्निष्ठायामिट्प्रतिषेधे प्राप्ते इण्निपात्यते । युवं शचीभिर्ग्रसितामसुञ्चतम् । (ऋ. १२।३९।१३) विष्कभिते अजरे । (ऋ. ६।७०।१) येन स्व: स्तभितम् । (ऋ. १०।१२१।५) सत्येनोत्तभिता भूमि: । (ऋ. १०।८५।१) स्तभितेत्येवसिद्धे उत्पूर्वस्य पुनर्निपातनमन्योपसर्गपूर्वस्य मा भूदिति। चते याचने । कस गतौ । आभ्यां क्तस्येडभाव: । चत्तो इतश्चत्तामुत: । (ऋ. १०।१५२।२) त्रिधा ह श्यावमश्विना विकस्तम् । (ऋ. ११११७।२४) उत्तानाया हृदयं यद्विकस्तम् । (वासं. ११।३९) निपातनं बहुत्वापेक्षं सूत्रे बहुवचनं विकस्ता इति । तेनैकवचनान्तोऽपि प्रयोग: साधुरेव । शसु शंसु शासु एभ्यस्तृच इडभाव: । एकस्त्वष्टुरश्वस्या विशस्ता ।(ऋ. १।१६२।१९) ग्रावग्राभ उत शंस्ता । (ऋ. १।१६२।५) प्रशास्ता पोता । (ऋ. १।९४।६) तरतेर्वृङ्वृञोश्च तृच उट् ऊट् एतावागमौ निपात्येते । तरुतारं रथानाम् । (ऋ. १०।१७८।१) तरूतारम् । वरुतारम् ।वरूतारम् । (ऋ.१।१६९।१) वरूत्रीभि: सुशरणो नो अस्तु । (ऋ. ७।३४।२२) अत्र ङीबन्तनिपातनं प्रपञ्चार्थम् । वरूतृशब्दो हि निपातित: । ततो ङीपा गतार्थत्वात् । उज्ज्वलादिभ्यश्चतुर्भ्य: शप इकारादेशो निपात्यते । ज्वल दीप्तौ ।

क्षर संचलने। टुवम उद्गिरणे। अम गत्यादिषु। इह क्षरिती-त्यस्यानन्तरं क्षमितीत्यपि केचित् पठन्ति। तत्र क्षमूष् सहने इति धातुर्बोध्यः। भाषायां तु ग्रस्तस्कब्धस्तब्धोत्तब्धचतित-विकसिताः। शंसिता। शसिता। तरीता। तरिता। वरीता। वरिता। उज्ज्वलति। क्षरति। पाठान्तरे क्षमति। वमति। अमति। 'बभूथाऽऽततन्थजगृम्भववर्थेति निगमे'। विद्मा तमुत्सं यत आ बभूथ। (ऋ. १०।८४।५) येनान्तरिक्षमुर्वाततन्थ। (ऋ.३।२२।२) जगृम्भा ते दक्षिणमिन्द्र हस्तम्। (ऋ.१०।४७।१) त्वं ज्योतिषा वि तमो ववर्थ। (ऋ. १।९१।२२) भाषायां तु बभूविथ। आतेनिथ। जगृहिम। ववरिथेति।

ग्रसु अदने, स्कम्भुस्तम्भु रोधनार्थौ (हे धातू सौत्र आहेत.) चते याचने, कस गतौ, शसु हिंसायाम्, शंसु स्तुतौ, शासु अनुशिष्टौ, तॄ प्लवनतरणयोः, वृङ संभक्तौ, वृञ् वरणे, ज्वल दीप्तौ, क्षर संचलने, क्षमूष् सहने, टुवम उद्गिरणे, अम गत्यादिषु--या धातूंची ग्रस्त, स्कब्ध, स्तब्ध, उत्तब्ध, चतित, विकसित, विशसितृ, शंसितृ, शासितृ, तरितृ, तरीतृ, वरितृ, वरीतृ, वरित्री, उज्ज्वलति, क्षरति, क्षमति, वमति आणि अमति अशीं अठरा (क्षम् धातूचा पाठ घेतल्यास एकोणीस) रूपें लोकभाषेंत होतात. पण वेदामध्यें त्यांचीं रूपें अनुक्रमें ग्रसित, स्कभित, स्तभित, उत्तभित, चत्त, विकस्त, विशस्तृ, शंस्तृ, शास्तृ, तरुतृ, तरूतृ, वरुतृ, वरूतृ, वरूत्री, उज्ज्वलिति, क्षरिति, क्षमिति, वमिति आणि अमिति अशीं रूपें निपातित केली जातात.

यांपैकीं ग्रसु, स्कम्भु व स्तम्भु हें धातू उदित् असल्यानें 'उदितो वा' ।७।२।५६ यानें क्त्वाला इडागम विकल्पानें सांगितला असल्यानें 'यस्य विभाषा' ७।२।१५ यानें निष्ठा प्रत्ययाला इडागमाचा निषेध प्राप्त झाल्यानें त्याचें निपातन केलें. उदा० 'युवं शचीभिर्ग्रसितामभुञ्चतम्'; विष्कभिते अजरे' यांतील 'विष्कभिते' हें रूप 'अनिदिताम्०' यानें

नलोप होऊन 'वेः स्कभ्नातेर्नित्यम्' यानें षत्व होऊन होतें. 'येन स्वःस्तभितम्'; पुढें येणारे 'उत्तभित' हें रूप 'उदः स्थास्तम्भोः' यानें पूर्वसवर्ण, सकाराला थकार व त्याचा 'झरो झरि सवर्णे' यानें लोप होऊन होतें.

'सत्यनोत्तभिता भूमिः' यांतील 'उत्तभित' हें रूप उद्पूर्वक स्तम्भ् धातूचें आहे व त्याची प्रक्रिया वर देण्यांत आलीच आहे.

'स्तभित' याचें निपातन केल्यानंतर पुनः 'उत्तभित' रूप देण्याचें कारण हें कीं उद्पूर्वक स्तम्भ् धातूचेंच 'स्तभित' होतें. इतर उपसर्ग पूर्वी असल्यास 'स्तब्ध' होतें.

'चत्तो इतश्चत्तामुतः' यांत 'चत्ता' हें 'चतिता' ऐवजी आहे. 'त्रिधा ह श्यावमश्विना विकस्तम्' किंवा 'उत्तानाया हृदयं यद् विकस्तम्' यांत 'विकसितम्' ऐवजी 'विकस्तम्' आहे. चत् व कस् या धातूपुढील क्त प्रत्ययाला इडागमप्रतिषेधाचें निपातन केलें आहे.

टीप— चतशब्दाट्टापि उञासह आद्गुणः निपातेन सह एकीकृत्य छेदस्तु पदकाराणां, संप्रदायसिद्धः'। (सुबोधिनी)

'विकस्ताः' असा बहुवचनी प्रयोग वेदांत आढळतो म्हणून तदपेक्षेनें सूत्रांत तसा निर्देश केला असला तरी एकवचनी प्रयोग सुद्धां शुद्ध समजावा. विशस्तृ, शस्तृ व शास्तृ यांतील तृच् प्रत्ययाला वेदांत इडागम होत नाहीं. उदा० 'एकस्त्वष्टुरश्वस्या विशस्ता'; येथे 'विशसिता' होत नाहीं. 'ग्रावग्राभ उत शंस्ता सुविप्रः'; शसिता होत नाहीं. 'प्रशास्ता पोता' 'प्रशासिता' होत नाहीं. तृ. वृ. (वृङ आणि वृञ्) यांहून होणाऱ्या तृच् प्रत्ययाला उट् व ऊट् आगम यांचें निपातन होतें. उदा० 'तरुतारं रथानाम्' येथें उट् आगम झाला आहे. ऊट् केल्यास 'तरूतारम् होतें. भाषेंत तरितारम् किंवा तरीतारम् अशीं रूपें 'वृतो वा' यानें विकल्पानें दीर्घ होऊन होतात. त्याप्रमाणें वृ पासून वरुतारम् किंवा वरूतारम् होतात. 'वरूत्रीभिः सुशरणो नो अस्तु' यांत 'वरूत्रीः' असें प्र. ब. व. एकाच ठिकाणीं सापडतें. त्याचें निपातन केलें. यांतील ङीपाचें निपातन प्रपंचार्थ आहे. कारण 'ऋन्नेभ्यो ङीप्' यानें तो झालाच असता. 'वरुतृ' शब्दाचें

निपातन सूत्रानें केलेंच होतें.

राहिलेल्या रूपांत शपाला, त्यांतील अकाराला--इकारादेश निपा-तनानें होतो. उदा० ' अग्निरुज्ज्वलिति, स्तोकं क्षरिति, वः सोमं वमिति ', अभ्यमिति वरुणः, स्तोमं क्षमिति-- यांतील क्षमिति हें रूप ' क्षमूष् सहने, याचें आहे असें समजावें. वमिति, अमिति;

' बभूथाततन्थजगृम्भववर्थेति निगमे '।७।२।६४

वेदामध्यें बभूथ, आततन्थ, जगृम्भ आणि ववर्थ हीं रूपें निपातित होतात. उदा० 'विश्वा तमुत्सं यत आ बभूथ । ' येनान्तरिक्षमुर्वाततन्थ'; त्या-प्रमाणें ' जगृम्भा ते दक्षिणमिन्द्रहस्तम् '--' त्वं ज्योतिषा वि तमो ववर्थ '; भाषेंत मात्र बभूविथ, आतेनिथ, जगृहिम व ववरिथ अशी रूपे अनुक्रमें होतात. ' ववरिथ ' हे रूप भाषेंत क्रादिनियमानें होतें. सूत्रातील इति शब्द प्रकारवाचक असल्यानें क्वचित् ' अभ्यमीति ' असेंहि रूप होतें. उदा० रविमभ्यमीति वरुणः ';

(३५८३) सनिंससनिवांसम् ।७।२।६९

सनिमित्येतत्पूर्वात्सनतेः सनोतेर्वा क्वसोरिट् एत्वाभ्यासलोपा-भावश्च निपात्यते । अग्निं ज्त्वाग्ने सनिंससनिवांसम् । (वा.) ' पावकादीनां छन्दसि प्रत्ययस्थात् कादित्वं नेति वाच्यम् '। 'हिरण्यवर्णाः शुचयः पावकाः। (शौ. १।३३।१)

सनिम्पूर्वक सनति किंवा सनोति या सन् धातूहून लिट् प्रत्यय केला असता इडागम होतो आणि एत्वाभ्यासलोप निपातनानें होत नाहींत. सन् धातूहून लिट् प्रत्यय, त्याला क्वसु आदेश, द्वित्व, एत्व, अभ्यासलोप (६।४। १२१) हीं कार्यें झाल्यानंतर तो एकाच् होत असल्यानें ' वस्वेकाजा०' ७।२।६७ यानें इडागम होतो. पुढें त्या सेनिवस् शब्दाचें द्वितीयैकवचन ' सेनिवांसम् ' असें होतें. वेदामध्यें मात्र निपातनानें द्वित्व केल्यावर धातु एकाच् झाला नाहीं तरी इडागम होतो. म्हणून ' सनिंससनिवांसम् ' असें निपातन केलेलें रूप सिद्ध होतें.

टीप--' नेड्वशिकृति ' ७।२।८ यानें निषेध प्राप्त झाला असताही इडागम होतो असें सुबोधिनीकार म्हणतो.

उदा० 'अञ्जित्वाग्ने सनिससनिवांसम्'; भाषेंतील रूप ' सेनिवांसम् ' होतें. (वा.) ' वेदामध्यें पावक ' वगैरे शब्दांचें स्त्रीलिंगी रूप करतांना ' प्रत्ययस्थात्कात्० ' ।७।३।४५ यानें अकाराला इत्व होत नाहीं असें म्हणावें.' उदा० 'हिरण्यवर्णाः शुचयः पावकाः'; भाषेंत मात्र ' पाविकाः ' होतें.

टीप–' पुनन्ति पावयन्ति वा पावकाः '–ण्वुल् केल्यावर टाप् होतो,

(३५८४) घोर्लोपो लेटि वा ।७।३।७०

दधद्रत्नानि दाशुषे । (ऋ. ४।१५।३) **सोमो ददद् गन्धर्वाय** । (ऋ.१०।८५।४१) **यदग्निरग्नये ददात्** । (काठसं. ७।१२)

लेट् प्रत्यय पुढें असतांना घुसंज्ञक दा आणि धा या धातूंच्या आकाराचा लोप विकल्पानें होतो. उदा० ' दधद्रत्नानि दाशुषे ', ' सोमो ददद् गन्धर्वाय '; लोप होत नाहीं. तेव्हां ' अग्निरग्नये ददात् ' यातील ' ददात् ' असेंही रूप होतें.

' दधत् ' हें रूप धा धातूहून लेट, तिप्, ' श्लौ ' यानें द्विर्वचन होऊन ' दधाति ' झाल्यावर आकार लोप होऊन ' लेटोऽडाटौ ' यानें अडागम होऊन ' इतश्च लोपः परस्मैपदेषु ' यानें इकाराचा लोप होतो. त्याचा अर्थ 'दाशुषें यजमानाय रत्नानि दधात्' असा होतो. 'ददत्' हें दा धातूचें रूप आहे.

(३५८५) मीनातेर्निगमे ।७।३।८१

शिति ह्रस्वः । प्र मिणन्ति व्रतानि । (ऋ. १०।१०।५) **लोके प्रमीणन्ति । ' अस्तिसिचोऽपृक्ते '** ।

वेदामध्यें मी धातूला शित् प्रत्यय पुढें असतांना ऱ्हस्व होतो.

' प्वादीनां ह्रस्वः ।७।३।८० यांतून ' ह्रस्व ' शब्दाची अनुवृत्ति येते. उदा० ' प्र मिणन्ति व्रतानि '; ' प्रमिणन्ति ' येथें ' हिनुमीना ' ।८।४।१५

यानें णत्व होतें. भाषेंत 'प्रमीणन्ति' रूप होतें. 'अस्तिसिचोऽपृक्ते' ।७।३।९६ यानें अस् धातु व सिच् प्रत्यय यापुढील अपृक्त सार्वधातुक प्रत्ययाला ईट् आगम सांगितला आहे. पण वेदांत--

(३५८६) बहुलं छन्दसि ।७।३।९७

सर्वमा इदम् । (ऋ. १०।१२९।३) **आसीदिति प्राप्ते । 'ह्रस्वस्य गुणः'। 'जसि च'। (वा.) जसादिषु छन्दसि वावचनं प्राङ् 'णौचङ्युपधायाः'। अधा शतक्रत्वो यूयम् ।** (ऋ. १०।९७।२) **शतक्रतवः । पश्वे नृभ्यो यथा गवे ।** (ऋ. १।४३।२) **पशवे 'नाभ्यस्तस्याचि' इति निषेधे । (वा.) 'बहुलं छन्दसीति वक्तव्यम्'। अनुषग्जुजोषत् ।** (ऋ.४।४।१०)

टीप--कांहीं प्रतींत 'आसीदिति प्राप्ते' यापुढें पुढील मजकूर सांपडतो. 'अस्तेर्लङ्, तिप्, ईडभावः । अपृक्तत्वाद्धल्ङ्याादि लोपः । रुत्वविसर्गौ । संहितायां तु 'भो भगो' इति यत्वम् । 'लोपः शाकल्यस्य' इति यलोपः । गोभिरक्षाः । सिच इडभावश्छान्दसः । अट् । शेषं पूर्ववत्'।

वेदांत अस् धातु व सिच् प्रत्यय यांच्या पुढील अपृक्त सार्वधातुक प्रत्ययाला ईट् आगम बाहुल्येंकरून होतो. भाषेंत तो नित्य होतो. पण--

उदा० 'आप एवेदं सर्वमाः'-यांतील 'आः' हें रूप 'आसीत्' ऐवजी आहे. 'आः' हें रूप अस् धातूहून लङ्, तिप्, 'आडजादीनाम्' यानें आट् आगम, शपाचा लुक्, ईट् न होता हल्ङ्यादि लोप झाल्यावर रुत्वविसर्ग होऊन सिद्ध होतें. संहितेंत 'रु' चा 'भो भगो०' ८।३।१७ यानें 'य' होतो व त्याचा 'लोपः शाकल्यस्य' ।८।३।१९ यानें लोप होतो. त्यामुळें 'सर्वम् आ इदम्' असें वाक्य होतें. आः-आसीत्, 'गोभिरक्षाः' (ऋ. ९। १०।७।९) यांतील 'अक्षाः' हें रूप क्षर् धातूच्या लुङाचें आहे. 'अतोर्लरान्तस्य' ।७।२।२ यानें वृद्धि होते व इडागम छान्दसत्वात् होत नाहीं.

'ह्रस्वस्य गुणः' ।७।३।१०८ यानें संबुद्धि सु पुढें असता मागील ह्रस्व इकाराला व उकाराला गुण सांगितला आहे. त्याप्रमाणें 'जसि च'

।७।३।१०९ यानें जस् प्रत्यय पुढें असता तो सांगितला आहे, पण--(वा.) 'जसाप्रमाणें इतर प्रत्यय पुढें असता ' णौ चङ्युपधाया ह्रस्वः ' ।७।४।१ पावेतो म्हणजे सातव्या अध्यायाच्या तिसऱ्या पादाअखेर जे विधि सांगितले आहेत ते वेदामध्यें बाहुल्येंकरून होतात.'

उदा० ' अधा शतक्रत्वो यूयम् ' (ऋग्वेद १०।९७।२) येथें ' शत-क्रतवः० ' याऐवजी ' शतक्रत्वः ' असें ' घेर्ङिति ' यानें गुण न होता यणा-देश होऊन रूप होतें.

टीप--' जसादि ' यांतील ' आदि ' शब्द प्रकारवाची आहे. त्यामुळें वेदांत अम्बे व अम्ब दोन्ही रूपें सिद्ध होतात. तसेंच ' पश्वे नृभ्यो यथा गवे ' (ऋग्वेद १।४३।२) येथें ' पशवे ' न होता पूर्ववत् यण् होऊन ' पश्वे ' होतें.

' नाभ्यस्तस्याचि० ' ।७।३।८७ यानें अभ्यस्तसंज्ञक धातूंतील ऱ्हस्व इकाराला व उकाराला अजादि सार्वधातुक पित् प्रत्यय असता गुण निषेध सांगितला आहे. पण--

(वा.) ' वेदामध्यें वरील निषेध बहुलेंकरून होतो असें म्हणावें ' उदा० ' अनुषग् जुजोषत् ' (ऋग्वेद ४।४।१०) यांतील ' जुजोषत् ' हें रूप ' जुषी प्रीतिसेवनयोः ' याच्या लटाचें आहें. व्यत्ययानें परस्मैपद होतें. सिप् ', इकाराचा लोप, ' लेटोऽडाटौ ' यानें अडागम, व्यत्ययानें शप् व श्लु व नंतर द्विर्वचन होऊन रूप सिद्ध होतें.

(३५८७) नित्यं छन्दसि ।७।४।८

छन्दसि विषये चङ्युपधाया ऋवर्णस्य ऋन्नित्यम् । अवी-वृधत् । (वासं २८।२३)

चङ् प्रत्यय पुढें असलेला णि प्रत्यय पुढें असतांना धातूच्या उपधेला, म्हणजे णिजन्ताच्या लुङांत असलेल्या ऋवर्णाला वेदामध्यें नित्य ऱ्हस्व ऋकार होतो,

उदा० ' अवीवृधत् ' अवीवृधताम्, अवीवृधन्'. हीं वृध् धातूच्या णिजन्ताच्या लुङाची रूपें आहेत. ' उर्ऋत् ' ।८।४।७ याने तो विकल्पाने प्राप्त झाला होता.

(३५८८) न छन्दस्यपुत्रस्य ।७।४।३५

पुत्रभिन्नस्यादन्तस्य क्यचि ईत्वदीर्घौ न। मित्रयुः। (मैस.२।६।१२) 'क्याच्छन्दसि' इति उः। अपुत्रस्य किम्। पुत्रीयन्तः सुदानवः। (ऋ० ७।९६।४) (वा.) 'अपुत्रादीनामिति वक्तव्यम्'। जनीयन्तो न्वग्रवः। जनमिच्छन्त इत्यर्थः।

वेदामध्यें पुत्रशब्दाशिवाय इतर शब्दांच्या शेवटीं असलेल्या अकाराला क्यच् प्रत्यय पुढें असता ईकार किंवा दीर्घ यांपैकीं कांहीं होत नाहीं. उदा० ' मित्रयुः '–' मित्र ' शब्दाहून क्यच् केंल्यावर ' मित्र ' या अवर्णान्त अंगाला ' क्यचि च ' ।७।४।३३ यानें ईत्व होत नाहीं व ' अकृत्सार्वधातुक० ' यानें दीर्घ होत नाहीं. ' क्याच्छन्दसि ' ।३।२।१७० यानें उ होतो. ' अपुत्रस्य ' म्हटल्यानें पुत्रमिच्छन्तः—' पुत्रीयन्तः सुदानवः ' येथें ' पुत्रीयन्तः ' असें रूप होतें. ईकार होतो. ' पुत्रयु ' असें रूप होत नाहीं.

(वा.) सूत्रांत 'अपुत्रस्य' पदाऐवजीं ' अपुत्रादीनाम् ' असें म्हणावें. उदा० ' जनीयन्तो न्वग्रवः ' येथें ' जनीयन्तः ' याचा अर्थ ' जनमिच्छन्तः ' असा होतो. येथें जन शब्दाहून क्यच् झाला असता ईकार होतो. लटाला शतृ आदेश होऊन ' उगिदचाम्० ' ।७।१।७० यानें नुम् होतो.

(३५८९) दुरस्युर्द्रविणस्युर्वृषण्यतिरिषण्यति ।७।४।३६

एते क्यचि निपात्यन्ते। भाषायां तु उप्रत्ययाभावात्। दुष्टीयति। द्रविणीयति। वृषीयति। रिष्टीयति।

दुष्ट, द्रविण, वृष आणि रिष्ट या शब्दाहून क्यच् प्रत्यय करून त्या क्यच्प्रत्ययान्त धातूंना (काठसं. २।११) उ लावून दुरस्यु, (ऋ. ६।१६ ३४) द्रविणस्यु, (ऋ. ९।५।६) वृषण्य (ऋ. २।२३।१२) आणि रिषण्य असे वेदामध्यें निपातित केंलें जातात. म्हणजे कधामें निपातन

होतें ? दुष्ट शब्दाला दुरस्भाव, द्रविणाला द्रविणस्, वृषाला वृषण्भाव व रिष्ट याला रिषण्भाव निपातनानें होतो. भाषेंत दुष्टीयति, द्रविणीयति, वृषीयति व रिष्टीयति अशी रूपें होतात.

'क्याच्छन्दसि' ।३।२।१७० यानें वेदांत उ होतो; भाषेंत होत नाहीं.

(३५९०) अश्वाघस्यात् ।७।४।३७

अश्व अघ एतयोः क्यचि आत्स्याच्छन्दसि । अश्वायन्तो मघवन् । (ऋ.७।३२।२३) **मा त्वा वृका अघायवः।** (वासं. ४।३४) **' नच्छन्दसि ' इति निषेधो नेत्वमात्रस्य किंतु दीर्घस्यापीति । अत्रेदमेव सूत्रं ज्ञापकम् ।**

अश्व आणि अघ या शब्दांतील शेवटच्या अकाराला वेदामध्यें क्यच् पुढें असता दीर्घ आकार होतो. उदा० 'अश्वायन्तो मघवन् ', ' मा त्वा वृका अघायवः '; 'अघायु ' शब्द ऋग्वेदांत (१।१२०।७, २७, ३) यांत आढळतो.

या सूत्रावरून असा निष्कर्ष निघतो की (हें सूत्र त्याचें ज्ञापक आहे.) या दोन शब्दांशिवाय इतर शब्दातील अंत्य अकाराला क्यच् पुढें असता दीर्घ होत नाहीं. ' नच्छन्दसि० ' यानें केवळ ईत्व होत नाहीं एवढेंच नव्हे तर दीर्घहि होत नाहीं. दीर्घ झाला असता तर आत्व सांगण्याची आवश्यकता नव्हती. अश्वायन्तः व अघायवः येथें आकार झाला. ' अघायु ' येथें ' क्याच्छन्दसि ' यानें उ होऊन ' अघायु ' रूप होतें. वेदामध्यें परेच्छा असतांना सुद्धां क्यच् होतो. 'छन्दसि परेच्छायां क्यच् '। भाषेत मात्र स्वेच्छा असताना होतो. पहा. ' सुप आत्मनः क्यच् ' ।३।१।८

(३५९१) देवसुम्नयोर्यजुषि काठके ।७।४।३८

अनयोः क्यचि आत्स्याद्यजुषि कठशाखायाम् । देवायन्तो यजमानाः । (तु. तैसं.३।५।५।३) **सुम्नायन्तो हवामहे ।**(ऋ. ८।७।११) **इह यजुःशब्दो न मन्त्रमात्रपरः किंतु वेदोपलक्षकः । तेन ऋगात्मकेऽपि मन्त्रे यजुर्वेदस्थे भवति । किं च ऋग्वेदेऽपि भवति ।**

स चेन्मन्त्रो यजुषि कठशाखायां दृष्टः । यजुषीति किम् । देवाञ् जिगाति सुम्नयुः । (ऋ. ३।२७।१) **बह्वृचानामप्यस्ति कठशाखा ततो भवति प्रत्युदाहरणमिति हरदत्तः ।**

यजुर्वेदांतील काठकांत (काठक शाखेंत) क्यच् पुढें असताना देव आणि सुम्न यांतील शेवटच्या अकाराला आकार होतो. उदा० ' देवायन्तो यजमानाः ', ' सुम्नायन्तो हवामहे. ' देव व सुम्न या शब्दांच्या अकाराला आकार होतो. सूत्रांतील ' यजुस् ' शब्द केवल मंत्रपर नसून त्यानें ऋग्वेदाचाही बोध होतो. त्यामुळें ऋग्वेदाच्या मंत्राला जर तो मंत्र यजुर्वेदांत कठशाखेंत असेल तर, त्यालाही प्रस्तुत सूत्र लागू पडतें. ' यजुषि ' म्हटल्यानें ' देवाञ् जिगाति सुम्नयुः ' येथें ' सुम्नयुः ' असें रूप होतें. पदमंजरीकार हरदत्ताच्या मतें हें प्रत्युदाहरण ऋग्वेदाच्या कठशाखेंतून घेतलें आहे कारण ऋग्वेदाची कठशाखा आहे. ' काठके ' म्हटल्यानें इतर शाखांमध्यें ' सुम्नयुरिदमासीत् ' असाच प्रयोग होतो. आत्त्व होत नाहीं.

(३५९२) कव्यध्वरपृतनस्यर्चि लोपः ७।४।३९

एषामन्त्यस्य लोपः स्यात् क्यचि ऋग्विषये । स पूर्वया निविदा कव्यतायोः । (ऋ. १।९६।२) **अध्वर्युं वा मधुपाणिम् ।** (ऋ. १०।४१।३) **दमयन्तं पृतन्युम् ।** (ऋ. ७।६।४) **' दधातेर्हिः ।' ' जहातेश्च क्त्वि ।'**

ऋचेमध्यें क्यच् प्रत्यय पुढें असतांना कवि, अध्वर आणि पृतना या शब्दांतील शेवटच्या वर्णाचा लोप होतो. उदा० ' स पूर्वया निविदा कव्यतायोः ', 'अध्वर्युं वा मधुपाणिम् ', 'दमयन्तं पृतन्युम् '; 'कव्यतायोः'; यांत कवि शब्दाहून क्यच् झाला असता इकाराचा लोप होतो. तसेंच ' अध्वर '-पासून ' अध्वर्यु ' व पृतनापासून ' पृतन्यु ' रूपें बनतात. अध्वर्यु व पृतन्यु' येथें 'क्याच्छन्दसि' यानें उकार होतो. 'दधातेर्हिः' ।७।४।४२ यानें धा

धातूला तकारादि कित् प्रत्यय पुढें असता ‘ हि ’ आदेश सांगितला आहे व ‘ जहातेश्च क्त्वि ’ ।७।४।४३ यानें ‘ हा ’ (जहाति) याला क्त्वा-प्रत्यय पुढें असता ‘हि’ आदेश सांगितला पण--

(३५९३) विभाषा छन्दसि ।७।४।४४

हित्वा शरीरम् । हीत्वा वा । (शौ. ४।११।६)

‘ ओहाक् त्यागे ’ या ‘ हा ’ धातूपुढें क्त्वा प्रत्यय असता वेदामध्यें ‘हि’ असा आदेश विकल्पानें होतो. उदा० ‘ हित्वा शरीरं यातव्यम् ’ किंवा ‘ हीत्वा ’; ‘ हि ’ आदेश होत नाहीं तेव्हां ‘ घुमास्था० ’ ।६।४।६२ यानें ईत्व होतें. क्वचित् ‘हात्वा’ असा पाठ आहे. तेथें छान्दसत्वात् ‘घुमास्था०’ यानें ईत्व होत नाहीं असें समजावे.

(३५९४) सुधित वसुधित नेमधित धिष्व धिषीय च ।७।४।४५

सु वसु नेम एतत्पूर्वस्य दधातेः क्तप्रत्यये इत्वं निपात्यते । गर्भं माता सुधितं वक्षणासु । (ऋ. १०।२७।१६) **वसुधितमग्नौ ।** (तु ऋ.१।१२८।८) **नेमधिता न पौंस्या ।** (ऋ.१०।९३।१३) **क्तिन्यपि दृश्यते । उत श्वेतं वसुधितिं निरेके ।** (ऋ. ७।९०।३) **धिष्व वज्रं दक्षिण इन्द्र हस्ते ।** (ऋ. ६।२२।९) **धत्स्वेति प्राप्ते । सुरेता रेतो धिषीय ।** (तैसं. १।६।४।४) **आशीर्लिङ इट् । ‘इटोऽत्’ । धासीयेति प्राप्ते । ‘ अपो भि ’ । (वा.) ‘ मासश्छन्दसीतिवक्तव्यम् ’ । ‘माद्भिः । शरद्भिः ’ ।** (ऋ. २।२४।५) **(वा.) ‘ स्ववस्स्वतवसोरुषसश्चेष्यते ’ । स्ववद्भिः । अवतेरसुन् । शोभनमवो येषां ते स्ववसस्तैः । ‘तु’ इति सौत्रो धातुस्तस्मादसुन् । स्व तवो येषां तैः स्वतवद्भिः ।** (तु. शब्रा. काण्व १।४।३।१२) **समुषद्भिरजायथाः ।** (ऋ. १।६।३) **मिथुनेऽसिः । वसेः किच्चेत्यसिप्रत्यय इति हरदत्तः । पञ्चपादीरीत्या तु उषः किदिति प्राग् व्याख्यातम् । ‘ न कवतेर्यङि’ ।**

सु, वसु आणि नेम हे शब्द उपपद असतांना धा धातूहून क्त प्रत्यय करून सुधित, वसुधित व नेमधित असे शब्द क्त प्रत्ययाला इत्वाचें निपातन करून केलें जातात. म्हणजे वेदामध्यें त्यांना ' दधातेर्हिः ' ।७।४।४२ यानें ' हि ' आदेश होत नाहीं. त्याच धा धातूच्या लोटाचें मध्यमपुरुषी एक-वचनाचें जें ' धत्स्व ' असें रूप होतें आणि आशीर्लिङाच्या आत्मनेपदी उत्तमपुरुषी एकवचनाचें जे ' धासीय ' असें रूप होतें त्यांच्याऐवजी वेदा-मध्यें ' धिष्व ' व ' धिषीय ' अशीं रूपें अनुक्रमें निपातित केलीं जातात.

उदा० 'गर्भं माता सुधितम् वक्षणासु' येथें 'सुहितम्' न होता 'सुधितम्' होतें. ' वसुधितमग्नौ जुहोति '--' वसुहितम् ' होत नाहीं. पदमंजरीकार हरदत्ताच्या मतें ' वसुधितम् ' हा कर्मधारय समास आहे. पण वेदभाष्यांत ' वसूनां धातारं प्रदातारम् ' असा अर्थ केला आहे. वेंदामध्यें क्तिन् प्रत्यय करून 'वसुधिति' असेंही रूप आढळतें. उदा० 'उत श्वेतं वसुधितिं निरेके '; ' नेमधिता न पौंस्या '-' नेमहिता ' होत नाहीं. नेम म्हणजे अर्धा; ' नेम-धिता ' हाही कर्मधारय समास आहे. ' धिष्व वज्रं दक्षिण इन्द्र हस्ते ' येथें ' धत्स्व ' न होता ' धिष्व ' होतें.

' सुरेता रेतो धिषीय '--यांतील ' धिषीय ' रूप धा धातूचें आत्म-नेपदी आशीर्लिङाचें उत्तमपुरुष एकवचन आहे. भाषेंत ' धासीय ' होतें.

' इटोऽत् ' ।३।४।१०६ यानें आशीर्लिङाच्या 'इट्' प्रत्ययाला ह्रस्व अकार होतो. ' धासीय ' रूप प्राप्त झालें होतें.

' अपो भि ' ।७।४।४८ यानें अकारादि विभक्ति प्रत्यय पुढें असता अप् शब्दाच्या पकाराला तकार होतो. पण वेंदामध्यें--

(वा.) ' मास शब्दांतील अंत्य वर्णालाहि तकार होतो असें म्हणावें'. उदा० माद्भिः--येथें ' पद्दन्नोमास्० ' ।६।१।६३ यानें ' मास ' शब्दाला मास् आदेश होतो. नंतर अंत्य सकाराला तकार झाल्यावर 'माद्भिः शरद्भिः' असें रूप होतें.

(इष्टि) ‘स्वव , स्वतवस् आणि उषस् यांतील अंत्यवर्णाला तकार होतो.’ उदा० स्ववद्भिः; ‘स्ववस्’ (जो चांगलें रक्षण करतो) हें रूप सुपूर्वक अव् धातूहून उणादि असुन् (अस्) प्रत्यय करून साधलें आहे. (पहा--ऋग्वेद १।३५।१०)

‘स्वतवस्’ हें रूप स्वपूर्वक ‘तु’ या सौत्र धातूहून असुन् करून साधलें आहे. त्याचा अर्थ ‘धनवान्’ असा होतो. उदा० स्वतवद्भिः ‘स्व तवो (धनं) येषां ते’ (पहा --‘स्वतवान् पायौ।’ ८।३।११); उषस् याचें उषद्भिः होतें. उदा० ‘समुषद्भिरजायथाः’; ‘उषस्’ येथें वस् धातूहून असि प्रत्यय होतो व तो कित् समजला गेल्यानें संप्रसारण होऊन रूप बनतें असें हरदत्ताचें मत आहे पण ‘मिथुनेऽसिः’ ‘वसेः कित्’ असे उणादि सूत्र सध्याच्या पंचपादी उणादि सूत्रांत नसून तें ‘उषः कित्’ (उणादि ६७३) असें आहे व त्याप्रमाणें या सर्व शब्दांची व्युत्पत्ति मागे देण्यात आलीच आहे. ‘वसेः कित्’ हें सूत्र नष्ट झालेल्या दशपादी उणादि सूत्रांत असण्याचा संभव आहे. ‘न कवतेर्यङि’ ।७।४।६३ यानें कु धातूच्या अभ्यासाला यङ पुढें असता चुत्व होत नाहीं असे सांगितलें. पण वेदामध्यें कृष् धातूच्या अभ्यासालाही तें पुढील सूत्रानें होत नाहीं--

(३५९५) कृषेश्छन्दसि ।७।४।६४

यङि अभ्यासस्य चुत्वं न। करीकृष्यते।

वेदामध्यें कृष् धातूच्या अभ्यासातील ककाराला यङ पुढें असतां चुत्व होत नाहीं. ‘कुहोश्चुः’ ।७।४।६२ यानें तें प्राप्त झालें होतें.

उदा० ‘करीकृष्यते यज्ञकुणपः’; भाषेंत ‘चरीकृष्यते कृषीवलः’ असा प्रयोग होतो.

(३५९६) दाधर्ति दर्धर्ति दर्धर्षि बोभूतु तेतिक्तेऽलर्ष्यापनीफणत्संसनिष्यदत्करिक्रत्कनिक्रदद्भरिभ्रद्दवि-

ध्वतोदविद्युतत्तरित्रतः सरीसृपतं वरीवृजन्मर्मृज्याऽऽगनीगन्तीति च ।७।४।६५

एते अष्टादश निपात्यन्ते । आद्यास्त्रयो धृङो धारयतेर्वा । भवतेर्यङलुगन्तस्य गुणाभावः । तेन भाषायां गुणो लभ्यते । तिजेर्यङलुगन्तात्तङ् । इयर्तेर्लटि हलादिः शेषापवादो रेफस्य लत्वमित्वाभावश्च निपात्यते । अलर्षि युध्म खजकृत्पुरन्दरम् । सिपा निर्देशो न तन्त्रम् । अलर्ति दक्ष उत । फणतेराङ्पूर्वस्य यङलुगन्तस्य शतरि अभ्यासस्य नीगागमो निपात्यते । अन्वा पनीफणत् । स्यन्देः संपूर्वस्य यङलुकि शतरि अभ्यासस्य निक् । धातुसकारस्य षत्वम् । करोतेर्यङलुगन्तस्याभ्यासस्य चुत्वाभावः । क्रन्देर्लुङि च्लेरङ् द्विर्वचनमभ्यासस्य चुत्वाभावो निगागमश्च । कनिक्रदज्जनुषम् । अक्रन्दीदित्यर्थः । बिभर्तेरभ्यासस्य जश्त्वाभावः । वि यो भरिभ्रदोषधीषु । ध्वरतेर्यङलुगन्तस्य शतरि अभ्यासस्य विगागमो धातोर्ऋकारलोपश्च । दविध्वतो रश्मयः सूर्यस्य । द्युतेरभ्यासस्य संप्रसारणाभावोऽत्वं विगागमश्च । दविद्युतद्दीद्यच्छोशुचानः । तरतः शतरि श्लौ अभ्यासस्य रिगागमः । सहोर्जा तरित्रतः । सृपेः शतरि श्लौ द्वितीयैकवचने रीगागमोऽभ्यासस्य । वृजः शतरि श्लावभ्यासस्य रीक् । मृजेर्लिटि णल् अभ्यासस्य रुक् धातोश्च युक् । गमेराङ्पूर्वस्य लटि श्लावभ्यासस्य चुत्वाभावो नीगागश्च । वक्ष्यन्ती वेदागनीगन्ति कर्णम् ।

दाधर्ति, दर्धर्ति (ऋ. ५।८४।३), दर्धर्षि, (ऋ. ५।८४।३) बोभूतु (तु. शौ ५।७।८), तेतिक्ते, (ऋ. ४।२३।७), अलर्षि, (ऋ. ८।१।७–४।४८।८), आपनीफणत्, (४।४०।४), संसनिष्यदत्, (वास. ९।१४), करिक्रत, (ऋ.१।१३१।३), कनिक्रदत्, (ऋ. २।४२।१),

भरिभ्रत्, (ऋ. २।४।४), दविध्वतः (ऋ. ४।१३।४), दविद्युतत्, (ऋ. ७।१०।१), तरित्रतः; (४।४०।३), सरीसृपतम्, वरीवृजत्, (ऋ. ७।२४।४), मर्मृज्य, (ऋ. ९।४७।४), आगनीगन्ति (ऋ. ६।७५।३) या अठरा रूपांचें वेदामध्यें निपातन होतें.

त्यांपैकीं पहिली तीन दार्धर्ति, दर्धर्ति, व दर्धर्षि रूपें 'धृञ् धारणे' पासून (भ्वादि) किंवा 'धृङ अवस्थाने' (तुदादि) याच्या णिजन्ताच्या यङलुकाचीं आहेत. अभ्यासाला दीर्घ व णि प्रत्ययाचा लोप निपातनानें होतो. परस्मैपदही निपातनानें होतें. 'क्षमया दर्धर्ष्योजसा'

'धृ'याचें ण्यन्त '–' धारयति ' असें घेतल्यास श्लु, णिलुक्, अभ्यास दीर्घ आणि रुगागम होतात. 'दर्धर्षि' हें यङलुकाचें रूप घेतल्यास येथें कशाचेच निपातन करावें लागत नाहीं. परंतु श्लुचें होतें. 'दर्धर्ति' येथें रुगामगमाचें निपातन होतें. दार्धर्ति येथें रुक् आगम होत नाहीं.

'बोभूतु'--हें भू धातूच्या यङलुगन्ताचें लोटाचें रूप आहे. 'भूसुवोस्तिङि' ।७।३।८८ यानें गुणनिषेध सिद्ध असतां ज्या अर्थी पुनः गुणाभावाचे निपातन केलें आहे त्यावरून असें सिद्ध होतें कीं अन्यत्र म्हणजे भाषेंत यङलुगन्तात गुणनिषेध होत नाहीं. म्हणून भषेंत बोभोति, बोभवीति अशी रूपें होतात. पहा--' उत नग्ना बोभुवीति स्वप्नया सचसे जनम्' ।

'तेतिक्ते'--तिज् धातूच्या यङलुगन्ताचें रूप असून आत्मने-पदाचें निपातन होतें. परंतु यङ हा ङित् असल्यानें आत्मनेपद सिद्धच होतेच. त्यावरून असे सिद्ध होतें की यङलुगन्ताशिवाय तिज् धातूहून आत्मनेपदी प्रत्यय होत नाहींत. पहा–' तेतिक्ते तिग्मा तुजसे अवीका'।

'अलर्षि'--' ऋ गतौ ' (इयर्ति) याचें लटाचें रूप आहे. सिप् प्रत्यय केल्यावर 'हलादिः शेषः' ।७।४।६० यानें रेफाचा लोप न होता त्याला लत्वाचें निपातन होतें. त्याप्रमाणें 'अर्तिपिपर्त्योश्च' ।७।४।७७ यानें होणाऱ्या इत्वाचा निषेधहि निपातनानें होतो. सूत्रांत 'अलर्षि' असा सिप् प्रत्यययुक्त निर्देश असला तरी तो अतंत्र म्हणजे अविवक्षित आहे.

त्यामुळें तिप् पुढें असताही 'अर्लति' असें रूप होतें. उदा० 'अर्लर्षि युध्म खजकृत्पुरन्दरम्'; 'अर्लति दक्ष उत';

'**आपनीफणत्**'-- आङ्पूर्वक फण् धातूच्या यङ्लुगन्ताहून शतृ प्रत्यय होतो. अभ्यासाला नीक् आगमाचें निपातन होतें.

'**संसनिष्यदत्**'-सम्पूर्वक स्यन्द् धातूच्या यङ्लुगन्ताहून शतृ प्रत्यय करून रूप साधलें आहे. अभ्यासाला निक् आगम व धातूच्या सकाराला षत्व निपातनानें होतात. सूत्रांत जरी सम्पूर्वक स्यन्द् धातूचा निर्देश असला तरी अन्य उपसर्गपूर्वक असतानाही असें रूप आढळतें. उदा० 'आसनिष्यत्'; पहा--'ऋतुं दधिक्रा अनु संसनिष्यदत्'।

'**करिक्रत्**'-कृ धातूच्या यङ्लुगन्ताहून शतृ प्रत्यय होतो. परंतु 'कुहोश्चुः' ७।४।६२ यानें होणारें चुत्व निपातनानें होत नाहीं. तसेच अभ्यासाला रिक् आगम निपातनानें होतो. 'आविष्करिक्रद् । वृषणम'।

'**कनिक्रदत्**'--क्रन्द् धातूपुढें लुङ् असता च्लिला अङ् आदेश, द्विर्वचन, अभ्यासाला चुत्वाचा अभाव व निक् आगम निपातनाने होतात. उदा० 'कनिक्रदज्जनुषम्'; भाषेमध्यें 'अक्रन्दीत्' होतें.

भरिभ्रत्-- भृ (बिभर्ति) याच्या यङ्लुगन्ताहून शतृ प्रत्यय करून रूप साधलें आहे. 'भृञामित्' ।७।४।७६ यानें होणाऱ्या इत्वाचा अभाव, जश्त्वाभाव व अभ्यासाला रिक् आगम निपातनानें होतात. उदा० 'वि यो भरिभ्रदोषधीषु' (ऋग्वेद ।२।४।४)

दविध्वतः-ध्वर् धातूच्या यङ्लुगन्ताहून शतृ प्रत्यय केला असता प्र. ब. व. प्रत्यय जस् पुढें असता हें रूप होतें. येथें अभ्यासाला विक् आगम व ऋकाराचा लोप निपातनानें होतात. येथें 'नाभ्यस्ताच्छतुः' ।७।१।७८ यानें 'उगिदचाम्०' ।७।१।७० यानें सांगितलेला नुम् होत नाहीं. उदा० "दविध्वतो रश्मयः सूर्यस्य';

दविद्युतत्--द्युत् धातूच्या यङ्लुगन्ताहून शतृ प्रत्यय केला असता रूप सिद्ध होतें. अभ्यासाला संप्रसारणाचा अभाव, अत्व व विक् आगम यांचें निपातन होतें. ' द्युतिस्वाप्योः संप्रसारणम् ' ।७।४।६७ यानें संप्रसारण प्राप्त झालें होतें. उदा० ' दविद्युतद्दीद्यच्छोशुचानः ';

तरित्रतः--तॄ धातूहून शतृ प्रत्यय, 'श्लु' श्लौ यानें द्वित्व, अभ्यासाला रिक् आगम निपातनानें होतात. ' तरित्रतः ' हें षष्ठी एकवचन आहे. उदा० ' सहोर्जा तरित्रतः ';

सरीसृपतम्--सृप् धातूहून शतृ, 'श्लु,' श्लौ यानें द्विर्वचन, अभ्यासाला रीक् आगम निपातनानें होतात. हें रूप द्वितीयेच्या एकवचनाचें आहे.

वरीवृजत्--वृज् धातूहून शतृ केला असता 'श्लु' व ' श्लौ ' यानें द्विर्वचन व अभ्यासाला रीक् आगम निपातनानें होतात. वरीवृजत् स्थविरेभिः '।

मर्मृज्य--मृज् धातूहून लिट् व नंतर णल् आदेश करून रूप सिद्ध होतें. अभ्यासाला रुक् आगम व धातूला युक् आगमाचें निपातन होतें. त्यामुळें लघूपधत्व नसल्यानें ' मृजेर्वृद्धिः ' ।७।२।११४ यानें वृद्धि होत नाहीं.

आगनीगन्ति--आङ्पूर्वक गम् धातूहून लट् केला असता श्लु होतो. ' श्लौ ' यानें द्विर्वचन केल्यावर अभ्यासाला ' कुहोश्चुः ' ।७।४।६२ यानें सांगितलेल्या चुत्वाचा अभाव व नीक् आगम निपातनानें होतात. उदा० ' वक्ष्यन्ती वेदागनीगन्ति कर्णम् ';

टीप--सूत्रांतील ' इति ' शब्दानें अशा प्रकारच्या अन्य रूपांचाही संग्रह होतो. रूप सिद्ध करतांना जेथें सूत्र प्रवृत्त होत नाहीं तें सर्व निपातनानें घडवून आणता येतें. ' अत्र च यल्लक्षणेनानुपपन्नं तत्सर्वं निपातनात्सिद्धम् ' (काशिका)

(३५९७) ससूवेति निगमे ।७।४।७४

सूतेर्लिटि परस्मैपदं वुगागमोऽभ्यासस्य चात्वं निपात्यते । गृष्टिः ससूव स्थविरम् । (ऋ.४।१८।१०) सुषुवे इति भाषायाम् ।

अदादि गणांतील सू धातूचें लिट् प्रत्यय करून 'सुषुवे' असें जें रूप लोकांत होतें त्याच्याऐवजीं वेदामध्यें 'ससूव' असें निपातनानें होतें. परस्मैपद, वुक् आगम व अभ्यासाला अत्व यांचें निपातन होतें. वस्तुतः 'दाधर्ति' इत्यादि सूत्रांत यांचें पठन केलें असते तर लाघव साधलें असतें. उदा० 'गृष्टिः ससूव स्थविरेम';

(३५९८) बहुलं छन्दसि ।७।४।७८

अभ्यासस्य इकारः स्याच्छन्दसि । पूर्णा विवष्टि । (ऋ. ७।१६।११) वशेरेतद्रूपम् ।

इति सप्तमोऽध्यायः ।

शपाचा श्लु झाला असता अभ्यासातील अचाला ह्रस्व इकारादेश वेदामध्यें बाहुल्येंकरून होतो. उदा० 'पूर्णा विवष्टि': 'विवष्टि' हें 'वश कान्तौ' धातूचें रूप आहे. वश्, धातूहून लट्, तिप् शपाला श्लु, 'श्लौ' यानें द्वित्व, अभ्यासाला इत्व व 'व्रश्च०' ।८।२।३६ इत्यादि सूत्रानें शकाराला षत्व होतें व नंतर ष्टुत्व होतें.

याप्रमाणें 'वैदिकी प्रक्रिया' प्रकरणांतील सातव्या अध्यायांतील सूत्रांचा मराठी 'बालबोधिनी' टीकेसह अनुवाद समाप्त झाला.

अष्टमोऽध्यायः ।

(३५९९) प्रसमुपोदः पादपूरणे ।८।१।६

एषां द्वे स्तः पादपूरणे । प्र प्रायमग्निः । (ऋ. ७।८।४) **संसमिद्युवसे ।** (ऋ. १०।१९१।१) **उपोप मे परामृश ।** (ऋ. १।१२६।७) **किं नोदुदु हर्षसे ।** (ऋ. ४।२१।९)

वेदामध्यें प्र, सम्, उप आणि उद् यांपैकीं कोणालाहि पादपूर्तीसाठीं म्हणजे पादांतील अक्षरसंख्या पूर्ण होत असेल तर द्विर्वचन होतें. उदा० ' प्र प्रायमग्निः '--' संसमिद्युवसे '--' उपोप मे परामृश '-- ' किं नोदुदु हर्षसे ' या उदाहरणांतून प्र, सम्, उप व उद् यांना द्विर्वचन झालें आहे. ' प्रसमुपोदः '--हा समाहारद्वंद्व आहे. समासान्तविधि अनित्य आहे अशी परिभाषा असल्यानें येथें ' द्वन्द्वाच्चुद० ' ।५।४।१०६ यानें टच् समासान्त होत नाहीं.

(३६००) छन्दसीरः ।८।२।१५

इवर्णान्ताद्रेफान्ताच्च परस्य मतोर्मस्य वः स्यात् । हरिवते हर्यश्वाय (ऋ. ३।५२।७) **गीर्वान् ।**

वेदामध्यें इकारान्त किंवा रेफान्त शब्दाच्या पुढील मतुप् प्रत्ययाच्या मकाराला वकार होतो. उदा० 'हरिवते हर्यश्वाय '; रैफान्ताचें उदाहरण— गीर्वान् ; हरयो विद्यन्ते यस्य स हरिवान्. तसेंच गीः विद्यते यस्य स गीर्वान्. ' र्वोरुपधाया दीर्घ इकः ' ।८।२।७६ याने गिर् यांतील इकाराला दीर्घ होतो.

(३६०१) अनो नुट् ।८।२।१६

अन्नन्तान्मतोर्नुट् स्यात् । अक्षण्वन्तः कर्णवन्तः । (ऋ. १०।७१।७) **अस्थन्वन्तं यदनस्था ।** (ऋ. १।१६४।४)

वेदामध्यें अन् अंतीं असलेल्या शब्दापुढील मतुप् प्रत्ययाच्या मकाराला वेदामध्यें वकार होतो. उदा० ' अक्षण्वन्त: कर्णवन्त: सखाय: ' ' अस्थन्वन्तं यदनस्था बिभर्ति ';

टीप——हा नुट् पराच्या आदीला होतो. ' अक्षण्वन्त: ' हें रूप अक्षि शब्दाहून मतुप् केल्यावर ' अस्थिदधि० ' ।७।१।७५ याने होणारा अवङ ' छन्दस्यपि दृश्यते ' ।७।१।७६ याने होतो व अक्षि याचें ' अक्षन् ' होतें. आता नुट् असिद्ध असल्यानें नलोप केल्यावर भूतपूर्वगत्या नुटाच्या नकाराला णत्व होतें.

(३६०२) नाद् घस्य ।८।२।१७

नान्तान् परस्य घस्य नुट् । सुपथिन्तर: । (वा.) 'भूरिदाव्नस्तुड् वाच्य: ' । भूरिदावत्तरो जन: । (ऋ. ८।५।३९) **(वा.) ईद्रथिन: ' । रथीतर: ।** (ऋ. १।८४।६) **रथीतमं रथीनाम् ।** (ऋ. १।११।१)

वेदामध्यें नकारान्त शब्दाच्या पुढील घसंज्ञक प्रत्ययाला (तरप् व तमप्) नुट् आगम होतो. उदा० ' सुपथिन्तर: '; सुपथिन् शब्दाहून ' द्विर्वचनविभज्योपपदे० ' ।५।३।५७ यानें तरप् प्रत्यय होऊन नलोप झाल्यावर त्याला नुट् आगम होतो व नंतर अनुस्वार व परसवर्ण होतात.

(वा.) ' भूरिदावन्' शब्दाच्या पुढील घसंज्ञक प्रत्ययाला तुट् असा आगम होतो असें म्हणावें ' उदा० ' भूरिदावत्तरो जन: '; भूरिदावन् येथें ' आतो मनिन्० ।३।२।७४ यानें दा धातूहून वनिप् केल्यावर तदन्ताहून तरप् होऊन ' नलोप: प्रातिपादिकान्तस्य ' ।८।२।७ यानें नलोप होतो. तुडागम होऊन रूप सिद्ध होतें.

(वा.) ' घसंज्ञक प्रत्यय पुढें असता रथिन् शब्दाच्या नकाराला ईकार आदेश होतो असें म्हणावें. उदा०' रथीतर:'; 'रथीतमं रथीनाम् '; रथीतर: रथ शब्दाहून ' अत इनिठनौ ' ।५।२।११५ यानें मत्वर्थीय इनि केल्यावर

तदन्ताहून तरप् होतो. नकारलोप झाल्यावर इकाराला दीर्घ ईकार होतो.

(३६०३) नसत्तनिषत्तानुत्तप्रतूर्तसूर्तगूर्तानि छन्दसि । ८।२।६१

सदेर्नञ्पूर्वान्निपूर्वाच्च निष्ठायां नत्वाभावो निपात्यते । नसत्तमञ्जसा । निषत्तमस्य चरतः । असन्नं निषण्णमिति प्राप्ते । उन्देर्नञ्पूर्वस्यानुत्तम् । प्रतूर्तमिति त्वरतेः, तुर्वीत्यस्य वा । सूर्तमिति सृ इत्यस्य । गूर्तमिति गूरी इत्यस्य ।

नसत्त, निषत्त, (ऋ. १।१४६।१) अनुत्त (ऋ. १।१६५।९) प्रतूर्त, (वास. ११।१२) सूर्त, (ऋ. १०।८२।४) आणि गूर्त (ऋ. ४।१९।८) या शब्दांचें वेदामध्यें निपातन केलें आहे. उदा० 'नसत्तमञ्जसा'; भाषेमध्यें 'नसत्तम्' ऐवजीं 'असन्नम्' होतें. नसत्त--नञ्-पूर्वक सद् धातूच्या पुढील निष्ठातकाराला नत्वाचा अभाव निपातनानें होतो. 'रदाभ्याम्०' ।८।२।४२ याने नत्व प्राप्त झालें होतें. 'निषत्तमस्य चरतः' निषत्त--निपूर्वक सद् धातूच्या पुढील क्त प्रत्ययाच्या तकाराला पूर्ववत् नत्वाचा अभाव निपातनानें होतो. भाषेंत 'निषण्ण' रूप होतें. अनुत्त-नञ्-पूर्वक उन्द् धातूच्या पुढील क्त प्रत्ययाच्या तकाराला 'नुदविदो०' ।८।२।५६ याने नत्वविकल्पाचा अभाव निपातनानें होतो. भाषेमध्यें 'अनुन्न' होतें. 'प्रतूर्त' येथें प्रपूर्वक त्वर् किंवा तुर्व् धातूच्या पुढील क्त प्रत्ययाच्या तकाराला नत्वाचा अभाव निपातनानें होतो. त्वर् धातु घेतल्यास 'ज्वरत्वर०' ।६।४।२० यानें ऊठ् होतो. 'तुर्वी हिंसायाम्' धातु घेतल्यास 'राल्लोपः' ।६।४।२१ यानें वकाराचा लोप होतो. सूर्त--सृ धातूच्या ऋकाराला उत्व आणि क्त प्रत्ययाच्या तकाराला नत्वाभाव निपातनानें होतात. 'गूर्त' येथें 'गूरी उद्यमने'--या गूरी (गूर्) धातूपुढील क्त यांतील तकाराला नत्वाचा अभाव निपातनानें होतो.

(३६०४) अम्नरूधरवरित्युभयथा छन्दसि ।८।२।७०

रुर्वा रेफो वा । अम्न एव । अम्नरेव । ऊध एव । ऊधरेव । अव एव । अवरेव ।

वेदामध्यें अम्नस्, (तै. सं. १।६।१०) ऊधस्, (ऋ. १।६४।५) आणि अवस्, (ऋ. १।८३।२) या शब्दांना रुत्वहि होतें आणि रेफादेशही होतो. उदा० अम्नएव किंवा अम्नरेव; येथें 'ससजुषो रुः' ।८।२।६६ यानें नित्य रुत्व प्राप्त झालें असतां एकदा रेफादेशाचे विधान केलें. अम्नस् शब्द ईषद् या अर्थी आहे. जेव्हां रुत्व होतें तेव्हा 'भोभगो०' ।८।३।१७ यानें रुला यत्व होऊन त्याचा 'लोपः शाकल्यस्य' ।८।३।१९ यानें लोप होतो. त्याप्रमाणें ऊधस् पासून 'ऊध एव' किंवा 'ऊधरेव' व अवस्पासून अव एव किंवा 'अवरेव' होतात. पहा—' तदाहुरम्ण एतानुद्वृत्य '।

(३६०५) भुवश्च महाव्याहृतेः ।८।२।७१

भुव इति । (तैउ.१।५) भुवरिति । (छांड. ४।१७।३)

महाव्याहृति असा जो भुवस् शब्द त्याच्या सकाराला वेदामध्यें रुत्व किंवा रेफादेश होतो. उदा० भुव इति किंवा भुवरिति;

टीप—महाव्याहृति एकंदर तीन असून (भूः, भुवः व सुवः) त्या पृथिवी, अन्तरिक्ष व स्वर्ग यांच्या वाचक आहेत. भुवस् हें अव्यय आहे. ' महाव्याहृति ' म्हटल्यानें ' भुवो विश्वेषु सवनेषु ' (ऋ. १०।५०।४) येथें सूत्र प्रवृत्त होत नाहीं. येथें 'भुवः' हें भू धातूचें वेदांतील लङाचे रूप आहे.

(३६०६) ओमभ्यादाने ।८।२।८७

ओंशब्दस्य प्लुतः स्यादारम्भे । ओ३म् अग्निमीळे पुरोहितम् । (ऋ. १।१।१) अभ्यादाने किम् । ओमित्येकाक्षरम् । (भगवद्गीता ८।१३)

प्रारंभद्योतक जो ओम् शब्द त्याला प्लुत होतो. उदा० ' ओ३म् अग्निमीळे पुरोहितम् ' (ऋग्वेद १।१।१) ' ओम् ' यांतील ' ओकाराला प्लुत होतो कारण तो प्रारंभद्योतक आहे. ' अभ्यादानें ' म्हटल्यानें ' ओमित्येकाक्षरं ब्रह्म ' किंवा ' ओमित्येतदक्षरमुद्गीथमुपासीत ' (छान्दोग्य उपनिषत् १।१।१) येथें प्लुत होत नाहीं कारण ' ओम् ' शब्द प्रारंभद्योतक नाहीं. अभ्यादान म्हणजे आरंभ–

(३६०७) ये यज्ञकर्मणि ।८।२।८८

ये ३ यजामहे । (तैसं.१।६।११) यज्ञ इति किम् । ये यजामहे ।

यज्ञकर्म चालू असतांना म्हणण्यांत येणाऱ्या मन्त्र, ब्राह्मण वगैरेतील ' ये ' या शब्दाला प्लुत होतो. उदा० ' ये ३ यजामहे '; ' यज्ञे ' म्हटल्यानें स्वाध्यायकालीं म्हणजे केवळ पठनकालीं ' ये यजामहे ' असाच प्रयोग होतो. ' ये देवासो दिव्येकादश स्थ ' (ऋ. १।१३९।११) येथेंहि प्लुत होत नाहीं.

(३६०८) प्रणवष्टेः ८।२।८९

यज्ञकर्मणि टेरोमित्यादेशः स्यात् । अपां रेतांसि जिन्वतो३म् । (ऋ. ८।४४।१६) टेः किम् । हलन्ते अन्त्यस्य मा भूत् ।

यज्ञकर्म चालू असता तेथें म्हणण्यांत येणाऱ्या मंत्र वगैरेच्या टिभागाच्या स्थानीं ' ओं ' किंवा ' ओ३म् ' आदेश होतो. उदा० ' अपां रेतांसि जिन्वति ' (ऋग्वेद ।८।४४।१६) याऐवजीं ' अपां रेतांसि जिन्वतो३म् ' असें म्हणावे. ' प्रणव ' म्हणजे काय ? ऋचेच्या पादाचे किंवा ऋचेच्या अर्धाचें जें शेवटलें अक्षर त्याला त्याच्यापुढील अवशिष्ट राहिलेल्या भागासकट जो आदेश म्हणून तीन मात्रांचा ओकार किंवा ओंकार होतो त्याला प्रणव असें म्हणतात (महाभाष्य)+

+ पादस्य वार्धर्चस्य वान्त्यमक्षरमुपसंहृत्य तदाद्यक्षरशेषस्य स्थाने त्रिमात्रमोकारं त्रिमात्रमोंकारं वा विदधति तं प्रणव इत्याचक्षते । (म. भा.)

सूत्रांत ' टेः ' म्हणण्याचें कारण असें कीं प्रणव आदेश होतो असें समजून जेव्हां आपण ओंकार आदेश करण्याचें मनांत आणू तेव्हां तो सर्व टिच्या स्थानीं झाला पाहिजे. ' ओम्' अनेकाल् असल्याने तो टिच्या स्थानीं सर्वादेश होईलच. नाहींतर 'ओ' आदेश ' अलोऽन्त्यस्य ' यानें अन्त्य व्यंजनाला होईल किंवा ' अचश्च ' ।१।२।२८ यानें टिभागापैकीं अचाला होईल. तसा होऊ नये म्हणून 'टेः' म्हटलें.

यज्ञकर्मांत पठन न होता स्वाध्यायकालांत होत असेल तर आदेश होत नाहींत.

(३६०९) याज्यान्ताः ।८।२।९०

ये याज्या मन्त्रास्तेषामन्त्यस्य टेः प्लुतो यज्ञकर्मणि । जिह्वामग्ने चकृषे हव्यवाहा ३ म् । (ऋ. १०।८।६) अन्तः किम् । याज्यानामृचां वाक्यसमुदायरूपाणां प्रतिवाक्यं टेः स्यात् । सर्वान्तस्य चेष्यते ।

यज्ञकर्म चालू असतांना तेथें म्हटले जाणारे जे ' याज्या ' नांवाचें मंत्र, त्यांच्या शेवटच्या टिभागाला प्लुत होतो. उदा० जिह्वामग्ने चकृषे हव्यवाहा३म् '; ' अन्ताः ' म्हटल्यानें असें कांहीं ' याज्या ' मंत्र आहेत कीं त्यामध्यें अनेक वाक्यें आहेत. अशा प्रत्येक वाक्यांतील टिभागाला प्लुत झाला असता तो होत नाहीं. ' अन्त ' म्हटल्यानें सर्व मंत्रांच्या अंत्य टिभागालाच प्लुत होतो.

टीप—' याज्याकाण्डे पठ्यन्ते ये मन्त्रा याज्यानुवाक्यकाण्डमिति समाख्यते—तत्रस्था इत्यर्थः '। (शेखर)

(३६१०) ब्रूहिप्रेष्यश्रौषड्वौषडावहानामादेः । ८।२।९१

एषामादेः प्लुतो यज्ञकर्मणि । अग्नयेऽनुब्रू३हि (मैसं. १।४।११) अग्नये गोमयानि प्रे३ष्य । (तु.शब्रा. ३।८।३।३४) अस्तु श्रौ३षट् । (तैसं. १।६।११।१) सोमस्याग्ने वीहि वौ३षट् । (ऐब्रा.३।५) अग्निमा३वह । (शब्रा.१।४।२।१६)

यज्ञकर्म चालू असता तेथें उपयोगांत आणिलेल्या ब्रूहि, प्रेष्य, श्रौषट्, वौषट् आणि आवह या शब्दांच्या आदीला प्लुत होतो. उदा० 'अग्नयेऽ-नुब्रू३हि'; 'अग्नये गोमयानि प्रे३ष्य'; 'अस्तु श्रौ३षट्'; 'सोमस्याग्ने वीहि वौ३षट्'; 'अग्निमा३वह'; 'आ वह देवान् यजमान (वासं.५।१२); येथें प्लुत होत नाही कारण वेदामध्यें सर्व विधी विकल्पानें होतात असें वचन आहे. तसेंच 'आ वह जातवेदः'; येथेंही समजावें. 'वौषट्' यांची सहा रूपें आहेत तीं येणेंप्रमाणें—वषट्, वौषट्, वोषट्, वौक्षट्, वौक्षाट् व वक्ष्वट्. 'वौषट्' इति एवंविधसर्ववषट्काराणामुपलक्षणमिति हरदत्तः' श्रौषट् ऐवजीं 'अस्तु स्व३धा' असें प्रत्याश्रावणांत होतें.

(३६११) अग्नीत्प्रेषणे परस्य च ।८।२।९२

अग्नीधः प्रेषणे आदेः प्लुतस्तस्मात् परस्य च । ओ३श्रा३वय । (मैसं. १।४।११)

यज्ञकर्म चालू असता तेथें अग्नीध नांवाच्या ऋत्विजाला प्रेष देताना अध्वर्यु जें वाक्य योजतो त्या वाक्याच्या आद्याक्षराला आणि त्याहून पुढच्या अर्थात् द्वितीय अक्षरालाहि प्लुत होतो. उदा० 'ओ३श्रा३वय';

टीप—यज्ञांत चार मुख्य ऋत्विज् असतात. अध्वर्यु, उद्गाता, होता व ब्रह्मा. यांच्या हाताखालीं काम करणारे प्रत्येकी तीन ऋत्विज् असतात. आग्नीध ऋत्विजाचे काम यज्ञिय अग्नि प्रज्वलित करणें हें होय. अध्वर्यूनें अग्नीध्राला आदेश देतांना (प्रेषण) वेदांत दोन्ही स्वर प्लुत होतात.

'अग्नीत्प्रेषणम्' हा 'अग्नीधः प्रेषणम्' असा समास आहे. इत-रत्र प्लुत होत नाहीं. उदा० 'अग्नीदग्नीन्विहर, बर्हिस्तृणीहि'; 'आ३-श्रा३वय' असाही प्रयोग होतो.

(३६१२) विभाषा पृष्टप्रतिवचने हेः ।८।२।९३

प्लुतः । अकार्षीः कटम् । अकार्षं हि ३ । अकार्षं हि । पृष्टेति किम् । कटं करिष्यति हि । हेः किम् । कटं करोति ननु ।

प्रश्नाला उत्तरादाखल दिलेल्या वाक्यांतील ' हि ' या शब्दाला प्लुत विकल्पानें होतो. उदा० अकार्षीः कटम् (कट केलास का ?) त्यावर उत्तरादाखल दिलेलें वाक्य ' अकार्षं हि ३ ' किंवा ' अकार्षं हि ' (होय. केला कीं.) ' हेः ' म्हटल्यानें ' कटं करोति ननु ' यांतील ' नु ' ला प्लुत होत नाहीं. ' पृष्ट ' म्हटल्यानें ' कटं करिष्यति हि ' या वाक्यांत ' हि ' याला प्लुत होत नाहीं. कारण हें विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर नाहीं तर केवळ कथन आहे.

(३६१३) निगृह्यानुयोगे च ।८।२।९४

अत्र यद्वाक्यं तस्य टेः प्लुतो वा । अद्यामावास्येत्यात्थ ३ । अमावास्येत्येवंवादिनं युक्त्या स्वमतात्प्रच्याव्य एवमनुप्रयुज्यते ।

एखाद्याचें मत युक्तिप्रयुक्तीनें खोडण्यानें त्याला अडवून अवहेलना बुद्धीनें (टोचून बोलण्याच्या हेतूनें) त्याच्या मताचा उल्लेख करण्या-दाखल जें वाक्य योजिलें जातें त्या वाक्याच्या टिभागाला प्लुत विकल्पानें होतो. उदा० ' अद्यामावास्येत्यात्थ ३ ' किंवा ' अद्यामावास्येत्यात्थ '; (आज अमावास्या आहे असें बोललास नाहीं का ?) असे म्हणणाऱ्याचे खंडन केल्यावर पुनः त्याच्याच मताचा उल्लेख–अवहेलनात्मक केला आहे. ' निग्रह ' म्हणजे दुसऱ्याच्या मताचें खंडन. ' अनुयोग ' म्हणजे खंडन केलेल्या वाक्याचा पुनरुच्चार. निगृह्य--निपूर्वक ग्रह् धातूचें ल्यबन्त. निग्रह करून अनुवाद करणें असा अर्थ होतो.

(३६१५) आम्रेडितं भर्त्सने ।८।२।९५

दस्यो ३ दस्यो ३ घातयिष्यामि त्वाम् । आम्रेडितग्रहणं द्विरुक्तोपलक्षणम् । चौर ३ चौर ३ ।

भर्त्सनद्योतक जें द्विर्वचन त्यांतील पूर्व आणि पर अशा दोन्ही भागांच्या टिभागाला प्लुत होतो. उदा० ' दस्यो ३ दस्यो ३ घातयिष्यामि त्वाम् '--' वाक्यस्य टेः० ' ।८।२।८२ याची अनुवृत्ति जरी या वाक्यांत येत असली तरी वाक्याच्या अन्त्याला प्लुत न होता आम्रेडिताला होतो. कारण ' वाक्यादेरेव पदस्य भर्त्सने द्वित्वविधानात् ;' सूत्रांतील 'आम्रेडित ' शब्द द्विरुक्ताचें उपलक्षण समजावें. त्यामुळें द्विरुक्त झालेल्या शब्दाच्या दोन्ही भागाना आलटून पालटून प्लुत होतो. + उदा० ' चौर ३ चौर '। किंवा ' चौर चौर ३ '; ' तस्य परमाम्रेडितम् ' ।८।१।२ यानें द्विरुक्त शब्दाच्या दुसऱ्या भागाला ' आम्रेडित' संज्ञा सांगितली आहे म्हणून वरील विधान उपलक्षण असल्याचें विधान केलें आहे. ' वाक्यादेरामन्त्रितस्य० ' ।८।१।८ यानें द्वित्व होतें.

+ ' भर्त्सने पर्यायेण ' असें भाष्यकारानें त्यासाठीं वार्तिक केले.

(३६१५) अङ्गयुक्तं तिङाकाङ्क्षम् ।८।२।९६

अङ्गेत्यनेन युक्तं तिङन्तं प्लवते। अङ्ग कूज ३, इदानीं ज्ञास्यसि जाल्म । तिङ किम् । अङ्ग देवदत्त मिथ्या वदसि । आकाङ्क्षं किम् । अङ्ग पच । नैतदपरमाकाङ्क्षति । भर्त्सन इत्येव । अङ्गाधीष्व, भक्तं तव दास्यामि ।

अङ्ग या शब्दानें युक्त असून दुसऱ्या अर्थाविषयीं साकांक्ष असलेलें जें तिङन्त त्याच्या टिभागाला भर्त्सन अर्थ गम्यमान असता प्लुत होतो. उदा० ' अङ्ग कूज ३, इदानीं ज्ञास्यसि जाल्म ' यांतील ' कूज ' हें ' कूज अव्यक्ते शब्दे ' या धातूचें लोटाचे म. पु. एकवचनाचें रूप आहे. यांतील ' अङ्ग ' शब्द रागानें उच्चारला आहे. ' अरे, तूं गुणगुणत आहेस पण याचें फल

तुला लवकरच समजेल !' असा भर्त्सनात्मक अर्थ आहे. 'कूजनफलमस्मिन्नेव क्षणे ज्ञास्यसि इत्यर्थः' (सुबोधिनी); 'कूज' पद तिङन्त आहे व अङ्ग शब्दानें युक्त आहे. म्हणून त्याच्या अंत्य वर्णाला प्लुत झाला. 'तिङ' म्हटल्यानें 'अङ्ग देवदत्त मिथ्या वदसि' यांत दोन वाक्यें आहेत. त्यापैकीं 'अङ्ग देवदत्त' हें एक असून तें 'मिथ्या वदसि' या वाक्याची आकांक्षा करतें. 'अङ्गशब्दोऽत्र अनुनये;' येथें अङ्गयुक्त तिङन्त नाहीं. 'आकाङ्क्षम्' म्हटल्यानें 'अङ्ग पच' यांत दुसऱ्या वाक्याची आकांक्षा नाहीं म्हणून 'पच' याचा अन्त्य प्लुत होत नाहीं. 'भर्त्सने' पदाची अनुवृत्ति असल्यानें 'अङ्गाधीष्व, भक्तं तव दास्यामि' (अरे बाबा, अध्ययन कर. मी तुला चांगले खावयास देईन.) या वाक्यांत भर्त्सना नाहीं म्हणून 'अधीष्व' हें तिङन्त 'अङ्ग' शब्दानें युक्त असून सुद्धां त्याचा अंत्य प्लुत होत नाहीं.

(३६१६) विचार्यमाणानाम् ।८।२।९७

वाक्यानां टेः प्लुतः । होतव्यं दीक्षितस्य गृहा ३ इ । न होतव्य३मिति । (तैसं. ६।१।४५) होतव्यं न होतव्यमिति विचार्यते । प्रमाणैर्वस्तुतत्त्वपरीक्षणं विचारः ।

कांहीं एक गोष्ट विचारण्याकरितां योजलेल्या वाक्यांच्या टिभागाला प्लुत होतो. उदा० 'होतव्यं दीक्षितस्य गृहा ३ इ'। न होतव्यम्' (दीक्षिताच्या घरीं यज्ञ करावा की नाहीं ?) हा विचार आहे. यांत 'गृहे' हें सप्तमी एकवचन आहे. यांतील 'ए' हा अ व इ मिळून झालेला स्वर असल्यानें 'एचोऽप्रगृह्यस्य०' ।८।२।१०७ यानें 'गृहे' यातील ए प्लुत झाल्यानें 'गृह' यांतील अकार प्लुत होतो. विचार म्हणजे प्रमाणांनीं वस्तुतत्त्वाचें परीक्षण करणें. एखाद्या विषयाची दोन टोकें (दोन बाजू) लक्षांत घेणें. 'कोटिद्वयस्पृग्विज्ञानं विचार इति कथ्यते'। (सुबोधिनी) 'इह तु विचार्यमाणार्थविषयत्वाद्वाक्यानि विचार्यमाणानि', (शेखर)

(३६१७) पूर्वं तु भाषायाम् ।८।२।९८

विचार्यमाणानां पूर्वमेव प्लवते । अहिर्नु ३ रज्जुर्नु । प्रयोगापेक्षं पूर्वत्वम् । भाषाग्रहणात्पूर्वयोगश्छन्दसीति ज्ञायते ।

कांहीं एक गोष्ट विचारण्याकरितां योजलेल्या वाक्यांपैकीं पहिल्या वाक्याच्या टिभागाला प्लुत होतो. मात्र त्या वाक्याचा प्रयोग लोकातील असावा, वेदांतील असू नये.

उदा० 'अहिर्नु ३ रज्जुर्नु' (सर्प आहे की रज्जु आहे ?) येथें विचारण्याकरिता योजलेलीं दोन वाक्यें आहेत. त्यापैकीं पहिल्या वाक्यांतील टि भागाला ('नु' ला) प्लुत होतो. सूत्रांत 'भाषायाम्' असल्यानें पूर्व सूत्र 'विचार्यमाणानाम्' हें वेदापुरतेंच आहे हें स्पष्ट आहे. पूर्व सूत्रानें सिद्ध असता प्रस्तुत सूत्र नियमार्थ आहे. सूत्रांतील 'तु' शब्द अर्थानें अवधारणार्थीं आहे.

(३६१८) प्रतिश्रवणे च । ८।२।९९

वाक्यस्य टेः प्लुतोऽभ्युपगमे प्रतिज्ञाने श्रवणाभिमुख्ये च । गां मे देहि भोः । हन्त ते ददामि ३ । नित्यः शब्दो भवितुमर्हति ३ । दत्त किमात्थ ३ ।

प्रतिश्रवण म्हणजे अंगीकार, प्रतिज्ञा व श्रवणाभिमुख्य. हे अर्थ गम्यमान असताना वाक्याच्या टि–भागाला प्लुत होतो. उदा० 'गां मे देहि भोः'; 'हन्त ते ददामि ३' (अहो, मला एक गाय द्या. हो. मी देईन.) येथें 'प्रतिज्ञान' शब्दाचा अर्थ वचन देणें असा आहे. 'नित्यः शब्दो भवितुमर्हति ३'; ('शब्द नित्य आहें' हें मी मानतो. हें तत्व कबूल करतो.) 'प्रतिज्ञान' शब्दाचा प्रतिज्ञा हा येथें दुसरा अर्थ आहे. 'दत्त किमात्थ ३ । (देवदत्ता, तूं काय म्हणतोस !) येथें 'प्रतिज्ञान' शब्दाचा अर्थ दुसऱ्याचें म्हणणें ऐकून घेणें असा आहे. म्हणजेच श्रवणाभिमुख्य अर्थ आहे. प्रतिपूर्वक श्रु

धातूचा अर्थ वचन देणें असा आहे. प्रतिज्ञान व प्रतिश्रव हे अर्थ असता 'प्रतिश्रवण' हा गतिसमास आहे. ' आभिमुख्य ' अर्थ असता हा ' लक्षणेनाभिप्रती० ' ।२।१।१४ यानें अव्ययीभाव आहे.

(३६१९) अनुदात्तं प्रश्नान्ताभिपूजितयोः ।८।२।१००

अनुदात्तः प्लुतः स्यात् । दूराद्धूतादिषु सिद्धस्य प्लुतस्यानुदात्तत्वमात्रमनेन विधीयते । अग्निभूत ३ इ ।पट ३ उ । अग्निभूते पटो–एतयोः प्रश्नान्ते टेरनुदात्तः प्लुतः । शोभनः खल्वसि माणवक ३ ।

प्रश्नाकरता योजलेल्या वाक्यांतील शेवटच्या पदाच्या टि--भागाला किंवा अभिपूजन या अर्थाचा बोध करण्याकरिता योजलेल्या वाक्याच्या टि–भागाला अनुदात्त असा प्लुत होतो. अभिपूजन म्हणजे स्तुति. या सूत्रानें प्लुत सांगितला नाहीं. मग कशाचें विधान केलें? ' दूराद्धूते च ' ।८।२।८४ यानें जें प्लुताचें विधान केलें त्याला उदात्त प्राप्त झाला असता या सूत्रानें अनुदात्तत्व सांगितले. अभिपूजित असा अर्थ असता ' दूराद्धूते च ' यानें प्लुत होतो. इतरत्र ' अनन्त्यस्यापि प्रत्याख्यानयोः ' ।८।२।१०५ यानें स्वरित प्लुत प्राप्त होतो. उदा० प्रश्नार्थक वाक्य–अग्निभूते,–' अग्निभूत ३ इ ' । ' पटो–पट ३ उ । 'अगमः पूर्वान् ग्रामान् '–अग्निभूते पटो ' असें मूळ प्रश्नार्थक वाक्य आहे. त्याची समाप्ति ' अगमः '। इत्यादीनें होते. त्यापैंकी ' अगमः ' वगैरे अंत्य नसूनहि त्याना झालेला प्लुत ।८।२।१०५ यानें स्वरित होतो. अग्निभूते–' अग्निभूत ३ इ ' व 'पटो–पट ३ उ' येथे झालेला प्लुत (' एचोऽप्रगृह्यस्य ' ८।२।१०७ यानें) प्रस्तुत सूत्रानें अनुदात्त होतो. अभिपूजितार्थी–' शोभनः खलु असि माणवक ३ '; येथें ' क ' ला झालेला प्लुत अनुदात्त होतो.

(३६२०) चिदिति चोपमार्थे प्रयुज्यमाने ।८।२।१०१

वाक्यस्य टेरनुदात्तः प्लुतः । अग्निचिद्भाया ३ त् । अग्नि–

रिव भायात् । उपमार्थे किम् । कथंचिदाहुः । प्रयुज्यमाने किम् । अग्निर्माणवको भायात् ।

चिद् याचा उपमा या अर्थी म्हणजे इव या अव्ययासारखा उपयोग केला असता वाक्याच्या टि--भागाला अनुदात्त असा प्लुत होतो. उदा० 'अग्निचिद् भाया ३ त्' (अग्नीप्रमाणें प्रकाशो.) 'भायात्' हें 'भा दीप्तौ' या धातूचें आशीर्लिङाचे रूप आहे. शेवटचा टि-भाग जो 'आत्' त्यांतील 'आ' या अचाला प्लुत होतो व तो अनुदात्त होतो. 'उपमार्थे' म्हट-ल्यानें 'कथंचिदाहुः' यांतील 'कथंचित्' यांतील 'चित्' शब्दाचा अर्थ कृच्छ्र असा आहे. म्हणून वाक्याच्या टि--भागाला प्लुत होत नाहीं. 'प्रयुज्यमाने' म्हटल्यानें 'अग्निर्माणवको भायात्' (माणवक अग्नी-सारखा प्रकाशो.) यांत उपमा असली तरी प्रत्यक्ष 'चित्' शब्दाचा प्रयोग नाही म्हणून प्लुत होत नाहीं. 'चित्' शब्दाची प्रतीति आहे पण तसा प्रयोग नाहीं.

टीप--येथें हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं 'चित्' शब्दाला प्लुत होत नाहीं हें सूत्रांतील 'इति' शब्दावरून ध्वनित होतें. 'अक्रियमाणे तु इति शब्दे चिच्छब्दस्यैव प्लुतः स्यात् । अग्निचिद्भाया३दित्यत्र न स्यादिति भावः ।' (सुबोधिनी)

(३६२१) उपरिस्विदासीदिति च ।८।२।१०२

टेः प्लुतोऽनुदात्तः स्यात् । उपरिस्विदासी ३ त् । (ऋ० १०।१२९।५) अधः स्विदासी ३ दित्यत्र तु 'विचार्यमाणानाम्' इत्युदात्तः प्लुतः ।

'उपरिस्विदासीत्' या वाक्याच्या टिभागाला अनुदात्त असा प्लुत होतो. उदा० उपरिस्विदासी३त् ; 'अधःस्विदासी३त्' या वाक्यांतील टिभागाला मात्र 'विचार्यमाणानाम्' ।८।२।९७ यानें प्लुत उदात्त होतो. अनुदात्तत्वाचेंच म्हणजे गुणमात्राचेच विधान प्रस्तुत सूत्र करतें. प्लुताचें नाहीं.

(३६२२) स्वरितमाम्रेडितेऽसूयासंमतिकोपकुत्सनेषु ।८।२।१०३

स्वरितः प्लुतः स्यादाम्रेडिते परेऽसूयादौ गम्ये । असूयायाम्-अभिरूपक ३ अभिरूपक रिक्तं ते आभिरुप्यम् । संमतौ-अभिरूपक ३ अभिरूपक शोभनोऽसि । कोपे-अविनीतक ३ अविनीतक इदानीं ज्ञास्यसि जाल्म । कुत्सने-शाक्तीक ३ शाक्तीक रिक्ता ते शक्तिः ।

आम्रेडित पुढें असून असूया, संमति, कोप आणि कुत्सन हे अर्थ गम्यमान असता वाक्याच्या आरभीं असलेल्या आमंत्रितातल्या टिभागाला स्वरित असा प्लुत होतो. उदा॰ असूयायाम् --'अभिरूपक ३ अभिरूपक रिक्तं ते आभिरूप्यम् ' । यामध्यें 'अभिरूपक ' शब्दाला ' वाक्यादेरामन्त्रितस्य॰ ' ।८।१।८ यानें द्विर्वचन होतें. त्यांतील पुढच्या भागाला ' तस्य परमाम्रेडितम् '।८।१।२ यानें आम्रेडित संज्ञा होते. तें पुढें असता वाक्याच्या आरंभीं असलेल्या आमन्त्रिताच्या टि-भागाला स्वरित असा प्लुत होतो. पूर्वसंबुद्धीला ' आमन्त्रित ' अशी संज्ञा आहे. या वाक्यांत असूया गम्यमान आहे. संमतौ --' अभिरूपक ३ अभिरूपक शोभनोऽसि '; कोपे--अविनीतक ३ अविनीतक इदानीं ज्ञास्यसि जाल्म ! (अरे उद्धटा, तुझ्या औद्धत्याचें फल तुला लवकरच समजेल !) कुत्सने-'शाक्तीक ३ शाक्तीक रिक्ता ते शक्तिः ! (अरे दांडग्या, तुझी शक्ति व्यर्थ आहे !)

(३६२३) क्षियाशीःप्रैषेषु तिङाकाङ्क्षम् ।८।२।१०४

आकाङ्क्षस्य तिङन्तस्य टेः स्वरितः प्लुतः स्यादाचारभेदे । स्वयं ह रथेन याति ३ । उपाध्यायं पदातिं गमयति । प्रार्थनायाम्-पुत्रांश्च लप्सीष्ट ३ धनं च तात । व्यापारणे । कटं कुरु ३ ग्रामं गच्छ । आकाङ्क्षं किम् । दीर्घायुरसि अग्नीदग्नीन्विहर । (तैसं. ६।३।१।२)

क्षिया म्हणजे आचारोल्लंघन, आशीः म्हणजे इष्टाशंसन, तसेच प्रैष म्हणजे प्रेरणा हे अर्थ गम्यमान असतांना इतर अर्थाविषयीं साकांक्ष असलेल्या तिङन्ताच्या टिभागाला स्वरित असा प्लुत होतो. उदा० स्वयं– रथेन याति ३, उपाध्यायं पदातिं गमयति (स्वतः रथांत बसून जातो. उपाध्यायाला मात्र पायीं चालावयास लावतो !) यांत सदाचाराचें उल्लंघन आहे म्हणून ' याति ' या तिङन्तातील ' ति ' याला स्वरित प्लुत झाला. प्रार्थनायाम्––' पुत्रांश्च लप्सीष्ट ३ धनं च तात ' येथें आशीर्वाद म्हणजे इष्टाशंसन आहे म्हणून 'लप्सीष्ट' या तिङन्तातील टिभागाला स्वरित असा प्लुत होतो. (पुत्रप्राप्ति होवो व त्यामुळें धनहि पण मिळो.) प्रैष–' कटं कुरु ३ ग्रामं गच्छ '–– येथें प्रेरणा गम्यमान असून ' कुरु ' हें तिङन्त साकांक्ष आहे. कट कर व (नंतर) गावाला जा. प्रत्येक उदाहरणांत तिङन्ताला आंकांक्षा असणारे दुसरे वाक्य आहे. ' आकाङ्क्षम् ' म्हटल्यानें ' दीर्घा– युरसि अग्नीदग्नीन्विहर ' येथें ' असि ' हें तिङन्त साकांक्ष नाहीं. आशीः म्हणजे इष्टाशंसन आहे. ' क्षिया ' चें प्रत्युदाहरण नित्यसाकांक्षत्वामुळें देता येत नाहीं. ' न हि स्वयं ह रथेन यातीत्युक्ते आचारभेदो गम्यते किं तर्हि उपाध्यायं पदातिं गमयतीत्युक्ते '। (प्रबोधिनी)

(३६२४) अनन्त्यस्यापि प्रश्नाख्यानयोः ।८।२।१०५

अनन्त्यस्याऽन्त्यस्यापि पदस्य टेः स्वरितः प्लुत एतयोः । अगमः ३ पूर्वा ३ न् ग्रामा ३ न् । सर्वपदानामयम् । आख्याने– अगम ३ म् पूर्वा ३ न् ग्रामा ३ न् ।

प्रश्न आणि त्याचे उत्तर (आख्यान) हे अर्थ गम्यमान असताना शेवटीं नसलेल्या व शेवटीं असलेल्याही पदाच्या टिभागाला स्वरित असा प्लुत होतो. उदा० ' अगमः ३ पूर्वा ३ न् ग्रामा ३ न् ' (तू पूर्वेकडील गावाना गेला होतास काय ?) येथें वाक्यातील सर्व शब्दांच्या टिभागाला स्वरित असा प्लुत होतो. सूत्र ८।२।१०० यानें प्रश्नार्थक वाक्याच्या टि– भागाला अनुदात्त असा प्लुतहि होतो. आख्यानात्मक वाक्यांत मात्र स्वरित असाच प्लुत होतो. अनुदात्त प्लुत होत नाहीं. उदा० ' अगम ३ म् पूर्वा–

३ न् ग्रामा ३ न् (होय. पूर्वेकडील गावाना गेलों होतो.) येथें सर्व शब्दांच्या टिभागाला स्वरित प्लुत होतो.

टीप—' पदस्य ' व ' स्वरितम् ' यांची अनुवृत्ति या सूत्रांत येते. आख्यानम्–प्रश्नस्योत्तरम्;

(३६२५) प्लुतावैच इदुतौ ।८।२।१०६

दूराद्धूतादिषु प्लुतो विहितस्तत्रैव ऐचः प्लुतप्रसङ्गे तदवयवाविदुतौ प्लवेते । ऐ ३ तिकायन । औ ३ पगव । चतुर्मात्रावत्र ऐचौ संपद्येते ।

'दूराद्धूते च' ८।२।८४ व पुढील सूत्रांनीं सांगितलेला प्लुत ऐ व औ यांच्या स्थानीं प्रसक्त झाला असताना ऐकारादि संध्यक्षरांचे अवयव जे इकार व उकार त्यांना प्लुत होतो. उदा० ऐ ३ तिकायन, औ ३ पगव येथें ' गुरोरनृतो० ' ।८।२।८६ यानें प्लुत झाला आहे. मात्र या ऐकाराच्या व औकाराच्या चार मात्रा होतात. त्या कशा ?

अ + इ = ऐ; अ + उ = औ (वृद्धीनें) यांतील एक मात्रा अकाराची व इकाराला व उकाराला प्लुत झाला म्हणजे त्याच्या प्रत्येकी तीन मात्रा अशा एकूण चार मात्रा ऐच् वर्णांच्या होतात.

(३६२६) एचोऽप्रगृह्यस्यादूराद्धूते पूर्वस्यार्धस्याऽऽदुत्तरस्येदुतौ ।८।२।१०७

अप्रगृह्यस्य एचोऽदूराद्धूते प्लुतविषये पूर्वस्यार्धस्याकारः प्लुतः स्यादुत्तरस्य त्वर्धस्य इदुतौ स्तः । (वा.) ' प्रश्नान्ताभिपूजितविचार्यमाणप्रत्यभिवादयाज्यान्तेष्वेव ' । प्रश्नान्ते–अगमः ३ पूर्वा ३ न् ग्रामा ३ न् । अग्निभूत ३ इ । अभिपूजिते–करोषि

पट ३ उ । विचार्यमाणे-होतव्यं दीक्षितस्य गृहा ३ इ । न होतव्य ३ मिति । प्रत्यभिवादे-आयुष्मानेधि अग्निभूत ३ इ । याज्यान्ते- स्तोमैर्विधेमाग्नया ३ इ । (ऋ. ८।४३।११) परिगणनं किम् । विष्णुभूते घातयिष्यामि त्वाम् । अदूराद्धूत इति न वक्तव्यम् । पदान्तग्रहणं तु कर्तव्यम् । इह मा भूत् । भद्रं करोषि गौरिति । अप्रगृह्यस्य किम् । शोभने माले । (वा.) आमन्त्रिते छन्दसि प्लुत विकारोऽयं वक्तव्यः । अग्ना ३ इ पत्नी व ३ः (तैसं.१४।२७।१)

प्रगृह्यसंज्ञक नव्हे असा असून ' दूराद्धूते च ' एतद्व्यतिरिक्त सूत्रानें सांगितलेल्या प्लुताचा विषय असलेल्या एच् वर्णातील पूर्व अर्धभागाला अकार आदेश होतो व तो प्लुत होतो आणि पुढील अर्ध्या भागाला इकार व उकार आदेश होतात.

आणि हा प्लुताचा विकार अमुकच ठिकाणीं होतो असें विषयांचें परिगणनहि केलें पाहिजे. तें पुढीलप्रमाणें--(वा.) ' प्रश्नान्त, अभि-पूजित (८।२।१००), विचार्यमाण (८।२।९७), प्रत्यभिवाद (८।२।८३), आणि याज्यान्त (८।२।९०) इतक्याच ठिकाणीं हा प्लुताचा विकार होतो असें म्हणावें. ' त्यापैकी प्रश्नान्ताचें उदाहरण--' अगमः ३ पूर्वा ३ न् ग्रामा ३ न् अग्निभूता ३ इ । अभिपूजिते-करोषि पट ३ उ; विचार्यमाणे--होतव्यं दीक्षितस्य गृहा ३ इ । न होतव्य-३ मिति; प्रत्यभिवादे-आयुष्मानेधि अग्निभूता ३ इ; याज्यान्ते--स्तोमैर्विधेमाग्नया ३ इ;

टीपा--हीं सर्व उदाहरणें मागें आलीं असून त्या वेळीं त्या-विषयीं चर्चा केलीच आहे म्हणून ती पुनः येथें केली नाहीं. उदाहरणार्थ--' प्रत्यभिवाद ' अर्थ असता ' प्रत्यभिवादेऽशूद्रे ' ।८।२।८३ यानें प्लुत होतो. इत्यादि. कांहीं उदाहरणांत ' गुरोरनृतो० ' ।८।२।८६ यानें होतो.

स्पष्टीकरण--एच् प्रत्याहारातील वर्ण म्हणजे ए, ऐ, ओ व औ. हीं संध्यक्षरें आहेत. त्याचे विभाग केले म्हणजे ते अ + इ व अ + उ असे होतात. शब्दाच्या शेवटीं असलेल्या संध्यक्षराना जेव्हां प्लुत होतो त्या वेळीं त्यांतील पूर्वभाग जो अकार त्याला प्लुत होतो व नंतर पुढें इकार किंवा उकार त्याला जोडले जातात. म्हणजे हे उत्तरभागाला होणारे आदेश होत.

आता ' आ ३ ' हा जो प्लुत आहे तो उदात्त, अनुदात्त अथवा स्वरित होतो. तो त्या त्या सूत्रानें होतो. प्रश्नार्थक वाक्याच्या शेवटीं असलेला प्लुत हा मात्र ' अनुदात्तं प्रश्नान्ताभिपूजितयोः ' व ' अनन्त्यस्यापि प्रश्नाख्यानयोः ' यानें अनुदात्त किंवा स्वरित असतो. इतरत्र मात्र तो उदात्त असतो.

परिगणन केल्यानें 'विष्णुभूते घातयिष्यामि त्वाम् ' या वाक्यांत प्रस्तुत सूत्र लागू होत नाहीं. कारण हा विषय वरील परिगणनांत नाहीं. (अग्निभूति व विष्णुभूति हीं विशेषनामें आहेत.) वस्तुतः सूत्रांत ' अदूराद्धूते ' म्हटले असल्यानें त्याचेच हें प्रत्युदाहरण होत असल्यानें परिगणनांत नाहीं म्हणून उदाहरण देणें अयुक्त आहे. सूत्रांत ' अदूराद्धूते ' असे म्हणण्याचें कारण नाहीं. कारण ती गोष्ट परिगणनानेंच सिद्ध होत आहे. हें वृत्तिकाराच्या मताप्रमाणें आहे पण इतर कांहीं म्हणतात-' केचित्तु परिगणनेऽपीदं कार्यमेव । अत्र दूराद्धूतपदं न संबोधनमात्रोपलक्षणम्, किंतु यथाश्रुतमेवेति दूरादाह्वानसंबोधनविशिष्टाभिपूजितार्थे ' स्वागच्छ भो माणवकाग्निभूते ' इत्यादौ नास्य प्रवृत्तिरिति च परिगणनेन प्रत्याख्यानं युक्तम् '। (शेखर) तें कांहीं असलें तरी सूत्रांत ' पदान्त ' शब्द असावयास पाहिजे होता.. कारण हीं संध्यक्षरे पदान्तीं असलीं तरच वरील सूत्र प्रवृत्त होतें. उदाहरणार्थ--' भद्रं करोषि गौः ' या वाक्यांत ' सर्वनामस्थानसंज्ञक प्रथमाविभक्तींचा सु प्रत्यय पुढें असता ' गौ ' हें पद नाहीं. (पहा--१।४।१७) म्हणून त्याला प्लुत होत नाहीं. कांहींच्या मतें ' पद ' शब्दानें वाक्याच्या बोध होतो. असा अर्थ मान्य केल्यास ' गौ ३ रिति ' असा प्लुत होण्यास हरकत नाहीं. तसेंच, ' अप्रगृह्यस्य ' म्हटल्यानें ' शोभने माले इति ' येथें ' माले ' यांतील एकाराला प्रस्तुत सूत्र लागू होत नाहीं. कारण या एका-

राला 'ईदूदेद्०' १।१।११ इत्यादि सूत्रानें प्रगृह्यसंज्ञा होते. (वा.) 'वेदामध्यें 'आमन्त्रित पदाच्या टिभागाला अशाच प्रकारचा प्लुत होतो असें म्हणावे.' ' उदा० 'अग्ना ३ इ पत्नी वः'; येथे इतर कोणत्याहि सूत्रानें प्लुताची प्राप्ति नव्हती. 'अप्राप्ते प्लुतविकारि इदम् । दूराद्धानसत्वात्परिगणना-च्चाप्राप्तिः'। (शेखर)

टीप—'सामन्त्रितम्' ।२।३।४८ यानें 'आमन्त्रित' संज्ञा सांगितली आहे. 'संबोधने या प्रथमा तदन्तमामन्त्रितसंज्ञं स्यात्'। (सि. कौ.) वरील उदाहरणांत 'अग्ने' या आमन्त्रिताला म्हणजे त्यांतील संध्यक्षर एकाराला म्हणजे त्यांतील अकाराला प्लुत संज्ञा झाल्यानें 'अग्ना ३ इ.' असें रूप होतें.

(३६२७) तयोर्य्वावचि संहितायाम् ।८।२।१०८

इदुतोर्यकारवकारौ स्तोऽचि संहितायाम् । अग्ना ३ याशा । पटा ३ वाशा । अग्ना ३ यिन्द्रम् । पटा ३ वुदकम् । अचि किम् । अग्ना ३ इ वरुणौ । संहितायां किम् । अग्ना ३ इ इन्द्रः । संहितायामित्यध्यायसमाप्तेरधिकारः । इदुतोरसिद्धत्वादयमारम्भः सवर्णदीर्घत्वस्य शाकल्यस्य च निवृत्त्यर्थः । यवयोर-सिद्धत्वाद् 'उदात्तस्वरितयोर्यणः स्वरितोऽनुदात्तस्य' इत्यस्य बाधनार्थो वा ।

प्लुत विकाराच्या संनियोगानें विहित जे इकार व उकार त्यांच्या स्थानीं क्रमानें यकार आणि वकार आदेश अच् पुढें असतां आणि संहिता-विषय असता म्हणजे उच्चारात मध्यें खंड पडत नसल्यास होतात. उदा० अग्ना ३ इ आशा=अग्ना ३ याशा, पटा ३ उ आशा=पटा ३ वाशा, अग्ना ३ इ इन्द्रम् = अग्ना ३ यिन्द्रम्, पटा ३ उ उदकम् = पटा ३ वुदकम्; 'अचि' म्हटल्यानें 'अग्ना ३ इ वरुणौ' येथें इकाराला यकार होत नाहीं.

कारण त्याच्यापुढें अच् नसून वकार हा हल् आहे. 'संहितायाम् ' म्हटल्यानें अग्ना ३ इ इन्द्रः येथेंहि इकाराला यकार होत नाहीं. तसेंच 'पटा ३ उ, उदकम् ' येथेंहि उकाराला वकार होत नाहीं. कारण येथें संहिता नसून पदपाठांत हीं वेगळी पदें दाखविलीं गेली आहेत.

' संहितायाम् ' या पदाचा अधिकार सातव्या अध्यायाच्या शेवटा-पर्यंत चालतो.

एक शंका—' इको यणचि ' ।६।१।७७ यानें यणादेश होऊन भागत असता प्रस्तुत सूत्रातें यकार व वकार हे आदेश कशाला सांगितले ? त्याचें कारण असें की हे जे इकार व उकार झाले ते प्लुतामुळें झाले. पण प्लुत-विधि त्रिपादीतील असल्यानें ' पूर्वत्रासिद्धम् ' ।८।२।१ या प्रमाणें ते असिद्ध आहेत. समजा, ते सिद्ध मानले तरी ' अकः सवर्णे दीर्घः ' ।६।१।१०१ यानें होणारा दीर्घ व ' इकोऽसवर्णे शाकल्यस्य० ' ।६।१।१२७ यानें होणारी प्रगृह्यसंज्ञा यांच्या निवृत्तीसाठीं प्रस्तुत सूत्राचा आरंभ आहे. कारण ' प्लुतप्रकरणे यत्कार्यं तत् स्वरसन्धिषु सिद्धम् ' असें ज्ञापक असल्यानें प्लुत सिद्ध मानला जातो. कारण पाणिनि ' प्लुतप्रगृह्या० ' ।६।१।१२५ या सूत्रानें प्लुताला प्रकृतिभाव सांगतो हें याला ज्ञापक आहे. तर मग प्लुत जर सिद्ध मानला तर ' इको यणचि ' यानें यण् होण्यास काय हरकत आहे असें कोणी म्हणेल. त्यावर समाधान असें कीं सवर्णदीर्घ व प्रगृह्यसंज्ञा होऊ नये म्हणून सूत्र आवश्यक आहे असें वर सांगितले. आतां कोणी म्हणेल कीं ' इको यणचि ' ।६।१।७७ यावरील जें वार्तिक इकः प्लुतपूर्वस्य सवर्णदीर्घबाधनार्थं यणादेशो वक्तव्यः ' याप्रमाणें सवर्णदीर्घ व प्रगृह्यसंज्ञा झालीच नसती. होय. हें खरें आहे पण दुसरें एक प्रयोजन आहे तें असें की ' उदात्तस्वरितयोर्यणः स्वरितोऽनुदात्तस्य ।८।२।४ यानें यणादेशापुढील अनुदात्ताला स्वरित सांगितला आहे त्याचा बाध व्हावा म्हणून सूत्राचें प्रयोजन आहे.

टीप--हीं प्लुतविधायक सूत्रें वैदिकीप्रक्रिया प्रकरणांत भट्टोजी दीक्षितानें कां घातली असें कोणी म्हणेल त्यावर शेखरकार म्हणतो--

' यद्यपीह प्लुतप्रकरणे बहूनि सूत्राणि लोकवेदसाधारणानि तथापि तस्य वैकल्पिकत्वेन लोके तदादराऽभावाद्वेदे च तदादराद्वैदिक्यामेव लिखितानीति ध्येयम् '।

(३६२८) मतुवसो रु संबुद्धौ छन्दसि ।८।३।१

रु इत्यविभक्तिको निर्देशः। मत्वन्तस्त वस्वन्तस्य च रुः स्यात्। 'अलोऽन्त्यस्य' इति परिभाषया नकारस्य। इन्द्र मरुत्व इह पाहि सोमम्। (ऋ. ३।५१।७) हरिवो मेदिनं त्वा। (तैसं. ४।७।१४।४) 'छन्दसीरः' इति वत्वम्।

मतुप्रत्ययान्त व वसुप्रत्ययान्त अशा पदाला संबुद्धि प्रत्यय पुढें असता वेदामध्यें रुत्व होतें. उदा॰ 'इन्द्र मरुत्व इह पाहि सोमम्'; 'मरुतो यस्य सन्ति' या अर्थी मरुत् शब्दाहून मतुप् झाला त्यांतील मकाराला 'झयः' ।८।२।१० यानें वकार झाला. 'तसौ मत्वर्थे' ।१।४।१९ यानें 'मरुत्' याला भसंज्ञा झल्यानें पदसंज्ञेच्या अभावी तकाराला जश्त्व होत नाहीं. 'उगिदचाम्॰' ।७।१।७० यानें जो नुम् होतो त्यांतील नकाराला 'अलोऽन्त्यस्य' या परिभाषेप्रमाणें प्रस्तुत सूत्रानें रुत्व होतें. 'मरुत्वन्त्' + सु अशी स्थिति असता सुचा (सकाराचा) लोप ।६।१।६८ यानें होतो व तकाराचा ।८।२।२२ यानें होतो. नकाराला रुत्व विसर्ग होऊन 'मरुत्वः' असें संबुद्धि एकवचन रूप होतें. ' 'हरिवो मेदिनं त्वा' यांतील 'हरिवः' हें 'हरिवत्' शब्दाचें स. ए. व. आहे. 'हरयो विद्यन्ते यस्य'---हरिवत् येथें 'छन्दसीरः' ।८।२।१५ यानें मकाराला वकार होतो.

टीप---वस्वन्ताचें उदाहरण पुढें दिलें आहे.

(३६२९) दाश्वान्साह्वान्मीढ्वांश्च ।६।१।१२

एते क्वसवन्ता निपात्यन्ते। मीढ्वस्तोकाय तनयाय। (ऋ. २।२३।१४) (वा.) वन उपसंख्यानम्। क्वनिब्वनिपोः

सामान्यग्रहणम् । अनुबन्धपरिभाषा तु नोपतिष्ठते । अनुबन्धस्येहानिर्देशात् । यस्त्वायन्तं वसुना प्रातरित्वः। (ऋ. १।१२५।२) इणः क्वनिप् ।

दाश्वान्, साह्वान् व मीढ्वान् हीं रूपें निपातित केलीं जातात. दाश्वान् हें रूप 'दाशृ दाने' या दाश् धातूहून क्वसु प्रत्यय केल्यावर द्वित्वाभाव व अनिट्त्व यांचें निपातन होतें. साह्वान्--'षह मर्षणे' या सह् धातूहून परस्मैपद, क्वसु प्रत्यय, द्वित्वाभाव, अनिट्त्व व उपधादीर्घत्व यांचें निपातन होतें. मीढ्वान्--'मिह सेचने' या मिह् धातूहून क्वसु, द्वित्वाभाव, अनिट्त्व व उपधावृद्धि यांचें निपातन होतें. सूत्रामध्यें हें सर्व शब्द एकवचनांत असले तरी तशी विवक्षा नाहीं. 'दाश्वासः', 'दाशुषः सुतम्' असे बहुवचनी प्रयोग सुद्धां आढळून येतात. हे प्रयोग जरी लोकांत व वेदांत सर्वसाधारण असले तरी लोकांत तितकें प्रयोगप्राचुर्य नसल्यामुळें हें सूत्र 'वैदिकीप्रक्रिया' प्रकरणांत घातलें. उदा० 'मीढ्वस्तोकाय तनयाय मृडय' यांतील 'मीढ्वः' येथें 'मतुवसोः०' ।८।३।१ यानें रुत्व झाले. त्यामुळें 'अत्रानुनासिकः०' ।८।३।२ हें सूत्र प्रवृत्त होतें म्हणजे मागील वर्णाला विकल्पाने अनुनासिक होतो.

(वा.) 'वेदामध्यें मतुप्रत्ययान्त व वसुप्रत्ययान्त शब्दांच्या शेवटच्या वर्णाला हा जो रु सांगितला आहे तो वन्प्रत्ययान्त शब्दाच्या शेवटच्या वर्णालाही सांगितला पाहिजे.' वन्' म्हटल्यानें वनिप् व क्वनिप् या दोन्ही प्रत्ययांचें ग्रहण होतें. या ठिकाणीं 'अनुबन्ध' परिभाषा म्हणजे 'तदनुबन्धकग्रहणें नातदनुबन्धकस्य' परिभाषा लागू होत नाही कारण अनुबन्धांचाच निर्देश येथें केला आहे.

उदा० 'यस्त्वायन्तं वसुना प्रातरित्वः' यांतील 'प्रातरित्वः' हें रूप --इण् धातूहून 'अन्येभ्योऽपि दृश्यते' ।३।२।७५ यानें क्वनिप् केल्यावर 'ह्रस्वस्य पिति कृति०' ।६।१।७१ यानें तुक आगम होतो व

' प्रातरित्वन् ' शब्द सिद्ध होतो. त्याचें ' प्रातरित्वः ' हें सं. ए. व. आहे. येथें नकाराला रु होतो.

(३६३०) उभयथर्क्षु ।८।३।८

अम्परे छवि नकारस्य रुर्वा । पशूंस्ताँश्चक्रे । (ऋ.१०।९०।८)

अम् प्रत्याहारांतील वर्ण पुढें असलेला असा जो छव् प्रत्याहारातील वर्ण तो पुढें असतां नकारान्त पदाला ऋचेमध्यें विकल्पानें रु आदेश होतो. उभयथा + ऋक्षु अशी पदें आहेत. ' नश्छव्यप्रशान् ' ।८।३।७ याची अनुवृत्ति येते. त्या सूत्रानें नित्य रु प्राप्त झाला होता. या सूत्रानें तो विकल्पानें सांगितला. उदा० ' पशूंस्तांश्चक्रे ', पशून् + तान् अशी स्थिति असतां नकाराला रुत्व होतें. ' अत्रानुनासिकः० ' यानें विकल्पानें अनुनासिक होतो. रेफाला विसर्ग होऊन ' विसर्जनीयस्य सः ' ।८।३।३४ यानें सत्व होतें.

(३६३१) दीर्घादटि समानपदे ।८।३।९

दीर्घान्नकारस्य रुर्वा स्यादटि तौ चेन्नाटौ एकपादस्थौ स्याताम् । देवाँ अच्छा सुमती । (ऋ. ४।१।२) महाँ इन्द्रो य ओजसा । (ऋ. ८।६।१) उभयथेत्यनुवृत्तेर्नेह । आदित्यान्याचिषामहे । (ऋ. ८।६७।१)

दीर्घ वर्णांच्या पुढें असून पदाच्या शेवटीं असलेल्या नकाराला अट प्रत्याहारांतील वर्ण पुढें असता रु आदेश होतो पण नकार आणि अट् वर्ण मंत्राच्या एका पादात असले पाहिजेत.

सूत्र ।८।३।७ यांतून ' नः ' याची व ।८।३।८ मधून ' ऋक्षु ' याची अनुवृत्ति येते. ' समानपादे ' यांतील ' समांन ' शब्द ' एक ' शब्दाचा पर्याय आहे. उदा० ' देवाँ अच्छा सुमती '; ' महाँ इन्द्रो य ओजसा '; 'देवान् अच्छा' व 'महान् इन्द्रः' यातील नकार व पुढील अट् वर्ण अकार व इकार एकाच पादांत असल्यानें नकाराला रु झाला व त्यामुळें ।८।३।३ यानें पूर्व

अचाला नित्य अनुनासिक झाला.

'उभयथा' या पदाची मागील सूत्रांतून अनुवृत्ति असल्यानें विकल्पामुळें नकाराला एकदा रु होत नाहीं. उदा० 'आदित्यान्याचिषामहे' येथें नकार कायम राहतो. येथें नकारापुढें यकार हा अट् वर्ण आहे.

(३६३२) आतोऽटि नित्यम् ।८।३।३

अटि परतो रोः पूर्वस्यातः स्थाने नित्यमनुनासिकः । महाँ इन्द्रः । (तैसं. १।४।२०।१) तैत्तिरीयास्तु अनुस्वारमधीयते । तत्र छान्दसो व्यत्यय इति प्राञ्चः । एवं च सूत्रस्य फलं चिन्त्यम् ।

अट् प्रत्याहारातील वर्ण पुढें असताना रु आदेशाच्या मागील आकाराला नित्य अनुनासिक होतो. उदा० 'महाँ इन्द्रः'; (ऋग्वेद ८।६।१) तैत्तिरीय शाखेचे लोक मात्र अनुनासिकाऐवजीं अनुस्वाराचाच उच्चार करतात. प्राच्य वैदिकांच्या मतें हें 'व्यत्ययो बहुलम्' ।३।१।८५ याप्रमाणें होतें. त्यामुळें या सूत्राची आवश्यकता चित्य आहे. 'अत्रानुनासिकः पूर्वस्य तु वा' ।८।३।२ यानें अनुनासिक विकल्पानें सांगितलाच आहे.

(३६३३) स्वतवान्पायौ ।८।३।११

रुर्वा । भुवस्तस्य स्वतवाँः पायुरग्ने । (ऋ. ४।२।६)

स्वतवान् शब्दाच्या नकाराला पायु शब्द पुढें असता रु आदेश विकल्पानें होतो. उदा० 'भुवस्तस्य स्वतवाँः पायुरग्ने'.

स्वतवः--स्वं तवो यस्यासौ स्वतवान्; 'तु वृद्धौ' असा सौत्र धातु असून त्याहून असुन् प्रत्यय होतो. 'दृक्स्ववः०' ।७।१।८३ यानें सु पुढें असता नुम् होतो. 'तवस्' शब्दाचा अर्थ धन असा होतो. 'स्वतवान्' यांतील नकाराला रु आदेश होतो व पूर्व अचाला अनुनासिक होतो.

(३६३४) छन्दसि वाऽप्राम्रेडितयोः ।८।३।४९

विसर्गस्य सो वा स्यात् कुप्वोः प्रशब्दमाम्रेडितं च वर्ज-

यित्वा । अग्ने त्रातर्ऋतस्कविः । (ऋ. ८।९८।४) **गिरिर्न विश्वतस्पृथुः । नेह ।** (ऋ. ८।६०।५) **वसुनः पूर्व्यपतिः ।** (ऋ. १०।४८।१) **अप्रेत्यादि किम् । अग्निः प्र विद्वान् ।** (शौ. ५।२६।१) **परुषः परुषः ।** (वासं. १३।२०)

वैदिक प्रयोगांत विसर्गाला कवर्ग किंवा पवर्ग पुढें असतांना विकल्पानें सकार आदेश होतो. मात्र तो कवर्ग किंवा पवर्ग प्र अथवा आम्रेडितसंज्ञक पदातील नसावा.

उदा० 'अग्ने त्रातर्ऋतस्कविः'; 'गिरिर्न विश्वतस्पृथुः' वरील उदाहरणांत ऋतः व कविः यांत विसर्गापुढें कवर्गातील वर्ण आहे व विश्वतः पृथुः येथें पवर्ग पुढें आहे म्हणून विसर्गाला सकार झाला परंतु विकल्प असल्यानें 'वसुनः पूर्व्यपतिः' येथें 'वसुनः' यांतील विसर्गाला सकार होत नाहीं. 'अप्राम्रेडितयोः' म्हटल्यानें 'अग्निः प्र विद्वान्' (अथर्व० ५।२६।१) येथें प्र शब्द पुढें असल्यानें विसर्गाला सकार होत नाहीं व 'परुषः परुषः परि' येथें दुसरें 'परुषः' हें आम्रेडित पुढे असल्यानें मागील विसर्गाला सकार होत नाही. येथे वीप्सार्थी द्विर्वचन झालें आहे.

शेखरकार म्हणतो व्यवस्थित विकल्पानें हे सिद्ध असता 'अप्राम्रेडितयोः' हें स्पष्टार्थ समजावे. याप्रमाणें पुढील सूत्रामध्येंहि समजावे.

(३६३५) कःकरत्करतिकृधिकृतेष्वनदितेः ।८।३।५०

विसर्गस्य सः स्यात् । प्रदिवो अपस्कः । (ऋ. ६।२३।५) **यथा नो वस्यसस्करत् ।** (वासं. ३।५८) **सुपेशसस्करति** (ऋ. २।३५।१) **उरुणस्कृधि ।** (वासं. ५।३८) **सोमं न चारुं मघवत्सु न स्कृतम् ।** (ऋ. १०।३९।२) **अनदितेरिति किम । यथा नो अदितिः करत् ।** (ऋ. १।४३।२)

कः, करत्, करति, कृधि आणि कृत हे शब्द पुढें असतांना वेंदामध्यें विसर्गाला सकार आदेश होतो पण तो विसर्ग 'अदिति' या शब्दापुढील नसावा.

उदा० **कः**--'प्रदिवो अपस्कः'--येथें 'अपः' यांतील विसर्गाला 'कः' पुढें असता सकार होतो. 'कः' हें रूप वेदातील कृ धातूच्या लुङाचें तिप् पुढें असतानाचें आहे. 'मन्त्रे घस०' ।२।४।८० यानें च्लिचा लुक् होतो. तिप् पुढें असता गुण होऊन तकाराचा हलङ्यादि लोप होतो. 'बहुलं छन्दसि' ।६।४।७५ यानें अडागम होत नाहीं,

करत्--'यस्य नो वस्यसस्करत्' येथें 'वस्यसः' पुढें 'करत्' आल्यानें विसर्गाला सकार होतो. 'करत्' हें रूप कृ धातूचें लुङाचें आहे. येथें 'कृसृदृ०' ।३।१।५९ यानें च्लि ला अङ होतो व 'ऋदृशोऽङि गुणः' ७।४।१६ यानें गुण होतो. अडागम पूर्ववत् होत नाहीं.

करति--'सुपेशसस्करति'--'करति' येथें व्यत्ययानें शप् होतो. हें लटाचें रूप आहे. 'सुपेशसः' यांतील विसर्गाला सकार होतो.

कृधि--'उरु णस्कृधि'--कृधि हे कृ धातूच्या लोटाचें रूप आहे. सि (सिप्)प्रत्ययाला 'सेर्हि०' ।६।४।८७ यानें 'हि' आदेश होऊन त्याला 'श्रुशृणु०' ६।४।१०२ यानें धि आदेश होतो. विकरणाचा लोप होतो. 'उरु नस्'– 'नस्' यांतील नकाराला 'नश्च धातुस्थो०' ।८।४।२७ यानें णत्व होतें.

कृत— 'सोमं न चारुं मघवत्सु नस्कृतम्'; 'कृत' हें कृ धातूचें निष्ठाप्रत्ययान्त रूप आहे. 'अनदितेः' म्हटल्यानें 'यथा नो अदितिः करत्' येथें 'अदिति' शब्दापुढें विसर्ग असल्यानें त्याला सकार होत नाहीं.

(३६३६) पञ्चम्याः परावध्यर्थे ।८।३।५१

पञ्चमीविसर्गस्य सः स्यादुपरिभवार्थे परिशब्दे परतः । दिवस्परि प्रथमं जज्ञे । (ऋ. १०।४५।१) अध्यर्थे किम् । दिवस्पृथिव्याः पर्योजः । (ऋ. ६।४७।२७)

वेदामध्यें पंचमी विभक्तीच्या विसर्गाला उपरि (वर) या अर्थाला दाखविणारा परि शब्द पुढें असता सकार होतो. उदा० 'दिवस्परि प्रथमं जज्ञे' याचा अर्थ 'दिवः उपरि' असा होतो. 'दिवः' ही 'दिव्' शब्दाची पंचमी आहे. व्यत्ययानें षष्ठीऐवजी पंचमी घ्यावयाची. 'अध्यर्थे' म्हटल्यानें 'दिवस्पृथिव्याः पर्योजः' या ठिकाणीं 'परि' याचा अर्थ 'परितः' असा असून 'उपरि' नाहीं म्हणून 'पृथिव्याः' यांतील विसर्गाला सकार होत नाहीं.

(३६३७) पातौ च बहुलम् ।८।३।५२

पञ्चम्या इत्येव । सूर्यो नो दिवस्पातु । (ऋ. १०।१५८।१)

वेदामध्यें पा धातु पुढें असतांना पंचमी विभक्तीच्या विसर्गाला सकार बहुलेंकरून होतो. 'पञ्चम्याः' याची अनुवृत्ति आहेच. उदा० 'सूर्यो नो दिवस्पातु'; 'दिवः' यांतील पंचम्यन्त विसर्गाला सकार होतो.

'बहुलम्' म्हटल्यानें 'परिषदः पातु' येथें विसर्गाला सकार होत नाहीं. सूत्रांतील 'पातौ' हें रूप 'पातु.' या लोडन्ताचें अनुकरण असून सप्तमी एकवचन आहे.

(३६३८) षष्ठ्याः पतिपुत्रपृष्ठपारपदपयस्पोषेषु । ८।३।५३

वाचस्पतिं विश्वकर्माणम् । (ऋ. १०।८१।७) दिवस्पुत्राय सूर्याय । (ऋ. १०।३७।१) दिवस्पृष्ठं भन्दमानः । (ऋ. ३।२।१२) तमसस्पारमस्य । (ऋ. १।९२।६) परिवीत इळस्पदे । (ऋ. १।१२८।१) दिवस्पयो दिधिषाणाः । (ऋ. १०।११४।१) रायस्पोषं यजमानेषु । (ऋ. ८।५९।७)

वेदामध्यें षष्ठी विभक्तीच्या विसर्गाला पति, पुत्र, पृष्ठ, पार, पद,

पयस् आणि पोष यांपैकीं कोणताही शब्द पुढें असतांना सकार आदेश होतो. उदाहरणार्थ --

पति--' वाचस्पतिं विश्वकर्माणमूतये ';

पुत्र-' दिवस्पुत्राय सूर्याय ';

पृष्ठ--' दिवस्पृष्ठं भन्दमानः ';

पार--' तमसस्पारेम् ';

पद--' परिवीत इळस्पदे ';

पयस्--' दिवस्पयो दिधिषाणाः ';

पोष--' रायस्पोषं यजमानेषु '; ' षष्ठ्याः ' म्हटल्यानें ' मनुः पुत्रेभ्यो दायं व्यभजत् ' या वाक्यांत ' मनुः ' यांतील विसर्गाला सकार होत नाहीं कारण ' मनुः ' ही प्रथमा असून षष्ठी नाहीं. वाचः, दिवः, तमसः, इलः व रायः हीं षष्ठ्यन्त रूपें आहेत.

टीप-' वाचस्पतिः ' या ठिकाणीं ' तत्पुरुषे कृति बहुलम् ' ।६।३।१४ यानें षष्ठीचा लुक् झाला नाहीं.

(३६३९) इडाया वा ।८।३।५४

पतिपुत्रादिषु परेषु । इळायास्पुत्रः (ऋ. ३।२९।३) इळायाः पुत्रः । इळायास्पदे । इळायाः पदे । (ऋ. ३।२३।४) ' निसस्तपतावनासेवने ' । निसः सकारस्य मूर्धन्यः स्यात् । निष्टप्तं रक्षो निष्टप्ता अरातयः । (वासं. १।७) अनासेवने किम् । निस्तपति । पुनःपुनस्तपतीत्यर्थः ।

वेदामध्यें इडा शब्दाच्या पुढील षष्टीच्या विसर्गाला पति, पुत्र वगैरे मागच्या सूत्रांतील शब्द पुढें असतां विकल्पानें सकार आदेश होतो. उदा॰ ' इळायास्पुत्रः ' किंवा ' इळायाः पुत्रः '; ' इळायास्पदे ' किंवा ' इळायाः पदे ' इत्यादि.

टीप—वेदामध्यें डकाराचा ळकार क्वचित् होतो. तो केव्हां होतो हें मागे आलेच आहे.

' निसस्तपतावनासेवने ' ।८।३।१०२ अर्थ-निस् शब्दाच्या सकाराला तप् धातूपुढें असता 'अनासेवन' ('वारंवार' हा अर्थ नसेल तर) या अर्थी षकार आदेश होतो. उदा० ' निष्ठप्तं रक्षो निष्ठप्ता अरातयः '; ' अना-सेवने ' म्हटल्यानें ' निस्तपति ' म्हणजे ' पुनःपुनः तपति. ' येथें आसेवन म्हणजे पौनःपुन्य हा अर्थ निस् शब्दाचा असल्यानें सकाराला मूर्धन्य म्हणजे षत्व होत नाहीं,

टीप—शेखरकार म्हणतो की, हा नियम भाषा व वेद या दोहोंना साधारण असल्यानें या सूत्राचा अंतर्भाव या वैदिकीप्रक्रिया प्रकरणांत चिंत्य आहे.

(३६४०) युष्मत्तत्ततक्षुष्वन्तःपादम् ।८।३।१०३

पादमध्यस्थस्य सस्य मूर्धन्यः स्यात्तकारादिषु परेषु । युष्मत्तादेशाः त्वं त्वा ते तवाः । त्रिभिष्ट्वं देव सवितः । (ऋ. ९।६७।२६) तेभिष्ट्वा । (ऋ. १०।१५५।१) आभिष्टे । (ऋ. ४।१०।४) अप्स्वग्ने सधिष्टव । (ऋ. ८।४३।९) अग्निष्टद्विश्वम् । (ऋ. १०।२।४) द्यावापृथिवी निष्टतक्षुः । (ऋ. १०।३१।७) अन्तःपादं किम् । तदग्निस्तदर्यमा । (ऋ. १।१०७।३) यन्मे आत्मनो मिन्दाभूदग्निस्तत्पुनराहार्जातवेदा विचर्षणिः । (तैसं. ३।२।५।४) अत्राग्निरिति पूर्वपादस्यान्तो न तु मध्यः ।

युष्मद् शब्दाचे आदेश त्वं, त्वा, ते, आणि तव, याशिवाय तत् आणि ततक्षुस् या शब्दांच्या मागे असून इण् वर्णाच्या पुढें असलेल्या सकाराला षकार आदेश होतो पण तो सकार पादाच्या शेवटीं नसावा.

'ह्रस्वात्तादौ तद्धिते' ।८।३।१०१ यांतून 'तादौ' पदाची अनुवृत्ति येतें. 'तादौ' हें युष्मद्‌चें विशेषण असून इतरांचे नाहीं. (अव्यभिचारात्.) असें असल्यानें युष्मद् शब्दाला तकारादि आदेश होऊन जीं रूपें होतात त्यांचाच निर्देश 'त्वम्' इत्यादींनीं केला आहे. उदा० त्वम्—'त्रिभिष्ट्वं देव सवितः'; त्वा–तेभिष्ट्वा, ते--आभिष्टे । तव-- 'अप्स्वग्ने सधिष्टव'; तत्--'अग्निष्टद्विश्वम्'; ततक्षुस्--'द्यावापृथिवी निष्टतक्षुः'; 'अन्तःपादम्' म्हटल्यानें 'तदग्निस्तदर्यमा'। 'यन्म आत्मनो मिन्दाभूदग्निस्तत्पुनराहाजातवेदा विचर्षणिः ।' यामध्यें 'अग्नि' शब्द प्रथमपादाच्या शेवटीं आहे व 'तत्' शब्द दुसऱ्या पादाच्या प्रारंभीं आहे. म्हणून 'अग्निस्' यांतील सकार पादाच्या मध्यें नाहीं म्हणून त्याला षत्व होत नाही.

वरील उदाहरणांत त्रिभिः, तेभिः, आभिः, सधिः, अग्निः व निस् यापुढें अनुक्रमे त्वम्, त्वा, ते, तव, तत् व ततक्षुस् शब्द आल्यानें विसर्गाला सकार झाला व नंतर ष्टुत्व झालें.

(३६४१) यजुष्येकेषाम् ।८।३।१०४

युष्मत्तत्ततक्षुषु परतः सस्य मूर्धन्यो वा । अर्चिभिष्ट्वम् । (वासं. १२।३२) अग्निष्टे अग्रम् । (तैसं. ३।५।६।२) अर्चिभिष्टतक्षुः । पक्षे अर्चिभिस्त्वमित्यादि ।

यजुर्वेदामध्यें त्वं, त्वा, ते, तव, तत् व ततक्षुस् यांच्या मागे असून इण् वर्णाच्या पुढे असलेल्या सकाराला विकल्पानें षकार आदेश होतो. उदा० अर्चिभिष्ट्वम् किंवा अर्चिभिस्त्वम्; अग्निष्टे अग्रम् किंवा अग्निस्तेऽग्रम्; (तैसं. ३।५।६।२) अग्निष्टत् किंवा अग्निस्तत्; अर्चिभिष्टतक्षुः किंवा अर्चिभिस्ततक्षुः; अर्चिभिस् व अग्निस् यांतील सकाराला त्वं, त्वा, ते, तव, तत् व ततक्षुस् पुढें असता षकार विकल्पानें होतो.

(३६४२) स्तुतस्तोमयोश्छन्दसि ।८।३।१०५

नृभिष्टुतस्य । (मैसं १३।३९) नृभिः स्तुतस्य । गोष्टोमम् । (तैसं. ७।४।११।१) गोस्तोमम् । पूर्वपदादित्येव सिद्धे प्रपञ्चार्थमिदम् ।

वेदामध्यें इण् वर्णाच्या पुढील स्तुत आणि स्तोम शब्दाच्या सकाराला षकार आदेश विकल्पानें होतो. उदा० नृभिष्टुतस्य किंवा नृभिस्तुतस्य; त्याप्रमाणें गोष्टोमम् किंवा गोस्तोमम्;

'पूर्वपदात्' या पुढील सूत्रानें षत्व सिद्ध असल्यानें प्रस्तुत सूत्र त्याचाच प्रपंच आहे असें समजावे. 'छन्दसि' पद मात्र पुढील सूत्रांत अनुवृत्त होतें.

(३६४३) पूर्वपदात् ।८।३।१०६

पूर्वपदस्थान्निमित्तात्परस्य सस्य षो वा । यदिन्द्राग्नी दिविष्ठः । (ऋ. १।१०८।११)। युवं हि स्थः स्वर्पती । (ऋ. ९।१९।२)

पूर्वपदांतील निमित्त म्हणजे इण्वर्ण अथवा कवर्ग, त्यांच्यापुढील सकाराला वेदामध्यें विकल्पानें षकार आदेश होतो. उदा० 'यदिन्द्राग्नी दिवि ष्ठः'; 'युवं हि स्थः स्वर्पती'। या सूत्रांत मागील सूत्रांतून 'छन्दसि' व ।८।३।१०४ मधून 'एकेषाम्' या पदांची अनुवृत्ति येते. सूत्रांतील 'पूर्वपद' शब्दानें समासातील पूर्वपद घ्यावयाचें. यामुळें 'युवं हि स्थः स्वर्पती' या प्रयोगांत 'स्थः' याच्यामागे इकार असूनहि सकाराला षकार होत नाहीं.

(३६४४) सुञः ।८।३।१०७

पूर्वपदस्थान्निमित्तात्परस्य सुञो निपातस्य सस्य षः । ऊर्ध्व ऊषु णः । (ऋ. १।३६।१३) अभी षु णः । (ऋ.४।३१।३)

पूर्वपदातील इण् वर्णांच्या किंवा कवर्गाच्या पुढील सुञ् या निपा-

ताच्या सकाराला वेदामध्यें षकार आदेश होतो. उदा० ‘ ऊर्ध्व ऊषु णः ’ ‘ अभी षु णः सखीनाम् ; ’ ‘ अभी षु ’ येथें ‘ इकः सुञि ’ ।६।३।१३४ यानें दीर्घ होतो व ‘ नश्च धातुस्थोरुषुभ्यः ’ ।८।४।२७ यानें नकाराला णकार होतो.

(३६४५) सनोतेरनः ।८।३।१०८

गो [illegible] नृषा असि । (ऋ. ९।२।१०) अनः किम् । गोसनिः । (वासं. ८।१२)

यांच्या पुढील ‘ सनोति (स)’ धातु-
पूर्वपदातील इण्वर्ण किंवा कवर्ग यांच्या पुढील ‘ सनोति ’ धातूच्या शेवटी नकार
च्या सकाराला षत्व करणें झाल्यास त्या ‘ सनोति ’ धातूच्या शेवटी नकार
नसतानाच करावे. उदा० ‘ गोषा इन्द्रो नृषा असि ’; ‘ गोषा ’ शब्द गोपूर्वक
सन् धातूहून ‘ जनसन० ’ ।३।२।६७ यानें विट् प्रत्यय केल्यावर
‘ विड्वनो० ’ ६।४।४ यानें नकाराला आत्व होतें. त्याप्रमाणें ‘ नृषा ’ हें रूप
समजावे. ‘ अनः ’ म्हटल्यानें ‘ गोसनिः ’ येथें षत्व होत नाहीं, ‘गोसनिः’
(अथर्व. ३।२०।१०) येथे ‘ छन्दसि वनसनरक्षिमथाम् ’ ।३।२।२७ याने
सन् धातूहून इन् होतो. येथे नकार कायम राहतो. म्हणून सकाराला षत्व
होत नाहीं. ऋग्वेदांत मात्र ‘ उत नो गोषणि धियम् ’ (ऋ. ६।५३।१०)
यांत ‘ गोषणिः ’ असें रूप आढळतें. ‘ गोसनिः ’ हा उपपदसमास आहे.

टीप–भाष्यकारांच्या मतें येथें ‘ पूर्वपदात् ’ यानें षत्व सिद्ध असल्यानें प्रस्तुत सूत्र नियमार्थ आहे. नियम असा कीं सन् धातुच्या सकाराला जर षत्व होईल तर सन् धातू जेथें नकारान्त नसेल तेथेंच करावे.

(३६४६) सहेः पृतनर्ताभ्यां च ।८।३।१०९

पृतनाषाहम् । (ऋ. ६।७२।५) ऋताषाहम् । (वासं० १८।३८) चात् ऋतीषाहम् । (ऋ. १।६४।१५८)

पृतना आणि ऋत या शब्दापुढील सह धातूच्या सकाराला षकार

आदेश होतो. उदा० पृतनाषाहम्--सूत्रांतील चकारानें इतर शब्दांचाही समावेश होतो. उदा० ऋतीषाहम्;

सूत्रांत 'छन्दसि' पदाची अनुवृत्ति आहे. चकार अनुक्त समुच्चयार्थ आहे. ऋतीषाहम्--येथें ऋति शब्दांतील इकाराला 'नहिवृति०' ६।३।११६ यानें दीर्घ होतो. संहिता नसेल तर 'ऋतिसाहम्' असाच प्रयोग होईल. 'छन्दसि सह०:' ।३।२।६३ यानें ण्वि होऊन 'साह' रूप होतें. मनोरमाकार ऋती यांतील दीर्घ 'अन्येषामपि दृश्यते ६।३।१३७' यानें होतो असें म्हणतो.

(३३४७) निव्यभिभ्योऽड्व्यवाये वा छन्दसि । ८।३।११९

सस्य मूर्धन्यः । न्यषीदत् । (तैसं. ७।५।२।१) न्यसीदत् । (ऋ. ५।१।६) व्यषीदत् । व्यसीदत् । अभ्यष्टौत् । (जैब्रा. ३।७३) अभ्यस्तौत् । (अथर्व अनु. २।२६)

नि, वि आणि अभि या उपसर्गापुढील सकाराला अडागमाचें व्यवधान असतानाही वेदामध्यें विकल्पानें षकार आदेश होतो. उदा० न्यषीदत् किंवा न्यसीदत्; त्याप्रमाणें व्यषीदत् किंवा व्यसीदत्; अभ्यष्टौत् किंवा अभ्यस्तौत्; येथें 'उतो वृद्धिर्लुकि हलि' ।७।३।८९ यानें वृद्धि होते.

टीप-- हें सूत्र सर्व धातूना लागू आहे, विशिष्ट धातूना नाहीं.

(३६४८) छन्दस्यृदवग्रहात् ।८।४।२६

ऋकारान्तादवग्रहात्परस्य नस्य णः । नृ मणाः । (ऋ. २।१६७।५) पितृयाणम् । (ऋ. १०।२।७)

पदपाठकाली ज्याच्यापुढें अवग्रह (पदविच्छेददर्शक उच्चारण विशेष) केला जाईल अशा ऋकारान्त पूर्वपदाच्या पुढील अर्थात् उत्तरपदातील नकाराला वेदामध्यें णकार होतो.

सूत्रांत 'पूर्वपदात्' या सूत्राची अनुवृत्ति आहे. उदा० नृ मणाः,

पितृ याणम्; या उदाहरणांत ' ऋ ' हा अवगृह्य आहे म्हणजे पदपाठांत नृ व मनस् आणि पितृ व यान अशी पदें असून नृ व पितृ येथें पदविच्छेद करून थांबावें लागते. यालाच ' अवग्रह ' अशी संज्ञा आहे. 'रषाभ्याम्०' इत्यादि सूत्रानें समानपदांत म्हणजे एकपदातच ऋ, रेफ किंवा ष् आणि नकार असले पाहिजेत, म्हणजे 'संहिता' पाहिजे. प्रस्तुत सूत्र त्याला अपवाद आहे म्हणजे संहिता नसताही णत्व होतें.

टीप--' अवगृह्यते विच्छिद्य पठ्यते इत्यवग्रहः । ऋच्चासौ अवग्रहश्च—ऋदवग्रहः, तस्मात् ' । नुसतीच पदें पाडलीं तर णत्व होत नाहीं.

(३६४९) नश्च धातुस्थोरुषुभ्यः ।८।४।२७

धातुस्थात् । अग्ने रक्षा णः । (ऋ. ७।१५।१३) शिक्षा णो अस्मिन् । (ऋ. ७।३२।६६) उरु णस्कृधि । (ऋ. ८।७५।११) अभी षु णः । (ऋ. ४।३१।६) मो षु णः । (ऋ. १।३८।६)

इति अष्टमोऽध्यायः ।

इति सिद्धान्तकौमुद्यां वैदिकीप्रक्रिया ।

धातूतील ऋकाराच्या रेफाच्या किंवा षकाराच्या पुढील तसेंच उरु शब्दाच्या पुढील नस् शब्दातील नकाराला वेदामध्यें णकार आदेश होतो.

उदा० धातुस्थ--' अग्ने रक्षा णः ' (' हे अग्ने, आमचें रक्षण कर.) ' शिक्षा णो अस्मिन् ' (आम्हाला हें शिकव.) उरु--' उरु णस्कृधि ' --' अभी षु णः सखीनाम् ', ' मो षु णः ';

टीप--' धातौ तिष्ठति इति धातुस्थः रेफः षकारश्च । उरु इति स्वरूपग्रहणम् । षु इति कृतषत्वस्य सुञो ग्रहणम् । न सप्तमीबहुवचनम् । नसिति नासिकादेशस्य नसादेशस्य च सामान्येन ग्रहणम् ' । (सुबोधिनी) ' रक्षा '—मूळ ' रक्ष ' हें लोटाचें रूप असून ' द्व्यचो० ' ।६।३।१३५

यानें दीर्घ होतो. ' कृधि ' हें रूप वेदांत कृ धातूच्या लोटाचें म. पु. ए. व. चें आहे. ' कः– करत्० ' ।८।३।५० यानें मागील विसर्गाला सकार होतो. अभी षु णः '–अभी षु येथें ' इकः सुञि ' ।६।३।१३४ यानें दीर्घ होतो. सर्वत्र अस्मद् शब्दाला ' नस् ' आदेश झालेला ' नस् ' हें रूप आहे.

याप्रमाणें सिद्धान्तकौमुदीतील ' वैदिकी प्रक्रिया ' या प्रकरणांतील आठव्या अध्यायांतील सूत्रांचा मराठी ' बालबोधिनी ' टीकेसह अनुवाद समाप्त झाला व त्याबरोबर ' वैदिकीप्रक्रिया ' या प्रकरणांतील सर्व सूत्रांचा मराठी ' बालबोधिनी ' टीकेसह अनुवाद समाप्त झाला.

इति साठे कुलतिलकायमानगंगाधरात्मजदामोदरशास्त्रिसुतेन महादेवेन कृतायां मराठी बालबोधिन्याख्यायां सिद्धान्तकौमुदीव्याख्यायां वैदिकीप्रक्रिया समाप्तिमगमत् ।

अकारानुक्रमेण

ग्रन्थान्तर्गतसूत्रसूचिका ।

अकाराद्यनुक्रमेण ग्रन्थान्तर्गतवार्तिक-सूचिका ।

मूल्यम्

१०) वैयाकरणसिद्धान्तकौमुदी-चतुर्थो भागः (तिङन्त, लकारार्थ-प्रक्रिया) प्रा. म. दा. साठेकृतमराठीबालबोधिनीटीकया सहिता । 12

११ वैयाकरणसिद्धान्तकौमुदी-पञ्चमो भागः (वैदिकीप्रक्रिया) प्रा. म. दा. साठेकृतमराठी 'बालबोधिनी'-टीकया सहिता) 3·75

१२ वैयाकरणसिद्धान्तकौमुदी-षष्ठोभागः (स्वरप्रक्रिया) प्रा. का. वा. अभ्यंकरकृतमराठी-अनुवादेन सहिता ।

(in the press)

१३) ब्रह्मसूत्रशाङ्करभाष्यम अध्याय २, पाद २ (तर्कपादः) गुजराथी-अनुवादेन-सहितम् by prof. K. V. Abhyankar & Dr. J. M. Shukla 6

१४) दसवेआलियसुत्तम् (दशवैकालिकासूत्रम) with English translation & notes by prof. K. V. Abhyankar 6

15) Mahabhashya of Patanjali (Navahniki) with English translation & notes by prof. K. V. Abhyankar and Dr.. J. M. Shukla Fasciculus I (Ahnikas 1 & 2) 10

१६) ब्रह्मसूत्रशाङ्करभाष्यम् (अध्याय १ पाद १) प. वासुदेवशास्त्री-अभ्यंकरकृतमराठी अनुवादेन सहितम 12

These publications are for sale with Hon. secretary Sanskrit Vidya Parisanstha 635 Sadashiv peth, near Phadatare Chowk Poona 30